शब्द
# रुची

सप्टेंबर २०१९
मूल्य १० रुपये
पृष्ठे ८०



# पुस्तक प्रकाशन क्षणचित्रे









पहिल्या क्षणचित्रात प्रा. भास्कर बंगाळे लिखित 'होरपळ ते हिरवळ' पुस्तकप्रकाशनसमयी **मसाप विभागीय सचिव कल्याणराव शिंदे, ज्येष्ठ पत्रकार सिद्धार्थ ढवळे, प्रा. डॉ. रमेश शिंदे, ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक योगिराज वाघमारे, सुदेश हिंगलासपूरकर, द.ता. भोसले, ज्येष्ठ लेखक डॉ. कृष्णा इंगोले, लेखक प्रा. भास्कर बंगाळे, पुण्यनगरीचे भरतकुमार मोरे.**

दुसऱ्या क्षणचित्रात **सुदेश हिंगलासपूरकर बंगाळे यांच्या वडिलांचा सत्कार करताना.**

तिसऱ्या क्षणचित्रात **भास्कर बंगाळे व छाया बंगाळे सुदेश हिंगलासपूरकर आणि शोभा हिंगलासपूरकर यांचा सत्कार करताना.**

**शेवटच्या क्षणचित्रात लेखक भास्कर बंगाळे आणि त्यांची पत्नी छाया बंगाळे यांचा सत्कार करताना डॉ. द.ता. भोसले, शोभा हिंगलासपूरकर आणि आदी मान्यवर**



पद्मश्री डॉ. विखे पाटील जिल्हा उत्कृष्ट साहित्य पुरस्कार माजी संमेलनाध्यक्ष नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# शब्द रुची

**सप्टेंबर २०१९, वर्ष सातवे**
**अंक पाचवा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
**अभ्यागत संपादक : डॉ. लतिका भानुशाली**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**
**ज्यांची वर्गणी मनिऑर्डरद्वारे १०० अथवा १५० रुपये येईल त्यांना अंक फक्त ६ महिनेच पाठवला जाईल.**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☎ २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com www.granthali.com

**ग्रंथाली ऑफिसची वेळ १ ऑक्टोबरपासून १ ते ६ संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी वाचक व विक्रेते यांनी याची नोंद घ्यावी.**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

- बाली / **द्वारकानाथ संझगिरी** / ५
- एस्टोनिया / **डॉ. शरद वर्दे** / ८
- आर्थर (इलिनॉय) / **विनता कुलकर्णी** / ११
- गोवा / **आदित्य जांभळे** / १४
- लुरे केव्हर्न्स / **नंदिनी महाजन** / १७
- इस्पानिया / **डॉ. सचिन जम्मा** / १९
- वरुणाअस्सीची लोकधाटी / **डॉ. प्रभाकर देसाई** / २२
- दिल्ली तुम्हारी, रूस तुम्हारी / **प्रा. अविनाश कोल्हे** / २६
- एका गावाचं गारूड / **मिलिंद ढेरे** / २९
- अझरबैजान / **सायली घोटीकर** / ३२
- 'पेरू'ची फोड फारच गोड / **मेधा आलकारी** / ३५
- काश्मीर... मनातलं / **डॉ. लतिका भानुशाली** / ३८
- ॲमेझॉन / **डॉ. अनंत पां. लाभसेटवार** / ४४
- राजगुरूनगर / **सचिन जगदाळे** / ४९
- भूतानची भटकंती / **वृषाली वजरीनकर** / ५१

काव्यरंग / ५५
- धनश्री ठोंबरे, गुंजन, साक्षी तावडे

- दानशूर सॅक्लर घराणं आणि अंमली औषधांचा (Opioid) अमेरिकेचा गळफास / **मोहन द्रविड** / ५६

**१९ वे बीएमएम अधिवेशन डॅलस मनोगत / ५९ ते ६२**
- अरुण जोशी, रोहित भानुशाली, शिल्पा अग्निहोत्री, संध्या खैरे, प्रकाश अंबुरे आणि शोभा सुदेश हिंगलासपूरकर

- **ज्योती स्टोअर्सचा अभिनव उपक्रम लेखक तुमच्या भेटीला** / ६९

- प्रकाश जगतातला एक अप्रकाशित सारस्वत **राजेंद्र आंबोसे** / ७०

- पुस्तकप्रकाशन आणि पुरस्कार वृत्तांत / ७२
- ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे** / ७३

## संपादकीय

सप्टेंबरमध्ये गणपती आणि ऑक्टोबरमध्ये दिवाळी. दोन्ही सण आनंदाचे! एक बुद्धीच्या देवतेच्या आराधनेचा सण तर दुसरा प्रकाशाचा दीपोत्सव. या सणांनी मनाला जो आनंद आणि जे समाधान मिळते तोच आनंद प्रवासामुळे मिळतो. नवीन प्रदेश, नवीन गाव, नवीन शहर पाहणे, तेथील रूढी-परंपरा यांना समजून घेणे, त्या मागचा अर्थ-अन्वयार्थ समजून घेणे, हा प्रवासाचा एक भाग असतोच. परंतु त्यानिमित्ताने जगभरातील माणसं वाचता येतात. त्यांच्या अंतरंगात प्रवेश करता येतो. देश भिन्न असला, प्रदेश वेगळा असला तरी मूलभूत प्रेरणा जगाच्या पाठीवर सारख्याच असतात. या सत्याचा साक्षात्कार प्रवासात होतो. प्रवासातील अनुभव माणसाला संपन्न करतात. त्याची दृष्टी व्यापक होते. स्व-भोवती घेरून असलेल्या संकुचित धारणा गळून जातात आणि नवीन निकोप दृष्टिकोन विकसित होतो. याच अनुभूतीचा लेखाजोखा सप्टेंबरच्या अंकात अनेकांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

रूढ अर्थाने सप्टेंबरचा अंक हा प्रवासवर्णन नाही की पर्यटन विशेषांक नाही तर तो विविध प्रांताचा लेखकांनी त्यांच्या दृष्टिकोनातून घेतलेला वेध आहे. प्रत्येक स्थळ प्रेक्षणीय असेलच असे नाही. पण 'पर्यटन दर्शना'च्या पलीकडे एखादी जागा आपल्या भावविश्वाचा अविभाज्य घटक होऊ शकते. अशी मनात रुंजी घालणारी गावं, शहरं, देश या अंकात चित्रबद्ध झाली आहेत. ती स्थळं कधी महाराष्ट्रातील आहेत. कधी महाराष्ट्राच्या बाहेरची तर कधी भारताच्या बाहेरची. पण या स्थळांशी जोडलं गेलेलं आंतरिक नातं लेखकाला भावसंपन्नता प्रदान करते याचाच अनुभव हे लेख वाचताना येईल.

'बाली'तील पर्यटनाच्या पलीकडे जाणारी, हिंदू संस्कृतीचे अंतरंग असलेली, पण बाह्य रूपात मुस्लीम धर्माने नटलेली परंपरा द्वारकानाथ संझगिरी यांना आकृष्ट करते तर एस्टोनियासारख्या देशातील तरुणांच्या, वृद्धांच्या मानसिकतेचा शोध शरद वर्दे घेतात. अमेरिकेसारख्या तंत्रसंपन्न दुनियेत साधेपणाने जगणारी 'आमिष' जमात विनता कुलकर्णी यांना आकर्षित करते तर गोव्याशी जन्मापासूनच जुळलेली नाळ गोव्यापासून दूर गेल्याने आणखीनच घट्ट होते हे आदित्य जांभळेंच्या लेखात निदर्शनास येते. क्षारापासून बनलेल्या लवण गुहा या नंदिनी महाजन यांच्या औत्सुक्याचा विषय आहे. इस्पानियाचे वैद्यकीय आणि सामाजिक जीवन डॉ. सचिन जम्मा यांच्या जिव्हाळ्याचा विषय होतो. अविनाश कोल्हे यांना दिसलेली बौद्धिक दिल्ली आणि प्रभाकर देसाई यांना दिसलेली भावपूर्ण धार्मिक वाराणसी आपल्यालाही मनोमन भावते तर युरोपातील एखादे गाव मिलिंद ढेरे यांच्या भावविश्वाचा हळवा कोपरा बनतो अशीच मेधा आलकारी यांची 'पेरू' देशाची फोड आपल्यालाही गोडच लागते. ॲमॅझॉनमधील जंगलाचं अनंत लाभसेटवार यांनी घडवलेलं दर्शन खूप काही शब्दांपलीकडलं देऊन जातं. पुण्याला नेहमीच जाणं असलं तरी शहीद राजगुरू यांचं गाव 'राजगुरूनगर' किती दुर्लक्षित आहे याची खंत सचिन जगदाळे व्यक्त करतात. वृषाली वजरीनकर भूतानी माणसांच्या आनंदाचे रहस्य आपल्यापुढे ठेवतात. पर्यटनापलीकडचे हे समृद्ध अनुभव वाचकांनाही समृद्ध करतील अशी आशा आहे

याशिवाय अमेरिका येथील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या १९व्या अधिवेशनाला गेलेल्या ग्रंथाली कार्यकर्त्यांनी नी आपले अनुभवकथन केलेत. नेहमीप्रमाणे पुस्तक परीक्षण व इतर साहित्यलेख आहेतच. मोहन द्रविड यांचा औषधांच्या दुनियेत मारलेला फेरफटका वाचकांनाही अंतर्मुख करेल, अशी आशा आहे.

**– डॉ. लतिका भानुशाली**
कॉसमॉस लाऊंज, १० सी, अँजेलिका बिल्डिंग,
निलकंठ ग्रीन्सच्या समोर, ग्लेडी अल्वारिस मार्ग,
मानपाडा, ठाणे (प.) ४००६०७
भ्रमणध्वनी : ९३२२२०७८७८
latikabhanushali@yahoo.co.in

**पुढील अंक हा ऑक्टोबर-नोव्हेंबर दिवाळी विशेष जोडअंक असेल.**




**द्वारकानाथ संझगिरी**

**लेखक, ज्येष्ठ क्रिकेट समीक्षक**


# बाली

भारताच्या गुजराथमधून काही मुस्लीम व्यापारी तिथे गेले. त्यांनी धर्माचाही व्यापार केला. पण तो व्यापार करताना त्यांनी तलवार वापरली नाही. त्यांनी प्रेमाने हिंदू राजांना धर्म बदलायला लावला. ते मुसलमान झाले. राजा मुसलमान झाला म्हणून प्रजेनेही धर्म बदलला. प्रजा मुसलमान झाली तलवारीशिवाय! अरबी संस्कृती त्यांच्यावर लादली गेली नाही. त्यामुळे अंतरंग हिंदू राहिलं, शरीरावर फक्त इस्लामचे कपडे चढवले गेले.

**मी** निदान अर्ध जग तरी फिरलोय. कधी निसर्गाने वेड लावलंय. कधी तिथल्या इतिहासाने मला गुंतून ठेवलंय. कधी नशिल्या रात्रीने खिळवून ठेवलंय तर कधी संस्कृतीने आ वासायला लावलंय. वेगवेगळ्या स्थळाचं वेगवेगळं वैशिष्ट्यं!

असाच एक सांस्कृतिक दृष्ट्या वेगळा देश, वेगळी संस्कृती म्हणजे इंडोनेशियातील बाली. बालीमधील विविध प्रकारच्या संस्कृतीने, विविध मंडळींना मोहित केलंय. चार्ली चॅपलिन, अमेरिकेचे प्रेसिडेंट रुझवेल्ट आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांना वेगवेगळ्या कारणांनी बालाने मोहित केलं. पंडित नेहरू बालीला 'जगाची पहाट' असं म्हणत. पाश्चिमात्त्यांना बालीकडे पाहण्याचा दृष्टिकोन हिचमन पावेल नावाच्या डच प्रवाशाने घडवला. त्याने लिहिलं, ''एक स्त्री नितंब हलवत आमच्याकडे आली. तिच्या खांद्यावरचा पदर पडला (तो पदराला स्कार्फ असं म्हणतो) आणि ब्रॉण्डच्या नाडल्ससारखे तिचे स्तन आम्हाला दिसले.'' त्यानंतर बालीमधील स्त्रियांचे नाच, त्यांचं नटणं, त्यांची चित्रकला, त्यांची मूर्तिकला वगैरे गोष्टी त्याने पाश्चात्त्य जगाला सांगितल्या. त्यामुळे अमेरिकेत न्यूयॉर्कमध्ये 'सिन्स ऑफ बाली' (बालीतील पापं) नावाचा नाईट क्लब उघडला गेला. नंतर मानववंशतज्ज्ञ मागरिट किडने जगाला कळवलं की तिथे अनावृत्त स्त्रिया दिसल्या तरी तिथे अनिर्बंध शरीर व्यवहार नाही. स्त्री लपंट म्हणून प्रसिद्ध असलेला चार्ली चॅपलिन बालीला गेला. पण त्याला ऐकीव माहिती आणि सत्य ह्यात उत्तर आणि दक्षिण ध्रुवाएवढं अंतर आहे हे जाणवलं. मी हे वरचं कुठलंही वर्णन वाचून बालीला गेलो नाही. अगदी आई शप्पथ सांगतोय!

पाश्चात्त्य देशात बालीकडे 'सेक्स पॅराडाईज' म्हणून पाहिलं जातं. मी तिथे गेलो कारण तिथल्या संस्कृतीची आतील बाजू मला पहायची होती. बाली हे बेट इंडोनेशियात आहे. इंडोनेशिया हा मुस्लीम देश आहे. जगातले अनेक मुस्लीम देश मी फिरलोय. त्यातले तुर्कस्थान आणि इंडोनेशिया हे इतरांपेक्षा खूप वेगळे आहेत. तुर्कस्थान आता पुन्हा कट्टरवादी होण्याचा प्रयत्न करतोय. इंडोनेशिया मात्र अजूनही धर्माऐवजी देशाची संस्कृती जपतो. 'कला-संस्कृती जपतो' म्हणजे काय हा प्रश्न तुमच्या ओठांवर येईल. तिथली पूर्वीची म्हणजे इस्लामीकरणाच्या अलीकडची संस्कृती अजून आहे तशीच



**बाली वॉटर टेंपल**

आहे. ती पुसली गेलेली नाही. उदा. कुराण हा त्यांचा पवित्र ग्रंथ आहे पण रामायण, महाभारत हे त्यांचे राष्ट्रीय ग्रंथ असतात. तिथल्या मुस्लीम ललना ‘मला भीमपुत्र घटोत्कचासारखा मुलगा होऊ दे’ असा देवाकडे नवस करतात. आपल्या इथल्या कट्टर हिंदू बायकांनीही असा नवस केल्याचे माझ्या ऐकिवात नाही. ते शूर माणसाला चक्क ‘पांडव’ म्हणतात. हिंदू संस्कृतीशी गाठी जुळल्यामुळे त्यांच्या भाषेवर संस्कृतचा प्रभाव जाणवतो. उदा. ते बाईला ‘वनिता’ म्हणतात. थोडक्यात वनिता समाज तिथेही आहे. बरं हा फक्त योगायोग नाही. तिथे सर्व्हिसला चक्क भक्ती आणि प्राध्यापकांना गुरू म्हणतात! प्राचार्य ‘महागुरू’ असतो. आपल्या भाषेशी त्यांचा किती जवळचा संबंध आहे पाहा.



**बारोंग मुखवटा**

ही भारतीय संस्कृती अर्थातच भारतातून गेली. तिथला धर्महीं हिंदू धर्मच होता. कारण तिथले राजे हिंदू होते. मग भारताच्या गुजराथमधून काही मुस्लीम व्यापारी तिथे गेले. त्यांनी धर्माचाही व्यापार केला. पण तो व्यापार करताना त्यांनी तलवार वापरली नाही. त्यांनी प्रेमाने हिंदू राजांना धर्म बदलायला लावला. ते मुसलमान झाले. राजा मुसलमान झाला म्हणून प्रजेनेही धर्म बदलला. प्रजा मुसलमान झाली तलवारीशिवाय! अरबी संस्कृती त्यांच्यावर लादली गेली नाही. त्यामुळे अंतरंग हिंदू राहिलं, शरीरावर फक्त इस्लामचे कपडे चढवले गेले.

पण बाली त्यापासून अलिप्त राहिला. त्यामुळे बालीचा धर्म हिंदू राहिला. आज ९३ टक्के हिंदू बालीत आहेत. तिथली संस्कृती कट्टर हिंदू आहे. मी तिथे गेलो होतो तेव्हा नुकताच गुढीपाडवा सण होऊन गेला होता. अक्षरश: घरोघरी गुढी उभारल्या होत्या. तिथे सर्वसाधारण वर्ष ३६० दिवसाच आहे. पण देवांचं-सणाचं वर्ष २१० दिवसांचं आहे. म्हणून प्रत्येक गुढीपाडवा तिथे ३० आठवड्यांनी येतो. तिथे प्रत्येक घरासमोर तुम्हाला रोज फुलं, पाकळ्या, फळं, भात आणि अगरबत्तीचा नैवेद्य ठेवलेला दिसेल. तो नारळाच्या झाडापासून तयार केलेल्या द्रोणात दिसेल. त्याला ते ‘चनंगसारी’ म्हणतात. तिथला आमचा देवा गाईड मला सांगत होता, ‘‘देवाला नैवेद्य अर्पण करून दिवसाची मंगलमय सुरुवात करायची आमची परंपरा आहे.’’ मुळात संस्कृतमध्ये ‘बाली’ म्हणजे अर्पण करणे. (मला संस्कृत येत नाही. कुणीतरी हे सांगितलं तेव्हा कळलं) पण आपल्यापेक्षा त्यांचा नैवेद्य अधिक देखणा असतो. तो चार फुटी उंचीचा असतो. तो नैवेद्य कमनीय स्त्रिया डोक्यावर बॅलन्स करत चालत जातात. त्यांना तसं नैवेद्य घेऊन जाताना पाहाणे हा एक सौंदर्यानुभव असतो. त्यांच्याकडे आपल्याप्रमाणे ब्रह्मा-विष्णू-महेश आहेत. पण ते ‘संघयांगविधीवासा’ या मुख्य देवतेचे अवतार आहेत असं मानलं जातं. तिथे देवळात मूर्ती असेलच असं नाही. त्यामुळे गाभाऱ्याला महत्त्व नाही. म्हणूनच कुणी गाभाऱ्यात जायचं, कुणी नाही असा भेदभाव नाही. नैवेद्य ‘फ्लेमिंग’ नावाच्या मोकळ्या जागेवर ठेवतात. देव तिथे येऊन आडवा हात मारतो, अशी त्यांची धारणा आहे. तिथे भटजी असतात पण ‘बडवे’ नसतात. दक्षिणेसाठी मागे लागत नाहीत. तीर्थाला तिथेही ‘तीर्थ’ म्हणतात. ते आपल्याप्रमाणे प्राशनही केलं जातं. पण बऱ्याचदा भटजी ते डोक्यावर शिंपडताना पहायला मिळतात. आमचा देवा गाईड सांगत होता, ‘‘ते तीर्थ म्हणजे देवाने माणसाला दिलेलं ‘गिफ्ट’ आहे.

बालीत २० हजारापेक्षा जास्त देवळं आहेत. तिथे म्हणतात, ‘‘हातात दहा फळं घ्या. ती दहा दिशेला उडवा. त्यातली सात देवळांवर पडतील. त्यातली नऊ देवळं अतिमहत्त्वाची असतात. त्यातली चार मी पाहिली. देवळाच्या रचनेचा विचार केला तर असं जाणवतं की तिथलं आर्किटेक्चर आपल्या देवळांपेक्षा वेगळं आहे. कारण हिंदू धर्म तिथून गेल्यावरही तिथल्या मूलभूत चालीरीती मुस्लीम धर्मात मिसळून गेल्या. मातीतली संस्कृती अशी नेहमीच मिसळते. बौद्ध धर्मही काही वर्षं तिथे नांदत होता. त्यामुळे बौद्ध पॅगोडाचा प्रभावही तिथल्या मंदिरांवर आढळतो. पण काही चालीरीती आपल्या हिंदू धर्माप्रमाणे आहेत. काही वेगळ्या. सध्या तरी तिथे मंदिर प्रवेश सर्वांनाच आहे. पूर्वी तिथे ब्राह्मणांचं वर्चस्व होतं. तिथल्या साम्यवादी क्रांतीनंतर ते कमी झालं. तिथे वर्णव्यवस्था आहे पण जातीचा पसारा मोठा नाही. तिथेही रजस्वला स्त्रीला देवळात प्रवेश नाही. पण आपल्या टिपिकल हिंदू धर्मापेक्षा एक वेगळी गोष्ट तिथे पाहायला मिळते. तिथे बायका कुंकू लावत नाहीत. तिथे कुंकू हा सौभाग्याचा अलंकार नाही तर तिथे सौंदर्य

वाढवायलाच फक्त कुंकू लावलं जातं.

बालीतलं नृत्य, संगीत आणि इतर संस्कृती हा खरं तर स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. लेखाचा मर्यादेत त्याला कोंबणं म्हणजे धबधबा बाटलीत कोंबण्यासारखा आहे. रामायण-महाभारत हा त्यांच्या खेळाचा, आयुष्याचा भाग आहे. राम-लक्ष्मण, भीम-अर्जुन वगैरे मंडळी इंडोनेशियाचीच आहेत असं त्यांना वाटतं. आपल्याकडे भीम-अर्जुनाचं जेवढं महत्त्व आहे तेवढं नकुल-सहदेवचं नाही. तिथे नकुल-सहदेवाच्या शेकडो कथा आहेत. मुस्लिम इंडोनेशियाला बुद्धापेक्षा रामायण-महाभारत जवळचं वाटतं. पाकिस्तानमध्ये मोंहदजडो-हडप्पा आहेत. पण तिथल्या नादान सरकारला ते आपलं संचित वाटतच नाही. दोन इस्लामिक राष्ट्रांमधला हा फरक आहे.

तिथे मी सांस्कृतिक नृत्य पाहिलं. एक होता बॅटाँग डान्स. भूतपिशाच्च, ब्लॅक मॅजिकच्या दुष्ट प्रवृत्तींशी लढणाऱ्या सिंहासारखा दिसणाऱ्या प्राण्याची कहाणी आहे. त्यात चक्क बकासुराची कथा आहे. सहदेवाची कथा आहे, कुंतीची कथा आहे.

दुसरा एक 'क्रिस' डान्स होता. क्रिस म्हणजे सुरा. तो सुऱ्यांचा डान्स होता. गंमत म्हणजे तिथेही जाणवलं की बालीमध्ये आपल्या सतीप्रमाणे एक रीत होती. नवऱ्यासाठी सती जाणं एवढीच चाल फक्त तिथे नसावी.

एका डच प्रवासाने तिथल्या सतीचं वर्णनं लिहून ठेवलं आहे. त्यात एक स्त्री मेल्यावर तिच्या २२ दासींनी सती जाण्याचं ठरवलं. त्या पांढरी वस्त्र घालून राणीच्या चितेजवळ उभ्या होत्या. त्यांना एक रत्नजडित सुरा दिला गेला. त्यांनी हाताची नस कापली. त्याचं रक्त आधी ओठाला लावलं. मग कपाळाला लावलं. तो सुरा मारेकऱ्याकडे दिला गेला. त्याने तो थेट त्या दासींचा बरगड्यातून हृदयापर्यंत नेला. त्यांनी हूं की चूं केलं नाही. हा क्रिस डान्स त्या जुन्या जखमांवरची खपली काढणारा वाटतो.



बालीमधील पारंपरिक सांस्कृतिक नृत्य

तिथलं सर्वात लोकप्रिय नृत्य म्हणजे वेचक नृत्य. ते रामायणावर बेतलेलं आहे. त्यात अशोकवनात बसलेली सीता आहे. तिला सोडावायला गेलेला मारुती आहे. अर्धनग्न माणसांच्या रूपात माकडं आहेत. गंमत म्हणजे अशोकवनातली सीता चक्क अलंकाराने नटलेली होती आणि माकडं तोंडाने 'चक्‌चक्‌' आवाज काढतात. तो इतका मोठा असतो की हॉटेलात जाऊन लताची गाणी ऐकली तरी तो कानातून जात नव्हता.

बालीमध्ये जाऊन आल्यावर आपण एका थोड्या वेगळ्या भारतातून फिरून आलो आहोत असे वाटत राहते.

**- द्वारकानाथ संझगिरी**
भ्रमणध्वनी : ९८२०१९७९८३
dsanzgiri@hotmail.com

**॥ग्रंथाली॥**

**व्हाईट लिली**



हा काव्यसंग्रह साहित्य आणि समाज या मळलेल्या वाटेकडे फिरकत नाही. समाजमनाशी, त्यातल्या वेदनेशी दुर्दैवाने हा काव्यसंग्रह एकरूप होत नाही. ते हृद्य चित्रण यात येत नाही. पण यात वारा येतो, तारा येतो, गंगेचा घाटचिरा येतो. रोजच्या ताणतणावातून दूर जात सहज ओघवत्या शैलीत लिहिलेल्या ह्या प्रेमकविता आहेत.

**जितेंद्र कुवर**

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**



**डॉ. शरद वर्दे**
जागतिक व्यवसाय तज्ज्ञ

# एस्टोनिया
## शापित गंधर्वभूमी

रशियनांनी स्थानिक भाषेची हकालपट्टी करून सगळे अभ्यासक्रम रशियन भाषेत बदलून टाकले. मातृभाषेतून शिकण्याला बंदी घातल्याबद्दलची सल स्थानिक वयस्कर लोकांनी मला अनेकदा बोलून दाखवली. स्वातंत्र्य मिळाल्यावर एस्टोनियानं सरस्वतीच्या दरबारात लगोलग मातृभाषेची पुनर्स्थापना केली. आपल्या एकसहस्रांश लोकसंख्या असलेल्या राष्ट्राचं हे राष्ट्रभाषाप्रेम पाहिलं की मन गदगदून जातं.

हिवाळ्याचे दिवस. सन १९८८. टॅलिनच्या विमानतळावर उतरलो. राजधानीचं शहर. देशाचं नाव एस्टोनिया. बाल्टिक सागरकिनाऱ्यावर वसलेल्या बाल्टिक रिपब्लिक्स या नावानं ओळखल्या जाणाऱ्या तीन छोटेखानी देशांच्या पुंजक्यांपैकी एक. मला न्यायला तिकडच्या एका कंपनीचे वयस्कर अधिकारी आले होते. खुशालीच्या औपचारिक चौकश्या करत असतानाच शहर संपलं. मी खिडकीबाहेर नजर टाकली. रस्त्यावर बर्फ. बर्फापलीकडे बर्फ. टपावर बर्फ. चाकांखाली बर्फ. दाही दिशांना एकच एक सफेद रंग. मी धसकून विचारलं, आपण रस्त्यावरून जातोय की बर्फाळ तलावावरून?

''खाली रस्ताच आहे.''

''मला तर दिसत नाही.''


''मलाही. पण या ड्रायव्हरला समजतं.''

कसं ते मी विचारलं नाही. देवाचं नाव घेत डोळे मिटून कुडकुडत बसून राहिलो. तासाभरानं कारखान्यात सुखरूप पोहोचलो तेव्हा कुठे जिवात जीव आला.

नंतर सतत येणंजाणं होत राहिलं. सुरुवातीला अबोल वाटणारे लोक बोलायला लागले. आजूबाजूला फिरवू लागले. मला आवडला तो देश. म्हटलं तर सुदैवी, म्हटलं तर कमनशिबी.

देशाचा ज्ञात इतिहास किमान दोन सहस्रकांचा. एस्ट नावाचे लोक तिथे वस्तीला आले, म्हणून नाव एस्टोनिया. परंतु मानवी वस्ती अकरा हजार वर्षांपूर्वी झाल्याचे सबळ पुरावे आहेत. त्यामुळे संस्कृतीची पाळंमुळं खोलवर रुजलेली दिसतात. केवळ तेरा लाख लोकसंख्येच्या या छोट्या देशात सव्वा लाखांहून अधिक लोकगीतं लेखी स्वरूपात जतन करून ठेवली आहेत. यावरून एस्टोनियन लोकांच्या सांस्कृतिक जाणिवेची वीण किती घट्ट आहे हे कळतं. लोकगीतांसोबत समूहगान आलंच. त्यात तर या एस्टोनियन लोकांचा हात कोणीच धरू शकणार नाही. गेली किमान दोनशे वर्षं समूहगानाचे महोत्सव या देशात ठिकठिकाणी भरवले जातात. म्हणूनच पर्यटनविश्वात एस्टोनियाची 'गाणारा देश' अशी ओळख आहे.

मात्र नशीब खत्रुड, कारण त्यांना स्वातंत्र्य कधी मनसोक्त उपभोगायला मिळालंच नाही. डेन्मार्क, स्वीडन, पोलंड, जर्मनी या देशांच्या सबळ सत्ताधीशांनी निरनिराळ्या कालखंडात एस्टोनियावर कब्जा केला. मग आले रशियन. त्यामुळे मांडलिकांना दिली जाणारी अपमानास्पद वागणूक कायम मिळत राहिली. देशाची, तिथल्या लोकांची आणि नागरी सुविधांची दुर्दशा झाली. दोनशे वर्षं रशियन



टॅलिन शहर

जुलूम सहन केल्यानंतर एकदाचं स्वातंत्र्य मिळालं खरं, पण ते अल्पजीवीच ठरलं. केवळ बावीस वर्षांतच सोव्हिएत युनियनच्या बावट्याखाली रशियानं पुनश्च ताबा घेतला. त्यातून सुटका झाली ती १९९१ साली. म्हणून या देशात दोन स्वातंत्र्यदिन साजरे होतात. पहिला मूळ दिवस आणि दुसरा स्वातंत्र्यपुनर्स्थापनादिन.

सतत पारतंत्र्यातच राहिल्यामुळे साहजिकच लोकांची मानसिकता नाजूक झाली. नवख्या माणसाशी ते पटकन सलगी करत नाहीत. मोजूनमापून बोलतात. सावधपणे वागतात. चेहरा कोरा ठेवतात. मनात काय चाललं आहे त्याचा थांगपत्ता लागू देत नाहीत. रशियन कम्युनिस्टांची दंडेली सहन करावी लागली त्याचा हा परिणाम. तरुण पिढी मात्र आता मोकळेपणानं वागायला लागली आहे.

स्वातंत्र्यासाठी एस्टोनियन जनतेनं लढा दिला तोसुद्धा त्यांच्या पारंपरिक समूहगान संस्कृतीच्याच माध्यमातून. म्हणजे १९८८ पासून सलग चार वर्षं जागोजागी देशभक्तीपर गीतगान केलं. एकदा तर राजधानीच्या टॅलिन शहरापासून दक्षिणेच्या लिथ्वानिया राष्ट्राच्या राजधानीपर्यंत सहाशे किलोमीटर लांबीची मानवी साखळी करून समूहगान केलं. या अभूतपूर्व घटनेची बाह्य जगानं आवर्जून नोंद घेतली आणि एस्टोनियाच्या अशा आगळ्यावेगळ्या लढ्याला 'गानक्रांती' ही समर्पक उपाधी दिली.

या देशावर परकीयांनी, विशेषतः रशियनांनी अनन्वित दडपशाही केली. निसर्गानं मात्र प्रसन्नतेची मनसोक्त उधळण केली आहे. उत्तर आणि पश्चिम दिशांना अथांग सागर तर पूर्वेला विस्तीर्ण तलाव. समुद्रात इवली इवली बावीसशे बेटं. मुख्य भूप्रदेशाच्या निम्म्या भागात दाट अरण्य, वैविध्यपूर्ण वन्यजीवन, छोटेमोठे तलाव, बारमाही नद्या आणि पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या देखण्या चौपाट्या. वस्तीच्या आसपास पुरातन गढ्या आणि सातशे वर्षं वयाचे दणकट किल्ले.

कौतुक केलं पाहिजे ते या देशानं अल्पावधीत घेतलेल्या उत्तुंग भरारीचं. सोव्हिएत युनियनमधून बाहेर पडल्यावर केवळ पाव शतकात तो देश अक्षरशः शून्यातून वर आला. निम्मी लोकसंख्या तेव्हा दारिद्र्यरेषेखाली होती. आता तो युरोपियन युनियनमध्ये समाविष्ट केला गेलेला एक प्रगत देश आहे. तब्बल ९९.८० टक्के नागरिकांना साक्षर करून तो जगातल्या दोनशे देशांच्या यादीत दुसऱ्या क्रमांकावर विराजमान झाला आहे.

रशियाकडून मिळालेल्या लाचलुचपतीच्या वारशाचा बिमोड करण्यासाठी त्यानं जनतेत माहितीतंत्रज्ञानाचा झटपट प्रसार करून त्यावर आधारित इ-गव्हर्नन्स प्रणाली कार्यान्वित केली. त्यामुळे नागरिकांना सरकारी कामासाठी एका दमडीचीही पानसुपारी द्यावी लागत नाही. नवीन उद्योग स्थापन करण्यासाठी लागणाऱ्या सर्व परवानग्या कोणत्याही सरकारी कार्यालयात चकरा न मारता केवळ अर्ध्या दिवसात ऑनलाइन मिळतात. सार्वत्रिक निवडणूक ऑनलाइन घेणारा तो जगातला पहिला देश आहे. लेखी मजकुरापासून व्हिडिओ चॅटिंगपर्यंतच्या सर्व दूरसंदेशवहनासाठी जगभर वापरली जाणारी 'स्काइप' ही प्रणाली २००३ साली विकसित झाली ती याच छोटेखानी देशात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अवघ्या ३३ वर्षांच्या एका दूरदर्शी तरुणाकडे पंतप्रधानपद सोपवलं गेलं आणि त्यानं मंत्रिमंडळात तरुण सहकारी घेतले त्याचा हा दृश्य परिणाम.

तंत्रज्ञान आत्मसात करण्यासोबत या देशाच्या नागरिकांनी पुरोगामी विचारशैलीचाही अंगिकार केला. तिथे आता कोणत्याच धर्माचं अवडंबर माजवलं जात नाही. खरंखुरं निधर्मी राष्ट्र आहे ते. सध्या तब्बल सत्तर टक्के एस्टोनियन लोक आपण निधर्मी असल्याचं जाहीर करतात. उरलेल्यांपैकी फक्त १४ टक्के लोक त्यांच्या धर्मातल्या कर्मकांडांचं पालन करतात. त्यामुळे तिथे धार्मिक दंगेधोपे होत नाहीत.

एस्टोनियात पाऊल टाकल्यावर सुरुवातीलाच पाहावं ते त्यांच्या राजधानीचं शहर टॅलिन. मध्ययुगीन वास्तुकलेचा अनोखा आविष्कार. शहराच्या मध्यभागी एक टेकडी आहे. त्यावर पंधराव्या शतकात बांधलेल्या इमारती आणि दगडी रस्ते आहेत. सहाशे वर्षांची कठोर बर्फवृष्टी अंगावर झेलल्यावर नखही वाकडं न झालेल्या या वास्तू पाहिल्या की वीस वर्षांत खिळखिळे होणारे आपले पूल नकळत आठवतात.

त्यानंतर पाहावं ते टॅर्टू शहर. देशातलं महत्त्वाचं आणि चारशे वर्षांचा इतिहास मिरवणारं विद्यापीठ इथे आहे. शिक्षणाचं माध्यम एस्टोनियन भाषा. परकीय सत्ता सतत उरावर बसलेली असूनही



**एस्टोनिया – डान्स फेस्टिव्हल**


**इस्टोनिया समुद्रकिनारा**

राष्ट्रभाषेची कास या विद्यापीठानं सोडली नाही. अपवाद रशियन हुकूमशाहीचा. रशियनांनी स्थानिक भाषेची हकालपट्टी करून सगळे अभ्यासक्रम रशियन भाषेत बदलून टाकले. मातृभाषेतून शिकण्याला बंदी घातल्याबद्दलची सल स्थानिक वयस्कर लोकांनी मला अनेकदा बोलून दाखवली. स्वातंत्र्य मिळाल्यावर एस्टोनियानं सरस्वतीच्या दरबारात लगोलग मातृभाषेची पुनर्स्थापना केली. आपल्या एकसहस्रांश लोकसंख्या असलेल्या राष्ट्राचं हे राष्ट्रभाषाप्रेम पाहिलं की मन गदगदून जातं.

त्यानंतर आवर्जून भेट द्यावी ती तिथल्या वस्तुसंग्रहालयांना. सांस्कृतिक वारसा जपणं हे एस्टोनियाच्या नसानसात इतकं भिनलं आहे की तिथे अडीचशेहून अधिक वस्तुसंग्रहालयं आहेत.


एस्टोनियन संस्कृतीचं नाणं खणखणीत वाजतं ते पावलोपावली स्वागत करणाऱ्या 'सॉना' आणि 'स्पा' केंद्रांमध्ये. एस्टोनियात जाऊन या संस्कृतीचा अनुभव न घेणं म्हणजे आग्र्याला जाऊन ताजमहाल न बघण्यासारखा बिनडोकपणा करणं. सुगंधित तेलमालिश ते थेट चिखलम साजपर्यंतचे अनेक लोकप्रिय पर्याय स्पाकेंद्रात असतात. सॉनाबाथ सेंटर म्हणजे त्यांचं पारंपरिक आरोग्यकेंद्र. 'सब बीमारी की दवा' म्हणजे त्या आजाराला पळवून लावणारी समुचित द्रव्यफवारणी करून दिला जाणारा सॉनाबाथ. अंगावर बोटभर चिंधीही न ठेवता वाफाळत्या सॉनाकेबिनमध्ये शिरणं ही समाजमान्य प्रथा आहे; पण आपण टॉवेल गुंडाळून गेलो म्हणून कोणी हटकतही नाही.

स्वातंत्र्य मिळाल्याचा पुरेपूर फायदा घेऊन एस्टोनियानं झपाट्यानं प्रगती केली, तरी सर्व काही आलबेल आहे असं नाही. तरुण पिढी अस्वस्थ आहे. लग्नसंस्थेवरचा विश्वास डळमळत होत आहे. 'लिव्ह इन रिलेशनशिप' जोडप्यांचं प्रमाण वाढत आहे. जन्मप्रमाण घटत आहे. अर्थात देश झपाट्यानं वयस्कर होत आहे. शिवाय तिथली एकचतुर्थांश लोकसंख्या रशियन वंशाची आहे. त्यांची निष्ठा रशियाला वाहिलेली आहे. या लोकांना हाताशी धरून साम्राज्यवृद्धीची हाव जोपासणारे रशियन सत्ताधीश पुन्हा एकदा आपला सार्वभौम देश गिळंकृत करतील अशी रास्त भीती एस्टोनियन जनतेला सतत भेडसावत असते.

**– डॉ. शरद वर्दे**
भ्रमणध्वनी : ९८२१०५२७५७
vardesd@gmail.com

**॥ग्रंथाली॥**

# होरपळ ते हिरवळ




**प्रा. भास्कर बंगाळे**

दारिद्र्य आणि अडचणीच्या अंधारातून स्वप्नपूर्तीच्या प्रकाशाकडे, विकासाकडे असा प्रवास करणारे ध्येयवादी माणसाचे स्वकथन. आयुष्यात जगलेल्या, भोगलेल्या, तनामनाला जाचलेल्या मनात स्मृतीरूपाने साचलेल्या रसरशीत अनुभवांचे वर्णन करणारे ग्रामीण ढंगातले लेखन मनाला भावणारे आहे. प्रयत्नातून पराक्रमाकडे अन् दुःखातून यशाकडे जाणारी ही कथा अंतर्मुख करून अस्वस्थ करते व ती वाचकांशी संवादातून सख्य साधते. आजच्या पिढीला हे स्वकथन प्रेरणादायी ठरेल यात शंका नाही.

**– द.ता. भोसले**
ज्येष्ठ साहित्यिक, पंढरपूर

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**




**विनता कुलकर्णी**

लेखिका, प्राध्यापक (अमेरिका, शिकागो)


# आर्थर (इलिनॉय)

## अमेरिकेतील एक खेडे
## हिअर यू आर अ स्ट्रेंजर ओन्ली वन्स

वेगवान तंत्रयुगात, घोडा आणि बग्गी हे रोजचे वाहन आणि तंत्रज्ञानाचा शक्य तितका कमी वापर अशी जीवनशैली स्वखुशीने अवलंबणारे काही लोक अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रात राहतात हे विशेषच म्हणायचे! सध्याच्या डिजिटल मीडियाच्या जमान्यात आपला स्वत:चा फोटो न काढणारे आमिष लोक विरळाच.

सध्याच्या तंत्रयुगात संगणकीय यंत्रणा, दूरध्वनी, सेलफोन, दुचाकी/चार चाकी वाहने... असे सगळ्या बाबतीत 'हाय स्पीड'च्या ध्यासाने माणसाचे दैनंदिन जीवन अधिकाधिक यंत्राधिन होत आहे. पळा पळा कोण पुढे पळे तो... अशा या वेगवान तंत्रयुगात, घोडा आणि बग्गी हे रोजचं वाहन आणि तंत्रज्ञानाचा शक्य तितका कमी वापर अशी जीवनशैली स्वखुशीनं अवलंबणारे काही लोक अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रात राहतात हे विशेषच म्हणायचे!

गेली काही वर्षे कामानिमित्त, शिकागोपासून १६० मैल अंतरावर वसलेल्या डिकॅटर या गावी आठवड्यातील काही दिवस जाण्याचा योग आला. या डिकॅटर गावामध्ये सार्वजनिक ठिकाणी काही वेळा मला आमिष व्यक्ती दिसतात. त्यामुळे त्यांची जवळपास वसाहत असावी असा अंदाज केला. जरा शोध घेतल्यावर समजलं, की डिकॅटरपासून केवळ ३२ मैलांवर आर्थर नावाच्या खेड्यात 'आमिष' वसाहत आहे. मग मी एक दिवस ठरवून आर्थर खेडेगावास भेट दिली. गाव जवळ आलं, आणि गावाच्या वेशीजवळ, घोडागाडीच्या चित्रासह 'SHRE the ROD' असा 'ट्रॅफिक साईन बोर्ड' दिसला. ताशी दहा मैल वेगाने पळणाऱ्या डौलदार ट्रॉटरसह (Trotter – शर्यतीसाठी पळण्याचे प्रशिक्षण असलेला घोडा) अनेक लहानमोठ्या बग्ग्या, रस्त्यांवर धावताना दिसू लागल्या. इथल्या रस्त्यांवर घोड्यांच्या दमदार टापांचा आवाज हा आर्थर गावाचा जणू 'सांऊड ट्रॅक' असून 'पर्यटकांनो, आपली वाहने हळू चालवा' असेच जणू तो सूचित करतोय असं वाटू लागलं.

आर्थर गावात शिरल्यावर सर्वप्रथम तेथील माहितीकक्षाला भेट दिली. या भेटीत तेथील कर्मचाऱ्यानं एका वृद्ध गावकऱ्याशी परिचय करून दिला. त्यांच्या घोडागाडीतून मी गावात फेरफटकाही मारला.

मात्र त्यांनी त्यांचा स्वत:चा फोटो काढण्यास नकार दिला. जुन्या पिढीतील बहुतेक आमिष लोक फोटोग्राफीपासून चार हात दूर आहेत. 'काढला सेल्फी, लावला सोशल मीडियाद्वारे साऱ्या जगासमोर (By Public View Setting)... असे- सार्वजनिक आणि वैयक्तिक आयुष्याच्या सीमारेषा धूसर करणाऱ्या सध्याच्या डिजिटल मीडियाच्या जमान्यात आपला स्वत:चा फोटो न काढणारे आमिष लोक विरळाच. आर्थर गावकऱ्यांशी झालेल्या गप्पागोष्टींतून या आमिष लोकांबद्दल बरीच माहिती मिळाली.

आमिष जीवनशैली आणि मेनानी चर्चची स्थापना



अमिष लोकांची बग्गी

स्वित्झर्लंडमध्ये जेकब मन यांनी केली. मन हे व्यवसायाने शिंपी होते. जगात चाललेली युद्धे, भौतिकवाद आणि छचोरपणा त्यांना पसंत नव्हता. शिस्तबद्ध आणि साधे जीवन याचा त्यांनी पुरस्कार केला. १६३९ साली हे मेनानी चर्च-प्रणालीचे लोक धार्मिक स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अमेरिकेला आले. कालांतराने ते चर्च आमिष आणि हाऊस आमिष अशा दोन गटांमध्ये विभागले गेले. आर्थर खेड्यातील आमिष लोक हाऊस आमिष पंथाचे आहेत. उत्तर अमेरिकेत आमिष समाजातील साधारण २०-३० कुटुंबे एकत्रितपणे स्थलांतरित होऊन त्यांनी वसाहती निर्माण केल्या. अमेरिकेतील 'ओहायो स्टेट युनिव्हर्सिटी'च्या एका पाहणीनुसार अमेरिका व कॅनडा मिळून सध्या पाचशेपेक्षा अधिक आमिष वसाहती आहेत. २०१०च्या जनगणनेनुसार आणि त्यानंतर आमिष लोकसंख्यावाढीच्या निर्देशांकानुसार सध्या कॅनडा व अमेरिका या देशांत विविध राज्यांमधील सर्व आमिष वसाहतींची मिळून लोकसंख्या सुमारे ३,५०,००० आहे.

इसवी सन १८७०च्या सुरुवातीस, इलिनॉय राज्यातील पॅरिस आणि डिकॅटर या खेडेगावांच्या हद्दीत नवीन रेल्वेलाईन टाकण्यात आली. त्यानिमित्ताने रेल्वेमार्गाच्या पलीकडे लोकवस्ती होऊ लागली. रेल्वेमार्गाचे मालक रॉबर्ट जी. हेर्वे यांनी या वसाहतीला ग्लास्को असे नाव दिलं. परंतु या गावाची नावनोंदणी करताना लक्षात आलं, की इलिनॉयमध्ये अगोदरच ग्लास्को गाव आहे. मग हेर्वे यांनी, ग्लास्कोऐवजी आपल्या लाडक्या भावाच्या नावावरून या गांवाचे 'आर्थर' असे नामांतर केलं. हे खेडेगाव अमेरिकेतील इलिनॉय राज्याच्या पूर्व-मध्य परिसरात असून तेथून ३०-३५ मैल परिसरात डिकॅटर, अर्बाना शॅम्पेन अशी जरा तुलनेने मोठी शहरे आहेत. आर्थर गावाचे वेगळेपण म्हणजे येथील आमिष वसाहत आणि त्यांची उद्योजकता!

१९६४ मध्ये सकस शेतजमिनीच्या शोधार्थ तीन आमिष पुरुष अमेरिकेतील पेन्सिल्वेनिया आणि मेरीलँड राज्यातून इलिनॉय राज्यात आले. आर्थर खेड्यातील जागा त्यांना पसंत पडली. मग त्यांनी आपले कुटुंब आणि काही मित्रांनाही येथे बोलावून घेतलं. सुरुवातीला हाताच्या बोटावर मोजता येतील इतपतच आमिष रहिवासी असलेल्या या खेड्यांत आता आमिष लोकसंख्या सुमारे चार हजारपेक्षा अधिक आहे. शेती व्यवसाय करणारी अनेक आमिष कुटुंबं या परिसरात राहतात. कित्येकांना राज्यसरकारकडून सेंटेनीअल फार्मचे (कुटुंबामधे १०० वर्षे शेती व्यवसाय केल्याचे) प्रमाणपत्र मिळाले आहे. शेतीव्यवसायासाठी त्यांना सरकारकडून विशेष सवलत देण्यात येते. मात्र त्यासाठी कुटुंबात पिढ्यान्‌पिढ्या, १००हून अधिक वर्षे, 'किमान' दहा एकर जागेत शेतीव्यवसाय चालू असावा ही सरकारी अट असते. अशी अनेक आमिष 'सेंटेनीअल फार्मस्' आर्थर खेड्यांत नजरेस पडतात.

साधी राहणी हे आमिष लोकांचे एक वैशिष्ट्य. स्त्री-पुरुषांचा पोशाख घरी शिवलेल्या कपड्यांचा असतो.

बहुतेक पुरुष प्लेन शर्ट, डार्क रंगाची विजार, कोट, हॅट अशा वेशात दिसतात. विवाहित पुरुष दाढी वाढवतात. स्त्रिया फिकट रंगाचे गुडघ्यापर्यंत किंवा पायघोळ ड्रेस, काळे स्टॉकिंग्ज, सपाट बूट अशा वेषात दिसतात. महिलावर्ग प्रार्थनेच्या वेळी पांढरी व इतर वेळी काळी बॉनेटसारखी टोपी घालतात. अविवाहित मुलींना गडद रंगाचे कपडे घालण्यास आमिष समाजात परवानगी दिली जाते. लहानपणापासून येथील आमिष मुलांमुलींना डच आणि इंग्रजी भाषा शिकवली जाते. बहुतेक कुटुंबांत पती, पत्नी व किमान चार ते सहा मुले आढळतात.

आर्थर गावातील आमिष मुलांमुलीपैकी सुमारे एकतृतीयांश पब्लिक स्कूलमधे आणि बाकी बहुतेक 'हाऊस आमिष'- संलग्न शाळांमधे शिकत आहेत. अशा १५ शाळा (parochial schools) आर्थर गावात आहेत. शिक्षणाचा भर लघुउद्योगांवर दिला आहे. किशोरवयीन, तरुण मुलांना पुढे मोठे झाल्यावर आमिष चर्चमध्ये, की दुसऱ्या चर्चमध्ये जायचे, की अजून दुसरा पंथ स्वीकारायचा, याचे मतस्वातंत्र्य दिले आहे. एकाच कुटुंबातील दोन-तीन पिढ्या आपल्या पिढीजात मोठ्या मालमत्तेच्या जागेत एका घरात किंवा त्याच जागेत दोन-तीन लहान घरे बांधून एकत्र नांदताना आढळतात. नवविवाहित जोडप्याला मुलीच्या किंवा मुलाच्या वडिलांकडून काही एकर जमीन भेट म्हणून देण्यात येते. सध्याच्या एकविसाव्या शतकातही, बहुतेक आमिष स्त्रिया घरगुती कामे, बागकाम, शिक्षिका, मिडवाईफ (सुईण) अशाच पारंपरिक कार्यक्षेत्रात दिसतात. मात्र गावामधे कित्येक आमिष स्त्रिया, मुली सायकल आणि घोडागाडीदेखील चालवताना आढळल्या.

आर्थर गावात प्रत्येक आमिष कुटुंबाकडे सरासरी ८० एकर



आमिष स्त्रिया

शेतजमीन आहे. गहू, ओट्स, चैनी (clover), आणि मका हे त्यांचे मुख्य पीक आहे. काही वर्षांपूर्वी शेती हा त्यांचा एकमेव व्यवसाय होता. जमिनीची टंचाई व दिवसेंदिवस जमिनीचा कस कमी होत गेल्याने, गेल्या काही वर्षांत, येथील गावकऱ्यांनी आपल्या गावात कॉटेज इंडस्ट्री स्वरूपात छोटी दुकाने मांडून विविध लघुउद्योग सुरू केले आहेत. बरेच आमिष लोक घरी इंधनासाठी, हिवाळ्यात ऊब निर्माण करण्यासाठी, प्रोपेन, नैसर्गिक गॅस, कोळसा, लाकूड यांचा वापर करतात. काळानुरूप अलीकडे, गावात, सार्वजनिक फोनयंत्रणा, शेतीकामासाठी व इतर उद्योगव्यवसायांत आवश्यक ती यंत्रसामग्री आली आहे. मात्र स्वत:च्या घरी दूरदर्शनसंच, दूरभाषसंच बाळगणे, घरगुती कामांसाठी यंत्रांवर विसंबणे अजूनही येथील लोकांना अनावश्यक वाटते. गावातील स्त्रीपुरुष सायकलींवरून येजा करताना दिसतात. कित्येकांकडे घरी २०-४० शेळ्या, सुसज्ज यंत्रणेसह कुक्कुटपालनकेंद्रे आहेत. हे लोक अवजड सामान ओढण्यासाठी ड्राफ्ट हॉर्स आणि प्रवासी बग्गीसाठी ड्राइव्हिंग हॉर्स असे दोन प्रकारचे घोडे पाळतात. घोड्यांची पैदास, संगोपन आणि खरेदी-विक्रीचे व्यवहार आर्थर गावातच केले जातात.

आमिष लोक अतिशय कष्टाळू आणि पापभीरू आहेत. वर्षातील काही महिने, जेव्हा बाहेर शेतीस हवामान योग्य नसते, हिमवर्षावाने कित्येक इंच बर्फाने परिसर आच्छादलेला असतो, अशा वेळी हे लोक स्वस्थ न बसता, उत्तम ओक फर्निचर, कॅबिनेट, बग्गी, घोड्याचा सरंजाम (हार्नेस) आणि जीवनावश्यक अनेक वस्तू व खाद्यपदार्थ बनवतात. आर्थर खेड्यात अशी सुमारे १५० लघुउद्योगकेंद्रे आहेत. याशिवाय संपूर्ण वर्षभर गावात अनेक कार्यक्रम आणि उत्सव चालू असतात. उदाहरणार्थ, स्ट्रॉबेरी जॅम फेस्टिवल, आर्थर फ्रीडम सेलिब्रेशन फायरवर्क्स, चीज फेस्टिवल, अमेरिकी स्वातंत्र्यदिनानिमित्त ४ जुलैस आमिष हॉर्स व बग्गी परेड, हायस्कूल होम कमिंग परेड, ख्रिसमस परेड, मॉल्ट्री-डग्लस जत्रा... इत्यादी. गावात गुन्हेगारीचे प्रमाण जवळपास अस्तित्वातच नाही. आर्थर येथील आमिष गावकरी अतिशय मनमिळावू असून पर्यटकांचे मनापासून स्वागत करतात.

जुन्या आमिष जीवनशैलीबद्दल, साध्या साध्या मूलभूत गोष्टींतून आनंद घेण्यासाठी, आमिष हस्तकला, फर्निचर, घरगुती खाद्यपदार्थ, आणि आतिथ्य यांचा आस्वाद घेण्यास उत्सुक पर्यटकांसाठी अमेरिकेच्या इलिनॉय राज्यातील आर्थर गाव एक पर्यटनकेंद्र बनले आहे. येथून परतताना, आर्थर गावाच्या वेशीवर लिहिलेले घोषवाक्य- You're Stranger Only Once आपल्याला मनोमन पटते.


**– विनता कुलकर्णी (शिकागो)**

vinata@gmail.com

टीप : लेख बृहन्महाराष्ट्र वृत्त (उत्तर अमेरिका), फेब्रुवारी २०१८च्या अंकात पूर्वप्रकाशित.


ग्रंथाली

# पुस्तकचोर



मूळ लेखक
**मार्कस झुसॅक**

मराठी अनुवाद
**विनिता कुलकर्णी**

**मूल्य ६०० रु.**
**सवलतीत ३५० रु.**

'पुस्तकचोर' ही कादंबरी जीवनाच्या जवळजवळ प्रत्येकच अंगाला स्पर्शून जाते म्हटले, तरी अतिशयोक्ती होणार नाही. जीवन आणि मरण या दोन टोकांमधील प्रेम आणि द्वेष, भयभीती आणि आनंद, दु:ख आणि नियतीने दिलेल्या भोगाचा निमूट स्वीकार, या भावभावनांच्या सर्व छटा त्यातून आपल्या भेटीला येतात. जर्मन राष्ट्रातील वेगवेगळ्या स्तरातील ज्यू आणि ख्रिश्चन नागरिकांच्या सर्व परी त्यात आढळतात. लेखकाची सहानुभूती कुठे झुकते ते कळले, तरी त्याने सर्वच पात्रांना न्याय दिलेला आहे. आणि मुळाबरहुकूम हे सर्व वातावरण, मराठी वाचकाला पुष्कळसे अपरिचित असे वास्तव अनुवादात जिवंत करण्यात अनुवादिका यशस्वी झाली आहे. हा अनुवाद वाचल्यावर आपले भावविश्व समृद्ध झाल्याचा एक अनोखा आनंद वाचकाला मिळणार हे निश्चित.

**– विद्युल्लेखा अकलूजकर** (रिचमंड, ब्रिटिश कोलंबिया, कॅनडा)




आदित्य जांभळे

राष्ट्रीय पारितोषिक विजेता, चित्रपट दिग्दर्शक आणि लेखक


# गोवा..

## मला भावलेला

जागे असतात ते बार, रेस्टॉरंट, समुद्रकिनाऱ्यावरचे शॅक्स, कॅसिनो आणि क्रूझ!!! पृथ्वीवरचा स्वर्ग समजली जाणारी दुनिया. चमचमणारा समुद्र, मदिरेची धुंदी आणि मदिराक्षीचा सहवास! चप्पल हातात धरून, हातात हात घालून वाळूत चालणाऱ्यापासून बिकीनी घालून अखंड समुद्रस्नान करणाऱ्यांपर्यंत... सगळ्यांसाठी गोवा म्हणजे एक नशा...आयुष्यात एकदातरी अनुभवावी अशी!

**अ**बे, दिखता नही क्या?

गर्दीत कुणालातरी जबरदस्त धक्का दिला होता मी... पण सॉरी-बिरी म्हणायच्या फंदात न पडता, प्लॅटफॉर्म क्रमांक तीनचा जिना धडधडत उतरायला लागलो. खात्री होती, माझं सॉरी ऐकायला तोही थांबला नव्हता. ट्रेन येतच होती..झटकन पाठीवरची बॅग पोटावर घेतली आणि गर्दीच्या लाटेबरोबर आपोआप ट्रेनमध्ये वाहत गेलो...घड्याळाचा काटा ..खरं तर मोबाइलचा टाइम डिस्प्ले पुढे पुढे सरकत होता..दादर आलं एकदाचं.. धावत सुटलो..म्हणजे तशी सगळी गर्दी धावतच होती..माझा स्पीड जरा जास्त होता.. आणखी चारचौघांना धक्के मारत, शिव्या खात एकदाचा पोचलो बस स्टँडवर.. Thank God..गोव्याला जाणारी सव्वासहाची 'कदंबा' अजून सुटली नव्हती...इथे सगळं 'सुशेगाद' (आरामात) चालू होतं. बॅगेतली पाण्याची बाटली काढली आणि तोंडाला लावली. कंडक्टर बोंबलला.. रस्त्यार कित्याक रावला? सुशेगाद भितर बसून पी मरे! खंय देवपाचो तू? फोण्या की मडगावा?

(रस्त्यावर का थांबलायस? आरामात आत बसून पी की रे. कुठे उतरणार तू? फोंड्याला की मडगावला?) कान तृप्त झाले.

एक गोंयकार (गोवेकर) दुसऱ्या गोयंकाराला बरोब्बर ओळखतो..

हाँव फोण्या रे! (मी फोंड्याला रे) म्हणून सांगताना अक्षरशः जीभ शुद्ध झाल्यासारखी वाटली. जिवाचा गोवा करायला निघालेल्या टूरिस्टना घेऊन बस निघाली. मी मात्र फिल्ममेकिंगचा कोर्स संपवून तब्बल वर्षभरानंतर गोव्याला निघालो होतो.. 'माझ्या' घरी!

बसनं वेग धरला.. फ्लायओव्हर्स, सिग्नल्स, ट्रॅफिक जॅम, सगळीकडे फक्त हॉर्नचे आवाज..घाई, स्पीड...स्पीड, कधी डुलकी लागली मला कळलंच नाही.

तशी गोव्यात सर्वसामान्यांची रात्र लवकरच होते. पाच-साडेपाच वाजता ऑफिसं, साडेसात-आठपर्यंत बाजारातील दुकानं, साडेआठ-नऊपर्यंत घरच्या चुली आणि साडेनऊ-दहाच्या आत घराघरातील दिवे बंद होतात..अर्थात काही अपवाद वगळता.

जागे असतात ते बार, रेस्टॉरंट, समुद्रकिनाऱ्यावरचे शॅक्स, कॅसिनो आणि क्रूझ!!! पृथ्वीवरचा स्वर्ग समजली जाणारी दुनिया.



गोवा समुद्रकिनारा



**गोव्यातील चर्च**

चमचमणारा समुद्र, मदिरेची धुंदी आणि मदिराक्षीचा सहवास! चप्पल हातात धरून, हातात हात घालून वाळूत चालणाऱ्यांपासून बिकीनी घालून अखंड समुद्रस्नान करणाऱ्यांपर्यंत... सगळ्यांसाठी गोवा म्हणजे एक नशा...आयुष्यात एकदातरी अनुभवावी अशी!

साहजिक आहे. 'सात हिंदुस्तानी', 'एकदुजे के लिए'पासून अलिकडच्या 'सिंघम', 'गोलमाल'पर्यंत सगळ्या चित्रपटांतून हाच आणि एवढाच गोवा दिसतो.

परंतु सच्च्या गोयंकारासाठी हाच समुद्र ऐशोआरामाचं नाही तर उदरनिर्वाहाचं साधन आहे. देव आहे. एरवी कधीतरी पाहुण्यांना घेऊन बीचवर जाणारा गोंयकार, पावसाळ्याच्या आधी एप्रिल-मे महिन्यात सहकुटुंब सहपरिवार ''दर्यार उदं न्हावपा वईता'' (समुद्रावर आंघोळ करायला जातो) ..अगदी ऑफिसमधून सुट्टी घेऊन संपूर्ण दिवसभर समुद्रकिनारी कडकडीत तापलेल्या वाळूत राहून समुद्रात अंघोळ करणं हे वार्षिक सक्तीचं कार्य मानतो. यानं संधिवात, पाठदुखी, अनेक त्वचारोग बरे होतात अशी समजूत आहे आणि ती काही अंशी खरी आहे. अशा असंख्य साध्या-सरळ श्रद्धा जपणं ही इथली खरी संस्कृती आहे.

साडेचारशे वर्षं पोर्तुगीजांनी गोव्यावर राज्य केलं, हिंदूंवर अत्याचार केले, बाटवून कॅथलिक बनवलं. गोव्यात हे पोर्तुगीज इतके घट्ट रुजले की १९४७च्या स्वातंत्र्यानंतर त्यांना गोव्यातून हाकलून लावायला १९६१ साल उजाडलं. मात्र त्यांनी गोव्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर पाडलेला ठसा आजही तसाच आहे.

दोतोर (डॉक्टर), आदोगाद (ॲडव्होकेट), कुलेर (चमचा), फेस्त (फीस्ट) असे असंख्य पोर्तुगीज शब्द अजूनही कोंकणी भाषेत सर्रास वापरले जातात. गोव्यात अजूनही पोर्तुगीजांनी केलेले काही कायदे तसेच आहेत जसे की द्विभार्याप्रतिबंधक कायदा इथे सर्व धर्मांना लागू होतो.

पोर्तुगीज राजवटीत सुरू झालेलं ''गोयच्या सायबाचे फेस्त'' (ओल्ड गोव्याचं सेंट झेव्हियर फेस्त/जत्रा) सगळ्या जगाला माहीत आहे. पण कणसांचे फेस्त, तवशांचे (काकडीचे) फेस्त, सायबिणीचे फेस्त अशी अनेक छोटीमोठी फेस्त साजरी करणं हा खरा गोंयकार कॅथलिकाचा प्राण आहे. ख्रिसमस, न्यू इअर, कार्निव्हल ही कॅथलिकांची जागतिक संस्कृती आहे, पण पावसाळ्यातला 'सांजाव' ही तितक्याच जल्लोशात साजरा करणारा क्रिस्ताव (ख्रिश्चन) हा गोव्यातच आहे. गंमत अशी आहे की जो क्रिस्तावांचा 'सांजाव' तो हिंदूंचा चिकोलकाला (चिखलकाला)! नावं वेगळी, रुढी वेगळ्या पण आनंद तोच.. पावसात चिखलात धुंद नाचण्याचा!

आनंदी कसं राहावं हे गोंयकाराकडून शिकावं..

ग्रामदेवता, कुलदेवता, कुलपुरुष, देवाचार, सगळ्या देवांची देवळं इथे आहेत. त्या प्रत्येक देवळात देवळाचा वर्धापनदिन, काला किंवा जत्रा, नवरात्रोत्सव, मखरोत्सव, आषाढी, कार्तिकी, रामनवमी, हनुमानजयंती, अगदी दर महिन्याची संकष्टीसुद्धा.. त्या त्या देवाच्या, गावाच्या शास्त्राप्रमाणे साग्रसंगीत केले जातात... आश्चर्य म्हणजे एरवी हॉटेलमधे बियर आणि चिकन शागुती, फिश फ्रायच्या पार्ट्या करणारी तरुण मुलं इथे हातात नारळ, उदबत्ती, फुलं घेऊन, रांगेत उभं राहून देवदर्शन घेतात...''जेवण बेश्ट अशिल्लें''(जेवण छान होतं) म्हणत देवळाचं प्रसादाचं शिवराक शाकाहारी जेवणही जेवतात.

एकंदरीत गोंयकार उत्सवप्रियच! गणेशचतुर्थी मोठ्ठा सण! सार्वजनिक गणपतींचे देखावे तर मुंबई-पुण्याच्या तोंडात मारणारे! होळीत वाईट विचारांचं दहन वगैरे करण्याच्या बाता गोंयकार कधीच करत नाही .. त्याच्यासाठी मेळ (शिमग्यातील लोककला) आणि मोठे मोठे चित्ररथ करून शिगमा (हो, कोकणीत शिगमाच म्हणतात) साजरा करणं जास्त महत्त्वाचं ! दिवाळीत नरकासुर प्रतिमा दहन तर अक्षरशः गल्लोगल्ली..! लक्ष्मीपूजन घरात, बाजारात अगदी प्रत्येक दुकानात आणि प्रसाद म्हणून चक्क चुरमुरे!! लहानपणी

बाजारभर फिरून खाल्लेल्या त्या 'चिरमुल्यांची' चव आजच्या भेळपुरीलाही नाही!

तसा गोवा म्हणजे तीन 'न'कार!

नाल (नारळ), नुस्ते (मासे) आणि नाटक!

नाटकवेड इतकं की आजही गावातील छोट्या संस्था संगीत सौभद्र, सीता स्वयंवर यांसारखी जुनी नाटकं बिनधास्त बसवतात. पोर्तुगीजांपासून आलेले तियात्र (कॅथलिक कोंकणीतील गाणी असलेला लोकप्रिय नाट्यप्रकार) जगभर प्रसिद्ध आहेच. पण स्थानिक जत्रा, काला, उत्सवातून इथल्या उत्सवी रंगभूमीवर सादर होणारी हौशी नाटकं, 'म'चे मटकरांचं नाटक (फक्त पुरुष पात्रांनी उत्स्फूर्त संवाद म्हणून केलेलं लोकनाट्य), दशावतारी काला, बघायलासुद्धा आजही उत्स्फूर्त गर्दी होते ...आणि त्यानंतर तितकीच गर्दी बाजूच्या एखाद्या कौलारू खानावळीवर होते...भाजीपाव (पावभाजी नाही...) खाण्यासाठी! खोबऱ्याचं वाटण असलेली भाजी आणि बेकरीतले ताजे पाव!

तशी गोव्याची खाद्यसंस्कृती तांदूळ, मासे आणि नारळाभोवतीच फिरते. अगदी विदेशी पर्यटकसुद्धा पंचतारांकित हॉटेलं सोडून शीत (भात), कढी (खोबऱ्याची आमटी), हुमण (माशांचं कालवण) चाखायला गावातल्या छोट्या खानावळी शोधतात. इथले भटी (ब्राह्मणी) शाकाहारी जेवणही अत्यंत स्वादिष्ट! कदाचित तोच स्वाद कोंकणी भाषेचा गोडवा वाढवत असावा.

'अहो जाहो'पेक्षा 'अरे तुरे'चा आपलेपणा जास्त... थँक यू, गुडबाय, आशीर्वाद, या सगळ्या कारणांसाठी एक सुंदर शब्दप्रयोग ''देव बरें करू'' (देव भलं करो)! या एका वाक्यात कोणालाही खिशात टाकू शकणारा आत्मविश्वास दडलेला आहे....इतका की इथला चपरासीसुद्धा मुख्यमंत्र्याना ठणकावून सांगू शकतो..हाँव सांगता तुका, तुए अशे केल्या बरें जातले. (मी सांगतो तुम्हाला, तुम्ही असं केलंत तर बरं होईल.) सामान्य माणसातला हा आत्मविश्वास जागा करणारा एक मुख्यमंत्री गोव्याला लाभला..भाई! माजी संरक्षणमंत्री आणि गोव्याचे माजी मुख्यमंत्री कै. मनोहर पर्रीकर. कैलासवासी लिहिताना अजूनही हात थरथरतो, असं खूप काही देऊन गेले भाई गोव्याच्या जनतेला.

सुधारला गोवा त्यांच्या कारकिर्दीत ... शिक्षण, आरोग्य, डिजिटायझेशन, मल्टिफ्लेक्स, मॉल्स, फ्लायओव्हर ब्रिज, अटल सेतू......

पणजी, पणजी, पणजी....कंडक्टरच्या आवाजानं खडबडून जागा झालो..मी गोव्यात पोचलो होतो...बस अटल सेतूवरून धावत होती.. मुंबईतील सी लिंकसारखा मांडवी नदीवर बांधलेला सेतू माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपयीजींना मानवंदना देणारा अटल सेतू...The pride of Goa!

सूर्योदय होत होता..मांडवी नदी, छोटी मिठागरं, ओल्ड गोवा चर्च... माझ्या मनाचा वेग बसपेक्षा जास्त होता.

तू गोवासे है? कौनसे बीचपे रहता है? उधर तो सब हाफ पँटमें घुमते हैं? सस्ती मिलती है ना उधर (बीअर)?? तू गोवामें रहके फिल्म कैसी बनाएगा? क्या कमाएगा गोवा में रहके? मुंबईकरांचे प्रश्न आठवले. सांगावंसं वाटलं.........

टीव्हीसमोर बसून वर्ल्ड कप बघता..कधी पावसात भिजत फूटबॉल ग्राउंडवर चिखलात गोल मारून बघा..कळेल कमाई म्हणजे काय ते!

वीकएण्ड मॉलमध्ये घालवता ..कधी दूधसागर, तांबडीसुर्ला, नेत्रावळी, हरवळेला ट्रेकला किंवा सहलीला जाऊन बघा..कळेल कमाई कशी मोजतात ते..!

सकाळी जॉगिंग करता...कधी कुळागरात, बागायतीत फिरून 'बेडे' (सुपाऱ्या), मुट्टे (काजू) वेचून आणा ..कळेल कॅलरीज कशा बर्न करतात ते..!

पात्राव, देवता मरे? (साहेब, उतरताय ना?)

कंडक्टर मला विचारत होता. मी फोंड्याला पोचलो होतो.

गावठी भेंडी, काकड्या, पालेभाजी विकायला भाजीवाल्या एका बाजूने रांगेत बसल्या होत्या. तुका म्हणून वीसाक पाच घालता (तुला म्हणून वीसला पाच देते) दोघीही खुश... देणारी पहिलं गिऱ्हाईक मिळालं म्हणून आणि घेणारी चाराऐवजी पाच मिळाले म्हणून! हे असं समाधान फक्त इथंच मिळू शकतं कारण इथे शेअरमार्केट घसरण्याची भीती नसते.

हे समाधान हीच गोव्याची खरी ओळख!!

मी पायलटाला हात दाखवला..विमानाच्या नाही ..इथे मोटरसायकलवर भाड्यानं प्रवाशाची 'ने-आण' करणाऱ्यांना पायलट म्हणतात. मनाची ही श्रीमंती फक्त गोव्यातच अनुभवता येते. मोटरसायकलवर बसलो. आता बॅग पोटावर घ्यायची गरज नव्हती कारण हा 'गोवा' होता...माझा गोवा! हजार-बाराशे शब्दात न उलगडता येणारा ...जगाला अजूनही माहीत नसलेला ..मला भावलेला..माझा गोवा!!


देव बरें करू!

**- आदित्य जांभळे**
भ्रमणध्वनी : ९८२२१२२९३६
jamjambhale1@gmail.com

**॥ग्रंथाली॥**

**कंबोडिया**
**सौहार्दाकडून संहाराकडे**

**कुमार नवाथे**



**मूल्य १०० रुपये**
**सवलतीत ६० रुपये**




**नंदिनी महाजन**
प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार आणि प्रशिक्षक


# लुरे केव्हर्न्स

## अद्‌भुत लवणशिल्पे

अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर, व्हर्जिनियामधील लुरे केव्हर्न्स ही भूगर्भातली अशीच एक स्तिमित करणारी कलाकृती आहे. डोंगररांगांच्यामध्ये जमिनीच्या खालच्या स्तरावर आढळणारी, नैसर्गिकरीत्या रचली गेलेली ही क्षारांची लेणी आहेत. सहाशे दशलक्ष वर्षांपूर्वी झालेल्या महाद्वीपांच्या अपवहनात (continental drift) पृथ्वीच्या पृष्ठभागावर अनेक फेरबदल झाले आणि उलथापालथ झाली.


**ध**रतीने आपल्या उदरात असंख्य अद्‌भुत आश्चर्ये दडवली आहेत. ही धरती कधी रौद्र, भयानक तर कधी नयनरम्य, सुंदर वास्तव ती मानवासमोर सादर करते. कधी अचंबित करते, कधी गुडघे टेकायला भाग पाडते, कधी कूटप्रश्न मांडते, तर कधी कुतूहल जागे करते.

अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर व्हर्जिनियामधील लुरे केव्हर्न्स ही भूगर्भातली अशीच एक स्तिमित करणारी कलाकृती आहे. डोंगररांगांच्या मध्ये जमिनीच्या खालच्या स्तरावर आढळणारी, नैसर्गिकरीत्या रचली गेलेली ही क्षारांची लेणी आहेत.

आपलेशिअन डोंगररांगा उत्तर अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्याला साधारण समांतर आहेत. ब्लू रिज हा त्या पर्वतरांगांमधला एक भाग. आपल्या नागमोडी वळणांनी व्हर्जिनिया आणि पश्चिम व्हर्जिनिया प्रदेश सुपीक करणारी शेनानडोआ नदी इथे वाहते. जॉन डेनवरच्या सुप्रसिद्ध 'टेक मी होम, कन्ट्री रोड्स ....' या गाण्यात भेटतो तो हाच शेनानडोआचा परिसर. याच ब्लू रीज़ पर्वतांच्या पश्चिमेला काही केव्हर्न्स आहेत. केव्हर्नचा शब्दशः अर्थ जमिनीखालची प्रचंड खोली किंवा गुहा. या गुहेचे वेगळेपण असे की इथे चुनखडीच्या रासायनिक प्रक्रियेतून तयार झालेले अनेकविध लवणस्तंभ पाहायला मिळतात. यात बरेचसे अधोमुखी (stalactite) आणि काही उर्ध्वमुखी (stalagmite) आहेत.

सहाशे दशलक्ष वर्षांपूर्वी झालेल्या महाद्वीपांच्या अपवहनात (continental drift) पृथ्वीच्या पृष्ठभागावर अनेक फेरबदल झाले आणि उलथापालथ झाली. याचाच परिणाम आपलेशिअन पर्वतरांगा तयार होण्यात झाला. पावसाचे पाणी जमिनीपर्यंत पोचताना झाडांच्या कुजलेल्या पानातून काही आम्ले त्यात मिसळली गेली. हे आम्लयुक्त पाणी चुनखडीच्या स्फटिकांच्या भेगातून झिरपत खाली उतरले तसे या रासायनिक प्रक्रियेतून चुनखडीच्या स्तरांची झीज होत गेली. चुनखडीतून कार्बन डाय ऑक्साइड निघून गेल्यावर उरलेल्या स्फटिकरूपी कॅलसाईटमधून ही सुंदर झुंबरे तयार झाली. जमिनीच्या आत विवक्षित अंतरावर पोकळी असल्याने त्यात ती स्फटिक झुंबरे तयार होत गेली.

यातही अनेक प्रकार पाहायला मिळतात. शुभ्र कॅलसाईट पसरत खाली येऊन तलम शुभ्र ओढणीसारखी रचना झाली आहे. तिला 'टायटानिया वेल' (Titania Veil) असे नाव दिलेले आहे. कप केक्स एकावर एक रचून उंचच उंच खांब तयार झाले आहेत. त्यांना 'टोटेम पोल' म्हणतात. तलम कापडाच्या निऱ्या वळून त्यांना दांडीवर टाकल्यासारख्या काही रचना आहेत. पांढरा पायघोळ झगा घालून, डोक्यावरून खांद्यावर एक कापड घेतलेल्या अतिप्रचंड मानवी आकाराचा एक स्तंभ इथे आहे. गुहेच्या त्या भागाला 'जायण्टस हॉल' असे म्हणतात. कोसळणाऱ्या धबधब्याला जर 'स्टॅच्यू' म्हणून कुणी स्तब्ध केले, तर तो कसा दिसेल? तसे काही आकार पाहायला मिळतात. त्यांचे नावही 'फ्रोज़न फाउंटेन' आहे.



लुरे क्षार लेणी

महाराणीच्या शाही झग्याच्या आकाराचे स्तंभ, 'एम्प्रेस कॉलम', त्यांच्या प्रचंड पण लयदार आकाराने आकर्षून घेतात. अठरा ते वीस इंच इतकीच खोली असणारे एक छोटुकले, स्फटिकासारख्या स्वच्छ पाण्याचे तळे, वरच्या बाजूच्या लवणशिल्पांचे प्रतिबिंब घेऊन उभे आहे. आपल्या मनातल्या इच्छा मनातच सांगून नदीत, तलावात, पुष्करणीत, अगदी रेल्वेतून पुलाखालच्या मोठ्या नदीत नाणी उडवणारे भारतात अनेकजण आहेत. इथे लुरे केव्हर्न्समध्ये अगदी पिटुकल्या डबक्यात असे सेंट्स, डॉलर्स उडवलेले, लहान मुलांच्या हातून टाकलेले, डोळे मिटून पुटपुटत टाकलेले असे पैसे पाहिल्यावर गंमत वाटली. भारतीयांवर 'अंधश्रद्ध' असा सरसकट शिक्का मारला जातो पण अंधश्रद्धा सगळीकडेच आहेत.



**फ्रोज़न फाउंटेन**

या जागेचा इतिहासही रंजक आहे. चुनखडीच्या डोंगरावरच्या एका छिद्रातून येणाऱ्या थंडगार हवेने अँड्र्यू कॅम्पबेलच्या हातातली मेणबत्ती विझली. ते साल होते १८७८. त्याने आसपासचे दगडाचे सैलसर तुकडे बाजूला सारून आत एक गुहा असल्याचे पाहिले. बेन्टन स्टेबिन्स नामक एका फोटोग्राफरला बरोबर घेऊन त्याने त्या खड्ड्यात आपल्या तेरा वर्षांच्या पुतण्याला उतरवले. आत जे काही पाहिले; त्याने तो स्तब्ध, अचंबित झाला. मेणबत्तीच्या उजेडात ते शुभ्र शिल्प उजळून आणखीनच अद्‌भुत दिसत होते. ह्या शोधाचे गुपित त्यांनी थोडे दिवस कोणालाच कळू दिले नाही. सॅम बरॅकर नावाचा त्या जमिनीचा मूळ मालक कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला होता. त्याच्या कर्जाच्या परतफेडीकरता कोर्टाने त्या जमिनीचा लिलाव केला. तेव्हा अँड्र्यू कॅम्पबेल, विल्यम कॅम्पबेल आणि बेंटन स्टेबिन्स यांनी ती जमीन विकत घेतली. ह्या व्यवहाराबद्दल नि त्या जमिनीला अचानक आलेल्या किमतीबद्दल बातम्या छापून आल्या. लोकांनी आश्चर्य व्यक्त केले. यथावकाश त्या जागेची माहिती सर्वदूर पसरली. या गुहा पाहण्याची उत्सुकता दूरदूरपर्यंत लोकांना वाटू लागली. स्मिथसोनिअन इन्स्टिट्यूटने अभ्यासकांचे पथक पाठवून त्या जागेची शास्त्रीय चिकित्सा केली.

जमिनीच्या आत प्रचंड आकाराचे क्षारशिल्प आणि त्यांचे विविध नमुने पाहण्यासाठी लोक येत. गुहेची जमीन चिखल आणि डबक्यांनी भरलेली होती. या सर्व भागात हिंडण्यासाठी लाकडी फळ्या टाकलेल्या असत. नंतर १९५० मध्ये पक्के बांधकाम असलेल्या पायवाटा बनवण्यात आल्या. त्या आजही वापरात आहेत.

शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वी या गुहा पाहण्यासाठी बारा ते पंधरा डॉलर फी आकारली जात असे. न्यू यॉर्क, फिलाडेल्फिया, बाल्टिमोर, वॉशिंग्टन अशा आसपासच्या मोठ्या शहरांत ही तिकिटे मिळत. सहल कंपन्या लुरेसाठी विशेष सहलींचे आयोजन करीत. घोडागाड्यांच्या राखीव कोचमधून येणारे प्रवासी रेल्वेची व्यवस्था झाल्यावर रेल्वेतून येऊ लागले. फोर्डच्या तत्कालीन अद्ययावत मोटारी आपण लुरेला गेल्याचे वर्णन प्रसिद्ध करीत. लुरेला जाण्यासाठी मंडळी 'सन्डे बेस्ट' पोशाख करीत. पुरुष कोट, टाय, हॅट घालीत तर बायका लांब झगे आणि टोप्या घालीत. लुरेला जाण्यासाठी कोणी काय परिधान केले होते, याच्या चर्चा होत. तसे त्यावेळचे छापील मजकूर पाहायला मिळतात. आजूबाजूच्या परिसरात हॉटेल व्यवसाय फारच भरभराटीला आला.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला कर्नल टी. सी. नॉर्थकॉट याने लुरे केव्हर्न्स भाड्याने घेऊन त्यावर एक आरोग्यधाम (sanatorium) बांधले. पाच फूट व्यासाचा पाइप गुहेत सोडून त्या घराच्या आतपर्यंत नेला. त्यावर दर चार मिनिटाला जरा फिरणारा इलेक्ट्रिक पंखा बसवून ती हवा त्याने घरभर फिरवली. ही थंड, नैसर्गिकरीत्या शुद्ध हवा श्वसनाचे रोग असणाऱ्यांना उपकारक असल्याचा गवगवा त्या वेळी होता.

या गुहेत एक कॅथेड्रल आहे.. तिथे येऊन लग्न करू इच्छिणाऱ्या जोडप्यांना बरेच आधी बुकिंग करावे लागते. जगातले सर्वात मोठे वाद्य असे बिरुद मिरवणारा एक ऑर्गन या क्षारस्तंभांवर बनवण्यात आला आहे. लेलँड स्प्रिंकल नावाच्या पेंटागॉनच्या शास्त्रज्ञाची ही कल्पना. रबरचे छोटे तुकडे लावलेल्या काड्यांनी या खांबांवर हलकेच प्रहार केला तर त्यातून स्वर उमटतील असे वाटल्यावर त्याने यासाठी आपली योजना सादर केली. छत्तीस वर्षांच्या संशोधन, प्रयोग आणि कष्टांनंतर त्याचे स्वप्न साकार झाले. चार कीबोर्ड वापरून हा वाजवता येतो. पाच मैलांइतके वायरिंग यासाठी केले आहे. ऋतू आणि प्रसंगानुरूप गाणी इथे वाजवली जातात. त्या प्रचंड खोलीमध्ये तो आवाज घुमत राहतो. इथे होणाऱ्या लग्नात हाच ऑर्गन पार्श्वसंगीत देतो. त्या जोडप्यांसाठी तो एक विलक्षण अनुभव असणार हे निश्चित!

सव्वाशे वर्षांपासून प्रवाशांना आकर्षित करत असल्यामुळे इथे या नैसर्गिक गुहेबरोबरच मनोरंजनाच्या इतरही गोष्टी विकसित केल्या आहेत. अगदी बाजूलाच असणारे विंटेज गाड्यांचे संग्रहालय एका शतकाहून जास्त कालावधीच्या मोटारी आणि इंजिनांचा खजिना घेऊन उभे आहे.

बाहेरून मध्यम आकाराचे एक टेकाड असणाऱ्या या जागेत पायऱ्या उतरून गेल्यावर भूगर्भशास्त्र, इतिहास, मानवी संकल्पना आणि श्रद्धा यांचा एक संमिश्र अनुभव मिळतो.

**– नंदिनी महाजन**
भ्रमणध्वनी : ९८२१८९३२०२
mahajanšnandiniyahoo.com



**डॉ. सचिन जम्मा**
लॅप्रोस्कोपिक व जनरल सर्जन

# इस्पानिया

खाण्यापिण्याइतकेच स्पॅनिश लोक वेडे आहेत बुलफाइटचे. १९२९ सालापासून प्रचलित असलेल्या या थरारक खेळासाठीची जगातली तिसऱ्या क्रमांकाची बुल फाइट रिंग माद्रिदमध्ये आहे. या बुलफाइट रिंगच्या समोरच्या हॉटेलमध्ये बुल फाइटमध्ये मरणाऱ्या बुलच्या अंडाशयासाठी चक्क बोली लावली जाते हे ऐकून मात्र या वेडेपणाची खरी जाणीव झाली.

हर्निया हा तसा सर्वसामान्य आजार परंतु हर्नियाची गाठ सहसा दुखत नाही म्हणून रुग्ण नेहमीच त्याच्याकडे दुर्लक्ष करतात आणि मग तो आजार गुंतागुंतीचा होतो. अशा अवघड हर्नियाच्या केसेस विशेषत: पोटावरच्या हर्नियाच्या शस्त्रक्रिया शिकण्याची आणि स्पेनमधील जगप्रसिद्ध हर्निया सर्जन डॉ. मिगुल गार्सिया युरेनिया यांच्याकडे प्रशिक्षणाची संधी मला उपलब्ध झालेली होती. मिगुल नावाची पण स्पेनमध्ये थोडी गंमतच आहे. स्पेनमधल्या कुठल्याही रस्त्यावर उभा राहून 'मिगुल' अशी हाक तुम्ही मारलीत तर दहा पंधरा मिगुल सहज भेटतील. गार्सिया युरेनिया या आडनावातही एक वैशिष्ट्य दडलेले आहे. स्पेनमधली प्रत्येक व्यक्ती ही आई आणि वडील असे दोघांचेही आडनाव आपल्या नावापुढे लावते. असो.

स्पर्धा तीव्र होती परंतु काही दिवसांतच माझी निवड झाल्याचे मला कळाले. माझा आनंद गगनात मावेनासा झाला. पोटावरील अवघड आणि गुंतागुंतीच्या हर्नियावरील शस्त्रक्रियेची एक वेगळी पद्धत शोधून काढणाऱ्या या जगप्रसिद्ध सर्जनकडे प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणे हे माझे भाग्य होते. यापूर्वीही मी अनेक देश पाहिलेले आहेत, परंतु स्पेनसारख्या सुंदर देशात दोन आठवडे राहायला मिळणे ही माझ्यासारख्या भटकंतीप्रिय व्यक्तीस सुवर्णसंधीच होती. माद्रिदमध्ये आठवडाभर प्रशिक्षणासाठी राहिल्यानंतर बार्सिलोना, व्हॅलेन्सिया, कोस्टा ब्राव्हा, झारागोजा या स्पेनमधल्या प्रसिद्ध शहरांना मी भेट देणार होतो. ब्रिटिश साम्राज्यापूर्वीही ज्या स्पॅनिश साम्राज्यामधे कधीही सूर्यास्त होत नाही असे म्हटले जायचे त्या स्पॅनिश साम्राज्याला भेट देण्याची पर्वणी मला लाभणार होती. आणि मग दोन जूनला मी मुंबईहून माद्रिदला प्रयाण केले.



ब्लॅक मॅडोना

स्पेनच्या मध्यभागी मान्सांनारेस नदीकाठी वसलेले माद्रिद शहर म्हणजे जणू आपली दिल्ली. स्पेनमधले सर्वात मोठे शहर आणि स्पेनची राजधानी बार्सिलोना म्हणजे जणू आपली मुंबई-स्पेनचे प्रमुख आर्थिक केंद्र! माद्रिदला विमानतळावर उतरलो आणि स्पॅनिश भाषेचा पगडा किती जबरदस्त आहे याची जाणीव झाली. इंग्रजी बोलणारी व्यक्ती चुकूनच सापडत होती. रात्रीचे दहा वाजत आलेले; परंतु लख्ख सूर्यप्रकाश जणू सायंकाळचे पाच वाजले असावेत असा आभास निर्माण करीत होता. आखीवरेखीव रस्ते, तुरळक लोक, शिस्तीतले ट्राफिक आणि आजूबाजूला सुंदर अशा इमारती. ३० युरो द्या आणि विमानतळापासून माद्रिदमध्ये कोठेही जा, या योजनेअंतर्गत एअरबीएनबी अपार्टमेंटला मी पोहोचलो. अपार्टमेंटसमोरच्या मोठ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूचे फूटपाथ मात्र इतक्या रात्रीसुद्धा गजबजलेले होते. रात्रीच्या त्या धुंद वातावरणात फूटपाथवर मस्त खुर्च्या आणि टेबल टाकून गप्पाटप्पा करत लोक बीअर आणि वाईनचा म्युझिकच्या सोबतीने आस्वाद घेत होते. मलाही भूक लागलेली होतीच. मीही त्यांच्यात सामील झालो.

पुढचा आठवडा हर्नियासंबंधित प्रशिक्षणात कसा गेला ते कळलं नाही. मिगुल, मॅानक्लुस आणि लुईस या तिन्ही सर्जन्सनी चार दिवसांत आठ मोठमोठ्या

शस्त्रक्रिया आम्हाला करून दाखवल्या. पाचव्या दिवशी युरोपमधून साधारणपणे वीस सर्जन तेथे जमा झाले होते. युरोपमधल्या वेगवेगळ्या देशातल्या सर्जनशी गप्पा आणि मैत्री हा माझ्यासाठी आगळा असा अनुभव होता. शेवटच्या दिवशी अमेरिकेतून आयात केलेल्या डेड बॉडीजवर यापूर्वी आठवडाभर शिकलेल्या शस्त्रक्रिया आम्ही स्वतः केल्या. ज्ञानात भर तर पडलीच, शिवाय हे पदोपदी जाणवत होते की स्पेनमधील आरोग्यव्यवस्था ही जगातील सर्वोत्तम आरोग्यव्यवस्थांपैकी एक आहे. सरकारी इस्पितळात मोठमोठ्या महागड्या शस्त्रक्रिया एक रुपयाही न खर्च करता करून मिळणे आणि तेही प्रत्येक रुग्णाला वेगळी प्रायव्हेट रूम देऊन, हे सारे माझ्या कल्पनेच्या पलीकडचे होते. डॉक्टर आणि रुग्णांचे इथले नातेही खूप छान आहे हे जाणवत होते. आठवडा संपला आणि मग 'मेक माय ट्रिप'च्या ग्रुप टूरबरोबर माझे स्पेनदर्शन सुरू झाले.

प्रशस्त चौक, त्या चौकामध्ये सुंदर बाग आणि त्यात थुईथुई नाचणारे मनमोहक कारंजे, हे दृश्य स्पेनमधे बऱ्याच ठिकाणी आढळते. प्लाझा इस्पानिया हा माद्रिद शहरातला प्रचंड मोठा आणि प्रमुख चौक. 'ग्रां व्हिया' या मुख्य रस्त्याचे ते एक टोक. टिपिकल स्पॅनिश कल्चर आणि क्युझिन अनुभवायचे असेल तर याहून दुसरी चांगली जागा नाही. मैद्यापासून तयार केलेले खुसखुशीत चुरोज, हॉट चॉकलेटबरोबर चापण्याची हीच ती जागा. जगप्रसिद्ध प्राडो म्युझियम आणि रॉयल पॅलेस येथून हाकेच्या अंतरावर! प्राडो म्युझियम म्हणजे जणू पॅरिसमधल्या ल्युरे म्युझियमची माद्रिदमधली छोटी आवृत्ती. आठ हजारांहून जास्त सुंदर पेंटिंग, तितकीच ड्रॉइंग आणि अनेक स्कल्पचर, ही या म्युझियमची खासियत. फ्रान्सिस्को दे गोया या सुप्रसिद्ध स्पॅनिश चित्रकाराच्या अनेक अप्रतिम पेंटिंगबरोबरच लिओनार्दो द विन्सीच्या विद्यार्थ्याने रंगवलेली मोनालिसाही येथे विराजमान आहे. स्पॅनिश राजघराण्याचे निवासस्थान म्हणजे रॉयल पॅलेस. रोमन संस्कृतीचा एक छोटा नजराणाच जणू. आपल्या हैदराबादच्या सालारजंग म्युझियमची आठवण झाली मला. येथे घडलेली एक मजेशीर गोष्ट सांगण्याचा मोह मात्र मला आवरत नाही. ग्रां व्हिया आणि रॉयल पॅलेस येथे 'खिसा पाकीट सांभाळा' असे आमचा गाइड वारंवार सांगत होता. माझ्याबरोबर एक कर्नल आणि त्यांच्या पत्नी होत्या. रॉयल पॅलेसच्या समोरच्या रस्त्यावर पटकन एका जीन्स टी शर्ट घातलेल्या सुंदर तरुणीने समोरून येऊन कर्नलना 'एक्सक्यूज मी, युवर वॉलेट' असे म्हणून त्यांच्या हातात त्यांच्या खिशातले पाकिट दिले. कर्नलनीही तिला पटकन थँक्यू म्हटले. क्षणार्धात ती सुंदर तरुण मुलगी दिसेनाशी झाली. कर्नलना सुरुवातीला काही कळलेच नाही. त्यांना हे जाणवलेच नव्हते की मागच्या खिशातले पाकीट कधी मारले गेले होते ते. पण त्यातला महत्त्वाचा सस्पेन्स म्हणजे कर्नलनी त्यांच्या पाकिटात हुशारीने फक्त पाचशे रुपयांची एक भारतीय नोट ठेवलेली होती आणि तिचा स्पेनमध्ये काहीही उपयोग होणार नाही हे समजल्यामुळे त्या मुलीने बेमालूमपणे मारलेले पाकीट इमानदारीत परत आणून दिले होते. हे सारे कळल्यानंतर आमची मात्र हसूनहसून पुरेवाट झाली.

माद्रिदला जाऊन सॅन मिग्वेल मार्केटला जर भेट दिली नाही तर लोणावळ्याला जाऊन चिक्की न खाण्यासारखे आहे. दरवर्षी साधारणपणे एक करोडपेक्षा जास्त टूरिस्ट या मार्केटला भेट देतात आणि तिथल्या 'सांग्रिया' आणि 'तपास' यावर आडवा हात मारतात. 'सांग्रिया' हे स्पॅनिश कॉकटेल आहे जे वाईन आणि फळांच्या रसापासून बनवले जाते. 'तपास' म्हणजे आपला चखणा. परंतु यात प्रचंड व्हरायटी मिळते. अगदी ऑलिव्ह, चीज, अंडी, फिश, पोर्क, बीफ यांसारख्या अनेक पदार्थांचा वापर करून या छोट्या चटपट्या स्नॅक्स डिशेस बनवल्या जातात आणि ड्रिंकबरोबर स्पॅनिश लोक चवीने याचा आनंद लुटतात. खाण्यापिण्याइतकेच स्पॅनिश लोक वेडे आहेत बुलफाइटचे. १९२९ सालापासून प्रचलित असलेल्या या थरारक खेळासाठीची जगातली तिसऱ्या क्रमांकाची बुल फाइट रिंग माद्रिदमध्ये आहे. या बुलफाइट रिंगच्या समोरच्या हॉटेलमध्ये बुल फाइटमध्ये मरणाऱ्या बुलच्या अंडाशयासाठी चक्क बोली लावली जाते हे ऐकून मात्र या वेडेपणाची खरी जाणीव झाली. फूटबॉलवेड्यांसाठी माद्रिदमधले बर्नाबू स्टेडियम आणि बार्सिलोना-मधील कॅम्प नाऊ स्टेडियम यांना भेट देणे हा एक आयुष्यातला अविस्मरणीय क्षण ठरतो. एफ.सी. बार्सिलोनाच्या कॅम्प नाऊ स्टेडियमला मी दिलेली भेट माझ्या चांगली स्मरणात आहे ती तिथल्या सुंदर डिस्प्लेंमुळे. गोल्डन बूट वा विविध कप असोत,



ला राम्बला रोड

ट्रॉफीज असोत किंवा मेसीसारख्या फूटबॉल प्लेअरने वापरलेल्या जर्सी असोत, पण प्रत्यक्ष एखादी मॅच पाहिल्याचा आभास निर्माण करतात, तिथल्या व्हर्चुअल टूर्स आणि ऑडिओ व्हिज्युअल डिस्प्ले! थक्क करणारा असा हा अनुभव. ६५००० प्रेक्षक सामावतील अशा ऑलिंपिक स्टेडियमला भेट देणे हासुद्धा एक थरारक अनुभव. बार्सिलोनाच्या नागरिकांनी पाहिलेले १९२९ सालचे ऑलिंपिक्स स्पर्धा भरवण्याचे स्वप्न, १९९२ साली या स्टेडियममध्ये कसे पूर्ण झाले हा इतिहास गाईडकडून ऐकताना अंगावर रोमांच उभे राहतात. ६५००० प्रेक्षकांच्या साक्षीने आर्चर अँटोनियो रिबेलो याने ऑलिंपिक ज्योत दुरून बाणाने अचूक वेध घेऊन कशी प्रज्वलित केली याचे वर्णन ऐकताना तो थरार आपण प्रत्यक्ष अनुभवतो.

अँन्तोनी गौदी नावाच्या जादूगार स्पॅनिश आर्किटेक्टने १८८२ साली पाहिलेले एक स्वप्न १५० वर्षानंतर २०२६ साली पूर्ण होणे अपेक्षित आहे. येशू ख्रिस्ताची जीवनगाथा निसर्गाशी जवळीक साधणाऱ्या प्रचंड मोठ्या वास्तूच्या स्वरूपात आपल्यासमोर उभे करणारे साग्राडा फॅमिलिया चर्च हे ते स्वप्न होय. चोवीस तास या एकाच ध्यासाने पछाडलेल्या आणि त्यावरील स्वप्नरंजनात मग्न असलेल्या या अँन्टोनी गौदीचा मृत्यू याच इमारतीसमोरील ट्राम ॲक्सिडेंटमध्ये व्हावा आणि त्याच्या मृतदेहाला याच इमारतीच्या तळमजल्यावर चिरविश्रांती मिळावी हा केवढा दैवदुर्विलास! आजही या महान आर्किटेक्टने दिलेल्या आराखड्याप्रमाणे या चर्चचे बांधकाम चालू आहे.

लयबद्ध टाळ्या आणि गिटारने धरलेला ताल, त्या ठेक्यावर गाणारे तरुणतरुणी आणि या दोन्हींना साजेल असा पायाचा ठेका देऊन केलेला सुंदर असा डान्स म्हणजे फ्लेमेंको शो. सोबत रेड वाइनची साथ. 'पुरा पैसा वसूल असा' हा शो. बार्सिलोना हे या फ्लेमेंको डान्सचे माहेरघर, मग तो डान्स शो चुकवून कसं चालेल बरे? मीही त्याचा आनंद लुटला.

प्लाझा दे कॅटालोनिया नावाचा प्रचंड मोठा भव्यदिव्य चौक म्हणजे बार्सिलोनामधला मीटिंग पॉईंट. माद्रिदच्या प्लाझा इस्पानियासारखाच हाही एक आगळावेगळा अनुभव. प्लाझा दे कॅटालोनिया या चौकापासून ख्रिस्तोफर कोलंबसच्या पुतळ्यापर्यंतचा दीड किलोमीटरचा ला राम्बला स्ट्रीट म्हणजे जणू पाहुण्यांसाठी एक ट्रीट. फक्त पायी चालणाऱ्या लोकांसाठी असलेल्या या रस्त्याच्या दुतर्फा आहे दाट झाडी, दोन्ही बाजूला अनेक फुलांची आणि सोव्हेनीयर्सची सुंदर सजवलेली दुकाने, अनेक कॅफे आणि बारमुळे खाण्यापिण्याची चंगळ आणि सोबतीला असतात देखणे स्पॅनिश लोक. उगाच नाही स्पॅनिश कवी फेडेरिकी गार्सिया लोर्काने म्हटलेय, 'जगातला हा एकमेव रस्ता आहे जो चालताना कधीच संपू नये असे वाटते.'

तुरिया नदीच्या काठी वसलेले व्हॅलेन्सिया हे स्पेनमधले तिसऱ्या क्रमांकाचे शहर. 'ला टोमॅटिनो' फेस्टिव्हलसाठी प्रसिद्ध असलेले ब्युनॉल हे गाव याच्या अगदी जवळ. परंतु तो असतो ऑगस्टमध्ये. त्यामुळे आम्ही त्याचा आनंद लुटू शकलो नाही. स्पेनमध्ये आलात आणि 'सांग्रिया नही पिया, व्हॅलेन्सियाका पाया नहीं खाया तो क्या किया?' असे म्हटले जाते. अनेक स्पॅनिश नागरिक व्हॅलेन्सियाच्या प्रसिद्ध 'पाया' या डीशला स्पेनची राष्ट्रीय डिश मानतात. बोंबा प्रतीच्या तांदळापासून तयार केलेली, सोयाबिन, हिरव्या भाज्या, केशर घातलेली आणि आपल्या चॉईसप्रमाण व्हेज वा सीफूड किंवा चिकन अथवा सशाचे मांस घालून बनवलेली ही व्हॅलेन्सियन खिचडी. पण तिला आपल्या बिर्याणीची सर नक्कीच नाही. कॅथेड्रल असो वा चर्च किंवा अगदी आर्ट म्युझियम असो, स्पॅनिश राजवटीवर झालेले रोमन, मुस्लिम आणि ख्रिश्चन राजवटींचे परिणाम इथल्या वास्तूंवर मात्र स्पष्ट दिसतात. युरोपमधले सर्वात मोठे मत्सालय इथेच आहे.

स्पेनमधले उत्तम समुद्रकिनाऱ्याचे स्थान म्हणजे कोस्टा ब्राव्हा. कॅटलान संस्कृती, वारसा आणि आर्किटेक्चर याबद्दल जाणून घेण्यासाठी हे एक उत्तम ठिकाण. 'टोसा दे मार' या छोट्या गावच्या समुद्रकिनाऱ्यावर तिथल्या उंच खडकांमधल्या नितळ निळ्याशार समुद्रात पोहण्यासाठी, स्नॉर्केलिंगसाठी याहून चांगली संधी मला केव्हा मिळणार होती? ती मी ठरवून साधली. एलिझाबेथ टेलर, इव्हा गार्डनर या नट्यांचे आणि अनेक चित्रपट निर्मात्यांचे हे आवडते ठिकाण. स्पेनमधली मोस्ट हॅपनिंग प्लेस असे म्हटले तरी चालेल अशी ही कोस्टा ब्राव्हाची २५० किलोमीटरपेक्षा मोठी किनारपट्टी. हा आनंद पुन्हा लुटण्यासाठी स्पेनच्या पुढच्या भेटीत इथे पुन्हा यायचे आणि कारने प्रवास करावयाचा हे ठरवूनच येथून आम्ही बाहेर पडलो.

स्पॅनिश चित्रकार 'फ्रान्सिस्को दे गोया' याची कर्मभूमी म्हणजे झारागोझा. परंतु मूरीश राजवाडा आणि त्याहीपेक्षा विशेषकरून 'बॅसिलिका ऑफ आवर लेडी ऑफ द पिलर'साठी ते जास्त प्रसिद्ध आहे. इब्रो नदीच्या किनारी उभी असलेली ही देखणी वास्तू म्हणजे जगातले पहिले चर्च आहे जे व्हर्जिन मेरीला समर्पित केलेले आहे. हिस्पॅनिक लोकांची आई म्हणून प्रसिद्ध असलेल्या व्हर्जिन मेरीचे हे ख्रिस्तांसाठीचे मोठे श्रद्धास्थान आहे. परतीच्या प्रवासासाठी माद्रिदला परतताना बोनस म्हणून आम्हाला गाईडने मॉन्टसराटच्या पवित्र ब्लॅक मॅडोनाचे दर्शन घडवले. समुद्रसपाटीपासून ४०५५ फूट उंचीवरील या श्रद्धास्थानाला भेट देण्यासाठी चक्क कॉगव्हील ट्रेनने हा डोंगर चढावा लागतो. या डोंगरावरील चॅपेलमध्ये विराजित 'ब्लॅक व्हर्जिन मेरी'च्या हातामधील गोलाला स्पर्श करून आपली मनातली इच्छा पूर्ण करून घेण्यासाठी येथे श्रद्धाळू ख्रिश्चनांची भली मोठी रांग लागलेली असते. मी मात्र चिकाटी लावून तासभर रांगेत उभा राहून ब्लॅक मॅडोनाचे दर्शन घेतले. मनात एकच इच्छा होती पुन्हा एकदा हा सुंदर देश विस्ताराने बघण्याची संधी मला मिळू दे. बघूयात ब्लॅक मॅडोना माझी इच्छा पूर्ण करते का?

**– डॉ. सचिन जम्मा**
भ्रमणध्वनी : ९८५०८४७१७५
drsachinjamma@gmail.com




**डॉ. प्रभाकर देसाई**

सहयोगी प्राध्यापक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ


# वरुणाअस्सींची लोकधाटी

> वरुणा व अस्सी ह्या दोन नद्यांच्या छोट्याशा अस्तित्वशून्य दोआबातला आणि त्याबाहेर नंतर वसत गेलेला अधिवास म्हणजे वाराणसी होय. पुराणकथांमधून भेटणारी आणि नंतर जगभरात प्रसिद्ध झालेली हीच ती काशी आहे. बारा महिने गंगेच्या तीरावर बसून गंगेची आणि येणाऱ्याजाणाऱ्या पर्यटकांची आणि भाविकांची सेवा करण्यात बारोमास न थकणारी वाराणसी, मिथकीय काशीच्या भारातून थकली-भागलेलीसुद्धा दिसते. तिच्यासाठी गंगा पोशिंदी. वाराणसीचे अन्यथा काय होईल असा प्रश्नच आहे. गंगा हिच्या नसानसात वाहते किंवा खरेतर गंगेतच ही नगरी राहते.

**त**ब्बल १३ वर्षांनंतरही वाराणसी माझ्या आयुष्याचा तसाच अविभाज्य भाग आहे. माझे सर्वच तिने व्यापलेले आणि हे मीही तसेच जमेल तशा काळजीने जपून ठेवले आहे. २००४ साली पहिल्यांदा वाराणसीत जाण्याचा योग आला आणि तिथे नोकरीनिमित्त स्थायिक होण्याचा. आता कायमचाच तिच्याशी जोडला गेलो ह्या जाणिवेने त्यावेळी मीही तिच्यात मघई पानासारखा विरघळून गेलो. अर्थात वाराणसी कोणालाही इतक्या लवकर स्वत:त विरघळू देत नाही. ती नंतर कधी नागव्या सत्यासारखी किंवा एखाद्या दंतकथेसारखी भेटत राहिली रोज मला! लहान पोरानं मरणथंडीत दुलईत हळूहळू आत आत जात शिरत जावं नि तिच्या उबेत गरम करून घ्यावीत गोठलेली हाडे तशीच उब वाराणसीच्या दुलईनं मला दिली. पुण्यात असताना वाराणसीबद्दल खूप ऐकले होते, वाचले होते. वाराणसी हे तसे उत्तर भारतातल्या अनेक विरासतींचे शहर. उत्तर भारताचा अर्क वाराणसीत आहे आणि वाराणसीचा जायका संपूर्ण उत्तर भारतात. वाराणसीबद्दल बोलायचे तर थोडे उत्तर भारताबद्दल बोलले पाहिजे. उत्तर भारत हा तसा खूपच मोठा प्रदेश आहे. भारताच्या नकाशावरही उत्तर भारताचे स्थान विशेषत्वाने उठून दिसते आणि आधुनिक भारताचा राजकीय नकाशाही दीर्घकाळ उत्तर भारताच्याच अधिपत्यात राहिल्याचा अर्थातच सबळ राजकीय इतिहासही सांगता येतो. अनेक भूभागांचा बनलेला हा प्रदेश नद्यांची विस्तीर्ण मैदाने, वाळवंट आणि पर्वतरांगांनीही तितक्याच समतोलपणे आपले भौगोलिक व्यक्तिमत्त्व साकारतो. मौर्य, गुप्त, मोघल, मराठे आणि इंग्रजांच्या राजकारणाचे ऐतिहासिक केंद्र म्हणून उत्तर भारताची झालेली जडणघडण तर सर्वांच्याच परिचयाची आहे. जम्मू-काश्मीरमधील निसर्गाने नटलेल्या डोंगररांगा आणि तेवढेच दहशतीच्या छायेखाली असलेले तिथले जनजीवन; हिमाचल प्रदेश, हरियाणा, पंजाब व उत्तर प्रदेशच्या नद्यांनी व्यापलेली मैदाने; उत्तराखंड, झारखंड, छत्तीसगड, बिहारसारखी आदिवासीबहुल लोकधाटी असलेली राज्ये, हे सर्वच उत्तर भारताच्या शिरपेचातले तसे मानाचेही आणि सामाजिक-सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील असलेलेही प्रांत आहेत. पंजाबचा सुप्रसिद्ध कवी पाश, हिंदीतला कवी धुमील ह्या मला दररोज प्रकर्षाने आठवणाऱ्या दोन असामी ह्याच प्रांतातल्या आहेत. उत्तर भारत एका संस्कृतीचं तसेच सांस्कृतिक इतिहास आणि राजकारणाचे प्रतीक आहे. इथे मुस्लीम संस्कृतीचे श्रद्धास्थान असलेला अजमेरचा दर्गा आहे. हुमायू बादशहाचा मकबरा आहे. महाबोधीचे मंदिर आहे. जगप्रसिद्ध ताजमहल आहे. सुवर्णमंदिर आहे. हिंदूंच्या तीर्थक्षेत्रांचे



काशी विश्वविद्यालय

माहेरघर असलेल्या ह्या उत्तर भारतातले एक टोक हिमालयातल्या गंगोत्रीचे आहे तर दुसरे गंगेच्याच काठावर वसलेले वाराणसी.

बनारस आणि काशी ही वाराणसीचीच नावे. इंग्रजांनी भारतातल्या अनेक ठिकाणांची नावे आपल्या उच्चारसोयीनुसार ठेवली. असा बनारसचा इतिहास खूप नंतरचा. पण वरुणा व अस्सी ह्या दोन नद्यांच्या छोट्याशा अस्तित्वशून्य दोआबातला आणि त्याबाहेर नंतर वसत गेलेला अधिवास म्हणजे वाराणसी होय. पुराणकथांमधून भेटणारी आणि नंतर जगभरात प्रसिद्ध झालेली हीच ती काशी आहे. बारा महिने गंगेच्या तीरावर बसून गंगेची आणि येणाऱ्या-जाणाऱ्या पर्यटकांची आणि भाविकांची सेवा करण्यात बारोमास न थकणारी वाराणसी, मिथकीय काशीच्या भारातून थकली-भागलेलीसुद्धा दिसते. तिच्यासाठी गंगा पोशिंदी. वाराणसीचे अन्यथा काय होईल असा प्रश्नच आहे. गंगा हिच्या नसानसात वाहते किंवा खरेतर गंगेतच ही नगरी राहते. खूप घाट आहेत. खूप मंदिरे आहेत. धर्मशाळा तर पैशाला पासरी आहेत. मी दुसऱ्यांदा पुण्याहून वाराणसीला निघालो आणि १ जानेवारी २००४ पोहोचलो. त्यादिवशी खरंतर माझा जन्मदिवस होता. वाराणसीची कर्मक्षेत्र म्हणून घडणारी ही भेट माझ्यासाठी अगदीच भावविभोर होती. अर्थात पुणे वाराणसी रेल्वे प्रवास म्हणजे प्रचंड दिव्य. ह्या प्रवासात मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आणि बिहारची माणसे अंतर्बाह्य कळतात. जी माणसे पुण्यामुंबईहून आपल्या सोबत प्रवास करतात ती बिचारी अशीच आपल्यासारखी पिचलेलीच असतात. पण मध्यप्रदेश सोडता सोडता रेल्वे अलाहाबादच्या इलाख्यात गेली की बरीचशी संथ होते आणि मग जागोजागी गाडीत चढणारी माणसे मात्र बेमुर्वतखोरपणे खुशाल आपल्या अंगावर येतात. जागा बळकावतात. त्यामुळे वाराणसीला रेल्वेतून प्रवास करण्याचा अनुभव तसा फार विचित्रच आणि दरवेळी भीतीदायक तीव्रता वाढवणारा. म्हणून सुरुवातीला मला वाराणसीचा तसा मनापासून कधी जिव्हाळा लागत नव्हता. पण काशी विश्वविद्यालयात रूजू झालो आणि एका वेगळ्याच काशीच्या नि वरुणाअस्सीच्या लोकधाटीला सामोरा गेलो. वाराणसीचे एक वेगळेच अंतर्यामी जग भेटले. इथला भूगोल आणि लोकधाटीचा लहेजाही वेगळाच. वाराणसी गंगेच्या काठावर असल्याने हवा दमट. उन्हाळ्यात कायमची चिकचिक. हिवाळ्यात हाडात शिरणारी थंडी तर जागच्या जागी उडायला लावते. पाऊस तसा बरा लागतो. पांढरी माती. पांढऱ्या मातीची मैदाने आणि खुरटलेल्या गवतासारखे ऊसाचे पिक पाहिले की पुणे-सातारा-कोल्हापूरकडचे एरंडासारखे ऊसाचे मळे आपसूक आठवून मनात अभिमानाने डोलतात. तीसेक तासांचा प्रवास करून वाराणसीच्या रेल्वेस्टेशनवर उतरल्यावर मात्र वाराणसी नाकातोंडात गुदमरवून टाकत आत शिरते. १८६२ साली बांधलेले स्टेशन कलकत्त्याच्या हावडा स्टेशनला पहिल्यांदा जोडले गेले. आता ह्या स्टेशनचा विस्तार आणि त्यावरचा भार खूपच आहे. परका प्रदेश आणि परकी जगरहाटी ह्यामुळे खरंतर आपण अगोदरच आक्रसलेले आणि त्यात वाराणसीची भोजपुरी भाषा कानाला गोड लागत असतानाच बोलणारा अनोळखी दबंग टणक माणूस आपले उरलेले अवसान घालवून टाकतो. पण बाकी सर्वदूर आपल्यासारखीच गरीब जनता. वराणसीशी मी लगेच जोडला गेलो त्याचे कारण काही हे महानगर नाही. महानगराची दु:खे वेगळी असतात. तिथल्या झगमगाटातही खरंतर सर्वच गोष्टींना सूज आलेली असते. धावपळीत ती दिसत नाही एवढेच. वाराणसीत मात्र खूप शांत वेळ! धावपळ नाही.


गंगेचा घाट

मी मराठी विभागात अधिव्याख्याता म्हणून रुजू झालो. माझे दुसरे एक सहकारी पडवळ सर अजून रूजू व्हायचे होते. मराठी विभाग मागील दोनेक वर्षांपासून जवळपास बंद होता. सुरेश भृगुवार हे बराच दीर्घकाळ सेवा करून निवृत्त झाले आणि मग आमची दोघांची नेमणूक झाली. वाराणसीत मदन मोहन मालवीय ह्यांनी स्थापन केलेल्या केंद्रीय विश्वविद्यालयात मराठीचा स्वतंत्र विभाग असणे ही खरोखरच मोठी बाब आहे. दिल्लीतही मराठीला स्थान होते पण वाराणसीच्या औदार्याची वागणूक दिल्लीतल्या मराठीला मिळाली नाही. मराठी माणूस दिल्लीत गेला की बिघडतो आणि मराठ्यांचे राजकीय मनसुबे उधळत उत्तर भारतातला राजकीय माणूसही धूर्तपणा करत राहतो. मालवीयांनी स्थापन केलेल्या काशी हिंदू विश्वविद्यालयाचा दृष्टिकोन मात्र मराठीबाबत सतत व्यापक राहिला आहे. दहाएक पिढ्यांपासून इथे आलेली खूप मराठी माणसे आहेत. वाराणसीत महाराष्ट्राचे एक वेगळेच स्थान आहे. अर्थात हे स्थान राजकीय अजिबातच नाही. इथली मराठी माणसे अल्पसंख्यांक का असेना पण आपली भाषा आणि संस्कृती जपून वाराणसीच्या पांढऱ्या मातीत रूजली आहेत. ही अशी कामानिमित्त वा अन्य व्यवसायानिमित्त स्थायिक झालेली ही महाराष्ट्राची कुटुंबे इथल्या माणसांच्या औदार्याचे साक्षीदार आहेत. काशी हिंदू विश्वविद्यालयाचा एक कॅम्पस १३०० एकरांचा आहे. दुसरा बरकच्छा हा २७०० एकरांचा आहे. ४००० एकरांचे दोन कॅम्पसचे हे विद्यापीठ भारतातल्या दातृत्वाचादेखील उत्तम नमुना

आहे. हैद्राबादच्या निजामानेदेखील मालवीयांना दान दिले. ज्यांनी ज्यांनी औदार्याने दानत केली, मालवीयांनी त्या सर्वांची ओळख जपली आहे विद्यापीठात. हैदराबाद गेट, सयाजीराव गायकवाड सेंट्रल लायब्ररी अशा रूपाने भारतातली चहूबाजूची मदत मालवियांनी संस्थात्मक केली आहे. पुणे विद्यापीठाला ४०० एकर जागा आहे. त्याच्या दहापट हे विद्यापीठ आहे. पुण्यात ४०० एकरातही केंद्र वा महाराष्ट्र शासनाची पुष्कळ अतिक्रमणे आहेत. केंद्रीय किंवा राज्यस्तरीय सरकारी वाटणाऱ्या पण अंतर्बाह्य एककेंद्री असणाऱ्या संस्थांचे जाळे पुणे विद्यापीठाला वाढू देत नाही. खरंतर महाराष्ट्रातल्या सर्वच विद्यापीठांची हीच अवस्था आहे. वाराणसी ह्या बाबतीत अगदीच उदार आहे.

जयंत नारळीकरांचे वडील याच विद्यापीठात गणिताचे प्राध्यापक होते असा इतिहास माहीत होता. पण वाराणसीत माझा पहिला आधार होता तो शुक्ला कुटुंबीयांचा. प्रोफेसर शुक्ला हे विद्यापीठाच्या हिंदी विभागातील नावाजलेले प्राध्यापक आणि लेखकही. ते निवृत्त होऊन खूप वर्षे झाली होती त्यावेळी. परंतु त्यांचा मोठा मुलगा हिंदी विषयातच विद्यावाचस्पती मिळवलेला त्याला मी भेटलो. ते वयाने मोठे होते. पण त्यांनी मी विद्यापीठात रुजू होण्यापासून ते राहण्याची व्यवस्था होईपर्यंत अशी सर्व प्रकारची मदत केली. माझे मन मोकळे करण्याचे हे पहिले केंद्र होते. त्यांनी सावळा रंग आणि उंच देहयष्टी. पुण्यात राहिले होते. आज का आनंद की संध्यानंदमध्ये पत्रकार म्हणून काहीकाळ काम करून ते पुण्यातून परत वाराणसीला गेले होते. त्यांची अपूर्ण स्वप्ने माझ्या रूपाने पूर्ण होत आहेत असा भास आणि त्यांच्याकडे पाहिले की समाधानाचा असाच अतृप्त चेहरा दिसायचा. त्यांची एक आठवण आजही खूप ताजी आहे. मी त्यांच्याच एका स्वतंत्र खोलीत त्यांच्यापासून काही अंतरावर राहात होतो. मी वाराणसीत आल्यापासून त्यांच्या घरी चहासाठी गेलो नव्हतो. ते सतत बोलवायचे आणि म्हणायचे की आपण घरी जाऊ. असे करता करता एक दिवस ते म्हणाले की आज आपण सायंकाळी घरी जाऊ. रात्रीचे जेवण इतरत्र करू नका. ते मला न्यायला आले. आज चूडामटरचा बेत आहे असे ते म्हणाले. भूक खूप लागली होती. त्यात घरचे खायला मिळते म्हटले की माझा आनंद काय सांगू? कारण रोज विद्यापीठातून येतांना लंका चौकात मी एका छोट्या हॉटेलात खाऊन यायचो. पनीर खाऊन खाऊन कंटाळा आला होता. आज मी पोटभर घरचे जेवणार ह्या आनंदाने त्यांच्या सोबत गेलो. त्यांच्या बायकोने पाणी वगैरे दिले. सहा वाजता जेवणाचा बेत म्हणजे भरपूर खायची संधी. पण समोर अचानक चूडामटर आले आणि मी गदबाळलोच. शुक्लांची चूक नव्हती. ते मला चूडामटरच खायला घेवून आले होते आणि मी भाषेच्या अज्ञानामुळे भलतेच काही व्यंजन समजत बसलो. पाहतो तर काय हिरवे वाटाणे घातलेले पोहे समोर होते. आता हे पोटभर खायचे तरी कसे. मनातल्या मनात मी खूप हसत राहिलो. पण चेहऱ्यावर कोरीव सभ्यता बाळगत चूडामटर संपवले आणि त्यांचा निरोप घेतला. अर्थात शुक्ला कुटुंब माझ्यासाठी आजही चिरस्मरणीय आहे. माझा एकट्याचा बारीक सारीक संसार जमवायला, बारीक सारीक खरेदी करायला, पगार होत नाही तोवर पैशाची मदत करायला एकमेव शुक्लाच होते माझ्या अडीअडचणीत.

मला वाराणसीची खरी ओळख करून दिली ती शिवजीने. शिवशंकर सिंह असे त्याचे नाव. पण शिवजी म्हणूनच तो परिचित होता. माझ्यापेक्षा दुप्पट किंवा त्याहून अधिक वयाचा शिवजी आमच्या विभागात शिपाई होता. त्यावेळी सोनी नावाचा एक कारकूनही होता. पण मस्त नाळ जुळली ती शिवजीशीच. शिवजीचा पेहराव कोणाच्याही नजरेत भरेल असा वैशिष्ट्यपूर्णच. पांढरा शर्ट, पांढरा पायजमा आणि डोक्याला पांढरे उपरणे लपेटलेले. भली मोठी साधूसारखी मौलवी दाढी. तोंडात पान. मला वसतिगृहात असतांना तंबाखू खायची सवय लागलेली. बनारसला जायचे म्हणून मी गायछाप तंबाखू सोबत घेतली होतीच. पण ती मला सोडायची होती. सुटतही आली होती. पण तलफ आली की कसेतरीच व्हायचे. शिवजी पानाचा भक्त. मी पान खायला सुरूवात केली. बनारसी पान म्हणजे रात्रभर द्रावणात भिजवलेला तंबाखू, भिजवलेली सुपारी आणि बनारसी पान. मी पान खातूय म्हटल्यावर शिवजी मला पान घेऊन येऊ लागला. त्याची एक सवय होती. मी रुजू व्हायच्या अगोदर विभागात दोनेक वर्षे कोणी नव्हतेच. त्यामुळे तो मोकळा होता. त्याला दुपारपर्यंत विद्यापीठाबाहेर राहायची सवय लागलेली. दुपारनंतर शिवजी गायब व्हायचा. मी हे हेरायच्या अगोदरच शिवजीने मला सांगितले ह्याबद्दल सर्व. साब, सकाळी कितीही लवकर बोलवा पण दुपारी तीन नंतर मला जाऊ द्या. पहिल्या सहा महिन्यात मुले नव्हती त्यामुळे काम तसे नव्हतेच; पण मला कुतूहल हे की हा जातो कुठे? मग मला कळले की तो रोज दुपारनंतर गंगेच्या घाटांवर जायचा. घाटावर जाऊन रोजच्या चौकडीबरोबर पत्ते कुटत बसायचा. लथ लागलेली. कारणं मात्र भलतीच भावनिक सांगायचा. शिवजीच्या असे बाहेर जाण्याचे मला काही फारसं वाटायचं नाही. शिपाई म्हणून आपली सर्व कामं चोख करून दुपारी तीन नंतर स्वारी बाहेर पडायची. जे काम एखादा शिपाई एका तासात करत असेल तेच काम शिवजी १० मिनिटांत करायचा. ही त्याची खासियत. म्हणूनच त्याच्याबद्दल कधी कामचुकारपणासारखे काही वाटले नाही. शिवजी माझ्यासाठी वाराणसीचा गूगल मॅपच. सायकल रिक्षातून त्याने मला वाराणसी दाखवली. अशावेळी शिवजीला घाटावरची चौकडी व कुटायचे पत्ते आठवायचे नाहीत. मग रात्रीपर्यत शिवजी सोबत असायचा. गर्दीतून लीलया वाट काढणार. मला तो साब असे म्हणायचा. हिंदी चित्रपटातल्या कथानकासारखे सारे वाटायचे. विद्यापीठातील सर्व कार्यालये, तिथले अधिकारी ह्या सर्वांना माझी अतिशय गर्वाने ओळख करून द्यायची शिवजीला भारी हौस. कोणतेही कागदपत्र मिळवायचे असेल तर शिवजी चुटकीसारखा काम करायचा. त्याची तेवढी वटच होती. कामगार युनियन आणि मूळातच राजकीय पार्श्वभूमी असे काहीबाही त्यांच्या पाठीशी होतेच, पण शिवजी अतिशय साध्वी मनाचा होता. अर्थात सरळ होणारे काम होत नाही असे दिसले की त्याचा मूळचा स्वभाव प्रकट व्हायचाच. पण खूप कमी वेळेला. शिवजी मला दहाबारा पाने बांधून आणायचा.

दुपारपर्यंत ती पाने जायची. मग मी दुपारी जाऊन आणख़ी पाने बांधून आणायचो. एकदा विभागातील सर्व खोल्या नीट बघाव्यात म्हणून शिवजीबरोबरच गेलो. शिवजीची एक चिंचोळी खोली होती. दहाजण बसतील असा वर्गच. तो वर्ग कायम बंद असायचा. त्याची साफसफाईसुद्धा होत नव्हती. त्या वर्गात जाऊन तो बसायचा. तिथे गेलो तर मला सिगारेटच्या पोकळ नळ्या दिसल्या कागदाच्या. चुट्टा ओढायची त्याला सवय होती. दुपारनंतरची अस्वस्थता शिवजीत यायला हेही एक बक्कळ कारण होते. कदाचित शिवजी गांजा ओढत असावा. अर्थात बनारसमध्ये गांजा ही काही नावीन्यपूर्ण बाब नव्हतीच. साधूसन्यासांचा हा रोजचाच परिपाठ होता. शिवजी अधूनमधून कधी फोन केला तर त्याच उर्मीने आणि आतल्या उमाळ्याने बोलतो. परवा पडवळ सरांशी फोन झाल्यावर कळले की युरिनमार्गाचा की कसला तरी कर्करोग झाला आणि त्यातून बाहेर पडण्याचा तो प्रयत्न करतोय. आताही तसाच पांढराशुभ्र शिवजी साक्षात तरळतो.

वाराणसी अशाच खूपशा माणसांची आहे. म्हणून एका अर्थाने ती जीवंतही आहे. वाराणसी म्हणजे अर्थातच गर्दी. सायकल रिक्षात बसलं की वेगळाच अनुभव यायचा. पाठपोट एक झालेले सायकलवाले पाहिले की दया यायची. त्यांच्या सायकलीत बसूच नये असे वाटायचे परंतु त्यांच्याही पोटापाण्याचा प्रश्न. नाईलाजाने त्यांच्या सायकलीत बसायला लागायचे. फार कमी पैशात खूप अंतर वाहून न्यायचे हे लोक. चढ आला की सायकलीच्या पॅडलवर उभे राहून आतडी पिळवटणारी ताकद लावायला लागते. मी एक शिरस्ता केला होता. चढा आला की उतरायचे आणि त्याच्याबरोबर चालायला लागयचे. अशावेळी तो सायकलवाला मायेने गालातल्या गालात स्निग्धपणे हसायचा. सायकलीला सायकली तर सहज थडकायच्या. महाराष्ट्रात असे काही थडकले की काय काय होते हे पाहण्याचा इतिहास असलेले आम्ही बऱ्याचदा सवय होऊनही ह्या वर्तमानावर अचंबित व्हायचो. वाराणसीचे रस्ते म्हणजे अगदी अरुंद. चिंचोळे. वाहतुकीची अजिबातच शिस्त आणि रीतभात नाही. रीत अस्ताव्यस्ततेचीच. घाटावर लोकांची तोबा गर्दी. सायंकाळी सातच्या सुमारास चालणारी गंगेची आरती बघायला खूप मजा येते. मी आस्तिक नाही पण वातावरणाने भारावून टाकण्याची क्षमता गंगेच्या आरतीत आणि वाराणसीत नक्कीच आहे. केदारनाथ सिंह ह्यांची एक कविता आहे 'बनारस' ह्या नावाची. ती खरेतर वाराणसीची दुखरी नस. ती इथे राहणाऱ्याला कळते. सुरुवातीला सलते. पण नंतर एकरूप होत गेले की सर्वजण ही दुखरी नस विसरतात. किंबहुना त्यात भर टाकतात. त्या कवितेची आठवण मला वाराणसीची आठवण आली की हमखास होते.

कभी सई-साँझ
बिना किसी सूचना के
घुस जाओ इस शहर में
कभी आरती के आलोक में
इसे अचानक देखो
अद्भुत है इसकी बनावट
यह आधा जल में है
आधा मंत्र में
आधा फूल में है
आधा शव में
आधा नींद में है
आधा शंख में
अगर ध्यामन से देखो
तो यह आधा है
और आधा नहीं भी है
जो है वह खड़ा है
बिना किसी स्तंहभ के
जो नहीं है उसे थामे है
राख और रोशनी के ऊँचे ऊँचे स्तंभ
आग के स्तंभ
और पानी के स्तंभ
धुएँ के
खुशबू के
आदमी के उठे हुए हाथों के स्तंभ
किसी अलक्षित सूर्य को
देता हुआ अर्घ्यर
शताब्दियों से इसी तरह
गंगा के जल में
अपनी एक टाँग पर खड़ा है यह शहर
अपनी दूसरी टाँग से
बिलकुल बेखबर!

गाईगुरांच्या शेणाने भरलेले रस्ते, येणाऱ्या जाणाऱ्या सायकली, रस्त्याने चालणारी लगबगीतली माणसे आणि वाराणसीला पांग फेडायला किंवा पापक्षालन करायला येणारे अफाट यात्रेकरू हा वाराणसीचा रोजचा वर्तमान. पहाटे तीन चारपासून साधूंची चालणारी हालचाल आणि गंगेच्या खळखळाटी वाऱ्याच्या झुळकेने जागे होणारे काठ, काठावरची दुकानदारी आणि पिढ्यान्‌पिढ्या इथे राहणारी माणसे एका रहस्यमयी समाधानात मात्र रोजच आपला क्रम पाळताहेत, हे आजही समजून घ्यायला खूप त्रास होतो. भगवान बुद्धाच्या सानिध्याने शुचिर्भूत झालेले सारनाथ फार लांब नाही वाराणसीहून. पण वाराणसी सारनाथ अंतर कापायला अजून खूप कालवकाश गरजेचा आहे. तितक्या संथ गतीने वाराणसीचे चालणे सुरूच आहे. गालीबची उर्दू आणि उस्ताद बिसमिल्लाह खान साहेबांची सनई इतिहासाच्या एका फ्रेममध्ये बंदिस्त झालीय आणि इथला वीणकर आधुनिक-उत्तरआधुनिकतेच्या भांडवलशाहीत जमीनदोस्त झाला ही वरुणाअस्सीची लोकधाटी तुम्हलाही गेलात तर अस्वस्थ केल्याशिवाय राहणार नाही.

**– डॉ. प्रभाकर देसाई**
भ्रमणध्वनी : ९८८१९०८०२०
prabhakardesai@unipune.ac.in



**प्रा. अविनाश कोल्हे**

**निवृत्त प्राध्यापक, राज्यशास्त्र, मुंबई विद्यापीठ**

# दिल्ली तुम्हारी, रूस तुम्हारी

दिल्लीतही दोन दिल्ली आहेत. एक पुरानी दिल्ली. म्हणजे लाल किल्ला, जामा मशिद, चांदनी चौक वगैरे भाग असलेली दिल्ली आणि दुसरी नवी दिल्ली. येथे संसद भवन, सर्वोच्च न्यायालय वगैरे संस्था आहेत. या दोन दिल्लीत फेरफटका मारला तर जाणवतं की ही फक्त दोन शहरं नसून या दोन संस्कृती आहे. पुरानी दिल्ली म्हणजे मुघलांची राजधानी असलेली दिल्ली, तर नवी दिल्ली म्हणजे इंग्रजांची राजधानी असलेले शहर.

**श्या**म बेनेगल यांनी दिग्दर्शित केलेल्या 'जुनून' चित्रपटात एक संवाद आहे. यात जेनिफर कपूर ही इंग्रज अधिकाऱ्याची पत्नी शशी कपूर या मुस्लीम सरदाराशी बोलत असते. पार्श्वभूमीला १८५७चे बंड धुमाकूळ घालत असते. यात कधी बंडखोर सैनिकांची सरशी होते तर इंग्रजांची. मी सिनेमाचे पूर्ण कथानक सांगत नाही. तर या प्रसंगी जेनिफर कपूर शशी कपूरला म्हणते, 'दिल्ली तुम्हारी, रूस तुम्हारी'. ही रूस म्हणजे जेनिफरची मुलगी जी शशी कपूरला फार आवडत असते. यातला लक्षात घ्यायचा मुद्दा हा की दिल्लीचे महत्त्व हे असे आहे. ज्याचा हाती दिल्ली तोच देशावर राज्य करू शकतो. आपल्या देशाच्या प्राचीन इतिहासापासून आधुनिक इतिहासापर्यंत दिल्लीचे महत्त्व अबाधित राहिले आहे. मुघलांच्या काळात सुरुवातीला हिंदुस्थानची राजधानी आग्रा होती, नंतर हा मान दिल्लीला मिळाला. इंग्रजांच्या काळात हा मान सुरुवातीला अनेक वर्षे कोलकोत्याकडे होता, पण इंग्रजांनीसुद्धा इ.स. १९११ साली राजधानी दिल्लीला हलवली.

का कोण जाणे मला लहानपणापासून दिल्लीचे आकर्षण वाटत आले आहे. तसे मी दिल्लीला अनेकदा गेलेलो आहे. कधी पर्यटक म्हणून तर कधी नोकरीच्या निमित्ताने. त्यामुळे दिल्लीला जाऊनही दिल्ली तशी गवसत नव्हती. ही संधी मला मार्च २००३ मध्ये मिळाली जेव्हा जे.एन.यू.-मध्ये (जवाहरलाल नेहरू विद्यापीठ) एक महिन्याचा कोर्स करण्यास जावे लागले. यात सर्वात महत्त्वाचे आकर्षण म्हणजे हा कोर्स करताना जे.एन.यू.च्या कॅम्पसमध्येच राहावे लागणार होते. म्हणजे नवी दिल्लीच्या मध्यभागात. मी अक्षरशः हरखून गेलो.

वर इंग्रजांनी इसवी सन १९११ साली राजधानी दिल्लीला हलवल्याचा उल्लेख आलेला आहे. तेव्हा इंग्रज सरकारने सर एडवीन ल्युटेन्स (१८६९-१९४४) या ब्रिटिश वास्तुविशारदास आमंत्रित केले. त्याच्या हवाली जुन्या दिल्लीच्या बाहेरचा एक भलाथोरला जमिनीचा तुकडा केला व तेथे त्याला भारताची राजधानी उभारण्यास सांगितले. म्हणून ही 'नवी दिल्ली'. जशी मुंबईत वाशी, कोपरखैरणेला 'नवी मुंबई' आहे तशी दिल्लीतही दोन दिल्ली आहेत.



**जवाहरलाल नेहरू विद्यापीठ**

एक पुरानी दिल्ली. म्हणजे लाल किल्ला, जामा मशिद, चांदनी चौक वगैरे भाग असलेली दिल्ली आणि दुसरी नवी दिल्ली. येथे संसद भवन, सर्वोच्च न्यायालय वगैरे संस्था आहेत. या दोन दिल्लीत फेरफटका मारला तर जाणवतं की ही फक्त दोन शहरं नसून या दोन संस्कृती आहे. पुरानी दिल्ली म्हणजे मुघलांची राजधानी असलेली दिल्ली, तर दुसरी नवी दिल्ली म्हणजे इंग्रजांची राजधानी असलेले शहर.



**दिल्ली विद्यापीठ**

माझे वास्तव्य जरी नव्या दिल्लीत होते तरी मला पुरान्या दिल्लीची तितकीच ओढ होती. शिवाय खाण्यापिण्यात फार रस असल्यामुळे मी रात्रीचे जेवण वसतिगृहात न घेता बाहेर कोठेतरी घेत असे. यात मग कधी चांदनी चौकचा फेरफटका असे तर कधी जामा मशिदीसमोर असलेल्या 'करीम'कडच्या कबाबवर ताव मारणे असे. दिल्लीतील चांदनी चौकातील पराठेगल्लीबद्दल मी पहिल्यांदा पु.लं.च्या 'माझे खाद्यजीवन' या लेखात वाचले होते. पराठेगल्लीत किती प्रकारचे पराठे मिळतात हे सांगणे अवघड आहे. दिल्लीत 'आलू के पराठे' तर कुठेही मिळतात, जसं मुंबईत बटाटेवडे कुठेही मिळतात. या चांदनी चौकात एका शनिवारी संध्याकाळी भटकत असताना मारुतीचे मंदिर दिसले. शनिवार होता म्हणून दर्शनासाठी आत गेलो तर मंदिरात अगदीच किरकोळ गर्दी. मी दर्शन घेऊन बाहेर आलो तर दिसले की बाजूला शनीचे मंदिर आहे आणि तेथे तोबा गर्दी आहे. एका भक्ताला विचारले की हे कसे? आमच्या महाराष्ट्रात तर शनिवार म्हणजे बजरंगबलीचा वार समजला जातो. तो म्हणाला हे चूक आहे. उत्तर भारतात मंगळवार बजरंग बलीचा तर शनिवार शनीदेवाचा मानला जातो. आपल्या देशात प्रांतागणिक देवाचे वार बदलतात की काय असा विचार करत मी तेथे एका कोपऱ्यात मिळणारा केवळ अप्रतिम म्हणावा असा दहीवडा (दिल्लीच्या भाषेत दहीभल्ला) हादडला.

दिल्लीची ही एक बाजू झाली. दुसरी व माझ्या मते जास्त महत्वाची बाजू म्हणजे दिल्लीतील उच्च दर्जाचे बौद्धिक वातावरण. तेथे प्रत्येक विषयाचे, खास करून राजशास्त्र, अर्थशास्त्र वगैरे सामाजिक शास्त्रांचे नामवंत अभ्यासक राहतात, जे सहसा तरुण अभ्यासकांसाठी उपलब्ध असतात. ज्या अभ्यासकांचे लेख आपण 'इंडियन एक्सप्रेस', 'टाईम्स ऑफ इंडिया', 'हिंदू' वगैरे दैनिकांत नेहमी वाचत असतो ते अभ्यासक आजूबाजूला वावरताना दिसतात. अशा अभ्यासकांमुळे दिल्लीचे बौद्धिक वातावरण चांगले आहे. याची एक बाजू म्हणजे तेथे अनेकदा चांगल्या पुस्तकांचे प्रकाशन समारंभ असतात. मला अशाच एका इंग्रजी पुस्तकाच्या प्रकाशनसोहळ्याला उपस्थित राहण्याची संधी मिळाली. ते पुस्तक होते 'ए पॅसेज फ्रॉम इंडिया'. ई.एम.फोस्टरच्या भारतावरील गाजलेल्या कादंबरीचे नाव आहे 'ए पॅसेज टू इंडिया'. इस्माइल मर्चंट (१९३६ ते २००५) या अवलिया सिने प्रोड्युसरचे हे आत्मचरित्र होते. मुंबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजमधून पदवी घेतल्यानंतर इस्माइल अमेरिकेला उच्च शिक्षणासाठी गेला पण डोळ्यांत स्वप्न होते की हॉलिवूडमध्ये चित्रपटनिर्माता व्हायचे. पुढे याला जेम्स आयवरीची साथ लाभली. या दोघांनी १९६१ साली 'मर्चंट आयव्हरी प्रॉडक्शन्स' ही कंपनी सुरू केली व नंतर तब्बल ४४ चित्रपट बनवले. अशा अवलियाच्या आत्मचरित्राच्या प्रकाशनाला उपस्थित राहण्याची संधी मिळाली. मी माझ्याच नशिबाचा हेवा करत होतो.

दिल्लीचे आणखी एक वैशिष्ट्यं म्हणजे तेथे निवृत्तीनंतर स्थायिक झालेले ज्येष्ठ पत्रकार, राजदूत, उच्चपदस्थ नोकरशहा/लष्करी अधिकारी वगैरे राहतात. मला जेव्हा दिल्लीला जाण्याची संधी मिळणार आहे हे निश्चित झाले तेव्हा मनात पहिला विचार आला की 'टाइम्स ऑफ इंडिया'चे माजी संपादक श्यामलाल यांना भेटलेच पाहिजे. माझ्या बौद्धिक विकासात श्यामलाल यांचा दर शनिवारी 'टाइम्स ऑफ इंडिया'त प्रकाशित होणारा साप्ताहिक स्तंभ 'लाईफ अँड लेटर्स'चे फार महत्त्व आहे. तेव्हाचे माझे जागतिक घडामोडींचे ज्ञान व इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व वगैरे सर्वच अंगांनी आनंद होता. मी पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ग्रंथालयात डाव्या बाजूला वीरकरांचा शब्दकोश आणि उजव्या बाजूला श्यामलालांचे सदर घेऊन बसत असे. त्यांचे लेख किमान तीन वेळा वाचल्याशिवाय समजत नसत. अशा श्यामलाल यांना कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी भेटणे गरजेचे होते. त्यासाठी पुरेशी खटपट केली, त्यांना फोन करून भेटीची वेळ मागितली. त्यानुसार त्यांच्या दुमजली इमारतीत भेटलो. तासभर गप्पा केल्या, पाया

पडलो व अतिशय तृप्त मनाने बाहेर आलो.

दिल्लीत एका बाजूला ही गंमत अनुभवायला मिळाली तर दुसरीकडे आय.आय.टी. दिल्लीत एका संध्याकाळी ‘स्पीक मॅकी’च्या कार्यक्रमाला जाण्याची संधी मिळाली. दिल्ली आयआयटी आणि जेएनयूचे आवार हे अंतर म्हणजे मुंबईच्या भाषेत ‘वॉकिंग डिस्टन्स’. त्या संध्याकाळी तेथे सोनल मानसिंग (जन्म : १९४४) यांच्या ओडीसी नृत्याचा कार्यक्रम होता. मला ‘नृत्य’ हा कलाप्रकार फार आवडतो. नृत्य हा एकमेव कलाप्रकार आहे ज्यात कलाकार स्वतःच्या संपूर्ण शरीराच्या माध्यमातून भावभावनांचा आविष्कार करत असतो. वृदांवनातून श्रीकृष्ण कायमचा गेल्यावर तेथील गोपिकांची, राधेची काय अवस्था झाली होती याचे ते सादरीकरण होते. श्रीकृष्ण नसलेल्या वृदांवनात जगणे त्यांना कसे असह्य झाले असेल याची ती कथा होती. हे नृत्य सादर करणाऱ्या सोनल मानसिंग यांचे तेव्हा वय ५९ वर्षे होते! पण बाईच्या पायांत जणू बिजली उतरली होती. त्यांनी राधेचा विरह, तिचे कासावीस होणे, तिचे सैरभैर होऊन सर्वत्र कृष्णाला शोधणे वगैरे एवढ्या जबरदस्त तीव्रतेने सादर केले की विचारता सोय नाही.

ज्या दिवसांत मी दिल्लीत होतो त्याच दिवसांत म्हणजे मार्च महिन्यात रंगपंचमीचा सण होता. मी दिल्लीपासून दोन तासांच्या अंतरावर असणाऱ्या मथुरेला जाऊन हा सण बघण्याच्या विचारात होतो, पण काही दिल्लीनिवासी मित्रांनी न जाण्याबद्दल सल्ला दिला. दंगा होऊ शकतो वगैरे भीती घातली. दुर्दैवाने मी या सर्वाला बळी पडलो व मथुरेला गेलो नाही. मला आजही याचा मनापासून पश्चात्ताप होतो. मी मथुरेची रंगपंचमी बघण्याची संधी सोडली. आता अशी संधी जीवनात परत कधी येईल हे तो गोवर्धनच जाणे.

दिल्लीत तीनचार विद्यापीठं आहेत. जेएनयू, दिल्ली विद्यापीठ, जामिया मिलिया विद्यापीठ. या सर्व ठिकाणी वर्षभर काही ना काही बौद्धिक कामे, सेमीनार, चर्चासत्रे, परदेशी अभ्यासकांची भाषणे सुरूच असतात. त्यामुळे अभ्यासकाचे दिल्लीत सहज मन रमू शकते. बघता बघता महिनाभराचा माझा कोर्स संपला व परत जाण्याचा दिवस जवळ येऊ लागला. माहेरपणाला आलेली सासुरवाशीण जशी सासरला जाण्यास नाखुश असते तशा मन:स्थितीत मी दिल्लीचा निरोप घेतला; पण हा निश्चय करूनच की मी परत येईन.


**– प्रा. अविनाश कोल्हे**

भ्रमणध्वनी : ९८९२१०३८८०

nashkohl@gmail.com



अक्षरगंध

दिवाळी २०१९

वर्ष १०वे



**मिलिंद ढेरे**
फोटोग्राफर

# एका गावाचं गारूड

नॉर्थ वेस्ट फ्रान्सचं हे पहिलं दर्शन...
मला त्यानं खूप दिलं... जे दिलं ते कोरलं गेलं कायमचं...
परिवार भेटला तो माझा, आमचा झाला... निसर्ग तर आयुष्यभराचा झाला... आत खोलवर रुजलं काही...
त्याला धुमारे फुटतीलच... हा प्रवास सुरू झाला होता...

**यु**रोपचा प्रवास ठरला... आमचा आम्ही करण्याचा. आमचा पहिलाच प्रवास होता तो...

२८ दिवसांचं प्लॅनिंग सोपं नव्हतं...

माझ्या बायकोनं ते अतिशय कष्टपूर्वक केलं...

आमचा पहिला मुक्काम होता नॉर्थ-वेस्ट फ्रान्समध्ये. आणि तोही घरात... माझ्या मुलीच्या एका मैत्रिणीकडे...

त्यात एक मऊपण असेलसं वाटत होतं... आणि ते तसं होतंच; पण तो अनुभव नंतर यायचा होता...

येताना मुक्ताला, माझ्या मुलीला इकडे आणायचं होतं... ती जवळजवळ वर्षभर फ्रान्समध्येच होती.

आत मी खूपच संकोचलो होतो. सतत दुसरी भाषा असणार... माणसं वेगवेगळी असणार... थोडं कसं होणार, असंच काहीसं आत चालू होतं.

आणि निघालो...

आठ-नऊ महिने खूपच असतात मुक्ता तिकडे असण्याचे. त्यापूर्वी इतके दिवस ती कधीच कुठे गेली नव्हती. दूर अशी... आम्हाला नातेवाईक जवळजवळ नाहीतच... म्हणून आमचे आम्हीच एकमेकांत घट्ट होतो.

मला जाणवलं, मुक्ता, पॅरिस एअरपोर्टवर भेटली तेव्हा आणि एकदा मागे २२ नोव्हेंबर १९९७ रोजी, तिचा जन्म झाला त्या वेळेस... साधारण तेवढेच दिवस... फटकिनी स्मरून गेले...

यावेळी तिच्यातले आत्मविश्वासाचे बदल जाणवले...

आम्ही तिघं खूप दिवसांनी कडकडून भेटलो...

त्या दिवशीचा मुक्काम खूप प्रवासानंतरचा होता...

पुण्याहून निघताना फक्त तिच्याबद्दलचाच विचार होता...

रात्री फार काही बोलणं झालं नाही...


दुसऱ्या दिवशी परत सकाळी आमचा प्रवास लांबचा होता..

पॅरिसहून बसनं सहा तासांचा...

मला खरं तर बसचेच प्रवास आवडतात... डोळ्यांना आसमंत भेटत राहतो ना!

आणि मग सुंदर हिरव्या शेतांना, त्यांतल्या छोट्याछोट्या वस्त्यांना, सुंदर आणि चित्रातल्या घरांना भेटत आम्ही निघालो...

पिवळ्या फुलांचे पट्टे मारलेली जमीन, तिच्या पार्श्वभूमीवर हिरवेकंच शेतांचे पट्टे, थोडे जाडच थर... मला हा निसर्गी चित्रकार



जंगल वॉक

खूपच काही देत होता...

मध्येच पिवळ्याधमक फुलांच्या शेतांना त्यानं नुकतीच नांगरून ठेवलेली जमीन कमी फोरग्राऊंडला ठेवली होती...

मध्येच वस्तीवरची लाल कौलांची दोनचार घरं मला खुणावत होती...

अशा घरांमध्ये राहण्याचा योग कधी तरी यावा... मी प्रार्थना करत होतो...

तंद्री भंगली. मुक्ता तिच्या तिथल्या, युरोपच्या काही एकट्या प्रवासांबद्दल बोलत होती...

बाहेरच्या रंगांच्या पट्ट्यांबद्दल बोलताना तिचा आत्मरंगही प्रवासी झाला आहे असं मला खूपच जाणवलं...

प्रवास हा नुसता इथून तिकडे जाणं एवढाच मर्यादित नसतो, सर्व संस्कृतींचे परीघ तो तुमच्याबरोबरच ओलांडत असतो...

माणसं, भाषा, अन्न, भौगोलिक प्रदेश... संस्कृती यांना तो सतत स्पर्श करत असतो...

आणि तिथल्या माणसांचे वास... तुम्ही त्यांचं होणं, त्यांनाही तशी खूप खोलवर जाणीव होणं, हेही... खूपच गोष्टी बदलतात...

आठ-नऊ महिन्यांत मुक्तानं ते साध्य केलं होतं...

भाषा हा अगदी महत्त्वाचा भाग ठरला. ती उत्तम फ्रेंच बोलत होती. त्यामुळेच ती एका वेगळ्या भूमीशी संवादी झाली होती... त्या प्रदेशाशी, फ्रान्सशी..

आम्ही तिच्या अगदी जवळच्या मैत्रिणीकडे, तिच्या गावाला चाललो होतो... आमच्याकडे ते येऊन गेले होते एकदा तसे...

पण तरी... आम्ही अवघडलो होतोच...

रीन्स नावाच्या गावी आम्हाला नताली - मुक्ताच्या मैत्रिणीची, म्हणजे मतिल्डाची आई न्यायला आली...

तिचं ते नोकरीचं गाव... रोज एक तासाचा ड्राइव्ह करून त्यांच्या ब्रुसविले गावाहून, ती इथे नोकरीसाठी येते... साष्टांग नमस्कार तिला...

आमचं जडजड सामान तिच्या गाडीत चढवलं...

आणि असंच, म्हणजे काहीसं रीन्ससारखंच त्यांचं गाव असेल असा समज झाला माझा...

आम्ही जिथं राहणार होतो ते गाव... जॉ पिअरे प्रॉड, नताली आणि मतिल्डाचं गाव...

रीन्स चांगलंच शहराकडे जाणारं, जुनं, वसलेलं शहरच होतं... दगडी घराचं मला फार पहिल्यापासून आकर्षण होतं... इथे तर फक्त दगडी इमारती होत्या... सुंदर रस्त्यांच्या कडेला अगदी दिमाखात उभ्या होत्या...

अत्यंत शिस्तीचं पार्किंग, झेब्रा क्रॉसिंगवरूनच चालणारी माणसं... सर्व स्वच्छ... तिथे राहणारा प्रत्येक माणूस हा स्वतः जबाबदारीनं वागतो... सगळ्या नियमांचं पालन करतो... आणि म्हणूनच स्वच्छ राहतात ही गावं आणि शहरं...

फ्रान्स निसर्गाच्या समतोलाबाबतीत अगदीच आग्रही आहे.

इथल्या प्रत्येकाच्या आत कुठे तरी हे आपलं आहे आणि आपल्यासाठी आहे याची तीव्र जाणीव मनात कायम असावी...

माझं परत प्रवासात बोलणं कमी झालं... बाहेरची निरखानिरखी चालू झाली...

परतपरत मी मनानं तिथला होत होतो का?

प्रवास आतही चालू होताच...

'जवळ आलं गाव आता,' कोणीतरी म्हणालं. अजूनही लांबून दिसणाऱ्या बिल्डिंग दिसत नव्हत्या...

मी जरा साशंक झालो... विस्तीर्ण शेतीच्या प्रदेशातून आणि मध्येमध्ये असणाऱ्या जंगलातून प्रवास करताना, तिथले मानवी वस्तीचे अंश अजिबातच दिसत नव्हते...

जरा अस्वस्थच झालो... मुक्ताशी बोललो...

'पण तुला आवडेल,' ती म्हणाली...

लांबूनच छोटा एक दगडी त्रिकोण आकाशी गेलेला दिसला...


मग मुक्ता म्हणाली, 'आलोच रे आपण...'

आणि गूगल सर्चमध्ये आधी दिसलेल्या गावात आम्ही शिरलो...

थोडं गावाबाहेरच, एका साध्या पण टुमदार घरात आमची गाडी शिरली...

ते घर एकदमच आपलं का वाटलं? आम्ही परक्या घरात शिरतो आहोत असं वाटलंच नाही... का व्हावं असं?

खूप सहजपणानं आम्ही आत शिरलो... खोल्या कळल्या



ब्रुसविले गाव

आणि लगेचच बाहेर पडायचं आहे फ्रेश होऊन असंही कळलं...

इस्टर होता. जॉ प्रॉड – मतिल्डाचे वडील – आधीच चर्चमध्ये होते... आम्ही सगळ्यांनी जाणं हे गरजेचं...

अर्ध्या तासात फ्रेश होऊन निघालोसुद्धा... नतालीनं गाडी काढली... पिवळी उन्हं स्वागतासाठी उभीच होती आमच्यासाठी... माझ्या आणि माझ्यासारख्या अनेकांसाठी हे आवडीचं ऊन... आतपर्यंत जाणारा, एक हवाहवासा वाटणारा, थोडा तीव्रच, सुखद गारठा. सातएक वाजले असतील...

गाडी पार्क झाली... सगळेच उतरले, मी थोडा मागून... आणि सर्व जण चालूपण लागले. मान थोडी वर केली तर चक्क पिवळ्या उन्हानं चर्चच्या शिखराला लपेटलं होतं... तो त्रिकोणी दगडाचा सुळका... जो लांबूनच येताना दिसला होता तोच... पिवळाधमक होऊन लकाकत होता.

विलक्षण फ्रेम होती ती... असं वाटलं... बसून राहावं आणि उन्हानं सोडूच नये त्या दगडी सुळक्याला... थेट निळ्याशार आभाळात तो घेऊन जात होता मला... हे माझंच होतं की... एक घट्ट गाठ बसली त्या गावाशी... आतून येणारे प्रार्थनेचे आणि त्याबरोबरच संगीताचे सूरही माझेच होते... असं काही विलक्षण असेलसं वाटलं नव्हतं...

पहाटे लागणारं सुब्बलक्ष्मींचं स्तोत्र आणि हे सूर फार काही वेगळं सांगत नव्हते मला... तेवढेच हेही जवळचे वाटले...

बाहेर पडलो... एका घराच्या खिडकीत मांजर दिसली... शांतपणे तीही चर्चमधली प्रार्थना ऐकत असावी...

त्या गावाचा पैस दाखवण्यासाठी आणि मला गाव म्हणून बघायचंच असल्यामुळे एक दिवस मला घरच्यांनी भल्या सकाळी बाहेर काढलं...

माझी गाव पाहण्याची एक अट होती, ती म्हणजे शक्यतो पाऊस नकोच...

तिसऱ्या दिवशी माझं नशीब उघडलं. स्वच्छ सकाळी आम्ही बाहेर पडलो...

त्रिकोणी-दगडी घरांना, त्यांच्या केशरी, लाल, निळ्या खिडक्या दरवाज्यांना माझं शटर झपकन कॅमेऱ्यात बंदिस्त करत होतं... खरं तर त्या आधी ते मनात, आत खोल जाऊन बसत होतं...

त्या घरांमधून गेलेले साधे रस्ते... कुठेतरी शांतपणे आत उतरत होते... मला हेच हवं होतं का? याचं उत्तर मात्र अजून नीटसं कळत नव्हतं. आपलं तर होतं हे... पण...

मग छान पिवळ्या फुलांच्या शेतातून आणि त्याकडेनं जाताना काही अगदी कोवळी खोंडं... पांढरी स्वच्छ... आमच्याकडे बघत होती. हिरव्या शेताच्या बॅकग्राऊंडमधून जास्तच लख्ख वाटत होती ती...

तळ्याच्या शेजारून जाताना बदकं नुसतीच इकडूनतिकडे करताना दिसली... अत्यंत जीवघेणी शांतता... एका बाजूला शांत पाणी, मधून जाणारे रस्ते... आणि शेजारचं जंगल... यांचा म्हणून एक सिक्वेन्स होता...

तळ्याकाठी असलेल्या बाकावर क्षणभर बसायचा मोह मला आवरला नाही... सारं अवकाश पाण्यावर आलं होतं...

वेळ नावाची गोष्ट कमी होती... कॅमेरा सोडून काही वेळा मी डोळ्यांत साठवत होतो अनेक क्षण...

गावातले नागमोडी दगडांचे रस्ते... फुलांचे पडलेले सडे...

ताज्या पावाचे, केकचे भूक लागणारे वास...

आणि कॉफी... कितीदा... शक्यच नाही मोजणं...

मी आयुष्यातली सर्वात जास्त कॉफी इथे प्यायलो असेन...

मला कॉफी आवडते हे लक्षात आल्यावर कॉफीची विचारणाही सतत होत होती मला...

उघड्या रेस्टॉरंटमध्ये बीअर किंवा कॉफी पिणं... उन्हं अंगावर घेत शांतपणे घुटके घेत त्याचा आनंद घेणं हा इथला स्थायिभावच होता...

जंगल वॉक, तो तर माझ्या स्मरणात घट्ट कोरला गेला आहे. आम्ही दीड-दोन तास चालत होतो, जॉ प्रॉड आणि मी...

त्यांच्या भाषेत वूड्स वॉक.. त्यांना इंग्रजी येत नव्हतं आणि मला फ्रेंच... पण आम्ही दोन तास अनेक विषयांवर बोललो...

आणि अतिशय नीट समजलं आम्ही काय बोलतोय ते एकमेकांना!

विलक्षणच होतं ते... कसं काय? याला उत्तर नाही...

जंगल... त्यामध्ये सायकल ट्रॅकसुद्धा होता. वाळलेल्या पानांचा रस्ता. चुरचुरणारा, पावलागणीक वाजणाऱ्या पाचोळ्याचा आवाजच फक्त तिथे होता... शांतता हातात हात घालून चालत होती. मध्येच एखाद्या पक्ष्याचा किणकिणाट ऐकू येत होता... बाकी आयुष्यभराची शांतता मी आत घेत होतो... एका तळ्याकाठी आमचं चालणं थांबलं. परतीचा प्रवास सुरू झाला...

घरांच्या कंपाऊंडभोवती लावलेली झाडं सुबक कापून त्याच्या केलेल्या भिंती मला फारच भावल्या... अर्थात या सगळ्यात काही फोटो काढलेच!

नॉर्थ वेस्ट फ्रान्सचं हे पहिलं दर्शन...

मला त्यानं खूप दिलं... जे दिलं ते कोरलं गेलं कायमचं...

परिवार भेटला तो माझा, आमचा झाला... निसर्ग तर आयुष्यभराचा झाला... आत खोलवर रुजलं काही...

त्याला धुमारे फुटतीलच... हा प्रवास सुरू झाला होता...

त्याचं तोरण ब्रुसविले या गावाने बांधलं आमच्यासाठी...

शुभयोगच होता तो... आत्मीय युरोपची सुरुवात झाली होती.

**– मिलिंद ढेरे**

भ्रमणध्वनी : ९८२२२८२५९०

milind.dhere@gmail.com




**सायली घोटीकर**

**चित्रकार आणि छायाचित्रकार**


# अझरबैजान

'अझरबैजानी चाय' हा तर लोकांच्या फारच जिव्हाळ्याचा विषय. जसा वरणभात न खाणारा, न आवडणारा मराठी माणूस सापडणं कठीण आहे. तसंच 'अझरबैजानी चाय' न पिणारी माणसं सापडणं दुर्मीळ आहे. वयस्कर पुरुष 'चाय' पित घोळक्या-घोळक्याने गप्पा मारत बसलेले अगदी सगळीकडे दिसतात. आपला हिंदी 'चाय' आणि त्यांचाही तो 'चाय'च.

कॅस्पियन समुद्राच्या जवळ वसलेला, इराण, टर्की आणि जॉर्जियाचा शेजार लाभलेला छोटासा देश अर्थात अझरबैजान! या शहराशी नातं जुळलंय काहीतरी... आता इथे परकं वाटत नाही. सगळीकडे माझ्याच खुणा मला दिसतात. मी पूर्णतः निरीश्वरवादी. इथे आले तेव्हा हजारो प्रश्न होते मनात... सगळ्यात मोठा मुद्दा होता तो माझ्या स्वातंत्र्याचा. ते इथे उपभोगायला मिळेल का? या राष्ट्रात माझ्या स्वतंत्र अस्तित्वाला मुरड घालून जगावे लागेल का? या विचारांचा भुंगा डोकं पोखरत होता. मी एकटी फिरणारी, कॅमेरा घेऊन कुठेही जाणारी. कुणाशीही बोलणारी. इकडचं-तिकडचं सांस्कृतिक जीवन समजून घेण्यात मला रस! हे गणित इथे जमवता येईल का? आणि नाही जमलं तर? घरातच राहावं लागलं तर? हजारो प्रश्न मला वेढून उभे होते. ब्लॉग्स सगळ्यांची उत्तरं देत नाही. गूगल सगळ्या समस्या सोडवत नाही. त्याची माहिती एककल्लीही असू शकते.

पण या देशाने 'सलाम' म्हणत मला जवळ घेतलंच. मी त्यांच्यातील एक कधी झाले ते कळलेही नाही. प्रत्येकाच्या स्वातंत्र्याच्या व्याख्या वेगळ्या असतात. तशा इथल्या लोकांच्याही आहेत. मला धार्मिक बंधन नको वाटतं. पण या देशात माणसांचा धर्म फक्त माणुसकी दिसला. जागोजागी मस्त माणसं भेटली. प्रत्येक ठिकाणची संस्कृती वेगळी, राहाणे वेगळे, खाणे वेगळे! पण शेवटी माणूस म्हणून आपण सगळे एकच असतो ना... तेच दुःख, तेच सुख, त्याच भावना, सगळं सारखंच तर असतं. तरी एकमेकांना म्हणायचं मात्र वेगळं!

इथल्या वास्तव्यात एक कळलं की माणूस माणसाशी जोडला जाण्यासाठी भाषेची गरज नसते. इथली माणसं फार गेस्चरस बोलतात. कमालीचे हातवारे करतात. डोळे बोलतात, देह बोलतो आणि सगळा शब्दांचा पसारा मागे पडून संवाद घडत राहतो. हात हातात घेतले की हातांची उब जाणवते. हीच उब आपल्याला देऊन गोड हसतात ही मंडळी! 'हसणं' किती जवळ आणतं माणसांना! मी इथे जवळजवळ दोन वर्षे राहिली आणि आता चक्क मला हा माझा देश वाटू लागलाय. मरिन ड्राईव्हच्या समुद्रावर जी शांतता मिळते. तीच शांतता इथे 'बुलवर्ड'वर (किनारपट्टी) अनुभवायला मिळते. इकडचे ऋतू, निसर्गात होणारे बदल, हवेचा सूक्ष्म बदलणारा वास, हळूहळू बहरणारी फुलं, मग येणाऱ्या वेगवेगळ्या भाज्या, त्या-त्या ऋतूंचे सोहळे मी अंगात भिनवून घेते. आपल्याकडे जसा मे महिना आला की संपूर्ण महाराष्ट्राला आंब्याचे डोहाळे लागतात अगदी



**बाकू बुलवर्ड (किनारपट्टी)**

तसंच मी आता इथे जून महिना सुरू झाला की 'बेरी'जची आतुरतेने वाट पाहाते. त्यांची रसाळ चव, त्यांचा स्पर्श आठवते. थंडीमध्ये आता बाहेर पडणारा नाजूक बर्फ रात्री ऐकत बसावासा वाटतो. जसा मुंबईतला पाऊस... टप टप टप... अगदी तसंच वाटतं. सेम तेच फिलिंग! जग सगळीकडून गोलच तर आहे ना?

या वास्तव्यात अनेक वेळा भारतात येऊन गेले. स्वत:च्या देशात, स्वत:च्या घरात पण 'बाकू'ची ओढ संपली नाही. उलट वाढतच गेली.

'बाकू' अझरबैजानच्या राजधानीच शहर. नीटनेटकं, स्वच्छ! एवढी स्वच्छता मी माझ्या बर्लिनच्या वास्तव्यात सुद्धा अनुभवली नव्हती. रस्त्यावर मांडी ठोकून बसावं. अगदी घरात फतकल मारून बसतो तस्सं! इतके सुंदर आणि स्वच्छ रस्ते, जागोजागी बहरलेल्या बागा. त्यांची नीट राखलेली निगा. बाजूला सायकलींसाठी असलेले वेगळे ट्रॅक. ज्यांना नुसत्याच गप्पा मारायच्या आहेत, त्यांच्यासाठी बसण्याचे वेगळे बाक. त्याच्या बाजूला लहान मुलांना खेळायला गवताळ मैदानी पट्टे. स्केटिंग करत मौजमजा मारत फिरणाऱ्या लोकांसाठी वेगळी 'स्केट ट्रॅक' आणि ही सगळी आखीव-रेखीव रचना चक्क एकाच बागेत! अशा अनेक बागा शहराची शोभा वाढवतात. अशा एखाद्या बागेत मस्त कोवळं ऊन खात, एखादं छानसं पुस्तक वाचत बसावं. कशाला उगाच जगाची पर्वा करावी? बसावं आपल्याच जगात तल्लीन होऊन. मध्येच एखादी कॉफी प्यावी. पक्षांचे आवाज साद घालतातच. आणि हो... तो निळा समुद्र, त्याची नीरव शांतता. मला बसल्या जागी ऐकू येते त्याची ती धीरगंभीर गाज. इथला समुद्र म्हणजे कॅस्पियन समुद्र. तोही कसा शांत. निवांत. लाटासुद्धा उठत नाहीत. कदाचित त्यांनाही या शांततेची सवय झाली असावी. मुलांचाच काय तो आवाज. मुक्तपणे वाढणारी मुलं आणि त्यांचं स्वच्छंदी बालपण. मी खरंच आता 'बाकू'च्या प्रेमात पडलेय.

बाकूहून एक तासाच्या अंतरावर बघण्यासारखं असलेलं ठिकाण म्हणजे 'गोबुस्तान'. इथे 'मड व्हल्कॅनो' आहेत. 'मड व्हल्कॅनो' म्हणजे चिखलातील ज्वालामुखी. यातील चिखल मधूनमधून बुडबुड्यांसारखी उसळी मारत फुटत राहतो. त्या चिखलात पेट्रोल मिक्स झालेलं आहे. त्याला पेट्रोग्लिक्स म्हणतात. आजूबाजूचा सुंदर निसर्ग बघत हे पेट्रोग्लिक्स बघायचे आणि मनसोक्त हुंदडायचे. याच ठिकाणी हजारो वर्षांपूर्वी मानवाने दगडांवर काढलेल्या शिलाकृती आहेत. त्या अगदी नीट जपून ठेवल्या आहेत. त्यांना पाहण्यासाठी टेकडीची चढण चढून वर जावं लागतं. टेकडीच्या पायथ्याशी एक प्रचंड मोठ्ठं मॉर्डन म्युझियम आहे. बाहेर रौद्र पाषाण आणि त्यामागे निळेभोर आकाश. जणू पिकासोच्या ब्ल्यू पिरेडमधला रंग ल्यालेलं आकाश. रौद्र पण सुंदर डोंगर. सुट्टीचे दिवस सोडून वीकडेजला इथे आलं की आपलंच राज्य! तुरळक डोकी, हौसे-गवसे फोटोग्राफर आणि आपण त्यामुळे मग गोबुस्तान आणखीनच छान दिसायला लागतं. त्यात त्यांची निसर्गसुलभ स्वच्छता जोडीला असतेच. स्वच्छ प्रसाधनगृहे, स्वच्छ आखीव-रेखीव रस्ते-दुकाने. सगळं मनापासून जपतात हे लोक. कुठेही कचरा नाही. चहा-कॉफीचे पेले नाहीत. चिप्सची पाकिटं नाहीत. एकदा शनिवार-रविवार सोडून मुद्दाम गेले. तिथून 'लाडा' नावाच्या गाडीत बसून काही अंतर पुढे गेलं की डोळ्यांचं पारणं फिटवणारा रस्ता लागतो. थेट मॅकनॉज गोल्डची आठवण करून देणारा. झाडं जवळजवळ नाहीतच. गाडी जणू हिंदकळतच चालते. बोटीत बसल्यासारखे वाटते पण मजा येते. थोड्या वेळाने भलेमोठे पठार लागते. तिथेच भेटतात आपल्याला हे मड व्हल्कॅनो. छोट्याशा टेपाडावर फुटणारे छोटे छोटे ज्वालामुखी. अगदी तीन ते चार फुटापर्यंत जवळ जाता येतं. बुडबुड आवाज करत चिखल उसळत असतो. आतील लाव्हारसाचं अस्तित्व जाणवत राहतं. मध्येच एकदम लाव्हा उफाळून चिखलातून वर येतो. जर बरोबर कोणी स्थानिक असेल तर तो लायटर पेटवून आग दाखवतो. काही लोक या जागेला चंद्र म्हणतात. चंद्राचा पृष्ठभाग असाच असणार ही त्यांची श्रद्धा आहे. जर ज्वालामुखी फुटलाच आणि चिखल उसळून वर आलाच तर त्या चिखलात भिजण्याची मजा पण औरच आहे. खनिज तेल आणि वायू यांच्या मिश्रणामुळे हे घडत राहते. हे वर आलेलं खनिज तेल आणि त्याबरोबरची माती इथली लोक बाटलीत भरून गोळा करतात. हे मिश्रण अंगाला लावले की त्वचा छान चमकदार होते. आता सरकार 'बाकू' हे नेक्स्ट दुबई करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे ही शांतता, हे सौंदर्य किती दिवस राहील काय माहीत? एकदा एखादी जागा टुरिस्ट प्लेस म्हणून प्रसिद्ध झाली की कचरा-रहदारी वाढतेच. त्याला पर्याय नाही.



फायर टेंपल

बाकूच्या अगदी जवळ वीस मिनिटांवर फायर माउंटन आहे. त्यात नैसर्गिक वायूचे साठे आहेत. कायम अग्नी पेटलेला असतो. जणू बाकूचा अखंड दीप!

एकूण बाकू हे शांत शहर असलं तरी झगमगाटाचं शहर आहे. चकचकीत कपडे, खडे लावलेले बूट इथली लोकं सर्रास घालतात. बाकू हे युरोपियन शहर नसलं तरी कपडे युरोपियन स्टाईलचेच असतात. त्यामुळे बऱ्याचदा आपण पश्चिम युरोपात आहोत असे वाटायला लागते. कॅफे, मॉल, पब्स हे शनिवार-रविवार गजबजलेले असतात. आयुष्य मनमुराद जाणणारे हे लोक. सिटी सेंटर म्हणावी अशी एकच जागा शहरात आहे ती म्हणजे 'फाउंटन स्वेअर'. इथे शहर सळसळत असतं. गजबजलेले असतं. युरोपिअन संस्कृतीप्रमाणे कोणी कॅफेमध्ये बसलेले असतात, कोणी वाद्य वाजवत असतात. कुणी नुसतंच बसून संध्याकाळ मजेत व्यतीत करत असतात. इथे युरोपिअन ब्रँडच्या जवळजवळ सगळ्या वस्तू मिळतात. 'अझरबैजानी चाय' हा तर लोकांच्या फारच जिव्हाळ्याचा विषय. जसा वरणभात न खाणारा, न आवडणारा मराठी माणूस सापडणं कठीण आहे. तसंच 'अझरबैजानी चाय' न पिणारी माणसं सापडणं दुर्मीळ आहे. वयस्कर पुरुष 'चाय' पित घोळक्या-घोळक्याने गप्पा मारत बसलेले अगदी सगळीकडे दिसतात. आपला हिंदी 'चाय' आणि त्यांचाही तो 'चाय'च.

बाकूपासून जवळच असलेल्या सुरखनी भागात 'आतेशगाह टेम्पल' म्हणून एक प्रार्थनास्थळ आहे. त्याला 'फायर टेम्पल' असेही म्हणतात. या प्रार्थनास्थळी कायमस्वरूपी तेवत असणारी ज्योत अगदी १९६९ पर्यंत इथे होती. सतराव्या शतकात बांधलेलं हे प्रार्थनास्थळ हिंदू, झोराष्ट्रियन आणि शीख लोकांचं श्रद्धास्थान आहे.

इचेरी (Iecheri) हा बाकू शहरातील जुना भाग. मिनिएचर पुस्तकांपासून जुन्या अँटिक वस्तू मिळणाऱ्या दुकानांची ही बाजारपेठ. राजवाडे आणि वस्तुसंग्रहालय यांचा सुरेख संगम इथे बघायला मिळतो. मी या भागात मनमुराद फोटोग्राफी केली. दुकानदार आवर्जून खास त्यांच्या अझेरी शैलीत स्वागतास सज्ज असतात. हा भाग खूप सुंदर आहे. शेरवान शहा पॅलेस, मैदान टॉवर आणि असंख्य हस्तकलेची दुकाने हे या जागेचं वैशिष्ट्य आहे. इथे लोक 'लवाश' नावाचा ब्रेड खातात. आपल्या पोळीसारखाच आणि गंमत म्हणजे त्याच्याबरोबर खायला मिळते ते मंगल सलाड. हे म्हणजे चक्क वांग्याचं भरीत! ते बघून कळतं की जग किती छोटंसं आहे. किती एकमेकांना जोडलेलं आहे. कशी खाद्यसंस्कृती मिळतीजुळती आहे.

इथे मला खूप सुरक्षित वाटतं. हा देश शांत आहे. लोक शांतताप्रिय आहेत. आवर्जून गप्पा मारतात. थांबून सलाम म्हणतात. संध्याकाळी बागेत गेलं तर स्वत:ची प्रायव्हसी जपत, सुंदर हसून मान डोलावतात. गप्पा मारतात. कधी कधी मात्र भाषेचा मोठा प्रॉब्लेम होतो. इथली भाषा 'अझेरी'. काही जण रशियन भाषा बोलतात. इंग्रजी सगळ्यांना येतच असं नाही. अर्थात त्याची त्यांना गरजही भासत नाही.

एकदा अशीच गंमत झाली. मी घरातल्या घरात कशाला तरी अडकून डोक्यावर पडले. चांगलचा मार बसला. मला भोवळ यायला लागली. शेवटी एम.आर.आय. काढावा लागला. तिथल्या डॉक्टरांना थोडं थोडं इंग्रजी येत होतं. दुसऱ्या दिवशी एम.आर.आय.चा. रिपोर्ट घ्यायला गेले. रिपोर्ट 'अझेरी' भाषेमध्ये लिहिलेला. डॉक्टरांना विचारलं, ''काय झालंय मला?'' ते म्हणाले, ''युवर स्कूल इज फाईन.'' मला काही समजेना. कोणती स्कूल? कोणती शाळा? शाळेचा आणि या रिपोर्टचा काय संबंध? माझ्या चेहऱ्यावरील असंख्य प्रश्नचिन्ह पाहून शेवटी डॉक्टरांनी त्यांचे म्हणणे पेपरवर इंग्रजीत लिहून मला दाखवले, "your skull is fine." मज्जाच मजा! भाषा येत नसली की ही धम्माल उडते. मग बरेच दिवस सगळे आप्तस्वकीय, ''काय मग? शाळा बरी चालली आहे ना?'' असे विचारून मला चिडवत होते.

अझरबैजानचे 'फ्लेम टॉवर्स' माझ्या स्वयंपाकघराच्या खिडकीतून दिसायचे. रात्री त्यावर वेगवेगळे रंगझोत सोडलेले असतात. तासन्तास बघत बसावा असा हा नितांत सुंदर नजारा! माझ्या बेडरूममधून कॅस्पियन समुद्र दिसायचा. त्यावरून वाहात येणारे थंडगार वारे अंगभर गोड शिरीशिरी उभे करायचे. समोर समुद्र आणि हातात वाफाळलेली कॉफी. काय लागतं अजून जगायला? खरंतर मी डोंगरवेडी पण या समुद्राने मला वेड लावलं. एखाद्या मित्रासारखाच वाटायचा तो! कोणत्याही दु:खाच्या-आनंदाच्या प्रसंगी मी समुद्रावर जायचे. त्यांच्याशी बोलायला. म्हणजे हक्काचा मित्रच ना?

हा देश कार्पेट्सचा आणि अत्तराचा आणि हो हुक्क्याचाही. इथे हाताने कार्पेट्स बनवतात. अतिशय सुंदर कलाकुसर केलेली ही कार्पेट्स किती बघू आणि किती नको असं होतं. अनेक लोकांची पोटं या कार्पेट्स निर्मितीच्या व्यवसायावर अवलंबून आहे. लोकरीच्या शाली, स्कार्फस, स्ट्रोल सगळंच अप्रतिम निर्माण करणार. त्यातही त्यांनी आपली संस्कृती जपली आहे. बुलवार्डवर एक कार्पेट म्युझियम आहे. ही लोकं फारच अगत्यशील आहेत. जिथे जाऊ तिथे बोलायला येतात. त्यांच्या भाषेत बोलतात. भारतातून आलो आहोत एवढे समजले की चक्क 'नमस्ते' करतात. इथल्या बॉलिवूडवर त्यांचे प्रचंड प्रेम. राज कपूर तर हृदयात बसलेला. शाहरूख खानचा 'मन्नत' मी पाहिला आहे की नाही हे शंभरेक लोकांनी तरी मला विचारलं असेल. एकूणच भारतीयांबद्दलचं प्रेम-जिव्हाळा त्यांचं वागण्या-बोलण्यातून, अगत्यशीलतेतून झिरपत राहतो.

मला इथे कधी परकं नाही वाटलं. या उबदार शहराने आणि देशाने मला बघता-बघता आपलंसं केलं. 'बाय-बाय'ला हे 'पका-पका' म्हणतात. हा रशियन शब्द. पण यांनी तो रोजच्या जीवनात उचलला आहे. मीही त्यांना 'पका-पका' म्हणत भारतात परतलेय. पण मन अजून कॅस्पियन समुद्राच्या निळाईत गुंतलंय. भारतात येऊन एक महिना झालाय पण कोणी भेटलं की आपसूक ओठांवर शब्द येतात- 'सलाम'!

**- सायली घोटीकर**

**भ्रमणध्वनी : ७७३८०६८९३०**

sayali.ghotikar@gmail.com




**मेधा आलकारी**

ललित लेखिका


# 'पेरू'ची कोड फारच गोड

दोन सुयांवर स्वेटर विणणाऱ्या आज्या आपण लहानपणापासून पाहिल्या आहेत, पण एखादा पुरुष दोन सुयांवर भराभर अतिशय घट्ट आणि सुबक विणकाम करतोय असं चित्र आपण अभावानंच पाहतो. स्त्रियांची मक्तेदारी असलेल्या या प्रांतात नुसतं डोकावून न पाहता त्यात प्रावीण्य मिळवून युनेस्कोच्या यादीत जागा पटकावण्याचा मान टकीले येथील पुरुषांना लाभला आहे.

दक्षिण अमेरिकेतील पेरू देशातील लोक तांबूस कांतीचे अन् तोंडावळ्याने म्हणाल तर आपल्यासारखे. त्यांची संस्कृती आपल्यासारखीच प्राचीन आणि तिथेही भारतासारखीच विविधता. बघण्यासारखं खूप काही. जगातील नवीन आश्चर्यांपैकी एक असलेलं माचू पिचू, गूढतेचं वलय असलेल्या नाझका लाइन्स, विशाल पंखाविस्तार असलेला त्यांचा पवित्र कोंडोर पक्षी, राजधानी लिमाचा नयनरम्य किनारा आणि साडेबारा हजार फुटांवर म्हणजे आपल्या केदारनाथ पर्वतांपेक्षाही उंचीवर वसलेल्या टिटिकाका या विस्तीर्ण तलावातील बेटं. बोलिव्हिया या शेजारी राष्ट्रातही पसरलेल्या टिटिकाका जलाशयात एकंदर ४५ बेटं आहेत आणि त्यातील टकीले नावाच्या बेटाला भेट दिल्यावर आम्हाला एका वेगळ्याच संस्कृतीचं दर्शन घडलं.

दोन सुयांवर स्वेटर विणणाऱ्या आज्या आपण लहानपणापासून पाहिल्या आहेत, पण एखादा पुरुष दोन सुयांवर भराभर अतिशय घट्ट आणि सुबक विणकाम करतोय असं चित्र आपण अभावानंच पाहतो. स्त्रियांची मक्तेदारी असलेल्या या प्रांतात नुसतं डोकावून न पाहता त्यात प्रावीण्य मिळवून युनेस्कोच्या यादीत जागा पटकावण्याचा मान टकीले येथील पुरुषांना लाभला आहे.

इथलं पर्यटन म्हणजे एक सांस्कृतिक अनुभव आहे. उंच-सखल असलेल्या या बेटाचं क्षेत्रफळ आहे सात चौरस किलोमीटर आणि लोकसंख्या आहे इनमीन तीन हजार. वेगवेगळी पिकं घेण्यासाठी या बेटाची सहा भागांत विभागणी केली आहे. प्रत्येक विभागाचा महापौर वेगळा. परंतु इथे सगळे इतक्या गुण्यागोविंदाने नांदतात की या बेटावर पोलीसठाणंच नाही. 'चोरी कधी करू नये आणि खोटं कधी बोलू नये' या मंत्राबरोबरच 'आळस हा माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे' हे बाळकडू त्यांना 'इंका' या



भव्य दगडी कमान

त्यांच्या पूर्वजांकडून मिळालं. आजतागायत त्यांचं जीवन या त्रिसूत्री मंत्राबरहुकूम चालू आहे. शांत, समाधानी आणि प्रामाणिक ग्रामीण आयुष्य जगणारी ही प्रजा सदा हसतमुख राहून एकजुटीनं काम करते.

श्रमाचं महत्त्व जाणणाऱ्या या प्रजेला आधुनिक सुखसोयींचं मात्र वावडं आहे. आजही तिथे वीज नाही, नळ नाही, वाहनं नाहीत. इतकंच नव्हे तर खेचरं किंवा त्या प्रदेशात आढळणारी लामा अल्पाकासारखी ओझेवाहू जनावरंही नाहीत. आपल्याच पायांची गाडी करून, पाठीवर ओझं वाहून विनासायास सामानाची ने-आण करत असतात इथले आबालवृद्ध!



हातमाग

पुनो शहराच्या बंदरापासून ३५ किलोमीटर आत असलेल्या या बेटावर जाण्यासाठी आम्ही मोठ्या उत्सुकतेनं बोटीत बसलो. बंदराजवळ उथळ असलेलं हिरवट दिसणारं पाणी काही अंतरानंतर निळंभोर दिसू लागलं. स्वच्छ, शुद्ध मोकळी हवा, दूर किनाऱ्यावर दिसणाऱ्या बर्फाच्छादित पर्वतरांगा, पाण्यावर डुलणाऱ्या नावा, जाळं ओढणारे कोळी, अस्मानी रंगाच्या आकाशाची रुंद कमान आणि त्यातून सरसर पाणी कापत जाणारी आमची बोट. बेटावर उतरलो तर मनात ठसली ती त्यांची वेशीवरील दगडी कमान. आत शिरताच चढावावरच्या रस्त्यावरून चालताना दमछाक झाली. विरळ हवेचा परिणाम!

लाल माती आणि दगड डकवून केलेली सुंदर पायवाट कडेला असलेल्या रानफुलांबरोबर वर वर घरांकडे जाताना दिसत होती आणि थबकून मागे वळून पाहता तो निळाभोर जलाशय लक्ष वेधून घेत होता. आम्हाला नेमून दिलेल्या वस्तीवर पोचताच त्या कुटुंबीयांनी आमचं स्वागत केलं. हात जोडणं किंवा हस्तांदोलन करणं ही त्यांची स्वागतरीत नाही. एकमेकांसमोर आले की ते एकतर मधाळ हसतात आणि मग कंबरेला खोचलेल्या बटव्यातील कोकोची थोडी पानं काढून समोरच्या माणसाच्या हातावर ठेवतात. त्यातली एकदोन तोंडात कोंबायची आणि बाकीची आपल्या बटव्यात ठेवायची. मला आपट्याची पानं लुटणारा दसऱ्याचा दिवस आठवला. ही कोकोची पानं उंचीवर होणाऱ्या विरळ हवेच्या त्रासावर रामबाण उपाय! वस्तीवर चारी बाजूंनी विटा-मातीची घरं होती आणि मध्ये मोकळं आवार. तिथे थोडी नाचगाणी, लुटूपुटूचा लग्नविधी आणि मँडलीनवादनाचा कार्यक्रम झाल्यावर आम्हाला हातमागावरील विणकामाचं प्रात्यक्षिक दाखवण्यात आलं. ताई, माई, आक्का सुताच्या लड्या करत होत्या, हातमाग चालवत होत्या आणि दादा, बाबा, काका मात्र दोन बारीक सुयांवर भराभर विणत होते. विणकामाचे नमुने अप्रतिम होते.

रापलेल्या कांतीच्या तेथील स्त्री-पुरुषांचा पोशाख वातावरणाला पोषक असतो. काळी वूलनची विजार आणि पांढरा शर्ट असला तरी त्यावर नेहमीच एक आखूड काळी बंडी असते. परंतु त्यांच्या परिधानाचं वेगळेपण म्हणाल तर त्यात समाविष्ट असलेल्या तीन खास गोष्टी. घट्ट विणलेला कंबरपट्टा, कंबरेला खोचलेला कोकोसाठी असलेला बटवा आणि कानापर्यंत गोंडा येणारी टोपी. लग्न झालेल्यांसाठी लाल तर कुमारांसाठी पांढरी. शेतीविषयक अथवा धार्मिक विधींचा निर्देश करणारी १२ ठळक चित्रं या कंबरपट्ट्यावर विणलेली असतात. म्हणून याला म्हणतात कॅलेंडर बेल्ट. स्थानिक क्वेचा भाषेत या कापडी दागिन्यांना म्हणजे टोपीला 'चुल्लू', कंबरपट्ट्याला 'चुंपी' आणि बटव्याला 'चुप्सा' अशी 'च'च्या बाराखडीतील नावं आहेत.

बायकांचा पोशाख सुरू होतो डोईवरील काळ्या शालीपासून. त्याच्या टोकाला असतात रंगीबेरंगी मोठ्ठाल्ले गोंडे. सौभाग्यवती झाली की तिनं लाल गोंडे वापरायचे. आपल्या सौभाग्यलेण्यांच्या, लाल कुंकू आणि सिंदूरशी असलेलं साधर्म्य पाहून मला गंमत वाटली. या बायका एकावर एक असे वेगवेगळ्या रंगाचे स्कर्ट परिधान करतात. लाल, हिरवा, पिवळा आणि सर्वात शेवटी काळा. या काळ्या स्कर्टच्या टोकाचा ओचा करून तो कंबरेला खोचतात. त्यामुळे आतल्या रंगीबेरंगी स्कर्टची नागमोडी किनार उठून दिसते.

टकीले बेटावरील संस्कृतीत आवडलेल्या मुलीला लग्नाची मागणी घालण्याची एक मजेशीर पद्धत आहे. त्यासाठी त्या तरुणांना आधी सासऱ्याला खुश करावं लागतं. सासरेबुवांसाठी एक घट्ट टाक्यांची टोपी विणायची. त्यात मग ते पेलाभर पाणी ओतून पाहाणार. जर एकही थेंब गळला नाही तर जावई पसंत. भावी वधूनं मग आपल्या नवऱ्यासाठी हातमागावर एक कंबरपट्टा विणायचा असतो. गंमत म्हणजे त्यात तिनं आपल्या सुखचित्रांची गुंफण करायची असते. म्हणजे सुंदरसं घर, मुलंबाळं, मुबलक पीक, गुरंढोरं आणि हो, सरपणसुद्धा. इतक्या थंडीत विजेअभावी सरपणाचं महत्त्व ही प्रजाच जाणे.

नियोजित वेळी यजमानांनी पंगत वाढली. 'किनोवा' या

धान्याचं गरमागरम सूप, उकडलेले बटाटे आणि बाहेरून कडक पण आतून मऊ असलेले भट्टीत भाजलेले ताजे ब्रेड आम्हा शाकाहाऱ्यांसाठी आणि नुकतंच पकडून आणलेलं ताजं म्हावरं मांसाहारी पाहुण्यासाठी असा बेत होता. जेवणानंतर यजमान आम्हाला त्यांचं गाव दाखवायला घेऊन गेले. सरळसोट वर जाणाऱ्या पायऱ्यांवरून आमचा सैरसपट सुरू झाला. गोबऱ्या गुलाबी गालांच्या शाळकरी मुलांचा एक थवा घरी परतत असताना भेटला. बेटावर दोन शाळा आहेत. एक प्राथमिक आणि दुसरी विणकाम शिकवणारी कार्यशाळा. मुलं आठ वर्षांची झाली की या शाळेतही भरती होत असतात. म्हणूनच आज इतकी वर्षं ही कला टिकून आहे.



टकिले बेटावरील रहिवाशी

आता आम्ही बेटावरील सर्वात उंच स्थळी येऊन पोहोचलो होतो. दगडांच्या पायवाटा रानफुलांच्या संगतीनं चालत एकमेकांत गुंफून दूरवर गेलेल्या दिसत होत्या. खाली उतरत्या डोंगरसज्जांवर वाफे तयार केले होते आणि रोपं अगदी शिस्तीत उभी होती. पालेभाज्या आणि बटाटा पेरलेला दिसत होता. काही शेतकरी शेतात खपताना दिसले तर काही बांधावर विसावले होते. या उंचीवर उन्हं खूप प्रखर असतात आणि विरळ हवेमुळे शारीरिक श्रमही खूप जाणवतात. उतरणीवरून चालत आम्हाला आता मुख्य चौकाकडे जायचं होतं. छोट्या छोट्या घरांसमोरून जाणाऱ्या या पाऊलवाटांवरून जाताना ग्रामीण जनजीवन दिसत होतं. मुख्य चौकात बरीच वर्दळ दिसली. पुरुष एकत्र बसून गप्पा ठोकत होते. मात्र तोंडाबरोबर त्यांचे हातही भराभर चालत होते. हे पुरुष आपल्या कामात इतके वाकबगार आहेत की त्या उंचसखल वाटांवरून चालतानाही ते दोन सुयांवर विणू शकतात. त्यांच्या कलाकृतींचं प्रदर्शन आणि विक्रीसाठी चौकात एक मोठं दालन आहे.

१९७० पासून टकीले बेट, तेथील विणकामाचे नमुने आणि एकंदरच ती जीवनपद्धती जवळून पाहायचा ओढा पर्यटकांना वाटू लागला आणि पर्यटकांचे लोंढेच्या लोंढे इथे येऊ लागले. पुनो शहरातील पर्यटनसंस्था काही विशेष कष्ट न घेता गबर झाल्या. बेटावरील ज्येष्ठ अनुभवी व्यक्तींनी हे ताडलं आणि या संधीच सोनं करून त्याचा फायदा सर्वच बेटवासीयांना होईल अशी उपाययोजना आखली. या बेटावर त्यांनी एक स्वतंत्र पर्यटनसंस्था सुरू केली आणि त्या अंतर्गत पर्यटकांचं नियंत्रण केलं जाऊ लागलं. येणारे ग्रुप आळीपाळीनं एकेका कुटुंबाच्या घरी जाऊ लागले. पर्यटनातील मिळकत अशा तऱ्हेनं एकाच कुटुंबात सीमित न राहता प्रत्येक घरी वाटली गेली. त्यामुळे ईर्ष्या, चढाओढ, वैमनस्य या गोष्टींना आपोआपच फाटा मिळाला. भिन्न भिन्न व्यक्ती नाही तर एकत्रित समाज हीच त्यांनी आपली ओळख ठेवली. किती साधी तरीही विचारी आणि सकारात्मक कल्पना आहे नाही ही? पेरू देशीची ही फोड तर फारच गोड लागली.

**– मेधा आलकरी**
भ्रमणध्वनी : ९८२००९५७९५
travelkarimedha@gmail.com



विस्तीर्ण टिटिकाका तलाव



**डॉ. लतिका भानुशाली**


**लेखिका, संपादक आणि प्राध्यापक**

# काश्मीर...मनातलं

नाक्यावर एक मुलगा-एक मुलगी उभे होते. त्यांना गाडीत घेतले. गप्पा सुरू झाल्या. चेकपोस्टजवळ येऊ लागले तशी दोघांची चुळबुळ वाढू लागली. हसून गप्पा मारणाऱ्या मुलीने माझ्या मुलाचा स्वेटर डोक्यावर घेतला आणि ती सीटच्या दिशेने खाली वाकली. ''खाली का लपतेस?'' माझा बावळट प्रश्न. ती शांत बसली. मनात म्हटले जर टूरिस्ट बघून गाडी चेकपोस्टला चेक केली नाही तर? काय माहीत कुठून आलीत? जवळच पाकिस्तान!

''**खि**चडी तयार है। अंदर चलो। सर्दी लग जायेगी।'' बहादूरने साद घातली. मी लाल लाल सफरचंदाने भरलेल्या झाडाखाली बहिणींबरोबर खेळत बसले होते. श्रीनगरच्या लाल चौकातील ते टुमदार घर आणि घरातल्या मागच्या अंगणातील सफरचंदांची झाडे, त्यावर आमचे कपडे वाळत पडले होते. दरवाजात आक्रोडाची गोण पडली होती. आक्रोड दगडाने फोडून खाण्यात मजा येत होती. आम्ही सगळेच हरखून गेलो होतो. साल होते सप्टेंबर १९८१. माझे वय असेल बारा-तेराच्या मध्ये कुठेतरी. मी सातवीत होते.

मुंबईला आमच्या घराशेजारी पेईंग गेस्ट म्हणून राहणाऱ्या एका बंगाली अधिकाऱ्याची श्रीनगरला बदली झाली होती. त्यांना लाल चौकात सुंदर घर राहायला मिळालेले. जोडीला जेवण बनविण्यासाठी 'बहादूर' नावाचा खानसामा होता. घरच्या जेवणासाठी तळमळणारे त्यांचे मन कधी कधी आमच्या घरून गेलेल्या अन्नपदार्थांमुळे शांत होऊन जायचे. त्यामुळे त्यांचे आमच्याशी जिव्हाळ्याचे संबंध होते. बाबा चतुर्थ श्रेणीचे कामगार असले तरी जे.आर.डी. टाटा नावाच्या महामानवामुळे एल.टी.सी.ची सोय उपलब्ध होती आणि श्रीनगरला राहण्याचा-खाण्याचा प्रश्न बंगालीबाबूंनी सोडवला होता. त्यामुळे बंगालीबाबूंच्या भरवशावर आम्ही लाल चौकात मुक्कामाला पोहचलो होतो. अख्ख्या शाळेला आम्ही काश्मीरला जाणार म्हणून कोण अभिमान वाटत होता. ''नेमाणे, परत आल्यावर काश्मीरवर निबंध लिहायचाय बरं का...'' अशी प्रेमळ धमकी मराठीच्या बाईंनी दिलेली. ते दडपण घेऊनच मी काश्मीर पाहत होते.



**आरू व्हॅलीकडे जाताना रस्ता**

माझ्या आयुष्याची व्याप्ती-खोली-उंची म्हणजे शाळा ते घर हा पाच मिनिटांचा रस्ता! आणि आता थेट तिथून उठून सफरचंदांच्या झाडावर काय बसलेय, सगळं स्वप्नमय वाटत होतं! प्रथेप्रमाणे मग गुलमर्ग पाहिलं. दललेक पाहिला. हाऊस बोटी आणि त्यात राहणारे लोक पाहिलं. कमळाची शेती पाहिली. तो सप्टेंबरचा महिना असल्याने फळफळांची रेलचेल होती. चेरी, सफरचंद, पिअर यांनी बागा लगडलेल्या होत्या. गुलाबी गालांच्या, लालचुटूक ओठांच्या काश्मिरी सुंदऱ्या पाहिल्या. निशात बाग, शालिमार बाग, रंगीबेरंगी फुलांच्या दाटीवाटीने गच्च भरल्या होत्या. बहरल्या होत्या. एकदम पऱ्यांच्या राज्यात, नंदनवनात आल्यासारखे वाटत होते. काश्मीरचे

ते रूप मेंदूच्या एका कोपऱ्यात आणि हृदयाच्या अनामिक कप्प्यात कायमचे ठसले गेले.

हळूहळू मोठी होत गेले. शिक्षण-नोकरी-लग्न-मुलगा अशा धबडग्यात जीवन जगायला वेळच नव्हता. काश्मीरच्या आठवणी मध्ये मध्ये डोके वर काढायच्या, पण एव्हाना त्या आठवणी धुसर झाल्या होत्या. नव्वदीच्या आसपास काश्मीरला नजर लागली. दहशतवादाने या नंदनवनाला पोखरले. गुण्यागोविंदाने राहणाऱ्या हिंदू-मुसलमानांमधील काश्मिरी पंडितांनी राहती घरं सोडून खोऱ्यातून नेसत्या वस्त्रानिशी पळ काढला. पांढऱ्याशुभ्र बर्फावर रक्ताचे लाल डाग सांडले गेले. कधी ते भारतीय जवानांचे होते, कधी दहशतवाद्यांचे तर कधी काश्मीरमधील सामान्य जनतेचे!

आता वयानुसार समज वाढत होती. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडींचा अर्थ-अन्वयार्थ उमगू लागला होता. त्यामुळे धगधगणारा काश्मीर कुठेतरी अस्वस्थ करत होता. माझ्या स्मृतिपटलावर ठसलेल्या काश्मीरच्या चित्राला कुठेतरी तडा जात होता. नक्की काय भावना होत्या समजत नव्हते. पण आत खोल-खोल कुठेतरी, काहीतरी ठुसठुसत होते. २००१ साली मी नवऱ्याकडे विनंतीवजा प्रस्ताव टाकला.

''मला काश्मीरला जायचंय.''

त्याने मला वेड्यात काढलं. मीही हट्टाला पेटले होते. तोवर 'काश्मीर शांत होतंय, काश्मीर शांत झालंय' अशा बातम्या अधूनमधून कानावर येत होत्या. शेवटी मनाचा हिय्या करून आम्ही दोघे निघालो. सोबत माझा मुलगा आणि एक-दोन बहिणींची एकुलती-दुकुलती चिमुरडी मुले. वय वर्षे पाचपासून पुढे...

१९९० ते २००० या वर्षांत, दहशतवादाच्या छायेतदेखील काश्मीरला नियमितपणे अमरनाथयात्रा घडवायला, लोकांना घेऊन जाणारा घाटकोपरचा हिराभाई मदतीला धावला.

''आप जाओ मोटाभाई. नझिरभाई के घरपर आपकी व्यवस्था हो जायेगी. मेरे अपने लोग है। आपका बाल भी बाँका नही होने देंगे वो!'' हिराभाईने धीर दिला.

दल लेकच्या मागच्या रस्त्याच्या बाजूला नझिरभाईंचे घर होते. छोटासा टुमदार बंगला. खाली त्यांची स्वत:ची राहण्याची व्यवस्था तर यात्रेसाठी येणाऱ्या यात्रेकरूंसाठी वरच्या मजल्यावर चार-पाच खोल्या काढल्या होत्या. पर्यटनासाठी प्रवासी सहसा येत नव्हतेच.

यात्रेचाच काय तो आधार होता. पर्यटन थंडावले होते. हाऊस बोटीत डॉलरमध्ये पैसे घेतलेल्यांना आता रुपया दिसणेही दुरापास्त झाले होते. गेली अठरा वर्षे अशा या भयानक वातावरणात गाडी चालवणारा जम्मूचा सुरेशभाई धीर द्यायला होता.

''डरो मत। मैं हूं ना। मेरी गाडीमें मिलिटंट भी बैठते है और मिलिटरीवाले जवान भी। सबके लिए गाडी चलाता हूँ। पापी पेट का सवाल है। मुझे सब सरीके है। जब सेन्सेटिव्ह एरिया से गुजरना होता है तो बस हॉर्न बजा देता हूँ। दो हॉर्न मतलब मिलिटरीवाले साथ है। तीन हॉर्न मतलब मिलिटंट साथ में है। चार हॉर्न मतलब टूरिस्ट साथ में है। और एक हॉर्न मतलब मैं अकेला हूँ। एक हॉर्न सुनकर गाववाले मिलने चले आत है। दोस्ती-यारी सबके साथ है ना।'' तो हसत हसत म्हणाला.

सुरेशभाई आणि काश्मिरी लोकांचे खूपच चांगले ऋणानुबंध होते. त्यामुळे मी निश्चिंत झाले. नझिरभाईंनी सक्त ताकीद दिली होती. 'संध्याकाळी साडेसहापर्यंत घरी परत यायचे.' त्यांची आज्ञा पाळत होतो. पुन्हा एकदा निशात बाग, शालिमार बाग, हरबान बाग पाहिली. परिमहलमधून दिसणारा, अथांग पसरलेला दल लेक, नगिन लेक पाहिला. मनात आनंदाचे कारंजे नाचू लागले होते आणि एका रात्री आईची आठवण येते म्हणून एका भाच्याने भोकाड पसरले. फोन कुठेच नव्हता. घराबाहेर थोड्या अंतरावर पब्लिक टेलिफोन होता. मी भाच्याला घेऊन रस्त्यावर आले. रात्रीचे आठ वाजले होते. रस्त्यावर सर्वत्र काळाकुट्ट अंधार आणि निर्मनुष्य शांतता! मी नेटाने चालत राहिले. मिलिटरीची बॅरॅक जवळच होती. अचानक हातात रायफल घेतलेला जवान बाहेर आला.

''बंबई समझके रखा है क्या? इतनी रात को घर से बाहर निकलना खतरे से खाली नही है। वापस जाओ।''

त्याने स्वत:च परत बंगल्यापर्यंत आणून सोडले. एव्हाना



**निशात बाग**

नझिरभाईंना माझा पराक्रम कळला होता. तेही खूप चिडले. ''आपकी हिफाजत ये मेरा धर्म है। कश्मीर में खुदा न करे आपको कुछ हो गया तो अल्ला ताला को क्या मूँह दिखाऊंगा?'' त्यांनी भावनांना वाट मोकळी करून दिली.

दुसऱ्या दिवशी श्रीनगर सोडले. आक्रोडच्या बाग बघत-बघत लीडर नदीच्या किनारी पहेलगामला पोचलो. पहेलगामच्या लीडर नदीचे खरे सौंदर्य पहाडावर वसलेल्या 'आरू' गावापासून सुरू होते. जवळच पाकिस्तानची सीमारेषा! तिथे सुरेशभाईंची गाडी जाण्यास परवानगी नव्हती. लोकल युनियनच्या सुमो गाड्याच तिथे जातात. त्यामुळे नाईलाजाने सुमोत बसून सगळे आरूला निघालो. भारतीय जवानांनी चेकपोस्टला गाडी अडवून, आतील माणसे मोजून त्याची नोंद केली. ''पुढे जात आहात तर सावधानता बाळगा आणि अंधार पडायच्या आत परत या'' असा सल्ला देऊन त्यांनी गाडी वर सोडली.

संपूर्ण रस्त्यात त्या लोकल ड्रायव्हरशी संवाद साधण्याचा प्रयत्न करत होते. बहुधा त्याला अडचणीत आणणारे प्रश्न मी विचारत होते. त्याचे गाडे ''हं'', ''हूँ''च्या पुढे जातच नव्हते किंवा 'वेड पांघरून पेडगावला जायची' कला त्याने आत्मसात केली होती. वर पोचल्यावर मात्र या सगळ्याचा विसर पडला. देवदार-पाईन वृक्षांच्या गच्च वनराजीने वेढलेले डोंगर आणि मध्यभागी नजर पोचत नाही तिथपर्यंत गवतात पसरलेल्या जंगली-रानटी फुलांचा रंगीबेरंगी ताटवा! बाजूने खळखळत वाहणारी लीडर. स्वर्ग-स्वर्ग म्हणतात तो हाच... त्या भारावलेल्या अवस्थेतून बाहेर आल्यावर लक्षात आले की सर्वत्र कोपऱ्याकोपऱ्यावर भारतीय जवान हातात रायफल्स घेऊन अलर्ट पोझिशनला उभे होते. त्यांच्या डोळ्यांतले गांभीर्य माझ्यासारख्या अल्लड बाईला लक्षात येणे शक्यच नव्हते. सहज एकाच्या जवळ गेले आणि ''इथे राहण्याची सोय आहे का?'' म्हणून विचारले. एवढे विचारते आहे तोच पायघोळ काळी फिरन घातलेल्या माणसांनी आम्हाला गराडा घातला. जवान गप्प बसला. जणू मी दगडाशी संवाद साधत होते. मग मीही इकडेतिकडे नाचत राहिले. अचानक पुन्हा त्याच जवानाकडे लक्ष गेले. तो खुणेने हळूच, हाताचे बोट हलकेच हलवून 'नाही' असा इशारा करत होता. काळजात चर्र झाले. नक्कीच तो मला 'इथून जा' असा इशारा करत होता. आम्ही लगेच गाशा गुंडाळला आणि खाली पहेलगामच्या दिशेने निघालो. मगासपासून 'हूँ हूँ' करणाऱ्या त्या लोकल ड्रायव्हरला अचानक वाचा फुटली. ''दीदी, वो गाँव में मेरे दोस्त है। उनको नीचे जाने के लिए लिफ्ट दे क्या? अंधेरा होनेवाला है ना?''

आपण मुंबईची माणसे. मुळातच हृदयात दयाळूपणा भरलेला. त्यामुळे विचारही न करता मी म्हटले, ''हाँ, हाँ. जरूर. उसमें पूँछने की क्या बात है।''

पुढे नाक्यावर एक मुलगा-एक मुलगी उभे होते. वय असेल वीस-एकवीस. अगदीच पोरसवदा. काश्मिरी सौंदर्याचा मूर्तिमंत नमुना. त्यांना गाडीत घेतले. गप्पा सुरू झाल्या. चेकपोस्टजवळ येऊ लागले तशी दोघांची चुळबुळ वाढू लागली. हसून गप्पा मारणाऱ्या मुलीने माझ्या मुलाचा स्वेटर डोक्यावर घेतला आणि ती सीटच्या दिशेने खाली वाकली.

''खाली का लपतेस?'' माझा बावळट प्रश्न.

''वो मिलिटरीवाले परेशान करेंगे. पूँछताछ के लिए नीचे उतारेंगे.''

''लेकिन आपने कुछ किया नहीं तो पूँछताछ से इतना डर क्यों?''

''....'' ती शांत बसली. डोळ्यांत वेगळाच अंगार. मला धोक्याची घंटा जाणवली. मनात म्हटले जर टूरिस्ट बघून गाडी चेकपोस्टला चेक केली नाही तर आपल्या आडोशाने ही दोघे सुटून जातील. काय माहीत कुठून आलीत? जवळच पाकिस्तान! माझ्या मनात विचारांचे काहूर उठले. डोक्यातील विचारचक्र वेगाने चालू लागले. मी कच्छी भाषेचा आधार घेत नवऱ्याबरोबर चर्चा केली आणि ''आम्ही इथेच उतरत आहोत. तुम्ही गाडी घेऊन पुढे जा'' असा बॉम्ब फोडला. पैसे तर खालीच भरले होते. त्यामुळे त्याचाही प्रश्न नव्हता. ड्रायव्हरसकट तिघांच्या चेहऱ्याचा रंग उडाला.

''दीदी, अंधेरा हो रहा है। इतने बच्चे लेकर नीचे उतरना आपको नही जमेगा. चेकपोस्ट तक चलते है। उसे क्रॉस करके फिर आप उतर जाना।'' तिने साळसूदपणे भोळा आव आणला.

मी चेहऱ्यावरचे मार्दव आणि हसू तसेच ठेवले, ''अरे भाई, इतनी खुबसुरत वादीयों में पैदल चलने का मन हो रहा है। वैसे भी अभी चढाई तो है नहीं. तीन किलोमीटर का ही तो रास्ता है।''

मी गाडी बाजूला उभी करायला सांगितली. आम्ही गाडीतून आमचे सामान उतरवत असताना त्या मुलीने एका भाच्याजवळ एक पिशवी दिली. त्याचे वय इयत्ता दुसरीचे. दैव बलवत्तर असल्याने त्याला ही आपली खाऊची पिशवी नाही हे कळले. त्यामुळे त्याने ''लतीमावशी, ही पिशवी आपली आहे का?'' असे विचारले. मी मानेने 'नाही' सांगितल्यावर त्याने ती पिशवी त्या दोघांना परत केली. चपलेचे बक्कल लावून, दोघा भाच्यांच्या बुटाच्या नाड्या बांधतेय तोच परत पाचवीत असणाऱ्या दुसऱ्या भाचीच्या हातात तीच पिशवी दिली गेली. तिनेही ''ही आपली पिशवी आहे का?'' म्हणून मला विचारले. आता मीच संभ्रमित झाले. नक्की आपलीच पिशवी आहे की नाही हे बघायला पिशवी हातात घेऊन चेन उघडणार तेवढ्यात चित्त्याच्या चपळाईने त्या तरुणीने सुमोबाहेर झेप घेतली. पिशवी हिसकावत ती चित्कारली, ''दीदी, गलती हो गयी। ये हमारी थैली है।'' तिच्या थरथरणाऱ्या आवाजातून मला संभाव्य धोका स्पष्टपणे दिसू लागला.

बाळगोपाळांना घेऊन, चेहऱ्यावर कोरडे भाव ठेवून आम्ही डोंगर उतरायला सुरुवात केली. गाडी लांबलचक वळणे घेऊन उतरत होती तर आम्ही शॉर्टकट घेऊन डोंगराच्या मधूनमधून असलेल्या पायवाटांचा आधार घेतला. चेकपोस्ट जवळ आले. इतर कोणत्या गाड्या रस्त्यात नव्हत्याच. चालत येणाऱ्या आमच्या घोळक्याकडे बघून जवान तयारीत उभे राहिले. मी हाताने इशारा करून गाडीकडे

बोट दाखवले. जवानांनी बंदुका सरसावल्या. मी बालगोपाळांना खाली बसवले. आईवडिलांची एकुलती एक मुले ती! घट्ट छातीशी बिलगून धरले सगळ्यांना. खाली जाणाऱ्या गाडीकडे आम्ही सगळे एकटक पाहत राहिलो. एव्हाना माझ्या कृतीचा अर्थ त्या तिघांना समजला होता. डोळ्याचे पाते लवते न लवते तोच त्या दोन तरुण-तरुणींनी गाडीबाहेर उडी मारून नदीच्या दिशेने पळायला सुरुवात केली. जवानांनी त्यांचा पाठलाग केला. ती मुलगी एक पिशवी घेऊन पळून गेली. तर तो मुलगा दुसऱ्या पिशवीसकट पकडला गेला. पकडलेल्या पिशवीत 'आर.डी.एक्स' होते हे खाली आल्यावर कळले. डोळ्यांदेखत एक थरारनाट्य अनुभवले.



युशमर्ग

रात्री सुरेशभाई हॉटेलवर आला. त्याच्या सुरात कधी नव्हे ती भीती होती. तो म्हणाला, ''नेहमीच्या संशयितांच्या यादीत जर या दोघा तरुणांचा फोटो नसेल तर तुम्हाला 'रेखाचित्र' तयार करण्यासाठी कदाचित बोलावले जाईल. आणि तुम्ही त्या तरुणांचे रेखाचित्र रेखाटायला मदत करू नये म्हणून तुमच्याही जिवाला धोका निर्माण होऊ शकतो. आता इथे राहायचे नाही. सकाळी पहाटेच पहेलगाम सोडायचे.''

हॉटेलचा मालक रसूल आला. असेही हॉटेल रिकामेच होते. आम्ही सोडून कोणीच गिऱ्हाईक नव्हते. रसूलभाई, सुरेशभाई आणि माझा नवरा मोठमोठी दगड घेऊन रात्रभर कॉरिडोरमध्ये सकाळपर्यंत बसून राहिले. अनंतनाग सोडेपर्यंत जिवात जीव नव्हता.

श्रीनगरला पोचलो.

नझिरभाई एकदम चिंताग्रस्त झाले होते. डोळ्यांत पाणी आणून त्यांनी मला आणि बच्चेकंपनीला जवळ घेतले. आकाशाकडे डोळे लावून ते उद्गारले, ''या अल्ला! कश्मीर से इस जहर को खत्म कर दो.''

मुंबईत आल्यावर चारच दिवसांत पहेलगामच्या हॉटेलात बॉम्बस्फोट झाला. मालाडचे एक जोडपे गेले. मला ती पिशवी हातात घेऊन पळणारी मुलगी आठवत राहिली...

नझिरभाईंसारखे असंख्य काश्मिरी भारतावर मनापासून प्रेम करतात. त्यांना पाकिस्तानचा तिरस्कार वाटतो. त्यांना काश्मीरमध्ये 'अमन आणि शांती' हवी आहे. हे नंतरच्या प्रत्येक काश्मीरभेटीत जाणवत गेले. मध्ये मध्ये श्रीनगरला जाणे होत राहिले.

२००८ मध्ये पुन्हा 'दल झील'ने साद घातली. यावेळी भाच्यांबरोबर त्यांचे आईवडीलही होते. ग्रूप मोठा होता. नझिरभाईंच्या बंगल्यात एवढ्यांची व्यवस्था करणे शक्य नव्हते. मग त्यांच्या शेजारच्या काका-मामांच्या घरात आमच्या राहण्याची व्यवस्था करण्यात आली. आता काश्मीर बऱ्यापैकी निवळले होते. आता रात्री अकरा-बारा वाजेपर्यंत दल झीलवर मनसोक्त भटकता येत होते. रात्रभर रस्त्यांवर वर्दळ दिसत होती. मुंबईत असल्याचा भास होत होता. यावर्षी वॉटरस्किईंग परत सुरू झाले होते. स्वत:ला शर्मिला टागोर समजत, त्याचाही थरार अनुभवला. बोटीच्या मागे एका फळकुटावर उभे राहून रस्सीच्या साह्याने पाण्यावर तरंगायची मजा काही औरच होती. निशात, शालिमार, हरबान सगळ्या बागा प्रवाशांनी ओसंडून भरून वाहत होत्या. तिथे काश्मिरी दागदागिने आणि काश्मिरी कपडे प्रवाश्यांना चढवून त्यांचे फोटो काढणारे रफिकमियाँ नेहमीप्रमाणे भेटले. ते खूपच आनंदात होते. ''बीबीजी, इस बार मौसम बहोत अच्छा है। लगता है पुराने दिन वापस आयेंगे।'' संपूर्ण काश्मीरभर आनंद ओसंडून वाहात होता. आपण दोन वस्तू विकत घ्याव्यात म्हणून डोळ्यांत पाणी आणणारे दुकानदार आता मात्र भाव करायलाही तयार नव्हते. सगळीकडे उत्साह भरलेला. पुन्हा पहेलगामला गेलो. पुन्हा लोकल सुमो पकडून वर 'आरू'ला गेलो. आरू आता शांत होते. नवीन दुकाने उघडली होती. घोडेवाल्यांसाठी रांगा लागल्या होत्या. जमिनीवर पसरलेली फुले हसून प्रवाशांचे स्वागत करत होती. तिथेच फकरूद्दिन भेटला. चणे-शेंगदाणे रस्त्यावर विकावे तसे 'आरू'च्या रस्त्यावर टोपलीत काळसर पण तेलकट आक्रोड विकायला बसला होता. ''दीदी रंग पे मत जाओ, ऐसे आक्रोड कही मिले तो अल्ला कसम जबान काँट दुंगा.'' मग पुढच्या प्रत्येक भेटीत त्याच्याकडून आक्रोड घेणं आणि त्याच्याबरोबर शिळोप्याच्या गप्पा मारत बसणं हे नित्याचेच झाले.

मध्येच नाझिरभाईंच्या मुलीचे लग्न निघाले. मग लग्नासाठी परत पुढल्या वर्षी श्रीनगरला गेलो. मुंबईत नववधूला हव्या असलेल्या वस्तूंची खरेदी झाली. यावेळी मला काश्मीर फिरायचे नव्हते तर पाहुणे बनून काश्मिरी पाहुणचार उपभोगायचा होता. त्यावर्षी काश्मीर खूपच गजबजलेले होते. आमच्यासाठी स्पेशल शिकारा बुक केलेला होता. वेळ मिळेल तेव्हा आम्ही शिकाऱ्यात बसून नगिन लेकपर्यंत फिरून येत होतो. नाझिरभाईंचे नातेवाईक काश्मीरच्या कानाकोपऱ्यातून लग्नासाठी आले होते. लग्नाच्या

गडबडीत पार नाझिरभाईंच्या स्वयंपाकघरापर्यंत मुक्तसंचार करणारे आम्ही पती-पत्नी हा काश्मिरींच्या औत्सुक्याचा विषय होता. काश्मिरी लग्नात तृतीयपंथीय माणसे बोलावून त्यांना गायला आणि नृत्य करायला लावण्याचा रिवाज आहे. 'धीरे धीरे बोल कोई सून ना ले' या गाण्याच्या चालीवर काश्मिरी लोकगीत गात त्यांचे नृत्य चालू होते. त्या तृतीयपंथीयांबरोबर बेफाम-धुंद होऊन नाचणारी 'मी' आणि त्याचे शूटींग करणारा माझा 'नवरा' हा काश्मिरी स्त्रियांसाठी प्रचंड मोठा सांस्कृतिक धक्का होता. मात्र जेवणाच्या पंक्तीत मी त्यांच्याबरोबर संवाद साधला तेव्हा त्या हरखून गेल्या. काश्मीरबाहेरच्या बायका आपल्यासारख्या नसतात हा त्यांचा अपसमज खोटा ठरला. मला एक मुलगा आहे. मी मुंबईतील एका महाविद्यालयात प्राध्यापक आहे कळल्यावर त्या कमालीच्या आश्चर्यचकित झाल्या.

''दीदी, हमारे यहाँ औरते और मर्द एकसाथ नाचते नहीं ना इसलिए हमने सोचा...'' त्यांच्या चेहऱ्यावर अपराधी भाव होता. लग्न लागले. नवऱ्याने नवरीला बघितले नाही. नवरीने नवऱ्याला बघितले नाही. जेवणे झाली. वरात गेलीसुद्धा. पुरुषांचा मांडव वेगळा. स्त्रियांचा मांडव वेगळा. पहिल्यांदाच काश्मिरी लोकांच्या अंतरंगात मी डोकावत होते. कुठेतरी स्त्रियांच्या बंदिस्त जीवनाची चौकट मला अस्वस्थ करत होती. ती अस्वस्थता चेहऱ्यावर न दर्शविता मी लग्न मनापासून एन्जॉय केले. संपूर्ण जेवणात एकही शाकाहारी पदार्थ नाही. सगळ्याच पदार्थांत गोश्त. त्यामुळे मांसाहार न करणाऱ्या आमची पंचाईत झाली. नाझिरभाईंच्या मनाला ते खूप लागले. ''सारी दुनिया दावत खा के गयी और आपने दाना भी नहीं खाया...'' त्यांचे डोळे डबडबले.

लग्न संपले. हातात सुट्टीचे दिवस बाकी होते. मी नाझिरभाईंना म्हटले, ''वर लडाखला जाऊन येऊ का?'' त्यांच्या डोळ्यांतील भाव बदलले. डोळ्यांत नाराजी उमटली. ''वहां इतनी खुबसुरत वादियाँ नहीं है। फिरभी आप जाना चाहते हो तो जाओ.'' मग मी लडाखच्या दिशेने कूच केले. द्रास कारगिलनंतर चेहरेपट्टी बदलली. डोंगरांनी हिरवा रंग टाकला आणि मातकट रंगाचे निष्पर्ण डोंगर गाडीबरोबर धावू लागले. ते रौद्रसौंदर्य आवडले, पण त्याला काश्मीरच्या सौंदर्याची सर नव्हती.

हळूहळू माझ्याबरोबर काश्मीरला येणाऱ्यांची संख्या वाढत गेली. नाझिरभाई आणि त्यांच्या नातेवाईकांची घरे अपुरी पडू लागली. मग नवीन विश्वासू माणूस शोधतानाच्या प्रक्रियेत अश्रफ भेटला. २३-२४ वर्षांचा कोवळा मुलगा. हॉटेलव्यवस्थेची जबाबदारी त्याने स्वत:कडे घेतली. ३०-३० लोकांची उत्कृष्ट व्यवस्था करणे यात त्याचा हातखंडा होता. तो मला आईच मानायचा.

मग श्रीनगर-लडाख असा प्रवास सुरू झाला. अनेकजण माझ्याबरोबर विश्वासाने काश्मीरला यायला लागले. त्यामुळे दरवर्षी काश्मीरदर्शन घडत राहिले. कधी कधी तर दीड दीड महिना आम्ही तिथेच राहतो. लोक येतात, राहतात आणि आम्ही त्यांना परत पोचवून दुसऱ्या ग्रूपच्या स्वागतासाठी तयार होतो. लोकल लोकांशी जिव्हाळ्याचे संबंध असल्याने कधीच कुठे समस्या निर्माण झाली नाही. अश्रफने नवीन काश्मीरदर्शन घडवले. युशमर्ग, दूधपथरी, दाची फॉरेस्ट अशा नवीन ठिकाणांना भेटी देणे सुरू झाले. गाववाल्यांबरोबर वस्तूंची देवाणघेवाण सुरू झाली. हापूस आंब्याची फर्माईश तर दरवर्षीच येऊ लागली. माझ्याही घरी पंपोरचे केशर आणि 'आरू'चे आक्रोड दरवर्षी येऊ लागले.

सगळे 'ऑल वेल' असताना 'बुऱ्हान वाणी' प्रकरण घडले. सगळेच हबकले. त्यावर्षीचे काश्मीरचे टूरिझम अगदी वाईट होते. निशात बागेत स्मशानशांतता होती. मी तिकिटाच्या खिडकीत प्रवेशतिकीट घ्यायला उभी राहिले. आतल्या चाचाने विचारले, ''किती?'' मी म्हटले, ''अठ्ठावीस''. त्याने लगेच बागेतील कारंजं चालू करण्याची ऑर्डर दिली. फोटो काढणारा रफिक भेटला. मला बघून भावूक झाला. ''दीदी, अपने लोगों को मेरे पास फोटो निकालने को बोलो ना.'' त्याने आमच्या ग्रूपमधल्या प्रत्येकाला मनापासून सजवले.

''बंबई जाओगे तो सबको बताना यहां शांती और अमन है.'' त्याने सर्वांना कळकळीची विनंती केली. त्यावर्षी दुकानांना पुन्हा अवकळा आलेली. ग्राहकांच्या प्रतीक्षेत बसलेले दुकानदार बघून काळीज पिळवटून गेले. अनेकांशी संवाद साधला. बरेच जण तर दरवर्षी भेटणारे स्नेहीच होते.

''दीदी, ये क्या हो गया? तुम्हारा मीडिया हमारा दुष्मन है। दूर कही पे कुछ हो जाता है और दिनभर वही खबरें दिखाते बैठते



**'आरू' येथील गवतावर उगवलेली फुले**

है। टूरिस्ट आयेंगे कैसे? हमारा क्या दोष है?''

पुढल्या वर्षी परिस्थितीत सुधारणा झाली. नंदनवन पुन्हा हसू लागले. आम्ही रात्री अकरा-साडेअकराला दल लेकवर मस्त मजा करून सगळे टूरिस्ट हॉटेलमध्ये आणले. टीव्ही लावला तर चॅनेलवाले ''श्रीनगर में फिरसे अलगाववादी।'' या भयानक शीर्षकाखाली कुठलीतरी जुनी दृश्ये पुन्हा पुन्हा दाखवत होते. सर्वांच्या घरून फोन यायला लागले पण तसे काहीही नसल्याची आम्ही खात्री पटवली. इथे तर सर्व नॉर्मल होते. मीडियाच्या विरोधात काश्मिरींचा रोष का आहे ते कळत होते. पुढचे पंधरा दिवस मी पुन्हा काश्मीरच्या कानाकोपऱ्यात फिरले पण टीव्हीवरची दृश्ये आणि प्रत्यक्ष काश्मीरचं वातावरण यात कुठेही ताळमेळ नव्हता.

मध्यंतरी 'पुलवामा' घडले. अख्खा भारत हादरला. 'काश्मीरला जाऊ नका, त्यांना उपाशी मरू द्या' सांगणारे मेसेज, व्हिडिओ क्लिप व्हायरल होऊ लागल्या. घरात बसून व्हॉट्सॲपवर सक्रिय असणाऱ्या लोकांना देशभक्तीचा चेव आला. काही मूठभर दहशतवादी लोकांमुळे अख्खा काश्मिरी समाज आरोपीच्या पिंजऱ्यात उभा केला गेला. प्रामाणिकपणे धंदा-पाणी करणारे सगळे काश्मिरी हादरून गेले. 'असे व्हायला नको होतं' यावर सगळ्यांचेच एकमत होतं. पुन्हा धंद्यापाण्याचे काय, ही चिंता सगळ्यांनाच भेडसावत होती. मी त्यानंतर पुन्हा मुद्दाम काश्मीरला गेले. जवळजवळ पंच्याऐंशी प्रवासी घेऊन तीन वेगवेगळ्या तारखांमध्ये तीन गट फिरवले. काहींना नंतर मी मुंबईत परत आल्यावर अश्रफच्या भरवशावर एकट्यांना पाठवून दिले. कोणाला काही त्रास झाला नाही. यात्रा करण्यासाठी तिथे ग्रूप पाठवले. अश्रफने हॉटेलपासून हॅलिकॉप्टरपर्यंत सर्वांची चोख व्यवस्था ठेवली. यावर्षी यात्रेला प्रचंड प्रतिसाद होता आणि अचानक यात्रा रद्द झाली. खोऱ्यात जवानांची कुमक वाढवली गेली. ''क्या होनेवाला है?'' या प्रश्नाचे उत्तर कोणाकडेही नव्हते. ४ ऑगस्टला रात्री शेवटचा संदेश पाठवला आणि काश्मिरी लोकांबरोबरचा संपर्क तुटला. ५ ऑगस्टला 'अनुच्छेद ३७०' रद्द केले गेले. तिथे काय चाललेय हे समजायला काहीच मार्ग नव्हता. चार दिवसांनी अश्रफचा संदेश आला. 'मी लडाखला आलो असल्याने रेंज मिळाली आहे. आयुष्यात इतकी शांतता माझ्या वयोवृद्ध बाबांनीसुद्धा कधीही अनुभवलेली नाही.'

''सगळं शांत होईल.'' मी धीर दिला.

''हमे तो बस शांती और अमन चाहिये. जैसे आप लोग खुशी की जिंदगी जिते है ना, हमे भी वैसीही जिंदगी चाहिये. जिसमें न न खौफ हो, न डर हो.'' तो म्हणाला.

''आमेन''. मी मनापासून आशीर्वाद दिला.

पण मनात मात्र विचार आला, इतकं सहज सोपं आहे का हे सगळं? सगळे सुरक्षित व्हायला अजून बराच काळ जावा लागेल. आपल्याला त्यांची जमीन नको आहे तर तिथली माणसे भारतात एकरूप व्हावी ही आपली भावना आहे हे तिथे पटवून द्यावे लागेल. घातपाती कारवाया, दहशतवाद, असुरक्षितता, भीती, दडपण, संचारबंदी, दगडफेक या सगळ्यांबरोबर दैनंदिन आयुष्य जगणे म्हणजे काय याची कल्पना दिल्ली-मुंबईसारख्या शहरांत सुरक्षित जीवन जगणाऱ्या लोकांना येणे कठीण आहे. ३७० रद्द केल्याचा उन्माद देशभर आहे. लोक ज्या पद्धतीने इतक्या संवेदनशील मुद्यांवर व्यक्त होत आहेत ते पाहून भीती वाटतेय. काश्मीरचे नैसर्गिक सौंदर्य बाजूला ठेवून 'काश्मिरी' माणूस समजून घेण्याची कुवत जेव्हा आपल्यात येईल तेव्हा काश्मीरचे पुन्हा नंदनवन होईल यात वादच नाही. शेवटी काश्मीर भारताचा शिरोमणी आहे. त्याचे तेज झाकोळले तर देशाची आंतरराष्ट्रीय प्रतिमा पणाला लागेल. त्यामुळे तेथील जनतेच्या भावनांचा आदर करणे हे सर्व भारतीयांचे परमकर्तव्य असले पाहिजे. काश्मिरी जनता, त्यांची भाषा, संस्कृती, संगीत हे वेगळे आहे. त्या वेगळेपणाचा आदर व्हायला पाहिजे. दल लेकमधील हाऊस बोटींमध्ये पुन्हा प्रवासी पाण्याची स्वर्गीय सैर करू देत. काश्मीरच्या बागा पुन्हा एकदा चेरी, पिअर, सफरचंदाच्या रसाळ गोडव्याने भरून जाऊ देत. काश्मिरी केसरचा दरवळ आणि कहावाचा स्वाद सर्व आसमंतात दरवळत राहू देत. लष्कराच्या बळावर काश्मीर शांत ठेवावे लागले तर ती भारतीय लोकशाहीची हार असेल. त्यामुळे प्रेमाने आणि पर्यटनव्यवसाय वाढवून, विकासाच्या नवीन वाटा निर्माण करून काश्मिरी जनता भारताशी एकरूप होऊ देत, हीच परमेश्वराकडे प्रार्थना करतेय. प्रश्न फक्त श्रीनगरमध्ये राहणाऱ्या लोकांचा नाही, तर घाटीच्या कानाकोपऱ्यात राहणाऱ्या भटक्या-विमुक्त मेंढपाळ जमाती, घोडेवाले यांच्यापर्यंत विकासाची गंगा पोचण्याचा आहे. जर '३७०'चे बुमरँग झाले तर काश्मीरचा पॅलेस्टाईन करायला शेजारी टपून बसलाय.

नाझिरभाईंच्या विचारांची पिढी आता म्हातारी होऊन 'आऊटडेटेड' झाली आहे. विचारांनी भरकटलेल्या तरुणांचं प्रबोधन होणं गरजेचं आहे. 'आझाद काश्मीर'च्या संकल्पनेतला फोलपणा त्यांना जाणवून देणं गरजेचं आहे. नाहीतर शेजारी त्यांचा 'बलुचिस्तान' करून टाकेल ही वास्तवता त्यांच्या निदर्शनास आणावी लागेल. 'तुम्ही-आम्ही एक आहोत. तुमचे दिशाभूल करणारे स्वार्थी नेते हेच काश्मीरच्या विकासातील अडथळे आहेत' हे विचार पक्के करणे गरजेचे आहेत. त्यासाठी शाळा-महाविद्यालयं यांच्या अभ्यासक्रमात बदल करणे. युवकांच्या हाताला सतत काम देणे जेणेकरून 'जिहादी' विचारांना डोके वर काढायला वेळच मिळणार नाही अशी व्यूहरचना आखावी लागेल. हे भारतीय लष्कर आणि भारत सरकार यांच्यापुढील मोठे आव्हान आहे.

त्यामुळे उन्मादापेक्षा संयम, शांतता आणि धार्मिक सौहार्द याच गोष्टी आपल्यातील आणि काश्मिरींमधील दरी मिटवू शकतील. ३७० कलम रद्द करताना या सरकारच्या मनात काश्मीरचा हा सर्वांगीण विकास दिसतोय. तो सफल होवो, हीच कामना.

**डॉ. लतिका भानुशाली**
भ्रमणध्वनी : ९३२२२०७८७८
latikabhanushali@yahoo.co.in




## डॉ. अनंत पां. लाभसेटवार

**लेखक, माजी अध्यक्ष–फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी, कॅन्सास अमेरिका**


# ॲमॅझॉन


## जगातलं महाअरण्य

ॲमॅझॉन नदी पूर्वेकडे वाहून शेवटी अटलांटिक समुद्रात विलीन होते हे सर्वांना ठाऊक आहे. परंतु एकेकाळी म्हणजे खापर पणजोबाच्या काळात नव्हे तर १५ दशलक्ष वर्षांपूर्वी पृथ्वीची जडणघडण होत असता ती पश्चिमेकडे वाहत होती हे वाचून कुणाच्याही गालाचा चंबू होईल. मग पृथ्वीच्या रचनेत ॲंडिज पर्वत निर्माण झाले व ॲमॅझॉनचं तळ झालं. माती पोखरत पोखरत पाण्याला पूर्वेची वाट मिळाली आणि तिचं अटलांटिक समुद्राशी १० दशलक्ष वर्षांपूर्वी मीलन झालं.

**ह**ल्ली 'ॲमॅझॉन' म्हटलं की लोकांना महाजालावरील वस्तू विकत घेण्याच्या संकेतस्थळाची आठवण होते, पण त्या आधी तो शब्द पृथ्वीवरील सर्वात मोठ्या पर्जन्यारण्यासाठी (Rain forest) वापरला जात होता हे आपल्या सर्वांना भूगोलाच्या वर्गातून व नंतर भारतीय प्रशासकीय सेवा अधिकाऱ्याच्या परीक्षेसाठी केलेल्या अभ्यासातून माहीत आहे. त्या परीक्षेत नापास झाल्यावर आपण तो विसरून जातो एवढंच. मला मात्र या महाजंगलाविषयी नेहमीच कुतूहल वाटलं आहे. त्याचा भौगोलिक विस्तार उभ्या भारतापेक्षा १.६ पट मोठा आहे. शिवाय ते अरण्य देशाच्या सीमारेषा विसरून अनेक देशांत पसरलं आहे. त्याचा अधिकांश भाग जरी ब्राझीलमध्ये असला तरी तो शेजारील कोलंबिया, व्हेनेझुएला, इक्वेडोर, बोलिव्हिया, पेरू व इतर देशांमध्ये घुसलेला आहे. मागच्या वेळी मी ब्राझीलमध्ये गेलो तेव्हा या निसर्गाला भेट देण्याचं राहून गेलं. ही उणीव मी २०१८ मध्ये भरून काढली.

इक्वेडोर या देशाची राजधानी म्हणजे किटो (Quito). मराठी परंपरेनुसार या शब्दाच्या प्रत्येक अक्षराचा उच्चार करून मी क्विटो म्हणून उच्चार केला आणि समोरच्या मुलीच्या चेहऱ्यावर अज्ञानाचे ढग पसरले. जेव्हा किटो म्हटलं तेव्हा कुठे तिला बोध झाला आणि तिनं आनंदानं मायामीवरून त्या राजधानीला जाणाऱ्या विमानाचं ठिकाण सांगितलं. किटो भारतीयांना दुसऱ्या एका कारणासाठीही महत्त्वाचं आहे. जगात भारतीय पासपोर्टचा फारसा आदर केला जात नाही. व्हिसा असल्याशिवाय भारतीय नागरिकाला परदेशात प्रवेश मिळत नाही. परंतु इक्वेडोर असा एक देश आहे, जिथे जाण्यासाठी व्हिसा लागत नाही. भारतीय बुद्धी वाममार्गानं भ्रमंती करण्यास नेहमी तयार असते. सरकारी नियमातून पळवाटा काढून त्याचं उल्लंघन करण्यात आपल्यापेक्षा चाणाक्ष या जगात दुसरं कुणी नसेल. म्हणून इक्वेडोरनं दिलेल्या सुविधांचा उपयोग आपले लोक इथे येऊन अमेरिकेत अवैधपणे घुसखोरी करण्यासाठी करतात याचं कुणाला फारसं नवल वाटू नये. ते उत्तरेला ६–७ देश तुडवून शेवटी अमेरिकेच्या दक्षिण सरहद्दीवर व्यावसायिक वाटाड्याच्या मदतीनं येऊन थडकतात.

मी मात्र तिथे सपत्नीक प्रवासी म्हणून गेलो होतो. आमच्या गटात २०–२५ लोक सहज असतील. सकाळी न्याहारी आटोपल्यावर आमची बस सूर्यनारायणाला तोंड देत पूर्वेकडे निघाली. किटो हे राजधानीचं शहर भव्य ॲंडिज पर्वतांच्या रांगांमध्ये लपलेलं. हा सर्व पर्वत ओलांडून पूर्वेला गेल्यावर ॲमॅझॉन या



**ॲमॅझॉनचं खोरं**

महाअरण्याची सुरुवात होणार होती. परंतु त्या प्रवासाला पाच-सहा तास सहज लागले. पर्वतांच्या अंगावर व भव्य दरीच्या काठावर वाढलेली वनराई हिरवीजर्द. त्या रम्यतेत रौद्रताही होती.

किटोवरून ॲमॅझॉनच्या जंगलात प्रविष्ट होण्यासाठी १०० मैलांचं अंतर कापावं लागतं. मात्र वाटेत अँडिज पर्वतावर गिर्यारोहण करून उतरावं लागतं. त्यामुळे या प्रवासाला ४-५ तास लागले. एरवी वळणं म्हटलं की माझा वेगरोग जागा होतो. पण, इथल्या अप्रतिम निसर्गसौंदर्यामुळे मला त्याचा विसर पडला. ढग पर्वतावर येऊन बसलेले. आजुबाजूच्या दऱ्याही त्यांनी भरलेल्या. ढगांना भेदून आमची गाडी अंतर कापू लागली. ढग मंत्र्याच्या भाषणाप्रमाणे पोकळ असतात, हे कळलं. उत्तरदक्षिण ४४०० मैल पसरलेला अँडिज पर्वत अनेक देशांना छेदून तिथलं जीवन घडवतो. अटलांटिक सुमद्रावरून येणारे जलधारी वारे तो अडवतो. त्यामुळे अँडिज पर्वताच्या पूर्वभागात अतिवृष्टी होऊन वनश्री वाढते तर पश्चिमेला अक्षरश: वाळवंट सापडतं.

पर्वतांमध्ये सूर्यराज वरुणराजाबरोबर लंपडाव खेळत होते. मधूनच ढग दाटून येत व आपलं पोट रितं करून निघून जातं. मग सूर्य वर येई. म्हणजे पृथ्वी रडताना हसत होती. अर्थातच अँडिज पर्वताच्या अनेक रांगा आहेत. वाटेत त्यात लपलेलं एक श्रमपरिहार करणारं स्थळ दिसलं. तिथे पर्वताच्या काठावर क्षारमय पाण्याचे ४ तलाव. प्रत्येकाच्या पाण्याचं उष्णतामान वेगळं. त्यात वक्राकार नळातून पाण्याच्या धारा पडत होत्या. त्याखाली बसण्याची व्यवस्था. मी व लता (माझी पत्नी) एका तलावात धारेखाली बसलो आणि मला अचानक एक श्लोक सुचला, 'ओम नमो भगवते वासुदेवाय' या शब्दांनी अँडिज पर्वतावरचं वातावरण प्रथमच पावन झालं असेल. तो श्लोक ऐकून एका तरुणीचं लक्ष माझ्याकडे गेलं आणि ती हसली. ऑफिसमध्ये भारतात असं झालं तर आपल्याला एकदम लघुकथा सुचते. मी लहानपणी ऑफिस रोमान्सवर कितीतरी कथा वाचल्या. परंतु परदेशात अशा हास्यानं प्रतिभेला कोंब फुटत नाही. अशी खुशी व्यक्त करण्यामागे कुठल्याच भावना नसतात. ती तरुणी आपल्या नवऱ्याबरोबर माझ्याजवळ पोहत आली आणि त्या श्लोकाविषयी तिनं पृच्छा केली. ती व्यवसायानं शिक्षिका होती. त्यामुळे तिनं भारताविषयी ऐकलं होतं. किटोमध्ये भारतीय भोजनालय असून तिथे तिनं मसालेदार अन्न खाल्लं होतं. शिवाय भारतीय पुराणाविषयी तिच्या मनात कुतूहल होतं. म्हणून माझ्या श्लोकामुळे ते जागृत झालं. तिनं मग भारताविषयी मला बरीच माहिती विचारली आणि एक दिवस आपण तिथे नक्की जाऊ असं आश्वासन देऊन ते पोहण्यास निघाले. श्रमपरिहार झाल्यावर आम्हीही ॲमॅझॉन जंगलाकडे मार्गस्थ झालो.

दुपारचा सूर्य इथे कलत नाही कारण हा देश विषववृत्तावर आहे. पण एप्रिल महिना म्हणजे दक्षिण गोलार्धातला हिवाळा. तरी फार उंचावर असल्यामुळे ऊन फारसं भासलं नाही. शेवटी बस एकदम थांबली. ते बसस्थानक नव्हतं. समोर एक भलीमोठी नदी वाहत होती. तिचं नाव नापो (Napo). ॲमॅझॉन या ४००० मैल लांबीच्या नाइलनंतर (Nile) सर्वात मोठ्या असलेल्या या महानदीला ११०० उपनद्या आहेत. नापो ही त्यातली एक. ७०० मैलांच्या पर्वतमय भागात प्रवास करून ती शेवटी ॲमॅझॉन नदीत संमीलित होते.

ॲमॅझॉन नदी पूर्वेकडे वाहून शेवटी अटलांटिक समुद्रात विलीन होते हे सर्वांना ठाऊक आहे. परंतु एकेकाळी म्हणजे खापर पणजोबाच्या काळात नव्हे तर १५ दशलक्ष वर्षांपूर्वी पृथ्वीची जडणघडण होत असता ती पश्चिमेकडे वाहत होती हे वाचून कुणाच्याही गालाचा चंबू होईल. मग पृथ्वीच्या रचनेत अँडिज पर्वत निर्माण झाले व ॲमॅझॉनचं तळ झालं. माती पोखरत पोखरत पाण्याला पूर्वेची वाट मिळाली आणि तिचं अटलांटिक समुद्राशी १० दशलक्ष वर्षांपूर्वी मीलन झालं. तिथे तिचं मुख ३०० मैल मोठं आहे. या नदीतून दर सेकंदाला ५.८ दशलक्ष गोड पाणी अटलांटिक समुद्राच्या क्षारयुक्त पाण्यात रिचवलं जातं. त्या गोड पाण्याची व्याप्ती समुद्रात १२५ मैल पसरते. पूर्वीच्या काळी समुद्री चोर ते पीत असत.

तर या महानदीच्या उपनदीच्या काठावर उभं राहताना या सरितेच्या भव्यतेपुढे मान झुकली. पैलतीरावर वृक्षाच्छादित उंच डोंगर. तिथे आमची राहण्याची सोय केलेली. म्हणजे नापो नदीशी मुकाबला करणं आलंच. लाकडी नावेत बसावं लागलं. ती निमुळती असल्यामुळे तिला उलथून पडण्यास व नदीत स्नान करण्यास फार वेळ लागला नसता. त्यात एकच अडचण होती. ती म्हणजे विद्युत इल (Electric Eel), विषारी बेडकं व पिराना (Piranha) मासे. त्या



**ॲमॅझॉनचे आदिवासी**

इलपासून आपल्याला विद्युत शॉक बसू शकतो. बेडकाचं मांस काही लोक खातात, पण इथल्या प्राणांच्या मांसात विष असतं. त्यामुळे त्यांच्या दर्शनानं तोंडाला पाणी सुटण्यात अर्थ नव्हता. पिराना मासे तर मांसभक्षक म्हणून प्रसिद्ध आहेत. माझ्यासारख्या अधिकांश शाकाहाऱ्याचं तर त्याला अभिरुची बदलासाठी खास आकर्षण असावं. यात जमेची एकच गोष्ट होती. या प्राण्यांविषयी आम्ही त्यावेळी अनभिज्ञ होतो. त्यामुळे अज्ञानातलं सुख अनुभवायला मिळालं. नदीच्या वेगवान प्रवाहाला भेदून आमची नाव पैलतीरावर पोचली. मग अनेक पायऱ्या चढल्यावर आमचा लॉज आला.

दुसऱ्या दिवशी ॲमॅझॉन जंगलाच्या पोटात शिरून त्याचं अंतरंग बघण्याची संधी मिळाली. सुदैवानं त्यावेळी वरुणराजानं आपले घोडे आवरून धरले होते. नाहीतर या विषववृत्तावरील भागात तो केव्हा येईल याचा नेम नसतो. तो वारंवार व अनियमित येत असला तरी फार काळ टिकत नाही. आपल्या मान्सूनप्रमाणे मागे रेंगाळण्याची खोड त्या दिवशी तरी इथल्या पावसानं दाखवली नाही. तरीपण अनेकांनी पॉंचो (Poncho) चढवून पावसाळ्याला तोंड देण्याची व्यवस्था केली होती. आम्ही मात्र ईश्वरावर भरवसा ठेवला होता. पुन्हा त्या होडीत बसून १० मिनिटं प्रवास केल्यावर एका ठिकाणी उतरलो. लाकडाच्या अनेक पायऱ्या चढून वर गेलो तेव्हा ॲमॅझॉन या महाभव्य अरण्यात आपण शिरणार याचा कोण आनंद झाला. आत काय आहे याची कल्पना नसल्यामुळे उत्कंठा वाढली. प्रत्येकाला एक काठी देण्यात आली. ती वार्धक्य म्हणून नसून जमिनीचा चढउतार आजमावण्यासाठी होती. वाटाड्याशिवाय बरोबर एक आदिवासी होता. त्याचं नाव वामो. त्याला या जंगलाचं अंतरंग, वनवाटा वगैरेची चांगली कल्पना. तसंच त्याचं तिथल्या वनस्पतींचं ज्ञान गाढ. जंगलात श्वापदं असू शकतात. पण वन्यप्राण्यांच्या निवारणार्थ त्या आदिवासीनं बरोबर एक लांब पात्याचा चाकूशिवाय दुसरं कुठलं शस्त्र घेतलं नव्हतं.

ॲमेझॉनची जंगलं दोन प्रकारची– एक दाट व दुसरं अतिदाट. अतिदाट अरण्य खास व्यावसायिकांसाठी राखून ठेवलेलं. तिथल्या खोडाचा व्यास भीमाच्या कवेतदेखील मावला नसता. शिवाय वन्यप्राण्यांचा उपद्रव जास्त. म्हणून आमच्यासारख्या सर्वसामान्य पर्यटकांसाठी दाट अरण्याची सोय केली होती.

इथे ॲमॅझॉन अरण्याविषयी दोन शब्द लिहिण्याची आवश्यकता आहे. पृथ्वीवरचा जो भूभाग आहे त्याचा २०% भाग हे अरण्य व्याप्त करतं. उलट उभा भारत फक्त २.०४% भागावर ठाण मांडतो. यावरून त्याच्या भौगोलिक भव्यतेची कल्पना येईल. जगातला सर्वात मोठा देश म्हणजे रशिया. पण तोदेखील फक्त १२% भूभाग व्याप्त करतो. ॲमॅझॉनमध्ये जे जैववैविध्य सापडतं ते दुसरं कुठेही आढळत नाही. इथे नुसत्या किड्यांच्या २५ लाख जाती आढळतात. याशिवाय ४०,००० प्रकारची झाडं व २००० जातींचे वेगवेगळे पक्षी. वाढत्या लोकसंख्येमुळे हरित वायू उत्सर्जन व पर्यावरणप्रदूषण सारखं वाढत आहे. परंतु महाअरण्यातील अब्जावधी झाडं हवेतला कार्बड डायऑक्साइड वायू भक्षण करून हरित रसायन तयार करतात. या प्रक्रियेत प्राणवायू ऑक्सिजन निर्माण होतो. या शुद्धीकरणामुळे ॲमॅझॉनला जगाचं फुफ्फुसं समजण्यात येतं. इथे वनस्पती वेगानं वाढण्याचं कारण विषववृत्ताशी असलेलं सामिप्य तर आहेच? पण दुसरं महत्त्वाचं कारण म्हणजे सहारा वाळवंटातून इथे नियमितपणे वाहून येणारी धूळ. दरवर्षी ५० दशलक्ष टन अशी धूळ इथे वाऱ्यानं येते. त्यात फॉस्फरसचं (Phosphorus) प्रमाण जास्त असून ते मूलद्रव्य वनवर्धक असल्यामुळे वनस्पतीला पहेलवान बनवतं.

या महाअरण्याचं मानवाच्या अस्तित्वाला एवढं महत्त्व असूनही त्याचा रोज वनविनाश होत आहे. तो बघून रडायला येतं. दर मिनिटाला १५० एकर जमीन बोडकी होते. त्याचं शेतजमिनीत रूपांतर करून त्यावर गुरांसाठी गवत व माणसासाठी सोयाबिन यांचं उत्पादन करण्यात येतं. आज ब्राझीलचा सोयाबिननिर्मितीत जगात अमेरिकेनंतर दुसरा नंबर लागतो. पण इथल्या जमिनीचा कस अल्पकाळात उतरतो. म्हणून वननाश करून सारखी नवीन जमीन शेतीसाठी वापरण्यात येते. हे निर्वनीकरणाचं (deforestation) प्रमाण एवढं वाढलं आहे की आतापर्यंत ॲमॅझॉनचा २०% भूभाग बोडका झाला. जगातला २०% प्राणवायू ॲमॅझॉन निर्माण करीत असल्यामुळे त्याचं आक्रसणारं क्षेत्रफळ म्हणजे मानवजातीवर कोसळत असलेलं एक संकटच समजावला हवं.

तिथली अतिउंच व भव्य झाडं सूर्यकिरणांना अडवून धरीत होती. त्यामुळे बाहेर ऊन असलं तरी इथे कायमची सावलीच. पर्णभाराचा मंडप एवढा अभेद्य की त्यातून पाणी झिरपण्यास ७ मिनिटं लागतात असं ऐकलं. सूर्यप्रकाश नसल्यामुळे इथे गवत व फुलझाडं अशी दिसलीच नाहीत. वनवाटा रानवाटापेक्षा अस्पष्ट व गळलेल्या पानांखाली लपलेल्या! इथे नीरव शांतता होती. कुठे पक्ष्यांची किलबिलही नव्हती. झाडांच्या पर्णभरात लपलेल्या पक्ष्यांनी केलेले आवाज जमिनीवर ऐकू येत नव्हते.

इथल्या झाडांमध्ये दोन प्रकारच्या स्पर्धा. एक म्हणजे आपली मुळं जास्तीत जास्त दूर पसरवून जमिनीतून पाणी व क्षार शोषणे. सर्वच वृक्ष स्वअस्तित्वासाठी तसं करीत असल्यामुळे जमिनीवर मुळाचं नुसतं जाळं पसरलं होतं. बरीच मुळं भूमिगत असली तर काही पृष्ठस्तरीय होती. त्यांचा आकार बघून हत्तीलादेखील लाज वाटली असती. मुळांच्या पसाऱ्यामुळे वन्यवाटावरून चालणं कठीण झालं. त्यावेळी ती काठी बाळगण्याचं शहाणपण कळलं.

दुसरी स्पर्धा सूर्यप्रकाशासाठी. हरितद्रव्य (Chlorophyll) बनवण्यासाठी त्याची जरुरी असते. इतरांपेक्षा जेवढं उंच तेवढा सूर्यप्रकाश जास्त. म्हणून या उंच वाढण्याच्या स्पर्धेमुळे इथली वनराई गगनचुंबी झाली होती. ठेंगणी झाडं सूर्यप्रकाशाभावी मरून जातात. त्याचे वाळलेले देह तिथे पडले होते. सृजनाबरोबर मरणही तिथे हातात हात घालून खेळत होतं.

इथले बरेच किडे उपद्रवी तर काही खाण्यायोग्य. एका खाद्य वाहिनीवर प्रसिद्ध झालेल्या निवेदकानं ॲमॅझॉनमध्ये जाऊन खोडात लपलेल्या मुंग्याचं ग्रहण केलं व आपण त्या खास जेवणामुळे किती तृप्त झालो हे ढेकर देऊन दाखवलं!

एका झाडावर भलंमोठं बांडगूळ दिसलं. ते टरमाइटचं (Termites) घर. त्या बाहेर पडून लेफ्ट-राईट करीत दूरवर जातात आणि लाकडाचा भुसा घरी आणून ते बांधतात. परतताना त्या कधी रस्ता चुकत नाही. त्यांच्यात परमेश्वरानं जी दिशादर्शक यंत्रणा योजली आहे त्यात अमेरिकन नौदलाला रस आहे. ते ज्ञान पाणबुड्यासाठी वापरता येतं.

आमचा वामो नावाचा जो चाकूधारी आदिवासी वाटाड्या होता त्यानं एक कौशल्य आम्हाला दाखवलं. त्यानं चाकू चालवून एका विशिष्ट पानापासून बारीक धागे कसे करायचे याचं कलाप्रदर्शन केलं. या दोऱ्यांपासून हॅट तयार करतात. या उभट टोपीमुळे ऊननिवारण करता येतं. थिओडोर रुझवेल्ट हे अमेरिकेचे २६वे अध्यक्ष. पनामा देशाला भेट देताना यजमानांनी त्यांना ती हॅट भेट म्हणून दिली आणि एकदम त्या टोपीला जागतिक प्रसिद्धी मिळाली. अमेरिकेत ती कमालीची लोकप्रिय ठरली. तिच्या उत्पादनात त्या मध्य अमेरिकेतील देशाचा काही एक संबंध नसला तरी तिचं 'पनामा हॅट' म्हणून नामकरण करण्यात आलं. त्या टोप्या ॲमेझॉनमध्ये निर्माण होणाऱ्या वनस्पतिजन्य धाग्यापासून विणल्या जातात हे जगाला ठाऊक नाही. ते गूढ आम्हाला ॲमेझॉन जंगलात त्या दिवशी वामोनं उलगडलं. या हॅटच्या किमती २५ डॉलरपासून ५००० डॉलरपर्यंत असू शकतात. या महागड्या टोप्या विणण्यास वर्ष-वर्ष लागतं म्हणे. या पनामा हॅट मी क्युबामध्येदेखील बघितल्या. ती हॅट मानाचं व सभ्यतेचं एक चिन्ह समजतात. या बाबतीत ते आपल्या पागोट्यापेक्षा किंवा उपरण्यापेक्षा फार वेगळं नाही.

बराच वेळ हिंडल्यावर आम्ही लॉजवर जाण्यास उतरलो. पण यावेळी होडीत बसलो नाही. एका लाकडी पसरट सतरंजीसदृश आसनाच्या काठी बसलो आणि पाय नापो नदीच्या पाण्यात सोडले. तो पाण्याचा स्पर्श संजीवक वाटला. पाणी फार खोल नसलं तरी प्रवाह वेगवान होता. त्या श्रमपरिहारात मांसभक्षक पिराना माशांचा विसर पडला.

लॉजवर पोचलो न पोचलो की विषववृत्तावरील पाऊस म्हणजे काय याचा अनुभव आला. आकाशात ढगांनी दाटी केली. ते आकाशातून खाली उतरून झाडांच्या डोक्यावर येऊन बसले. मग सगळीकडे अंधार पसरला. ढग फुटले आणि आपल्या मान्सूनसारखी वर्षावृष्टी सुरू झाली. विषववृत्तावर कधी वादळ निर्माण होत नाही असं कळलं. त्या पावसानं तृप्त व शांत झालेली सृष्टी तिथे स्थितप्रज्ञपणे उभी होती. लवकरच सगळीकडे पाणीच पाणी झालं. १०-१५ मिनिटांच्या जलवर्षावानंतर वरुणराजानं उसंत घेतली. सूर्यानं त्या दिवशी दांडी मारली होती, पण आमच्या वाटाड्याला (मार्को) हा पाऊस म्हणजे भातुकलीचा खेळ वाटला. तो म्हणाला इथल्या पावसात जलधारा एवढ्या जोरानं जमिनीवर व छतावर आदळतात की त्यांच्या आवाजात आपलं बोलणं बुडून जातं. समोरचं काही दिसत नाही. त्यामुळे वाहन चालवणं अशक्य होतं. परंतु इथला पाऊस अल्पजीवी असल्यामुळे हा निसर्गाचा उपद्रव फार काळ सोसावा लागत नाही. त्याची पुनरुक्ती सारखी होते एवढंच.

इथले आदिवासी कसे राहतात हे बघायला मिळालं. नापो नदीच्या जवळच एक जलवेष्टित बेट होतं. त्यामुळे तिथल्या लोकांची बाहेरच्या जगाशी नाळ तुटली होती. तिथले आदिवासी लोक साध्या दोन मजली घरात रहात होते, पण खालचा मजला रिकामा व मोकळा. वरच्या मजल्यावर कुटुंब संसार करीत. ही राहण्याची व्यवस्था हेतूपूर्वक करण्यात आली होती. दरवर्षी एकदा तरी नदीला पूर येऊन खालचा मजला पुरामुळे पाण्याने व्यापला जातो. अशा पुराचं इथली मंडळी स्वागतच करतात. कारण त्यातल्या गाळामुळे जमिनीची उत्पादनक्षमता वाढते असा अनुभव होता. तो केव्हा येईल हे सांगणं कठीण. पाण्याची पातळी वाढत आहे हे कळताच हे लोक पहिल्या मजल्यावर वाळत घातलेलं धुणं व स्वच्छंदपणे खेळणाऱ्या कोंबड्या वरच्या मजल्यावर आणून ठेवतात. जलवाहतूक बंद झाल्यामुळे शाळा व इतर व्यवहार ठप्प. या लोकांना पुराची मुळीच भीती वाटत नाही.

तिथली मुख्य शेती फळझाडांची. त्यांची काही फळं अगदी वेगळी. एकाचं नाव कोको. आपल्या पपईच्या आकाराच्या फळात ८०-१०० बिया. पण कोको फळाच्या बिया पपईप्रमाणे गाभ्यात एकत्र गर्दी करीत नसून गरात सर्वत्र विखुरलेल्या असतात. प्रत्येक बी भोवती असलेला गोड गर खाण्यात मजा वाटली. त्या बियांपासून चॉकलेट तयार होतं. हे कोको फळ आम्ही पेरूमध्ये बघितलेल्या कोका पानापेक्षा वेगळं होतं. ती पानं तोंडात ठेवून चघळणं किंवा त्यापासून तयार केलेला चहा पिणं उत्तेजक असतं. माझ्यावर मात्र त्याचा मुळीच परिणाम झाला नाही.

तिथलं एक कंदमूळही वेगळं. ते आपल्या रताळ्याच्या आकारासारखं. पण त्यापेक्षा मोठं. त्याला युका (Yuka) म्हणतात. अर्थातच त्याचं पीठ करून भाकरी तयार करता येईल. पण या लोकांनी त्याचा जास्त सर्जनशील उपयोग शोधून काढला आहे. फर्मेंटेशन करून त्यापासून मद्ययुक्त पेय निर्माण करण्यात आलं. ते आम्हाला चवीसाठी देण्यात आलं. काहींनी त्याची चव घेतली आणि ती चांगली आहे म्हणून जाहीर केलं.

मग दुसऱ्या मजल्यावर गेलो. तिथलं एक विशेष म्हणजे एका कोपऱ्यात शेकोटी होती. ती रात्रंदिवस सुरू असते. तिचा उपयोग पदार्थ भाजण्यासाठी होतो. विषववृत्तावर नेहमी गरमी असते. मग शेकोटी वापरणं म्हणजे उत्तरधृवावर वातानुकूलित यंत्र वापरण्यासारखं नव्हतं काय? पण इथे तशी परंपराच विकसित झाली. त्यापासून निघालेला धूर गवती छतात घुसून तो ते घर जिवाणूमुक्त ठेवतो असं सांगण्यात आलं. नाहीतर ते कीटक छताला भोकं पाडून पावसाला दिवाणखान्यात बोलावतात. अमेरिकेत त्यासाठी फवारे सोडून पर्यावरण प्रदूषण करण्यात येतं. त्यापेक्षा ही पारंपरिक पण पर्यावरणस्नेही पद्धती बरी!

गृहिणीनं केलेले कपडे मात्र पाश्चात्त्य प्रकारचे. नवरा शेतावर काम करण्यास गेलेला. तिने आमच्या अनेक प्रश्नांची उत्तरं दिली. आदिवासी असो की सुधारणावादी असो, मनुष्याची सुखदु:खं जगभर सारखीच. संसाराची काळजी सर्वांना असते. शेतात पीक

आलं नाही तर काय होईल यापासून आजारी पडलं तर पोट कसं भरेल? इथपर्यंत यांचे प्रश्न जगभर सारखेच. भौगोलिक रेषा बदल्यानं सुखदु:खाचं रूप बदलत नाही. शेवटी मी तिला आपण संध्याकाळी जेवायला काय करणार म्हणून प्रश्न विचारला.

केळीच्या पानात मासे गुंडाळून ते ती भाजणार होती. सर्वांना तिचा बेत आवडला. कुठे फोडणी देण्याची जरुरीच नव्हती. इथे पाण्याचा सुकाळ असूनही त्याचा दुष्काळ होता. नदीचं पाणी गाळ असल्यामुळे पिण्यायोग्य नव्हतं. म्हणून हे लोक नेहमी पडणाऱ्या पावसाचं पाणी गोळा करून ते वापरतात. ती कष्टिक बाब म्हणून ते नेमस्त वापरलेलं बरं.

घराबाहेर आम्हाला हे लोक शिकार कशी करतात याचं प्रात्यक्षिक दाखवण्यात आलं. हे लोक बाजारात मिळणारं प्रक्रिया केलेलं अन्न खात नाही. आपली आधुनिकतेची व्याख्या त्यांना पटत नाही. शेकडो किंवा हजारो वर्षांपासून वापरण्यात आलेली ही प्राचीन विद्या फार आगळी होती. बांबूच्या नळकांड्यात ते एक विषधारी बाण ठेवतात. जंगलातल्या वनस्पतीपासून तयार केलेलं ते रसायन प्राण्याला तात्पुरतं लुळं करते. तो बाण एकलव्यासारखा धनुष्यावर न चढवता नळकांड्यात ठेवून ते तोंडानं फुंकून लक्ष्यभेद करण्यात येतो. अर्थातच त्याला बलशाली फफ्फुसं, एकाग्रता व सराव लागतो. ते कौशल्य या लोकांत आहे. आता ते हळूहळू कालबाह्य होत आहे कारण सरकारनं त्यांना बंदुका व वीज दिली. तरी अफाट ॲमॅझॉन जंगलाच्या आतल्या भागात जुन्या प्रथाच अद्याप कायम आहेत असं कळलं. काही जमातींना बाहेर आधुनिक जग आहे याची कल्पनादेखील नाही.

इथलं सरकार आदिवासी लोकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मदत करते. मुलं अर्थातच होडीत बसून जलमार्गे शाळेत जातात. तिथे घरची भाषा सोडून पोर्तुगीज शिकतात. मग ते नोकरीसाठी किटोसारख्या शहरात जातात. परंतु शहरी जीवनशैली त्यांना आवडत नाही. म्हणून ९०% मुलंमुली घरी परतून वडिलांच्या व आईच्या पारंपरिक जीवनाचा स्वीकार करतात. म्हणजे मुलांना शेती व शिकार करावी लागते. इथे मका होतो पण गहू पिकत नाही. तांदूळ समुद्रकिनाऱ्यावरील पट्टीत होतो. कापूस म्हणजे काय हे या लोकांना ठाऊक नाही. मात्र विविध प्रकारच्या फळांच्या बाबतीत ते राजे आहेत.

ॲमॅझॉनमधील आदिवासींविषयी सुसंस्कृत झाल्यावर लॉजवर परत जाण्याची वेळ उभी ठाकली. पावसामुळे रस्त्यात चिखल झाला होता. अमेरिकेत लोक या मातीच्या प्रकारापासून वंचित राहतात. भारतात पावसाळा म्हणजे चिखल असं आपण गृहीत धरतो. शेवटी पुन्हा त्या नापो नदीच्या काठी आलो व त्या होडीत बसून खोलीवर परतलो. आता नदीवर जलविहार करण्याची आम्हाला सवय झाली होती.

**– डॉ. अनंत पां. लाभसेटवार** (Ph.D.)
anantlabh@gmail.com

॥ग्रंथाली॥

## डॉ. अनंत पां. लाभसेटवार यांची दोन चरित्रात्मक पुस्तके

# ट्रंप

एक वादळी जीवनपट




**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

ट्रंप करिष्माधारक, वाटाघाटीपटू, कृतिप्रधान, नेतृत्ववान व अमेरिकेला अग्रणी ठेवणारे आहेत. त्याबरोबरच एक भंपकबाज बोलणारे, श्रीमंतीची अतिशयोक्त अभिव्यक्ती प्रिय असलेले व देशाचं राजकीय ध्रुवीकरण करणारे म्हणूनही त्यांची ओळख आहे. या चढउतारांमुळे त्यांचा जीवनपट वादळी व चित्तथरारक झाला आहे.




# संगणकक्षेत्रातले काही प्रज्वलित दिवे

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

व्हॅलीमधल्या जगप्रसिद्ध-युगप्रवर्तक मोठ्या कंपन्या. जसे ॲपल, मायक्रोसॉफ्ट, ॲमॅझॉन, फेसबुक व गूगल यांच्या 'संस्थापकांना' महर्षी म्हणणंच योग्य ठरेल. स्टिव्ह जॉब्ज, बील गेट्स व मार्क झकरबर्ग यांनी तर विद्यापीठीय शिक्षणही पूर्ण केलं नव्हतं. त्यांनी स्वयंप्रेरणेन, स्वकष्टानं व आसामान्य दृष्टेतानं जगपरिवर्तन केलं. म्हणून या पुस्तकातली चरित्र वाचकांना उद्बोधक ठरतील.



# राजगुरूनगर


**सचिन जगदाळे**

**लेखक आणि पत्रकार**


## इतिहास सांभाळून असलेलं आधुनिक गाव

ज्या माणसानं देशासाठी प्राण वेचले त्या माणसासाठी त्यांच्याच गावातला माणूस वेळ देऊ शकत नाही? गेल्या बऱ्याच वर्षांत एखाद्या मोठ्या राजकारण्यानं देखील हुतात्मा राजगुरूंच्या जन्मस्थळी भेट दिल्याचं ऐकिवात नाही. कोठडीतला मार काय असतो, उपाशी राहणं काय असतं, गरम सळयांचे चटके काय असतात, याचा अनुभव या लोकांना नसल्याने हुतात्मा राजगुरू पुस्तकातल्या एखाद्या प्रकरणापुरतेच मर्यादित राहिले.

**पु**ण्यापासून साधारणतः ४५ किलोमीटर अंतरावर, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० वर राजगुरूनगर नावाचं ऐतिहासिक निमशहरी गाव आहे. भीमा नदीच्या काठावर वसलेल्या या गावाची फक्त महाराष्ट्रातच नाही तर पूर्ण भारतात असलेली सगळ्यात मोठी ओळख म्हणजे हे गाव शहीद भगतसिंग आणि शहीद सुखदेव यांच्याबरोबर फासावर चढलेल्या हुतात्मा राजगुरू यांचं जन्मस्थळ आहे. फार पूर्वी हे गाव खेटक या नावाने ओळखलं जायचं. कालांतराने खेटकचं खेड झालं आणि मग हुतात्मा राजगुरूंच्या कार्याचा प्रेरणादायी वारसा पुढील पिढीला मिळावा म्हणून त्यांच्या सन्मानार्थ गावाचं नाव १९६६ साली राजगुरूनगर करण्यात आलं. मात्र तालुक्याचे नाव आजही खेड हेच आहे. गावाची लोकसंख्या ही जवळपास साठ हजारांच्या आसपास आहे. ऑटोमोबाइलचे अनेक प्रकल्प असलेली जगप्रसिद्ध चाकण एमआयडीसी राजगुरूनगरपासून जवळ असल्याने गावाची लोकसंख्या गेल्या काही वर्षांत अतिशय वेगानं वाढली आणि वाढत्या शहरीकरणामुळे २०१४ साली गावात नगरपरिषद स्थापन झाली. असं असलं तरी गावात आजही शेती केली जाते. जवळच झालेल्या चास कमान धरणामुळे ऊस आणि भाजीपाला इथे मोठ्या प्रमाणावर पिकवला जातो.

राजगुरूनगरला फार मोठा ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा लाभलेला आहे. गावात शंकर, विष्णु, गणपती, शनी इत्यादी देवतांची मंदिरं आहेत. गावात हेमाडपंती बांधकाम असलेलं सिद्धेश्वर मंदिरदेखील आहे. साक्षात प्रभू रामचंद्रांनी भीमा नदीची वाळू वापरून या मंदिरातलं शिवलिंग बनवल्याची आख्यायिका प्रसिद्ध आहे. सिद्धेश्वर हे राजगुरूनगरचं ग्रामदैवत आहे. त्याचबरोबर गढई मैदानावर असलेलं भोपळबुआ हेदेखील गावाचं दुसरं ग्रामदैवत आहे. या दोन्ही ग्रामदैवतांची वार्षिक यात्रा चैत्र आमवास्येला भरते व यात्रेच्या दुसऱ्या दिवशी गावात कुस्तीचे आखाडे भरतात. या आखाड्यात पाकिस्तानचे मल्ल कुस्ती खेळल्याचे गावातील जुने लोक सांगतात. इंग्रजी शासनकाळात हे गाव इंग्रजांचं व्यवहाराचं महत्त्वाचं केंद्र होतं. यामुळेच गावात चर्चदेखील पहायला मिळतं. गावात धार्मिक एकोपा एवढा आहे की आदिलशहाचा सरदार दिलावर खान याच्या उरूसाच्या दिवशी म्हणजे चैत्र प्रतिपदेला भोपळबुआ आणि दिलावर खान यांना हिंदू आणि मुस्लिम सम ाजाकडून नैवैद्य म्हणून पोळीचा गूळ, तूप घालून मलिदा आणि नारळ दाखवला जातो. दिलावर खानचा विस्तीर्ण जागेतला घुमट (गुंबज) गावाच्या अगदी मध्यवर्ती भागात आहे. या भागाला सर्व बाजूंनी बुरूज आहे. येथे दिलावर खानची समाधी तसेच नमाज पढण्यासाठी मोठी जागा आहे. दिलावर खानाने खेडच्या सर्व बाजूंनी दगडी भिंत देखील बांधायला घेतली होती जिचे अवशेष आजही बघायला मिळतात. तसंच त्यानं पाण्याच्या सोयीसाठी १७५० च्या




**राजगुरूनगर येथील बसस्थानक**

आसपास येथे दगडी धरणदेखील बांधायला घेतलं होतं. त्याचेही अवशेष आपल्या नजरेस पडतात.

ऐतिहासिक दृष्ट्या राजगुरूनगरचं आणखी एक मोठं वैशिष्ट्यं म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहासातील अतिशय प्रसिद्ध व्यक्ती राजगुरूनगरच्या आजूबाजूच्या गावात/परिसरात वास्तव्याला होत्या. पहिल्या बाजीराव पेशव्याची सासुरवाडी ही राजगुरूनगर जवळच्या चास गावची. शूर सरदार होळकर घराणं हे राजगुरूनगरपासून काही अंतरावर असलेल्या वाफगावचं. औरंगजेब त्याच्या कालखंडात आठ महिने तेरा दिवस खेड मुक्कामी होता. तो ज्या मशिदीमध्ये राहायचा ती मशिद आज शाही मशिद नावानं ओळखली जाते. इतिहासात प्रसिद्ध असलेली राणी तारामती आणि शाहू महाराज यांच्यातील राज्य वर्चस्वाची लढाई इथेच झाली होती जी खेडची लढाई म्हणून प्रसिद्ध आहे.



राजगुरू यांची जन्मखोली

शैक्षणिक सोयींच्या बाबतीत राजगुरूनगर बऱ्यापैकी स्वावलंबी आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात गावात फक्त लोकल बोर्डाची शाळा होती आणि त्यामुळे पुढील शिक्षणासाठी मुलांना पुण्याला जावं लागायचं. ही समस्या दूर करण्यासाठी समाज धुरंदरांनी १९३८ साली ‘खेड तालुका एज्युकेशन सोसायटी’ स्थापन केली आणि या सोसायटीमार्फत महात्मा गांधी विद्यालय चालू केलं. ‘खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळा’ने गावात ‘हुतात्मा राजगुरू महाविद्यालय’देखील सुरू केलंय. राजगुरूनगरमधील समाजसुधारकांनी ज्ञानप्रसाराचं महत्त्व ओळखून सन १८६२ मध्ये गावात ‘जनरल नेटिव्ह लायब्ररी, खेड’ नावानं वाचनालय थोडक्या पुस्तकांनीशी सुरू केलं. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वाचनालयाचे नाव बदलून ‘सार्वजनिक वाचनालय, राजगुरूनगर’ हे नवं नाव अस्तित्वात आलं. आज या वाचनालयात ३६०००हून अधिक पुस्तकं आहेत. याचा फायदा जवळपास हजारो वाचकांना होतो आहे. राजगुरूनगरमधील शाळा-कॉलेजात शिक्षण घेऊन जगाच्या पाठीवर नाव कमावणारे अनेक जण आहेत. माजी राज्यसभा खासदार कै. बाळासाहेब आपटे, माजी विधानसभा अध्यक्ष कै. रामभाऊ म्हाळगी, माजी जागतिक बँक अधिकारी रमेश देशपांडे, कै. यशवंतराव चंद्रचूड; माजी न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालय, तसंच प्रसिद्ध संगीतकार अजय-अतुल यांनी आयुष्याचा बराचसा काळ याच ठिकाणी व्यतीत केलाय. याशिवाय राजगुरूनगर हे हुतात्मा राजगुरूंच्या नावानं जरी ओळखलं जात असलं तरी गावाने इतरही अनेक स्वातंत्र्यसैनिक देशाला दिलेत. मोरेश्वर गोपाळ सुतार, मारुती कहाणे, माधवराव शिंदेकर, कैलाशराव मधवे यांनीही भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वाचं योगदान दिलं होतं. विश्वनाथ खांगटे यांचा गोवा मुक्तिसंग्रामात सहभाग होता.

गावात भारतातल्या अनेक प्रांतातल्या लोकांच्या येण्याने राजगुरूनगरचं शहरीकरण झालं. शेतजमिनी विकल्या जाऊ लागल्या, त्यावरून वादविवाद होऊ लागले. परिणामी गावातल्या गुन्हेगारीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. गेल्या एक दशकात गावात हत्यांची अनेक प्रकरणं घडलेली आहेत. ढासळत्या कायदासुव्यवस्थेमुळे आणि शहरनियोनाच्या अभावामुळे राजगुरूनगर दुर्दैवानं पूर्वीच्या एवढं राहण्यासाठी आता सुरक्षित आणि सुटसुटीत राहिलेलं नाही. एके काळी गावात वाडे आणि चाळी मोठ्या संख्येनं होत्या; पण कालानुरूप त्यांची जागा बंगले आणि फ्लॅट संस्कृतीनं घेतली आहे. मनाला यातना देणारी सगळ्यात मोठी गोष्ट ही की ज्या हुतात्मा राजगुरूंच्या स्मरणार्थ गावाचं नाव राजगुरूनगर ठेवण्यात आलं त्या राजगुरूंचा वाडा मात्र पुरता उद्ध्वस्त झाला आहे. हुतात्मा राजगुरूंची जन्मखोली बांधण्यापालिकडे सरकारनं विशेष काही काम इथे केलेलं नाही. राजगुरूनगरला मी पहिल्यांदा गेलो होतो ते राजगुरूंचा वाडा बघण्यासाठीच. एसटी बसस्थानकावर एकाला वाड्याचा पत्ता विचारल्यावर, ‘‘कशाला जाता तिथं? बघायला काही नाही. मलाच किती वर्षं झाली तिथं गेलो नाही’’ असं उत्तर त्या गावातल्याच माणसाकडून मिळालं. ज्या माणसानं देशासाठी प्राण वेचले त्या माणसासाठी त्यांच्याच गावातला माणूस वेळ देऊ शकत नाही? गेल्या बऱ्याच वर्षांत एखाद्या मोठ्या राजकारण्यानं देखील हुतात्मा राजगुरूंच्या जन्मस्थळी भेट दिल्याचं ऐकिवात नाही. कोठडीतला मार काय असतो, उपाशी राहणं काय असतं, गरम सळयांचे चटके काय असतात, याचा अनुभव या लोकांना नसल्याने हुतात्मा राजगुरू पुस्तकातल्या एखाद्या प्रकरणापुरतेच मर्यादित राहिले. बऱ्यापैकी शिकल्यासवरल्या लोकांचं गाव असणाऱ्या राजगुरूनगरमधील नागरिकांनी हुतात्मा राजगुरूंचा वारसा सांभाळणे अपेक्षित असताना, त्यांचं हुतात्मा राजगुरूंकडे झालेलं दुर्लक्ष मला अस्वस्थ करून गेलं. बदल हा निसर्गाचा नियम आहे, राजगुरूनगरदेखील बदलत राहील. फक्त माणसं बदलली की त्रास होतो. आधुनिकतेची कास नक्की धरावी पण जोडीला राजगुरूनगरला देशाच्या पटलावर नेऊन ठेवणाऱ्या आणि गावाचं भूषण असलेल्या अनेक सन्मानीय व्यक्तींच्या नावाला किंवा सन्मानाला धक्का लागणार नाही याचीदेखील काळजी राजगुरूनगरमधील लोकांनी घ्यावी.

**- सचिन जगदाळे**
भ्रमणध्वनी : ९८६९२३२२६९
sachinjagdale02@gmail.com



**वृषाली वजरीनकर**
**महिला मंच समन्वयक, पुणे प्रतिनिधी, पोर्टल**

# भूतानची भटकंती


भूतान एकूण २० जिल्ह्यांनी व्यापला आहे, थिंपू आणि पारो मुख्य शहरे आहेत. जगातील सर्वात कमी कार्बनउत्सर्जन होणारा देश म्हणून भूतान ओळखला जातो. जगातील सर्वात आनंदी लोकांचा देश ही भूतानची नवीन ओळख! हॅपिनेस इंडेक्समधील त्यांचा हॅपिनेस जगात सर्वात जास्त उंचावलेला आहे.

**भू**तान! छोटासा देश. भारताच्या शेजारीच असून आम्ही कधी जाऊ असे वाटले नसताना, तेथील निसर्ग आणि भौगोलिक सौंदर्य, पर्यटनस्थळे याकडे आकर्षित होऊन आम्ही प्लॅन केला तो स्वतंत्रपणे जाण्याचा.

पुणे ते बागडोगरा व्हाया दिल्ली असा विमानप्रवास करून आम्ही पोहचलो. तेथून वेस्ट बंगालमधील बुक्सा (Buxa) फॉरेस्टला जाण्यासाठी, 'राजभातखावा' असे मजेशीर नाव असलेले रेल्वेस्थानक होते. तिकडे ट्रेनने पोचून आम्ही उतरलो ते सुंदर निसर्गरम्य अशा गावात. आजूबाजूला जंगल, मस्त प्रवास आणि तेथून मग आम्ही सफारीने बुक्सा फॉरेस्ट व इतर किल्ले, ऐतिहासिक ठिकाणे, जयंती नदीच्या काठी वसलेली खेडी बघत मस्त प्रवास केला .

तिथले जेवण, रसगुल्ले, मोमो, भात असे मस्त खाद्यपदार्थ चवीने खात आणि बरीचशी मंदिरे, छोटी देवळे वगैरेची सफर करून जराशी विश्रांती घेतली. भूतानला जायची तयारी तेथून फार सोपी होती.

आमच्या ठरलेल्या गाडीने भारतातून छोट्यामोठ्या गावांतून काहीच तासांत, 'जायगाव' या गावामधून भूतान प्रवेशद्वारावर आलो आणि सगळेच अचंबित होऊन तिथेच थबकलो! गाडीतून उतरून मस्त पावले टाकत जवळ जाऊन बघतो तर एक छान, नक्षीदार, आकर्षक सुंदर कमान (त्याखाली सुरक्षारक्षक उभे) आपल्या भारत देशाला जोडून दुसऱ्या देशात प्रवेश करण्यासाठी बांधलेली होती. यावरूनच आपले आणि भूतानचे मैत्रिसंबंध दिसून येतात. प्रवेश करताच काहीच अंतरावर भारत आणि भूतानमधील विरोधाभास जाणवला. तिकडचे सुंदर स्वच्छ रस्ते, शिस्तबद्ध वाहतूक पाहून जरा कौतुकच वाटले. सामान भूतानमध्ये फेन्शुलिंग या शहरात ठरल्याप्रमाणे बुकिंग केलेल्या ठिकाणी मुक्कामी ठेवून आम्ही आसपास फिरायला निघालो. तसे तर अजून आपला देश सोडल्याचे फारसे फीलिंग आलेही नव्हतेच. मस्त थंड, हवेशीर, मोकळे वातावरण पाहून कौतुक म्हणून फिरत होतो.



**टायगर नेस्ट**

सर्वांना भूक लागली होतीच, रात्रीची वेळ होती. जेवायचे कुठे बघू जवळच म्हणता, भारताहद्दीपलीकडे लागून काही अंतरावर वाटिका हॉटेल आहे समजले. मग काय भूतानमधून भारतात जेवायला जायचे ठरले आणि जेवण घेऊन परत भूतानमध्ये आलोही! तेही, एक फक्त कमान ओलांडून! मजेशीर वाटत होते! आणि गर्दीचा फरकही जाणवत होता. जेवण झाले तसे पुन्हा चालत भूतानमध्ये निघालो, फेन्शुलिंग शहरात, आहे ना मजा!

फेन्शुलिंग शहरातून सर्व इमिग्रेशन वगैरे पार पाडून गाडीने भूतानची पुढील विविध रम्य ठिकाणे पाहण्यासाठी निघालो. विशेष म्हणजे पासपोर्टचा कडक नियम इकडे नसल्याने फार सहज प्रवेश मिळतो. फक्त परमिट मात्र काढावे लागते.

आमचा ड्रायव्हर होता फेन्शु. त्याला बरेच छान हिंदी येत असल्याने सर्व माहिती प्रवासात मिळत होती.

अनेक मॉनेस्ट्री, रम्य प्रवास, देखण्या निळसर नद्या पार करत, रमणीय निसर्ग बघत भूतानची राजधानी थिंबू येथे सुंदर कमानीतून प्रवेश केला.

तेथील राजाराणीची चित्रे, पेंटिंग, फोटो ठिकठिकाणी लावलेले पाहून त्यांचे राजाराणीवरील प्रेम दिसून येत होते. भूतानदर्शनाचा भाग म्हणून राजाचा महालही बघून झाला.

अतिशय सुंदर रस्ते, आजूबाजूला स्वच्छता, शांत वातावरणात आम्ही आमच्या राहायच्या ठिकाणी पोचलो. हॉटेलमधील लाकडी सजावट तिथली परंपरा दाखवणारे होते आणि एकूणच सुंदर रम्य ठिकाण.

भूतानमध्ये सुपारी देऊन पाहुण्यांचे स्वागत केले जाते. तेथील लोक सतत तोंडात काहीतरी चघळत असतात म्हणून विचारलं तर तो ओल्या सुपारीचा प्रकार होता. भूतानी वेशातील हसतमुख ललनांनी स्वागत केले.

फ्रेश होऊन आम्ही तेथील सर्व पर्यटनस्थळांची सफर केली. जगप्रसिद्ध बुद्धाची भव्य मूर्ती पाहायला निघालो, तोही प्रवास रमणीय होता. तेथे थंडगार वारे अंगाला झोंबत होते, उंचावर बसवलेल्या भव्य सोनेरी बुद्धमूर्तीवरचे शांत स्मितहास्य, प्रसन्न मुद्रा पाहून स्तिमित व्हायला होते. समाधानी भाव मनाला प्रसन्न करून जातात. आजूबाजूच्या सोनेरी रेखीव कलाकृती, नर्तिका शिल्पे आणि उंच डोंगरावरून दिसणारे नयनरम्य परिसर पाहून मनही प्रसन्न झाले. सर्व जगाला शांततेचा संदेश देणारे महान गौतम बुद्ध सर्वदूर प्रसिद्ध असले तरी भूतानच्या या मूर्तीचे आकर्षण खासच.

पुढे तिथले नॅशनल पार्क पाहिले, तिथला टाकीन नावाचा बोकड गेंड्यासारखा दिसणारा प्राणी, राष्ट्रीय प्राणी म्हणून ओळखला जातो. तर कावळ्यासारखा दिसणारा 'रावेन' पक्षी त्यांचा राष्ट्रीय पक्षी आहे. जवळच छानसे म्युझियम आहे, त्यातही सर्व शिल्पे, चित्रकलाकृती पाहताना भूतान उलगडत जातो. या संग्रहालयात जगातले सर्वात मोठ्या आकाराचे पुस्तकसुद्धा ठेवले आहे.

तिथले पारंपरिक जेवण म्हणजे मस्त बैठी व्यवस्था असते! 'एमदातशी' नावाचा छान पदार्थ तिकडे मिळतो. आम्ही शाकाहारी



**भूतानी मुले**

असल्याने तो मागवून खाल्ला. त्यात सर्व भाज्या, सूप व चीज असे काहीसे मिक्स सॅलड असते, तर पालकाच्या छोट्या रोट्या, लाल तांदळाचा भात, काहीतरी पातळ आमटी, तोंडलीची भाजी असे कमी मसाल्याचे पदार्थही चाखले. भूतान जवळपास ९० टक्के मांसाहारी असून मुख्य धान्य तांदूळ आहे.

पुढचा प्रवास फोबजिका या ठिकाणी होता. अतिशय उंचावर हे ठिकाण असून तिकडे जाताना काळसर मानेचे क्रौंच पक्षी मोकळे फिरताना दिसतात. शिवाय डोंगरदऱ्या, प्राणिसंग्रहालय आणि विविध मॉनेस्ट्री पाहत आम्ही मस्त थंडीत कुडकुडत तिकडे राहिलो ते खासच होते. तिकडे खरे तर भारतीय पर्यटकांनी भजी वगैरे प्रकार सतत करायला लावून त्यांना या चमचमीत पदार्थांची सवय लावली असे तेथे पदार्थ करणाऱ्या मुलीने आम्हाला हसत सांगितले.

भूतानाचा सुप्रसिद्ध झुलता पूल 'पारो' या ठिकाणी आहे. मोचू घोचू या नद्यांवर तो बांधला आहे. निळसर पाचू रंगाच्या नद्या अतिशय स्वच्छ सुंदर आहेत. प्लास्टिकचा वापर अजिबात नाही. नदीवर बोटिंगची, राफ्टिंगची व्यवस्था आहे.

तेथील सर्वात जुनी भव्य मॉनेस्ट्री, तिथला राजमहाल आणि लायब्ररी हे मुख्य आकर्षण आहे. मॉनेस्ट्रीमध्ये तिथले धर्मगुरू म्हणजेच माँक यांची पूजा, मंत्रोच्चारचा आवाज घुमत असतो, पूजावाद्ये वाजत असतात. चहूबाजूंनी आसमंतात दरवळणारा उदबत्तीचा सुगंध मनाला प्रसन्नता प्रदान करतो. वातावरण खूपच भारावणारे होते. भाषा वेगळी असल्याने फारसे बोलणे झाले नाही. शिवाय भूतानी लोक शांत बुजरे वाटायचे. त्यांचा पारंपरिक वेष

म्हणजे पायघोळ 'घो'. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळेच हा पोशाख परिधान करतात.

भूतान हा मूलत: बौद्धधर्मीय देश आहे. याचे संस्कृत नाव 'भू-उत्थान' म्हणजेच भूमीपासून उत्थान होऊन निर्माण झाले ते भूतान. बौद्धधर्मीय देश असला तरी काही प्रमाणात हिंदू लोकही इथे वास्तव्य करतात. बौद्ध भिक्षूंची संख्या अधिक असल्याने तसा हा धार्मिक देश आहे. लोक गरजेपुरते काम करतात आणि उरलेला वेळ ध्यानधारणेत व्यतीत करतात. अतिशय शांत आणि हळू आवाजात बोलणे हे या लोकांचे वैशिष्ट्य आहे.

या लोकांच्या मते पृथ्वीच्या प्रत्येक कणात परमेश्वराचे अस्तित्व आहे. या लोकांच्या जीवनाकडून असलेल्या अपेक्षा मुळातच कमी आहेत. गरजाही कमी आहेत. त्यामुळे अत्यंत आनंदी आणि समाधानी वृत्तीने ते जीवन जगतात. हव्यास नाही, भौतिक गोष्टींची लालसा नाही, त्यामुळे निसर्गाच्या ते खूप जवळ आहेत. ठिकठिकाणी चित्रकारी, परंपरेने नटलेली चित्रे, शिल्पे यांचे दर्शन होते. बहुतेक व्यवसाय महिलावर्ग सांभाळतो. भूतानचा मसाज खूप प्रसिद्ध आहे. पुरुषाच्या लिंगाचे प्रतीक असलेले 'पेनीस आर्ट' हे तेथे प्रत्येक घरात, भिंतीवर लावले जाते. यामागे सांगितले जाणारे कारण म्हणजे संसारातून विरक्त होऊन संन्यासी प्रवृत्तीकडे झुकत चाललेला युवावर्ग. या तरुणांनी संसाराकडे आकर्षित व्हावे म्हणून अशी प्रतीके सगळीकडे सर्रास लावलेली दिसतात. तिकडे स्त्रियांनी दोन पती करणे हे समाजमान्य आहे. बुद्धपूजेनंतर राजाराणीचीही तेवढ्याच आत्मीयतेने व धार्मिकतेने पूजा केली जाते.

१९०७ मध्ये भूतानमध्ये राजेशाही स्थापना झाली 'उगयेन वानचूक' हा भूतानचा पहिला राजा. २००६ पासून जिग्मे वानचूक हे राजे आहेत. १९७४ पासून भिक्षेकरूचा प्रांत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भूतानला स्वतंत्र देश म्हणून मान्यता मिळाली.

भूतानच्या राजकारणाविषयी लिहायचे तर, लोकशाही पक्षीय व संसदीय प्रणाली प्रस्थापित आहे. पार्लमेंटमध्ये प्रधानमंत्री लोटे स्टेरिंग असून राजा सार्वभौम आहे. पार्लमेंट येथे अप्पर हाऊस, 'नॅशनल काउन्सिल लोअर हाऊस, नॅशनल असेंब्ली आहे. येथे संसदीय लोकशाही असून संविधानिक राजतंत्र आहे. प्रमुख म्हणून राजाला मान आहे. पंतप्रधान यांची 'ड्र्युक नामरून तशोगापा' ही पार्टी आहे.

निवडून आलेल्या सभासदांचे वरिष्ठ सभागृहामध्ये २५ सदस्य असतात तर नॅशनल असेंब्लीमध्ये ४७ सभासद असतात. प्रधानमंत्री हा मंडळाचा प्रमुख असतो.

येथे पहिली निवडणूक २४ मार्च २००८ रोजी झाली.

पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी व Druk Phuensum Tshogpa हे मुख्य मोठे राजकीय पक्ष आहेत. भूतानच्या राजकारणात तेथील संस्कृतीमुळे महिला फारशा सक्रिय नव्हत्या, सहभागी नव्हत्या पण अलीकडे त्यांचा सहभाग वाढला आहे.

भूतान हा सार्कचा सदस्य देश आहे. रॉयल भूतान हे आर्मी सैन्यदल असून त्यामध्ये राजाचे अंगरक्षक व पोलीस सामील असतात. भूतान एकूण २० जिल्ह्यांनी व्यापला आहे, थिंपू आणि पारो ही भूतानमधील मुख्य शहरे आहेत. जगातील सर्वात कमी कार्बनउत्सर्जन होणारा देश म्हणून भूतान ओळखला जातो. जगातील सर्वात आनंदी लोकांचा देश ही भूतानची नवीन ओळख! हॅपिनेस इंडेक्समधील त्यांचा हॅपिनेस जगात सर्वात जास्त उंचावलेला आहे.

हा देश जीडीपीच्या साह्याने मोजल्या जाणाऱ्या भौतिक आर्थिक उत्कर्षावर विश्वास ठेवत नाही, तर जनतेच्या आनंदी राहण्याच्या संकल्पनेवर विश्वास ठेवतो हे पाहून तो जगातील आनंदी देश का मानला जातो हे सिद्ध होते.

भारत हा नेहमीच भूतानचे संरक्षण करत आला आहे, त्याला मदत करत आला आहे, म्हणून आपले भूतानबरोबर मैत्रिपूर्ण संबंध आहेत. तो आपला विश्वासू मित्र देश आहे. अलीकडे भूतानमधील डोकलाम भागात चिनी सैन्य शिरले तेव्हा भारतीय सैनिकांनीच चिनी लोकांसमोर निधड्या छातीने उभे राहण्याचे धारिष्ट्य दाखवले.



**भूतानचे प्रवेशद्वार**

तिकडे सिनेमा, नेट, टीव्ही याचा फारसा प्रचार-वापर नाही. त्यावर बंदीच असायची. मी एके ठिकाणी हॉटेलमध्ये टीव्ही बघणाऱ्या तिथल्या महिलेला विचारले, ''काय बघता आहात?'' तेव्हा तिने सांगितले की आम्ही भारतीय मालिका बघतो. तिने त्यावर एक हिंसाचाराचे दृश्य असलेले चॅनल लावले होते, 'शांत भूतान' असा बिघडत जाणार या विचाराने मला वाईट वाटले.

इथे साफसफाई खूप महत्त्वाची मानली जाते. कचरा पसरवणे गुन्हा मानला जातो, तर रस्ते क्रॉस करताना काटेकोरपणे झेब्रा क्रॉसिंगचे पालन केले जाते याची प्रचीती आली.

सुंदर निसर्गाच्या साथीने प्रवास करत पुढे पारो या शहरात प्रवेश केला. माँक, धर्मगुरू, शिष्य असे समूह ठिकठिकाणी दिसायचे, शिवाय शांत समाधानी शिस्तीचे लोक आपल्या दार्जिलिंग-सिक्कीम भागातील लोकांसारखे दिसतात.

वेशभूषा सर्वांची सारखीच. पुरुषांचा घो, मुलींचा पोषाख किरा स्कर्ट आणि वर टॉप असा, तोही कामाच्या ठिकाणी घातला जातो.

वाटेत राजाचा भव्य राजमहाल आणि परिसर पाहायला मिळाला.

पुढचा प्रवास मोठा अवघड होता. १०० मीटर उंचावर असलेले टायगर नेस्ट मॉनेस्ट्रीला आम्हाला जायचे होते. याला टाकसँग (Taksang) असेही म्हणतात.

१२ हजार फूट उंचीवर, तेही खडबडीत अवघड रस्त्यात्तून चालत चढणे! तसे घोडेही असतात म्हणा जाण्यासाठी.

आम्ही सर्वांनी सकाळी सुरुवात केली ती उतरायला संध्याकाळ झाली. तिथे जायचे ते बुद्धमूर्ती बघायला आणि धर्मगुरूंचे दर्शन घ्यायला. त्याचा इतिहास आणि मॉनेस्ट्रीची रचना ग्रेटच. प्रत्यक्ष अनुभवल्यावरच समजते.

बौद्ध धर्मगुरू येथे वास्तव्यास असतात. भूतानच्या प्रवासातील हा महत्त्वाचा प्रवास ठरतो. तिथल्या अतिशय अवघड कड्यावर बांधलेली ती मॉनेस्ट्री माणसाची जिजीविषा प्रवृत्ती स्पष्ट करते.

असा वेगवेगळ्या अनुभवातून सुंदर प्रवास चालू असायचा, मधेच फुबजिका या ठिकाणी पोचलो आणि अचानक मस्त स्नो फॉल सुरू झाला. अशी ही निसर्गरम्य ठिकाणे फक्त अनुभव घेऊनच समजतील अशी आहेत.

भारताची लोकसंख्या प्रचंड आणि भूतानची लोकसंख्या जेमतेम ८ लाख. क्षेत्रफळ मोकळेच, त्यामुळे तफावत असणारच. स्वच्छता, शिस्त, चकचकीत निसर्ग तिकडे तर इकडे भारतात लगेच घाणीचे, ट्राफिकचे रस्ते, गचाळपणा! हे केवळ लोकसंख्येमुळेच आहे. तिकडे तसा रोजगार फारसा उपलब्ध नाही, चलन वेगळं असलं तरी काही ठिकाणी आपले पैसे चालतात. खरेदीला खास काही नाही, स्थानिक कलाकुसरीच्या वस्तू मिळतात. आम्ही जुन्या बाजारातून बुद्धांची मेटलची मूर्ती घेतली. १० ते१५ दिवसांत सगळा भूतान फिरून होतो. पारो येथे छोटेसा टुमदार विमानतळ आहे. तेथून भारतात येण्याची सेवा सुरू आहे.

नुकतेच भूतानबरोबर द्विपक्षीय संबंध विस्तारण्यासाठी भारताचे पंतप्रधान मोदी यांनी भूतानच्या पंतप्रधान लोटे तसेरिंग यांच्याशी विविध मुद्यावर चर्चा केली. या चर्चेनंतर थिंफू येथील ऐतिहासिक सिमटोका झाँग या गढीमध्ये भारत आणि भूतान दरम्यान अवकाश, हवाई उड्डाण,आयटी वीज आणि शिक्षण या क्षेत्रात संदर्भात आणि नऊ सामंजस्य करारावर एक वीजखरेदी करारावर सह्या झाल्या. मोदी यांच्या उपस्थितीत भूतान येथील मांग छेदू जलविद्युत प्रकल्प आणि इस्रोने बांधलेल्या प्रक्षेपण केंद्राचेही उदघाटन झाले याशिवाय भारत भूतानमधील ५० वर्षाच्या जलविद्युत सहकार्याचे प्रतीक म्हणून विशेष टपाल तिकिटाचे प्रकाशन झाले. रूपे कार्डचा वापर करणारा सिंगापूर नंतर भूतान हा दुसरा देश ठरला आहे त्यामुळे भारताकडून रूपे कार्ड वितरित केल्यानंतर भूतान प्रवासासाठी आलेले नागरिक त्याचा वापर करू शकतील. तसेच भूतान येथील बँकांना भारतात जाणाऱ्या नागरिकांसाठी हे कार्ड उपलब्ध करून देण्याची सोय करण्यात येईल.

तसेच नुकतेच भूतान मध्ये भारताकडून वीजनिर्मितीचा हायड्रोलीक प्रोजेक्ट राबवण्यात येत आहे. या प्रोजेक्ट मधून भूतान येथील 'पुना सांचू एक', 'पुना सांचू दोन' असे मोठे १२०० मेगाव्याटचे प्रोजेक्ट भूतानच्या वांगडू जिल्ह्यात सुरू केले आहेत. त्यामुळे भूतानला रोजगार वीज आणि भारताला वीज मिळेल. भूतानच्या आर्थिक सुधारणेत आणखी भर पडेल.

भारत भूतान संबंध आणखी दृढ होतील. तसेच या काम ासाठी भरताकडून भूतानमधला सर्वात मोठा दीड किलोमीटरचा बोगदा करण्यात आला आहे ज्यामुळे अनेकांना सोयीचे जाणारा हा प्रोजेक्ट २०२३ पर्यंत पूर्ण करण्याची शाश्वती भूतानने दिली आहे. अशा प्रकारे भूतानचे पक्षीसंवर्धन असो की शैक्षणिक, भौगोलिक विकास, भारताचा फार मोठा हातभार कायमच लागला आहे.

छोटासाच देश, आपल्या शेजारचाच... तरीही संस्कृतीत बरीच तफावत. आनंदी, समाधानी वृत्तीने कसे राहावे हे हा देश शिकवतो. हा देश परवडणारा आहे आणि जवळच असल्याने छान निवांत पाहून होतो. मौजमस्ती, आल्हाददायक वातावरण भरभरून बघण्याचा उत्साह, सुंदर मॉनेस्ट्री, स्वच्छतेचे धडे, तेथील गोड खाद्यपदार्थ आणि काही छान भेटवस्तू घेऊन आम्ही अगदीच लवकर, अलगदपणे... या पिटुकल्या भूतान देशातून भारतात परतलो, ते पुन्हा एकदा, नक्कीच जायचं हं! असे एकमेकांना म्हणेतोवर आपला देश आलाही.

**– वृषाली वजरीनकर**
भ्रमणध्वनी : ८९९९८८६५३४
८९७५८९०५६७
vrushalivarjrinkar@gmail.com

काव्यरंग

## पसारा

काय म्हणावं तरी काय या मनाला
किती 'पसारा' साठवून ठेवलाय त्यानं कप्प्याकप्प्यात
दु:खाचे क्षण, सुखाचे हसू, तिरस्कार, प्रेम, आपुलकी
सगळं कसं व्यवस्थित रचून ठेवलंय कानाकोपऱ्यात
प्रश्न पडतो कधी कधी की हे आपलं मन आहे की
पसाऱ्याचं कपाट?
एखाद्या कातरवेळी मग फुटतोच बांध आणि
कप्प्यातला पसारा अस्ताव्यस्त पडतो समोर
दाटून येतो हुंदका आणि ओलावते हळवी नजर
मग मात्र मनालाच विचारतो आपण की
''काय गरज होती एवढा पसारा साठवायची
शेवटी बांध फुटलाच ना तुझा?
मग मन म्हणतं
'अग वेडे, नियमच आहे तो निसर्गाचा,
अनावर झाला की तो निसर्ग सुद्धा
आपला पसारा अस्ताव्यस्त करून टाकतो आणि
त्यातच तर आस असते नवनिर्मितीची
आता माझाही बांध फुटला,
गेला तो पसारा वाहून
आता नव्या उमेदीने उठावेच लागेल तुला
मला माहीत आहे की थोड्याच दिवसात
नवीन पसारा जाईल जमून आणि
मलाच तो ठेवावा लागेल
'कप्प्याकप्प्यात रचून...'
आणि मग मात्र आपण भानावर येतो,
'पसारा' आपलाच आणि तो साठविण्यासाठी असलेलं
मनाचं 'कपाट' देखील आपलंच असा विचार करून
नव्या जोमाने आपण टाकतो पुढचे पाऊल...
नवीन 'पसारा' साठवायला...!!!

**– धनश्री महेंद्र ठोंबरे**
भ्रमणध्वनी : ९८२१७४९५७२
thombaredhanshree@gmail.com

## सती

घोट घोटत साचले
दाह तिन्ही लोकीयांचे
नऊ माणकांच्या रांगेत
एक बोचरे विषाचे

डोळे आगीने माखले
भोळा साधू तो अमर
पेटत्या गळ्यातला
एक आर्जवी स्वर

हाती अमृत घेऊनी
अर्धांगिनी धावली
माया स्पर्शातली तिच्या
आणि अगदी गोठली

देह जळे जरी त्याचा
ती वेदना न्हाली
विषबाधा कर्तव्याची
प्रेमात सती जाहली

**– गुंजन**
भ्रमणध्वनी : ९८६७८३९२७८
gunjan11n@gmail.com

## ओढ

निळ्या क्षार जलाशयावर
डावी-उजवी वाहते नाव
अन् बोलके नभ पांघरले
नयनांच्या गोलावर
निखळ, पारदर्शी दर्पणावरूनी
हात हळूच खिळून राही
मज त्याची ओढ अनामिक
सरते आहे पुढे कहाणी
अगणित अशा क्षणांवर
मोकळ्याश्या गारव्यात
मुखी येई सूर कोवळा
भरत जातो उर आणिक
नाव सरते गहिऱ्या वळणा

**– साक्षी तावडे**
भ्रमणध्वनी : ८०९७३८२८०३
sphurti.19@gmail.com

# दानशूर सॅक्लर घराणं आणि अंमली औषधांचा (Opioid) अमेरिकेला गळफास

मोहन द्रविड

व्यसनी लोकांची संख्या एकट्या अमेरिकेत कोटींच्या घरात पोचली.
आज अमेरिकेत opioids च्या आधीन असलेल्यांची संख्या तीन कोटी आहे आणि
ती वाढतच आहे. गरीब कुटुंबांत या औषधाच्या अतिसेवनाची साथ मोठ्या प्रमाणात आहे.

**सा**धारण पन्नास वर्षांपूर्वीची गोष्ट. तत्कालीन इजिप्तचे अध्यक्ष नासेर यांनी 'आइसीस' आणि 'ओसाइरस' या देवांचे एक मोठे देऊळ अमेरिकेला भेट दिले. हे देऊळ रोमन साम्राज्याचा पहिला सम्राट ऑगस्टस याने इजिप्तमधील देंदूर या गावात इसवीसनपूर्व १५ साली बांधले होते आणि ते आता आस्वान धरणाखाली येत होते. १९६७ मधील अमेरिकन अध्यक्ष जॉन्सन यांनी ते न्यूयॉर्क शहराला भेट दिले आणि तिथल्या महापौरांनी ते शहरातील सुप्रसिद्ध मेट्रोपॉलिटन म्युझियम ऑफ आर्ट्स (मेट)मध्ये ठेवायचे ठरवले. पण इजिप्तहून देऊळ आणणार कोण व म्युझियममध्ये मोठा हॉल बांधणार कोण? हा प्रश्न सहा वर्षे सुटेना. हे आर्थर सॅक्लरच्या कानावर आले आणि त्याने तो प्रश्न सहा सेकंदांत सोडवला. आज संपूर्ण काचेच्या भिंती असलेले प्रशस्त असे सॅक्लर विंगमधले देखणे देऊळ मेटचे खास आकर्षण आहे.

सॅक्लर घराणं हे जणू दातृत्वाचे दुसरे नाव आहे. त्यांनी अमेरिका आणि ब्रिटनमधीलच काय पण जगातल्या ज्या संस्थांना देणग्या दिल्या आहेत त्यांची नुसती जंत्रीसुद्धा करणे अशक्य आहे. त्यांत हार्व्हर्ड, येल, ऑक्सफर्ड, टफ्ट्स, ससेक्स, किंग्ज कॉलेज यांसारख्या जगप्रसिद्ध युनिव्हर्सिटी आहेत. गुगनहाइम, लुव्र्ह, वॉशिंग्टनमधील स्मिथसोनियन यांसारखी म्युझियम आहेत. सर्पन्टीन, टेट आणि डलविच पिक्चर गॅलरीसारख्या गॅलरीज, लंडनमधले नॅशनल थिएटर, रॉयल ऑपेरा हाऊस, शेक्सपिअर ग्लोब, अशा नाट्य-नृत्याचे प्रयोग करणाऱ्या संस्था आहेत. इस्राएलमधल्या तेल अव्हीव्ह युनिव्हर्सिटीत तर पावलोपावली सॅक्लर घराण्याचे नाव दिसेल. त्यांनी दिलेल्या देणग्यांचे मूल्य काढणे कठीण आहे. पण ते कमीत कमी एक अब्ज डॉलर्सच्या घरात जाईल असा अंदाज आहे.

सॅक्लर घराण्याचा मूळ पुरुष इसाक हा मूळचा पोलंडचा रहिवासी. तेथील ज्यू लोकांवरील अत्याचार सहनशक्तीच्या बाहेर गेल्यामुळे १९१० साली तो आपल्या पत्नीला- सोफीला - घेऊन अमेरिकेत आला. न्यूयॉर्कमध्ये त्याने किराणा मालाचे दुकान काढले. तिथे सोफीला तीन मुले झाली. आर्थर, मॉर्टमोर आणि रेमंड. तिघेही प्रचंड हुशार, महत्त्वाकांक्षी आणि मेहनती. ते गणित आणि सायन्स या विषयांत तर प्रवीण होतेच, पण त्यांना कला-शास्त्र-विनोद यांच्यातही रस होता. त्या तिघांनाही डॉक्टर व्हायचे होते. त्याप्रमाणे मोठा आर्थर झालाच. (आर्थरचा गुरू फ्रॉइडचा हा सर्वांत लाडका शिष्य होता, असं म्हणतात.) नंतरच्या दोघांना मात्र अमेरिकेतील युनिव्हर्सिटीत प्रवेश मिळेना. हिटलरच्या उदयानंतर अमेरिकेतही ज्यूविरोधी वातावरण तयार झाले होते. तेव्हा त्यांनी स्कॉटलंडमध्ये वैद्यकीय पदवी मिळवली. तिघांनीही मनोरुग्णशास्त्र (Psychiatry) यात विशेषज्ञता मिळवली आणि त्यांचे जवळजवळ दीडशे संशोधन निबंध काही वर्षांतच वैद्यकीय नियतकालिकांत प्रसिद्ध झाले.

१९५०च्या सुमारास मनोरुग्णांना बरे करायचे दोन मुख्य मार्ग होते. मनोविश्लेषण (Psychoanalysis) आणि मेंदूला विजेचा धक्का. सॅक्लरबंधूंचा मुख्य सिद्धांत असा होता की, मानसिक रोगांना मेंदूतील रसायने जबाबदार असतात. म्हणून त्यांनी आपलं लक्ष केंद्रित केलं ते वेदनानाशक रसायनांवर (Painkillers and anesthetics). पण त्यांना नुसतंच संशोधन नको होतं तर आपली विद्या व्यापाराकरता वापरायची होती. धाकट्या दोघांनी Purdue and Fredrick नावाची एक छोटी कंपनी विकत घेऊन औषधे बनवायला सुरुवात केली. मोठ्याने त्यात भागीदारी ठेवून आपला मार्केटिंगचा स्वतंत्र व्यवसाय चालू केला. फाइझर (Pfizer) कंपनीचे एक सिग्ममायसिन नावाचे प्रतिजैविक (Antibiotic) त्याने यशस्वी करून दाखवले.

आर्थरने प्रचंड पैसा कमावला तो रोश (Roche) कंपनीच्या लिब्रीअम आणि व्हॅलिअम (Valium) या tranquaillizersच्या जाहिरातींतून. ही औषधे इतकी 'यशस्वी' झाली की अमेरिकेच्या सेनेटला त्या यशाची दखल घेऊन त्यावर सुनावणी घ्यायला

लागली! त्यानंतर ऑर्थरने 'मेडिकल ट्रिब्युन' या नावाचे वैद्यकीय नियतकालिक काढले. इथूनच पुढे माहिती आणि जाहिरात यांच्यात गल्लत व्हायला सुरुवात झाली. आतापर्यंत वापरलेली सर्व भलीबुरी तंत्रे सॅक्लरबंधूंनी आपल्या औषधाच्या धंद्यात वापरली. उदाहरणार्थ, मार्केटिंगच्या व्यवसायात असताना त्यांनी एफ.डी.ए. (फूड अॅण्ड ड्रग अॅडमिनिस्ट्रेशन)च्या अॅन्टीबायोटिक डिव्हिजनचा प्रमुख हेन्री वेल्च याला तीन लाख डॉलर्सची लाच दिली होती. (त्यात पुढे वेल्च सापडला आणि त्याची नोकरी गेली. पण फार दिवस नाही! सॅक्लरबंधूंनी त्याला आपल्या कंपनीत सामावून घेतले.)

व्हॅलिअमच्या यशानंतर सॅक्लर बंधूंनी पुढची पायरी घ्यायची ठरवले. अफूसदृष्य (opioids) पदार्थ असलेली औषधे. अफू नुसती नशाच आणत नाही तर तिच्यात औषधी गुणधर्म आहेत. वैद्यकीयशास्त्राचा पिता ज्याला म्हटलं जातं त्या हिपोक्रॅटिसने ग्रीसमध्ये हे निदर्शनास आणून दिले होते. मुख्य म्हणजे अफू ही वेदनाशामक आहे. पण अफू असंख्य शतकं औषध म्हणून न वापरता केवळ नशेसाठी वापरली गेली. अॅक्लेझांडरने अफू इराण आणि हिंदुस्थानात आणली. इराणहून ती 'सिल्क रूट'ने चीनमध्ये गेली आणि चिनी लोकांनी एकोणिसाव्या शतकात ती अमेरिकेत आणली. अर्थात सर्व ठिकाणी तिचं सेवन बेकायदेशीरच होतं आणि अमेरिकेत तिच्यावर लगेच बंदी आली.

एकोणिसाव्या शतकातच अफूतले कोडीन, मॉर्फीन, थिबेन हे घटक वेगळे केले गेले. मॉर्फीन पेनकिलर म्हणून वापरले गेले. जर्मन शास्त्रज्ञांनी मॉर्फीनपासून प्रयोगशाळेत दहापट प्रबळ असे हेरॉईन तयार केले व थिबेनपासून ऑक्सिकोडोन. (यांच्याही शंभरपट प्रबळ असे फेंटनिल नुसत्या रसायनांपासून तयार केले गेले.) हेरॉईनने व्हिएतनाम युद्धाच्या काळात (१९६५-१९७५) अमेरिकेत-विशेषत: सैनिकांत आणि हिप्पी समुदायात-गदारोळ माजवला. १९८० मध्ये अध्यक्ष रेगन यांनी अफूविरुद्ध युद्ध पुकारले आणि औषध म्हणूनसुद्धा अफूसदृष्य रसायनांचा (Opioids) उपयोग करायला डॉक्टर कचरू लागले.

या सर्व प्रकरणात सॅक्लरबंधूंना व्यापाराची एक नामी संधी दिसली. औषधाला रक्तप्रवाहात हळूहळू सोडण्याची (ER : Extended release) कल्पना नुकतीच अंमलात येत होती. मॉर्फीनवर या पद्धतीचा उपयोग करायचा असे सॅक्लरबंधूंनी ठरवले आणि MS-Contin हे औषध बाजारात आणले. ते यशस्वी होण्यासाठी त्यांनी रुग्णांऐवजी डॉक्टरांना लक्ष्य करायचे ठरवले. त्यांना अनेक प्रलोभने दाखवण्यात आली. त्यांनी बेसुमार प्रिस्क्रिप्शन लिहून दिल्या. (त्याबद्दल त्यांना उपहासाने 'गोळ्यांच्या गिरण्या' ऊर्फ Pill Mills ही उपाधी मिळाली.)

थोड्याच वर्षांत MS-Contin ने हलकल्लोळ माजवला. १९९० च्या सुमारास या औषधाचे पेटंट संपत आले आणि सॅक्लर यांनी मोठी उडी मारायचं ठरवलं. (आता त्यांची पुढची पिढी मैदानात उतरली होती.) मॉर्फीनच्या काहीपट भारी असे ऑक्सिकोडोन निर्भेळ स्वरूपात पण ER पद्धतीचे औषध Oxy-Contin (Contin=Continuous) या नावाने बाजारात आणायची योजना आखली. औषध रक्तप्रवाहात हळूहळू जात असल्याने बिनधास्त मोठे डोस द्यायला काय हरकत आहे असा विचार पुढे केला. त्याचप्रमाणे कॅन्सरसारख्या रोगांपासून होणाऱ्या जबरी वेदना शमवण्याकरताच हे औषध का वापरा, बारीकसारीक वेदनांकरता का नको? हा विचार पुढे आला.

हे सर्व साधायचे म्हणजे कायद्याला जमेल तेवढे वाकवणे. या योजनेमध्ये डॉक्टरांनी रुग्णांना आणि एफ.डी.ए.सारख्या नियामक संस्थांना (Regulatory bodies) दोन गोष्टी पटवून द्यायच्या. (१) कॅन्सर आणि तत्सम रोगांपासून होणाऱ्या प्रचंड वेदना टाळायच्या असतील तर प्रबळ opioids ना पर्याय नाही. (२) Oxy-Contin पासून व्यसनाची शक्यता फारच कमी आहे. मेमोरिअल स्लोन केटरिंग कॅन्सर सेंटर या प्रसिद्ध संस्थेच्या डॉ. पोर्टनॉय यांनी जाहीर केलं. ''Opioid चे व्यसन लागते हे त्या औषधावर रचलेलं कुंभाड आहे.'' अमेरिकन अॅकेडमी ऑफ पेन मेडिसीनने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात Opioid चे कौतुक केले. हे पत्रक डॉ. डेव्हिड हॅडॉक्सने लिहिले होते. (पुढे कळले की डॉ. हॅडॉक्स सॅक्लर बंधूंकडून लाच खात होते.)

Oxy-Contin मधून ऑक्सिकोडोन वेगळं करणं कठीण नाही हे ''रस्त्यावरच्या चाणाक्ष शास्त्रज्ञांच्या'' लक्षात आले. सॅक्लरने भुसभुशीत केलेल्या जमिनीवर बिया पेरायला जेनेरिक कंपन्या मोठ्या प्रमाणात घुसल्या. गोळ्यांचा पूर वाहू लागला. शंभर अब्ज गोळ्या खपल्या. एवढं झाल्यावर प्रसारमाध्यमांना जाग आली. महत्त्वाकांक्षी राजकारण्यांना पंख फुटले. वकील पेटले. पत्रकारांना वाचा फुटली आणि २००७ मध्ये कोर्टात केसेस दाखल झाल्या. सॅक्लर कंपनीचा नवीन अवतार असलेल्या Purdue Pharma ने दिलगिरी व्यक्त केली, २७ कोटी डॉलर्सचा दंड भरला आणि नवीन फॉर्म्युलेशन तयार केले. (नाहीतर पेटंट संपतच आले होते.) २००७ मधील कंपनीचे १ अब्ज डॉलर्सचे वार्षिक उत्पन्न २०१६ मध्ये दहा अब्जच्या घरात नेले.

अब्जाधीशांच्या यादीत सॅक्लर कुटुंबाने मेलन, रॉकफेलर यांसारख्या मातब्बर लोकांना मागे सारले. त्याचबरोबर व्यसनी लोकांची संख्या एकट्या अमेरिकेत कोटींच्या घरात पोचली. Opioid च्या अतिसेवनाने मरणाऱ्या लोकांची (अधिकृत) संख्या दिवसाला दोनशेच्या घरात पोचली. नुसत्या Oxy-Contin च्या अतिसेवनाने आतापर्यंत मेलेल्यांची संख्या पाच लाखांच्या आसपास आहे. सात-आठ वर्षांच्या कालावधीनंतर Purdue Pharma वर पुन्हा केसेस चालू झाल्या आहेत.

अशी भ्रष्टाचाराची गंगा वाहत असता आपले देशबांधव कसे मागे राहतील? जॉन 'अमृतसरवाला' कपूर या सज्जनने इन्सिस थेरप्युटिक्स ही कंपनी काढून सब्सिस हा जिभेखाली मारायचा Opioid spray बाजारात आणला. (स्प्रेमध्ये फेंटनिल वापरलं आहे.) ''हलाखीच्या गरिबीतून श्रीमंतीच्या शिखरावर'', ''दानशूर धर्मात्मा'' अशा स्तुतीसुमनांचा मानकरी असलेला कपूर अमेरिकेतील सर्वांत 'श्रीमंत भारतीय' या पदवीच्या आसपास आला होता. (तरीही त्याची एक अब्ज डॉलर्सची वैयक्तिक संपत्ती सॅक्लर

कुटुंबाच्या १७ अब्जपुढे फिकीच पडत होती!) कपूर याची माल खपवायची तंत्रं काहीशी सॅक्लरसारखी होती तर काहीशी वेगळी. दोघांतलं साम्य म्हणजे डॉक्टरमंडळींना लाच. कपूरने ती एकाच वर्षी म्हणजे २०१६ साली-वीस लाख डॉलर्सच्या आसपास दिली. त्यात शेकड्यांनी डॉक्टर होते.

सॅक्लर यांच्या वैद्यकीय प्रतिनिधींचा भर आलेख, चार्ट्स (बरेचसे खोटे), पॉवर पॉइंट यांसारख्या आधुनिक साधनांवर असे, तर कपूर यांच्या वैद्यकीय प्रतिनिधींचा भर भरपूर मेकअप, लांडे कपडे यांसारख्या जुन्या पण प्रभावी साधनांवर असे. कपूर याच्या अमेरिकेतील दक्षिण विभागाच्या डायरेक्टरला औषधाच्या ज्ञानाचा औषधाइतकाही गंधही नव्हता. कारण ती मूळची स्टेजवर विवस्त्र होऊन नाचणारी नर्तिका होती. तिने अब्जावधी डॉलर्सची विक्री केली. शेवटी नशिबाचे चक्र फिरले आणि काही महिन्यांपूर्वी कपूरला गुन्हेगारी प्रवृत्तीने संपत्ती गोळा करण्याबद्दल तुरुंगवासाची शिक्षा झाली.

आज अमेरिकेत opioids च्या आधीन असलेल्यांची संख्या तीन कोटी आहे आणि ती वाढतच आहे. गरीब कुटुंबांत या औषधाच्या अतिसेवनाची साथ मोठ्या प्रमाणात आहे. वेस्ट व्हर्जिनियासारख्या गरीब राज्यात या गोळ्यांचा वार्षिक खप माणशी शंभरपर्यंत आहे, तर तेथील काही जिल्ह्यांत दोनशेपर्यंत! प्रचंड कंबर दुखते किंवा जीवघेणं पोटात दुखतं पण डॉक्टर परवडत नाही, ऑपरेशन परवडत नाही. अशा वेळी प्रबळ पेनकिलर हाच अखेरचा आधार असतो.


या परिस्थितीची जबाबदारी एकमेकांवर ढकलणं चालू आहे. गुंगी आणणाऱ्या गोळ्या किंवा वेदनाशमक औषधांशिवाय Pain management कसं करणार असं डॉक्टर विचारतात. त्यांच्या मते ही औषधं मानवजातीला दैवी देणगीच आहेत. औषधी कंपन्या फार आक्रमकरीत्या आपला माल खपवतात असा एक आरोप आहे. सॅक्लरचं तरी म्हणणं आहे की आम्ही एफ.डी.ए.ने आखून दिलेल्या कायद्याच्या चौकटीत राहून व्यापार करतो. त्यांनी केलेल्या लहान मुलांसाठी योग्य अशा ऑक्सिकाँटीनला २०१५ साली एफ. डी.ए.ने परवानगी दिली, हा आपल्या चांगल्या वर्तनाचा पुरावा आहे, अशी पुस्ती ते जोडतात. भारतात आणि इतर विकसनशील देशांतून येणारी औषधे कमी प्रतीची असतात. त्यात भेसळ असते, असं सॅक्लर म्हणतात. सॅक्लर पुढे असंही म्हणतात, ''माझा मुलगा किंवा मुलगी औषधांच्या व्यसनाने मेला किंवा मेली'' असे सांगून गळा काढणारे राजकारणी, पत्रकार आया, हॉलिवुडची मंडळी बघितली की चीड येते. तुमच्या बेजबाबदारीबद्दल दुसऱ्यांना दोष कसला देता? या औषधाने व्यसन लागण्याची शक्यता आहे असे मोठ्या अक्षरात लेबलवर लिहावे अशी एक सूचना आहे. पण शेवटी जे लोक असल्या द्रव्यांचं सेवन नशेसाठीच करतात त्यांना असल्या धोक्याच्या सूचनेने काय फरक पडणार आहे?

गंमत ही की एवढं रामायण झालं तरी सॅक्लर यांच्याकडून ज्यांनी देणग्या घेतल्या त्यातले बहुतेक देणग्या परत करायला तयार नाहीत. एवढेच काय पण सॅक्लर यांच्याकडून त्यांनी दिल्या तर नवीन देणग्या घेणार का या प्रश्नाला बहुतेकांचे उत्तर 'हो' असे किंवा संदिग्ध आहे. याचा अर्थ हे सर्व वादळ तात्पुरतं असण्याची शक्यता आहे. सॅक्लर कुटुंबाचा होरा तोच आहे. त्यांनी अशी अनेक वादळे शमवली आहेत. त्यांच्या राशीला लागलेल्या समंधांना उतरवणे हा त्यांच्या डाव्या हातचा मळ आहे. त्यानंतर त्यांची जी प्रगती एक्सप्रेस चालू होईल ती पुढचा अपघात होईपर्यंत!

**– मोहन द्रविड**
भ्रमणध्वनी : ९८२०५६३१३०
mohan.drawid@gmail.com

ग्रंथाली

# युगांतराची कविता




**डॉ. किशोर सानप**

**मूल्य ६०० रु.**
**सवलतीत ३५० रु.**


डॉ. किशोर सानप यांनी मात्र सत्तरी, ऐंशी, नव्वदीच्या व त्या पुढीलही कवी आणि कविता ही आपला समीक्षाविषय केली. मराठी कवितेवर आपली स्वतंत्र मुद्रा या काळात उमटवणाऱ्या कवींपासून तो असे कर्तृत्व पुढे सिद्ध करण्याची शक्यता असणाऱ्या कवींपर्यंतचे हे समीक्षालेखन ही या काळाचीही सांस्कृतिक समीक्षा झाली आहे. अकारणच ग्रांथिक, पुस्तकी न होता, विद्वत्ताप्रचुरतेचा आव न आणता, 'कोटेषणा' टाळून थेट कवितेला भिडणारी संवेदनशील अशी दुर्मीळ होत चाललेली समन्यायी समीक्षा डॉ. किशोर सानप यांनी परिश्रमपूर्वक कशी जपली आहे याची साक्ष हा ग्रंथ देतो...

# डॅलस येथे बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या १९व्या अधिवेशनात उपस्थित राहिलेल्या 'ग्रंथाली' टीममधील कार्यकर्त्यांचे मनोगत




प्रकाश अंबुरे, रोहित भानुशाली, शिल्पा अग्निहोत्री, अरुण जोशी, अजित आचार्य, मोहन खैरे, रुचिका खैरे, संध्या खैरे, भारती वालावलकर, नीलिमा आढाव, आशा इंगळे व भगवान इंगळे







# पहिल्या अमेरिकेवारींचं कवित्व

अरुण जोशी

उत्तम आणि उन्नत अशी भव्यतेची आस असलेली ही भूमी. उत्तम निर्मिती आणि त्याचं उत्तम मार्केटिंग हा इथला स्वभाव. तुम्ही इंटरनेटवर नाही तर तुम्ही अस्तित्वात नाही हे जसं त्यांनी रुजवलं; तसंच तुम्ही अमेरिका पाहिली नाही तर काही पाहिलं नाही असं जगाच्या गळी उतरवण्याची व्यापारी शक्ती त्यांच्यात भिनलेली. अर्थात ती पाहिली की त्याची भव्यता, त्याची निगराणी, उत्तम सर्व्हिस, तिथली स्वच्छता मनाला भिडते हेही खरंच. रस्त्यांचं जाळं, त्यावरची शिस्तबद्ध वाहतूक आणि दुतर्फा हिरवाई हे आम्ही पाहिलेल्या ठिकाणी सर्वत्र दिसत होतं.

एप्रिल महिना होता. मी ग्रंथालीत बसलो होतो. जुलैमध्ये होणाऱ्या बीएमएम कन्व्हेन्शनबद्दल चर्चा चालू होती. तेव्हाच अमेरिकावारीचा मनात विचार सुरू झाला. सुदेशनं नुसती कल्पना मांडली नाही, तर पुढाकार घेऊन तसा संपर्क सुरू केला. मग व्हिसाची तयारी, पुढची आखणी याबद्दल बैठका सुरू झाल्या. देशाटन, पंडितमैत्री आणि सभेत विपुल संचार केलेल्या सुदेशमध्ये आलेलं चातुर्य त्याच्या बोलण्यात दिसत होतं. मग प्रत्येक बैठकीत तो साऱ्यांचं प्रबोधन करत होता आणि आम्ही ऐकत होतो. अखेर बायोमेट्रिक होऊन व्हिसाची तारीख मिळाली आणि व्हिसा पदरात पडला ती तारीख होती २१ जून आणि आम्ही २ जुलैला निघायचे असं आखलं होतं. आता दहा दिवसांत तिकीट काढण्यापासून सारा दौरा आखण्याचे सोपस्कार करायचे होते. सारी आखणी सुदेशनं इत्थंभूत केली होती. अकरा जणांची आमची टीम पहिल्या अमेरिकावारीला सज्ज झाली.

परंतु २ जुलै रोजी नाही, तर ९ जुलै रोजी आम्ही अमेरिकेला प्रयाण केले. पंचविशी ते पासष्टी अशा वयोगटांतले आम्ही होतो. मनात थोडे कुतूहल, थोडा संभ्रम अशी अवस्था होती. संमिश्र भावनेनं आम्ही नेवार्क विमानतळावर उतरलो तेव्हा पहाटेचे साडेसहा वाजले होते. तिथून दुपारी ३.३०च्या विमानानं डॅलसला जायचं होतं. मध्ये बराच अवधी होता. सारं काही भव्य, अकल्पित असेल असं वाटत असताना विमानतळाबाहेरच्या रस्त्यावर पडलेली सिगारेटची थोटकं पाहून जरा घरच्यासारखे वातावरण दिसलं! दोन दिवस मुंबईत पावसानं धरलेली पाठ इथेही सोडली नव्हती. डॅलसला विमान सहापर्यंत पोचायला हवं होतं. मात्र वादळ आणि पाऊस यामुळे ते सॅन अँटिनियो विमानतळावर उतरवलं गेलं. रात्री अकरापर्यंत - पाच तास - विमानात बसून काढले व शेवटी रात्री बारा वाजता डॅलसला पोचलो. मिळालेला हा निवांत वेळ आम्हा मंडळींमधला परकेपणा घालवायला पुरेसा ठरला. मग पुढचे पंधरा दिवस हा दौरा अविस्मरणीय होत गेला.

डॅलसला तीन दिवस होतो. भव्य कन्व्हेंशन सेंटरमध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळाचं एकोणिसावं द्विवार्षिक अधिवेशन अनुभवलं. उत्साहानं भारलेलं उत्सवी वातावरण त्यात होतं. वेगवेगळ्या सभागृहांत एकावेळी वेगवेगळे कार्यक्रम होत होते. त्याचा वृत्तांत गेल्या अंकात आलाच आहे. टेक्सासमधलं हे गाव, फारशी गजबज नसलेलं, पायी फिरलो. कन्व्हेंशन सेंटरपासून वीसेक मिनिटांच्या अंतरावर जॉन केनेडी मेमोरियल आहे. केनेडींची हत्या झाली ते ठिकाणही पाहिलं. खरंतर तिथला हा सुट्टीचा काळ होता, तरी पुढे न्यू यॉर्कमध्ये आणि ओरलँडोतील केनेडी स्पेस सेंटर, युनिव्हर्सल स्टुडिओ, डिस्नी वर्ल्डमध्ये जशी अलोट गर्दी पाहिली त्यामानानं डॅलस शांत होतं. आमचं ठिकठिकाणी स्वाभाविक फोटो घेणं सुरू होतं. स्थानिक त्याकडे कौतुकानं पाहत होते. हसून, थांबून आमचा नवखेपणा न्याहाळत होते. त्यांच्या वागण्यातली सौहार्दता एकूणच दौऱ्यात सर्वत्र दिसली. पहिल्याच दिवशी पाऊस-वादळानं आमचं वेळापत्रक बिघडलं तेव्हापासून परतीच्या दिवसापर्यंत वीसेक तरी वादळ-पावसाचे अलर्ट मेसेज आमच्या मोबाइलवर आले. खरं तर डॅलसला पोचलो तेव्हा पाऊस पडल्याचा मागमूसही नव्हता. कुठे पाण्याची ओलही दिसली नाही नि प्रश्न पडला, मग विमानाला विलंब का केला असेल? तिथे हवामानखात्यानं दिलेले अंदाज अचूक असतात हा त्यांचा विश्वास आणि ते गांभीर्यानं घेण्याची प्रशासनाची वृत्ती महत्त्वाची वाटली. आपल्याकडे या दोन्हीची कमतरता दुर्दैवी परिणामांना कारणीभूत ठरते आहे.

डॅलसहून मोहन, संध्या आणि रुचिका हे खैरे कुटुंबीय, प्रकाश अंबुरे, आशा व भगवान इंगळे हे दांपत्य, डॉ. नीलिम आढाव, भारती वालावलकर, शिल्पा अग्निहोत्री व रोहित भानुशलीसह आमची अकरा जणांची टीम ओरलँडोला पोचली. एक छान व्हिला इथूनच नोंदवला होता. मागे तळं असलेल्या व्हिलांच्या रांगेतला तो एक होता. तिथे चार दिवस मुक्काम करत केनेडी स्पेस सेंटर, युनिव्हर्सल स्टुडिओ आणि डिस्नी लँड पाहिलं. डिस्नी लँडचं तिकीट खरं तर १२० डॉलर होतं. मात्र व्हिलाच्या मालकिणीनं आम्हाला ९० डॉलरमध्ये आत सोडलं! तिच्याकडे गेस्ट पास होते. तिच्या दोन मैत्रिणी सोबत आल्या. त्यांच्याबरोबर दोन गटांत आम्ही त्या

पासवर प्रवेश मिळवला. प्रवेश करताच त्या दोघींनी आमच्या हाती दिलेले ते पास परत घेतले आणि त्या निघून गेल्या! आम्हाला कळेना, की पुढे कुठे आम्हाला तिकिटाची विचारणा झाली तर दाखवायचं काय? रोहितने फोन करून विचारलं, तेव्हा ती म्हणाली आता कुठेही तुम्हाला अडचण येणार नाही. तुम्हाला कुठल्याही राइड करताना पास वा तिकीट दाखवावं लागणार नाही, निर्धास्त राहा! हा अनुभव अजब होता. आम्ही डिस्नी पार्क पूर्ण एन्जॉय केलं. तिथे असंही घडतं हे अकल्पित होतं.

पुढचा आमचा दौरा 'टेक टूर'सह ईस्ट कोस्ट पाहण्याचा होता. ही पाच दिवसांची टूर होती. त्यात नायगाराचा नैसर्गिक चमत्कार पाहून मन हरखलं. पाच हजार एकरांवर पसरलेल्या हार्वर्ड युनिव्हर्सिटीचा इतिहास जाणून घेतला, बोस्टन हार्बरला क्रूझ केली तेव्हा बोस्टन टी पार्टी घडली ते ठिकाण व बोट पाहता येईल असं वाटलं होतं, मात्र आम्हाला क्रूझमधून किनाऱ्यावरील इमारती पाहण्यापलीकडे काही साधलं नाही. या टूरमध्ये फार काही हाती लागलं नाही.

टेक टूरची सुरुवात विमानाच्या न्यू यॉर्कहून होणार होती, मात्र विलंबामुळे पहिल्या दिवशी हुकलेलं न्यू यॉर्क दौऱ्याच्या अखेरच्या दिवशी रात्री फिरलो. चाकरमानी व स्थानिकांना खाडी पार करण्यासाठी असलेल्या विनामूल्य बोटसेवेतून रात्री ११ वाजता घेतलेलं स्टॅच्यू ऑफ लिबर्टीचे दर्शन छानच होतं.

अमेरिकेबद्दलचं वर्णन अनेकांकडून ऐकलेलं असतं. तिथली स्वच्छता, तिथली शिस्त, तिथलं वातावरण आणि बरेच काही. आम्हालाही आल्यावर विचारलं, कशी वाटली अमेरिका? तिथेच राहावंसं वाटतं का? तर उत्तर होतं, गड्या, आपुला गाव बरा! रोमला गेलात की रोमन व्हा असं म्हणतात, तसं अमेरिकेला गेलो तेव्हा 'अमेरिकन' होऊन आम्ही परतलो तेव्हा पुन्हा 'भारतीय' झालो!


भ्रमणध्वनी : ८१०८२४५७९७

scorpion.arun09@gmail.com





**रोहित भानुशाली**


# बंधमुक्त देश

१ जुलैला 'ग्रंथाली' टीम युएसएसाठी निघणार होती. निमित्त होतं 'बीएमएम कन्व्हेन्शन'. आम्हाला व्हिसा डेट मिळाली होती १९ जून. तो व्हिसा मिळाल्यानंतर प्रत्यक्ष तयारीसाठी फक्त दहा दिवस मिळत होते पण नशिबाने सुदेश हिंगलासपूरकर नावाचा जादूगार आमच्यामध्ये होता. त्याने जादुची कांडी फिरवली आणि आम्ही अमेरिकेला उडालो.

आपल्या वयाचं कोणीच नाही आणि सगळेच नवखे अशा लोकांबरोबर आपल्याला अमेरिका बघायची आहे हे दडपण होतं. पण एका दिवसात हे नवखेपण गळून गेलं आणि माझ्या आईवडिलांनी जी माझी काळजी घेतली असती तेवढीच माझी काळजी सगळ्यांनी घेतली. मी शाकाहारी होतो पण कुठेही उपाशी राहण्याची वेळ आली नाही. या ग्रुपमध्ये काही तरुणी पण भेटल्या. सई आणि रुचिका ज्यांचे; वेगवेगळ्या अँगलमधले, वेगवेगळ्या लोकेनशवर फोटो काढण्याचे काम मला सतत करावे लागत होते.

अमेरिकेत पहिले शहर पाहिले ते होते डॅलस! बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अत्यंत भव्य असं अधिवेशन इथे भरवलं होतं. तिथे मराठी भाषेतील विविध कार्यक्रम पाहून एरवी मातृभाषेपासून थोडा दूर गेलेलो मी माझ्या मातृभाषेशी मी अधिक जोडलो गेलो.

अमेरिकेला जायचे तेही इस्ट कोस्टला म्हणजे ऑरलँडोला जाणं क्रमप्राप्तच आहे. प्रचंड मोठी मायनगरी अमेरिकन्स लोकांनी बांधून ठेवली आहे. थेट हॅरी पॉटरच्या घरात जाण्यापासून, समुद्रातील माशांच्या जगात भटकण्यापासून, बालगोपाळांच्या बाहुल्यांच्या दुनियेत भटकण्याचा जादुई अनुभव इथे मिळतो आणि आपण स्तिमित होतो. वॉल्ट डिस्नी नावाच्या वेड्या माणसाच्या कल्पनेतून हे जग आकाराला आलं आणि आता त्याने अख्खा जगाला वेड लावलंय. नासा बघताना मात्र मी नतमस्तक झालो. प्रत्यक्ष चंद्रावर गेलेलं अपोलो ११ यान तसंच अटलांटिक यान सर्व समोर होते. आम्ही चक्क त्याला हात लावत होतो. अमेरिकेची ही अंतराळ भरारी थक्क करून जाते एवढे मात्र खरे!

त्यानंतर फिलाडेल्फिया, न्यू यॉर्क, वॉशिंग्टनसारखा भव्य शहरांचं दर्शन घेतलं. नायगराचा प्रपात बघितला. 'थर्ड वर्ल्ड'मध्ये राहणे आणि 'फर्स्ट वर्ल्ड'मध्ये राहणे यातील फरक जाणवला. या देशात कायमचं राहायला मिळावं म्हणून लोकं का धडपडतात हे समजलं. इथे कोणी कोणाच्या खाजगी गोष्टीत लक्ष घालत नाही.

तुम्ही काय खाता, काय पिता, कोणाबरोबर राहता याची उत्तरे सतत कोणालातरी द्यावी लागत नाही. खऱ्या अर्थाने मुक्त विचारांचा देश. मनापासून आवडला. पण भारतातील मायेचे पाश मात्र परत मातृभूमीकडे ओढत होते.


भ्रमणध्वनी : ७८३८७६४६९८

rohitbhanushali@hotmail.com



# अमेरिका

## एक अनुभव

शिल्पा अग्निहोत्री

'ग्रंथाली' पुस्तक प्रकाशनातील एक अग्रगण्य संस्था. गेली ४४ वर्षे दर्जेदार पुस्तके प्रकाशित करून या क्षेत्रातील आपला ठसा कायम ठेवत आलेली. 'ग्रंथाली'शी माझा परिचय माझ्या मैत्रिणींमुळे झाला आणि अनेक प्रकाशन कार्यक्रमानिमित्ताने तो वाढला. निरनिराळ्या विषयांवरील दर्जेदार पुस्तके आणि अनेक प्रकाशन समारंभात झालेल्या मान्यवरांच्या मुलाखती, अनुभव कथन, आणि इतरही कार्यक्रमांमुळे अनेकजणांना 'ग्रंथाली'ने समृद्ध केले. त्याबरोबरच आपले हे कार्य आपल्या देशापुरते मर्यादित न ठेवता सातासमुद्रापलीकडे नेऊन अमेरिकेतही आपला झेंडा रोवला. गेली १५ वर्षे अमेरिकेत होणाऱ्या बीएमएम कन्व्हेन्शनमध्ये सातत्याने सहभागी होऊन आपले कार्य थेट अटकेपार नेले. तेथे जाऊन पुस्तक विक्री करणे हे खरं तर उद्दिष्ट नव्हतेच. तर तेथील मराठी लोकांना या निमित्ताने विविध क्षेत्रातील पुस्तके उपलब्ध करून देणे हेच ग्रंथालीचे प्रमुख उद्दिष्ट. तेथे स्थायिक झालेल्या मराठी लोकांमध्ये वाचन संस्कृती जागवत ठेवणे आणि त्यांची मायभूमीशी आणि मराठीपणाशी असलेली नाळ घट्ट करणे हेच तर खरे प्रयोजन. मैत्रिणींमुळे ग्रंथालीशी झालेली ओळख तेथील पुस्तकप्रेमी लोकांमुळे आणि ग्रंथाली संस्कृतीमुळे वाढली-जपली. म्हणूनच बीएमएम अधिवेशनला जाण्याचे आणि ग्रंथालीशी संलग्न असणाऱ्या लोकांना तेथे जाण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे आपली संस्कृती तिथे रुजवण्याचे ग्रंथालीचे ध्येय. मी वाचक कट्टा निमित्ताने जोडले गेले आणि ग्रंथालीशी संलग्न राहिले. अमेरिकेचा बीएमएम अधिवेशनसाठीचा प्रस्ताव वाचनप्रेमी आणि कलाप्रेमी म्हणून मांडण्यापासून ते तडीस नेईपर्यंत ग्रंथाली परिवाराचे सर्वांनाच पाठबळ मिळाले. सकारात्मक ऊर्जा आणि प्रेरणा कायमच सगळ्यांना देऊन आणि पाठीशी खंबीरपणे उभे राहून कार्य सिद्धीस नेण्यात ग्रंथालीचा मोलाचा वाटा आहे.

खरं म्हणजे या सगळ्याची सुरुवात गेल्या वर्षी झाली. ते एक स्वप्नच होतं माझ्यासाठी. खूप वर्षांपासून जपलेलं.... लहानपणापासून. आणि आपली अनेक स्वप्नं जशी स्वप्नच राहतात तसंच ते राहायचं याची जणू मनाला समजूतच घातली होती. खूप वर्षानंतर आशेचा किरण दिसला पण प्रत्यक्षात घडणं तसं धूसरच होतं. हळूहळू एकेक पायरी चढणं सुरू झालं. तसं तर मी पहिल्यापासूनच मनाला जमिनीवर ठेवत होते. नाहीतर ते उंच उंच आकाशात भरारी घ्यायचं आणि नंतर एका फटकाऱ्यानिशी जमिनीवर यायचं. म्हणून पहिल्यापासूनच मनाला बजावत होते की US visa ही तशी tricky गोष्ट आहे, त्यातून कुटुंबाची अनुमती महत्त्वाचं आहे आणि घराचाही सेटअप लावून देणं महत्त्वाचा आहे. पण एकेक कामं हातासरशी बाजूला सरत गेली आणि तो दिवस उजाडला.

आनंद, उत्सुकता, काळजी, धास्ती, हुरहुर अशा सर्व भावनांचं मिश्रण झालं होतं मनात. प्रवासाचा पहिला टप्पा होता पुण्यातून मुंबईत येणे. मुसळधार कोसळण्याऱ्या पावसानेच प्रवासाची सुरुवात झाली. मनात आलं एकूणच पूर्ण महिन्याभराचा प्रवास खडतर असावा त्याचीच ही झलक आहे. गच्च पावसातून प्रवास करून मुबंईत पोहोचले. अमेरिकेचं विमान दुसऱ्या दिवशी असल्यामुळे तो दिवस निवांत जावा आणि पावसाने कृपा करावी असं साकडं घालत घालवला.

ज्या बीएमएम कन्व्हेन्शनमुळे ही सर्व आखणी झाली त्या शहरी डॅलसला येऊन पोचलो. या शहराला DFW म्हणजे Dallas Fort Worth असे नाव आहे. बीएमएम अधिवेशन सेंटर हे राहण्याच्या जागेपासून ७-८ मिनिटे चालतच होते. अपार्टमेंटपासून अधिवेशन सेंटरपर्यंत चालताना US च झालेलं ते पहिलं दर्शन. त्या ७-८ मिनिटात चालतानाही या देशाच्या भव्यतेची आणि सुंदरतेची कल्पना आली. गगनाला भिडणाऱ्या चिकटून चिकटून उभ्या असणाऱ्या आणि मुख्यत्वे काचेच्या तावदाने असणाऱ्या उंचच उंच इमारती क्षणात लक्ष वेधून घेतात. त्याचबरोबर पहिल्या प्रथम नजरेत भरते ती स्वच्छता, टापटीप आणि आखीव रेखीव रस्ते. त्यामुळे सिमेंट कॉंक्रीटचे जंगलही कलात्मक दिसत होते. तो सगळा लोभस परिसर न्याहाळतच आम्ही अधिवेशन सेंटरला पोहोचलो.

अधिवेशन सेंटरची भव्यता बघून अचंबित व्हायला झालं. डॅलसमधील हे अधिवेशन सेंटर हे सर्वात मोठं सेंटर आहे असं ऐकण्यात आलं. सुरुवातीलाच प्रवेशद्वारात सुंदर गणपतीची मूर्ती, मोठा नोंदणीकक्ष, खूप मोठा डायनिंग हॉल, त्या बाजूला विविध क्षेत्रातील लोकांचे स्टॉल, ध्वनी आणि प्रकाशयोजना आणि सर्व तांत्रिक बाबींनी सुसज्ज अशी भव्य ऑडिटोरियम्स. माझा आनंद गगनात मावेनासा झाला. माझ्या पुढील भरगच्च असणाऱ्या दिवसांची ती नांदीच होती.

युएसमध्ये असूनही सर्वदूर मराठी भाषाच ऐकायला येत होती. त्यामुळे क्षणभर आपण अमेरिकेत आहोत याचा विसरच पडायचा. समोरच्या काचेच्या तावदानातून उंचउंच इमारती पहिल्या की मग मनाची खात्री पटायची. नाहीतर खुद्द अमेरिकेत पूर्ण सेंटरभर मराठी भाषाच ऐकू येत राहायची. तो सगळा दिमाख पाहून अमेरिकेत सातासमुद्रापलीकडे जाऊन आपण आपला ठसा उमटवलाच आहे याची प्रत्यक्ष ग्वाही मिळाली. तिथे वावरणारा गोऱ्या लोकांचा स्टाफ पाहिल्यावर मजा आणि समाधान वाटले. जगावर राज्य करणाऱ्या अमेरिकेत आपण पाय रोखून उभे आहोतच हे पटले.

तीन दिवस नानाविध सांस्कृतिक कार्यक्रम निरनिराळ्या हॉलमध्ये सुरू होते. त्यामुळे 'देशील तू किती आणि मी घेऊ किती हाताने' त्यातलीच माझी गत झाली. त्यात देवकी पंडित यांचे शास्त्रीय गायन, सुबोध भावे यांचा रुबरु, ढोल ताशा स्पर्धा आणि मिरवणूक, वाद्यवृंद हे विशेष उल्लेखनीय.

अमेरिकेत स्थायिक झालेल्या मराठी माणसांची भारताशी, मराठीपणाशी आणि संस्कृतीशी असलेली नाळ मजबूत करण्यासाठी चाललेली धडपड आणि कष्ट या सांस्कृतिक उत्सवामुळे समजली.

अधिवेशनचा आनंद तसाच मनात साठवत आम्ही आमचे त्यापुढील डेस्टिनेशन ओरलँडोला रवाना झालो.

ओरलँडोला पोचल्यानंतरचे सगळे दिवस जोरदार धडाक्यात सुरू झाले. सकाळ झाली की आवरून बाहेर पडायचे. तेथील पर्यटन स्थळे बघण्याची आखणी आमच्यातल्याच तडफदार तरुणांनी केलीच होती. दिवसभर भटकंती सुरू राहायची. दिवसाचा उजेड रात्री ९ वाजेपर्यंत टिकत असल्याने खूप उशिरापर्यंत भटकून रात्री येणे आणि झोपणे अशीच साधारण पुढच्या आठ एक दिवसाची दिनचर्या होती. एक दिवस एक शहर या रेटाने आम्ही न्यूयॉर्क, फिलाडेल्फिया, वॉशिंग्टन डीसी, बोस्टन ही शहरं पालथी घातली. या सर्व प्रवासातील ठळकपणे लक्षात राहण्याऱ्या गोष्टी म्हणजे भरधाव धावणाऱ्या चकचकीत गाड्या, गुळगुळीत रस्ते, शिस्तप्रिय ट्रॅफिक, चित्रात असल्यासारखी सुबक सुंदर घरे, त्याभोवतीच्या सुंदर बाग, आखीव रेखीव शहराची मांडणी आणि प्रदूषणमुक्त हवा. तेथील आत्ताचा उन्हाळा ऋतू असल्याने सर्वत्र फुलांची उधळण होती आणि पूर्ण परिसर रंगीबेरंगी फुलांनी नटला होता. पूर्ण प्रवासभर किती गोष्टी बघू आणि किती डोळ्यांत साठवू अशीच प्रत्येकाचीच गत होती.

आणि शेवटी 'तो' दिसला.....

आतापर्यंत कित्येक जणांनी काढलेले 'त्याचे' फोटो, व्हिडिओ बघून झालेले. पुन्हा पुन्हा बघावासा वाटला तेव्हा तेव्हा इंटरनेटवरून डोळे भरून 'त्याचे' दर्शन घेतले. मधल्या काही वर्षात तर 'त्याला' बघण्याची दूर दूर आशा दिसत नव्हती. मनातून विचार पुसूनच टाकावा का असं ठरवत असतानाच अमेरिकेची वारी करायची संधी मिळाली. अमेरिका बघायचे स्वप्न उराशी बाळगून होते म्हणजे खरं तर 'त्याला' बघण्याचे स्वप्न होते ते. 'त्याला' भेटण्याची अभिलाषा इतकी प्रखर की ही माझी अंतिम इच्छा आहे हे मी कित्येकदा निकटवर्तींना बोलूनही दाखवले.

काही वर्षांपूर्वी एका पुस्तकात वाचले होते. उत्तर भारतात एक तळे आहे. वर्षातील काही विशिष्ट दिवसांमध्ये तेथे जाण्यास बंदी असते. कारण त्या दिवसांमध्ये त्याचे दृश्य इतके विहंगम असते की बरेचजण त्यात उडी घेतात. त्याचं कारण असं की मनात येणारे विचार इतके उत्कट असतात की आपण निसर्गात विलीन व्हावे आणि ह्या पलीकडे दुसरे काहीही नाही अशी भावना मनात निर्माण व्हावी. त्याबरोबर पुस्तकात असंही म्हटलं होतं की 'त्याला' बघायला जाण्यापूर्वी एक छोटी फिल्म दाखवतात. ज्यात असं म्हटलंय की जरी तुम्हांला स्वतःला त्याच्यामध्ये झोकून देण्याची उत्कट इच्छा झाली तरी तुम्ही तसे करू नये. पण 'त्याला' अनुभवून अशी इच्छा होणं हेच मुळी त्याच्या सौंदर्याचे आणि दैवी असण्याचे सिद्ध करते. त्याच्या पलीकडे दुसरे काहीही नाही किंवा त्याच्याशिवाय दुसरे जादुई असे काही नाही. अशी भावना निर्माण होऊन, त्यात विलीन होण्याची उत्कट इच्छा होणं हेच त्याच्या सौंदर्याची आणि भव्यतेची ग्वाही देतं.

असा हा नायगरा धबधबा.... काय सांगावे त्याच्याबद्दल! पहिल्यांदा त्याचे घेतलेलं दर्शन केवळ अवर्णनीय! डोळे दिपून जावेत, काळजाचा ठोका चुकावा, श्वास थांबावा जेव्हा तो दैवी प्रपात कड्यावरून कोसळतो आणि आपण नतमस्तक व्हावे. त्याच्या धुवाधार प्रपाताखाली चिंब व्हावे अशी सगळ्यांचीच वेडी इच्छा! त्यामुळेच तर त्याच्या आव्हानाला स्वीकारून त्याच्याबरोबर साहस करत त्यात विलीन व्हावे असे अनेकांना वाटले पूर्वी.

असा नायगराप्रेमी लोकांचा मानस. त्याचे आव्हान देणारे रौद्र आणि त्याचवेळी अतिसुंदर दिसणे सगळ्यांनाच भुरळ घालणारं आहे. त्यामुळेच त्याला सर्व बाजूंनी बंदिस्त करून गॅलरीमधून बघण्याची योजना केली असावी. तिथल्या बोट राईडने आपण त्याला अगदी जवळून अनुभवू शकतो. तिथे बांधलेल्या सुरक्षित अशा पायऱ्या-कठडे आपल्याला त्याच्या अगदी जवळ नेतात आणि अगदी सुरक्षितपणे चिंब करतात. बऱ्याच वर्षांपूर्वी शाळा-कॉलेजातून असताना आसपासच्या ज्या ज्या म्हणून धबधब्यांना भेटी दिल्या त्यातूनच नायगरा पाहायची इच्छा प्रखर झाली. त्यात भिजतानाचा अनुभव वेगळा होता. आधी खूप जंगलतोड, काट्याकुट्यातून चालत जाऊन तो धबधबा शोधायचा. थोडं जवळ गेल्यानंतर त्याच्या कोसळणाऱ्या आवाजानेच अंग शहारून जायचं आणि मातीत, चिखलात,पाण्यातून जात जात खूप उत्कंठा वाढवूनच तो एकदाचं दर्शन द्यायचा.

अशा सर्व आणि अनेक साहसी मोहिमा नायगरावर पूर्वी लोकांनी केल्या असाव्या किंवा तोच आव्हान देत असावा आपल्यातल्या साहसीवृत्तीला. त्यामूळेच त्याला कठड्यात बंदिस्त करून त्याचे सौन्दर्य अनुभवावे, सुरक्षित राहूनच तो प्रपात अंगावर घ्यावा असे प्रयोजन केले असावे असे वाटते.

जवळजवळ एक महिना घरातून आणि ऑफिसमधून घेतलेली सुट्टी संपत आली आणि परत यायचा दिवस जवळ आला. घराची ओढ लागली. कुटुंबाची आठवण यायला लागली. पण तसं म्हटलं तर एक कुटुंब माझ्या बरोबरच होतं की, सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे जुजबी ओळखी करून सुरू केलेला हा प्रवास संपता संपता घट्ट कुटुंबासारखा कसा काय झाला कळले नाही. आम्ही सर्वजण वयाने, व्यवसायाने आणि इतरही अनेक बाबींनी वेगळे असलेले एकत्र कसे काय आलो, राहिलो आणि कुटुंबाप्रमाणे झालो कळलेही नाही. या सर्वांमधला एकच समान धागा होता ग्रंथाली. त्यानेच औपचारिक ओळखीपासून मैत्री हा प्रवास घडवला. अमेरिका प्रवासाप्रमाणेच हा प्रवासही सगळ्यांनाच समृद्ध करून गेला. त्यासाठी 'ग्रंथाली'चे मनापासून आभार आणि धन्यवाद.

भ्रमणध्वनी : ९८२२०१०९४६
shilpa2970@gmail.com



# स्वप्नपूर्ती

**संध्या खैरे**

**सु**देश नेहमी म्हणत असे, तुम्ही बीएमएमनिमित्त अमेरिकेला या. मी सगळी व्यवस्था पाहीन. सुदेशने आपला शब्द खरा केला. काही देश पाहून झाले होते, अमेरिका पाहायची ओढ होती, तो योग यावर्षी जुळून आला तोही सुदेशमुळे. लोकसंग्रह करणे आणि मदत करणे या सुदेश यांच्या स्वभावामुळे ग्रंथाली परिवार मोठा होतोय, याचे कौतुक वाटते. ग्रंथालीशी संबंधित जसे आम्ही काही होतो तसे काही नवीनही आमच्यात सामील झाले होते. ९ जुलैला अखेर आम्ही अमेरिकेला निघालो. त्यासाठी विमानतळावर रात्री १०.३० भेटल्यापासून आमच्यात छान मैत्री जमली. मी, माझा नवरा मोहन व कन्या रुचिका असे तिघेही हा दौरा करत होतो. अरुण जोशी, आशा व भगवान इंगळे सोडले तर बाकी पाच जणांना प्रथमच भेटले. रोहित भानुशाली आणि रुचिका हे तरुण आमच्यात सहज सामावूनच गेले नाहीत, तर प्रत्येक ठिकाणी पडेल ते काम करत जबाबदारीने वागले याने आनंद झाला. दौरा अप्रतिम झाला. आम्ही सर्व राइड मनसोक्त अनुभवल्या. नायगारा पाहून डोळ्यांचे पारणे फिटले. रात्रीचे न्यू यॉर्क मनमोहक होते. डिस्नी वर्ल्ड, युनिव्हर्सल स्टुडिओ परिसर फिरताना दिवस कमी पडत होता. पायपीट खूप झाली, तरी उत्साह संपत नव्हता.

या दौऱ्याचे विशेष म्हणजे मोहनला अस्थम्याचा त्रास अजिबात झाला नाही. इथे थोडे चालून वा एक मजलाही चढून दम लागणारा मोहन तिथे सतत धावपळ करत होता, सर्व राइड एन्जॉय करत होता, अगदी जड बॅगाही उचलत होता. मात्र तिथली हवा त्याला इतकी मानवली, की इथून निघताना माझ्यामुळे बाकीच्यांना त्रास नको वाटणारा मोहन सर्वात एनर्जेटिक पर्सन आहे, असे साऱ्यांनी म्हटले. अमेरिकादर्शनाचा जेवढा आनंद होता, तितकाच सारे एकजुटीने तो अनुभवल्याचा झाला. याचे श्रेय ग्रंथाली आणि सुदेशला आहे.

भ्रमणध्वनी : ८८५०२४७१८८



# अविस्मरणीय

**प्रकाश अंबुरे**

खरंतर संपूर्ण जीवनच एक प्रवास आहे. प्रवासात भेटलेल्या काही व्यक्ती, काही क्षण कायमचे स्मरणात राहतात. मी आजपर्यंत विविध प्रेक्षणीय स्थळं व निसर्गसौंदर्याचा मनमुराद आनंद घेतला आहे, पण या प्रवासाचा आनंद वेगळाच आहे. मी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्टवर ठरल्याप्रमाणे रात्री नऊ वाजता पोहोचलो. दिवसभर पावसाची रिपरिप सुरूच होती. आम्ही बोर्डिंग पास घेण्यासाठी निघालो. सोळा तासांचा प्रवास ग्रंथाली परिवारातील सर्वांच्या आपसातील प्रेमामुळेच सुखद झाला. गप्पागोष्टी करत आम्ही डॅलसला पोहोचलो. आम्ही एकोणिसावे बीएमएम अधिवेशन अटेंड केले. तिथे अनेक विद्वानांच्या भेटी झाल्या. अनेक मान्यवर लेखक-लेखिकांच्या पुस्तकांच्या सामूहिक प्रकाशनात मलाही टेक्सास, डॅलस येथील बीएमएमच्या स्टेजवर जाण्यासाठी संधी ग्रंथालीमुळे मिळाली.

१३ जुलैला आम्ही डॅलसहून ओरलँडोला निघालो. इथं सर्वांनी साईट टूर केली. १७ जुलैला साडेआठच्या ओरलँडो ते नेवार्क विमानासाठी आम्ही विमानतळावर पोचलो. खराब वातावरणामुळे आमचं विमान रद्द करण्यात आलं होतं. चोवीस तासांनंतर, दुसऱ्या दिवशी त्याच विमानाने जाता येईल असं सांगितलं गेलं, पण आमच्या ग्रुपमधल्या रोहित भानुशाली आणि रुचिका खैरे यांनी सर्व ऑपशन्स बोर्डिंग पास देणाऱ्या ऑफिसरला विचारून शेवटी ओरलँडो ते वॉशिंग्टन व तेथून न्यू यार्कला जाण्यासाठी विमानाने जायचे ठरवले. आम्ही रात्र विमानतळावर काढून पहाटेच्या विमानानं न्यू यार्कला पोचलो, तोपर्यंत आमची १७ ते २२ जुलैची ईस्ट कोस्ट टूरची बस निघून गेली होती. आम्ही बसच्या पुढच्या स्टॉपवर जाऊन बसटूरला सामील झालो. तीन दिवसांत टूर केल्यावर जाणवलं, की आपण याऐवजी स्वतंत्र टूर जास्त छान केली असती ज्यात आपापल्या आवडीला व वेळेला जास्त महत्त्व दिलं गेलं असतं. मोहन खैरे यांच्या सर्वांना मदतीला धावून जाणं आणि कामातून दिसणारी ऊर्जा वाखाणण्याजोगी आहे. हा प्रवास म्हणजे आमच्यासाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरला.

भ्रमणध्वनी : ९४१४००९४९३
prakashambure61@gmail.com



शोभा सुदेश हिंगलासपूरकर

# माझी अमेरिकेची तिसरी वारी

## (व्हाया स्वित्झर्लंड आणि पॅरिस)

'ग्रंथाली'चा विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी १ ऑगस्ट २०१७ रोजी 'गर्जे मराठी' पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात अमेरिकेत होणाऱ्या अधिवेशनात लेखक व कार्यकर्ते यांना घेऊन ग्रंथविदेश यात्रा काढणार असल्याचे जाहीर केले होते. तो गेली १४ अधिवेशनास पुस्तके, लेखक अथवा मित्रपरिवार हा त्यावेळी त्याच्या सोबत असायचा. आम्ही या आधी त्याच्याबरोबर बॉस्टन व लॉस एंजेलिस इथे झालेल्या अधिवेशनास गेलो होतो व त्यानिमित्ताने अमेरिकेचा ईस्ट व वेस्ट कोस्टचा भाग फिरून झाला होता.

जुलै महिन्यात डॅलस येथे अधिवेशन होणार होते. काही बैठका झाल्या व त्यातून एकूण २९ जणांनी अधिवेशनास येण्याचे ठरवले. या ग्रुपने अधिवेशन व त्यांच्या अमेरिकेतील फिरण्याच्या ठिकाणांची जुळवाजुळव सुरू केली.

आम्ही या आधी अमेरिका फिरलेलो असल्यामुळे जाताना युरोपातील स्वित्झर्लंड व पॅरिस ही दोन शहरं पाहून जाऊ असे ठरवले. आमच्या या ग्रुपमध्ये श्रीधर व सपना पाटील, अभिजित व सीमा हेगशेट्ये, सुदेश व सई असे सात जण होतो.

२ जुलै २०१९ला दोन वाजता विमान टेक-ऑफ - घेणार होतं. परंतु मुंबईत धो-धो पाऊस झाल्यामुळे आमचं विमान दुसऱ्या दिवशी दुपारी ११ वाजता सुटलं. तेव्हा आम्ही निःश्वास सोडला. परंतु पुढचा नियोजित कार्यक्रम मात्र विस्कळीत झाला. आम्ही पॅरिस ते स्वित्झर्लंडला 'बाय रोड' प्रवास करणार होतो. हा प्रवास आमचा दिवसाचा असणार होता. विमान उशिरा सुटल्यामुळे आमचा प्रवास सायंकाळी सुरू झाला तो मध्यरात्री ३ ला आम्ही स्वित्झर्लंडमधील इंटरलेकन या मुक्कामस्थळी पोचलो. इथे आमचा मुक्काम ४ दिवसांचा होता. इथून आम्ही १०३ नंबरची बस घेऊन रिंगणबर्ग स्टेशनला जायचो व तेथून ट्रेन व मग केबलकार असा आमचा प्रवास असायचा. या प्रवासात आम्ही सिन्थॉल पिक जिथे जेम्स बॉण्डचे पिक्चर शूट झाले ती जागा दुसरे ठिकाण टॉप ऑफ युरोप म्हणजे जुंगप्रोव. या दोन्ही ठिकाणावर बर्फातील आनंद घेतला. (या दोन्ही ठिकाणी जाताना ल्युटर ब्रुन, ग्रुटचाप, म्युरेटू, स्टेचलबर्ग त्याचाही आनंद घेतला.

तिसऱ्या दिवशी ट्रेनने निसर्गसौंदर्य पाहत, मोठा प्रवास करत ल्युझन सिटीला पोचलो. येथे आम्ही लेकवरील फुल व पेटींगने नटलेला चॅपल ब्रिज पाहिला. या शहरात आम्ही चॉकलेट म्युझियम पाहण्यास गेलो. बियांपासून चॉकलेट कसे तयार होते ते प्रोजेक्टवर चित्रीकरण केलेलं होतं ते अप्रतिम वाटलं. चॉकलेट खाण्याचा आनंद लुटला. नंतर रेल्वे म्युझियम बघितले. जुन्या रेल्वे गाड्या, त्या मशिनरी बघितल्या. नंतर अचानक वारा आणि पाऊस आला. झाडं खाली पडली. दहा मिनिटांनी जणू काहीच झालं नाही असं झालं. लगेच झाडं न्यायला यंत्रणा सज्ज होती याचं कुतूहल वाटलं. मार्केट बघितले. थोडी फार खरेदी केली. परत आम्ही आमच्या मुक्कामी परत आलो. आमच्या बंगल्यासमोर ब्रुझिन लेक व गार्डन पाहिले. आजूबाजूचं शहर बघितलं व स्वित्झर्लंड प्रवास केला.

चौथ्या दिवशी आम्ही बुलेट ट्रेनने पॅरिसला बॅगा घेऊन निघालो. तीन ट्रेन बदलत पॅरिसला पोहोचलो. तेथून जवळच असलेले साऊथ इंडियन हॉटेल शोधले. तेथे जेवण व नाश्ताचा आस्वाद घेतला.

पॅरिस इथे मुक्कामी असलेल्या हॉटेलसमोर ट्युब रेल्वेचे स्टेशन होते. तेथे सिगरेट ओढणारी मंडळी, पाकिटमार करणारी मंडळी असे दृश्य दिसायचे. आम्हाला तिथे गरीबी व गुन्हेगारी असल्याचे जाणवले. तिथे सूर्यास्त रात्री साडेदहा वाजता व्हायचा. रात्री तिथे भटकताना फुटपाथ व हॉटेलच्या बाहेर मंडळी खाणेपिणे करत बसलेली दिसायची.

पॅरिस शहरात आम्ही लॉ कार्नव्हेन म्युझियम बघितलं. शिल्पकला, चित्रकला, पेंटिंग पाहिले. पेंटिंगमध्ये मोनालिसाचं पेंटिंग पाहिलं. ते पेंटिंग पाहण्यासाठी लाखो लोक येतात. तसंच मार्बलचे पुतळे बघितले.

पॅरिसमधील जगप्रसिद्ध आयफेल टॉवर बघितला. याचे बुकिंग आधीच करायला लागते ते आम्ही केलं होतं. ७०० पायऱ्या चढत आम्ही वरती आलो. नंतर लिफ्टने टॉप फ्लोअरला गेलो. तेथून पॅरिस शहर बघितलं. पॅरिसचा अप्रतिम नजारा पाहिला. यानंतर लेकमधील क्रुझला गेलो. क्रुझची राईड केली. असा आमचा स्वित्झर्लंड व पॅरिसचा प्रवास संपला. पॅरिसवरून अटलांटा. अटलांटा ते डॅलस असा विमानप्रवास सुरू झाला.

अमेरिकेत डॅलस येथे उतरताना हवामान खराब असल्यामुळे डॅलस येथे आमचे विमान रात्री उशीरा पोचले. आम्ही ज्या अपार्टमेंटमध्ये राहणार होतो. मुंबईहून येणारी दुसरी टीमही तिथे दुपारी पोचणार होती. त्यांच्या विमानाला खराब हवामानाचा त्रास झाल्यामुळे त्यांचेही विमान मध्यरात्री डॅलस येथे आले. आम्ही दोन्ही ग्रुप्स १०च्या रात्री व ११ च्या पहाटे डॅलसमधील



**स्वप्ना पाटील, सुदेश हिंगलासपूरकर, शोभा हिंगलासपूरकर, सई हिंगलासपूरकर आणि श्रीधर पाटील**

अपार्टमेंटमध्ये भेटलो.

बीएमएम अधिवेशन २०१९ अमेरिकेत डॅलस या शहरात के बेली ह्युस्टन कनव्हेशन सेंटर या वास्तूत होते. भव्यदिव्य हॉलमध्ये पाच हजार माणसं मावतील इतकी व्यवस्था तिथे होती. ११ ते १४ जुलै या काळात अधिवेशन मोठ्या थाटामाटात साजरे झाले. हे अधिवेशन दर दोन वर्षांनी होतं. या अधिवेशनाला हजारो मराठी माणसं एकत्र येतात. तीन दिवस राहतात. मराठी भाषा संस्कृती जपावी, ती परंपरा पुढे चालत राहावी याची धडपड आम्हाला जाणवली जणू काही हे मोठे संमेलनच असावे असे वाटत होते.

अमेरिका हा देश औद्योगिकदृष्ट्या धनाढ्य असला तरी त्याचे फायदे-तोटे जाणून, त्या देशात एकता टिकून राहिली आहे. तिथली शिस्त, कायदा आपल्याला जाणवतो. प्रदूषणमुक्त हवा, स्वच्छता, टापटीप रस्ते, जिकडेतिकडे रंगबेरंगी फुलं जणू काही हे बघून मन भारावून जातं. 'ग्रंथाली' स्टॉलसमोर विठ्ठल-रुक्मिणीची मंदिराची प्रतिकृती उभी केली होती. पहिल्या दिवशी स्त्रियांनी व पुरुषांनी पारंपरिक पोषाख घातलेला होता. जसे- शालू, पैठण्या, नथ. पुरुषांनी कुर्ता, पायजमा, वगैरे वगैरे. नाच-गाणं, फिरक्या घेणं. दुसऱ्या दिवशी- दिंडी, लेझिम. यामुळे जणू काही मराठी संस्कृतीने अमेरिका दुमदुमली.

कनव्हेशन सेंटरमधल्या विविध हॉलमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम चालू असायचे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. अरुणा ढेरे, जगप्रसिद्ध प्लॅस्टिक सर्जन डॉ. रविन थत्ते यांच्या भाषणांना उत्तम दाद मिळाली. भारतातून आलेल्या देवकी पंडित, सुबोध भावे, स्पृहा जोशी, संजय मोने, विशाखा सुभेदार, संकर्षण कऱ्हाडे, आर्या आंबेकर 'डिअर आजो' अशा विविध कार्यक्रमांना उत्तम प्रतिसाद लाभला. जेवणाच्या मेनूमध्ये पहिल्या दिवशी आषाढी एकादशी असल्यामुळे उपवासाच्या पदार्थात साबुदाण्याची खिचडी, आमटी, भगर, नारळाची वडी असा बेत होता. दुसऱ्या दोन दिवस मोदक, पुरणपोळी, पावभाजी असा मेनू होता. 'ग्रंथाली'च्या स्टॉलबरोबर तेथे दागिने, कपडे, पुस्तके, सीडीज्, सामाजिक संस्था, पर्यटन, चित्रप्रदर्शन असेही स्टॉल होते.

या अधिवेशनात 'ग्रंथाली'च्या दीपक करंजीकर यांचे 'घातसूत्र', प्रगती कोळगे याचं 'का घडतंय हे?', विनता कुलकर्णी यांचे 'पुस्तकचोर', प्रकाश अंबुरे यांचे 'आरवली ते अरावली', डॉ. अनंत लाभसेटवार यांचे 'संगणकक्षेत्रातील काही प्रज्वलित दिवे', रमेश वाघमारे यांचे हिंदुस्थानी रागदारीतील सुवर्णयुगाचे मानकरी', संदीप काळे यांचे 'मुक्काम पोस्ट आई', डॉ. विजय ढवळे 'शब्दांच्या फुलवाती' आणि 'मार्मिकताय नम:' यांच्या पुस्तकांचे मुख्य हॉलमधील स्टेजवरून प्रकाशन झाले.

अधिवेशनानिमित्त या २२ जणांची टीम एकत्र आली. त्यांच्याही अमेरिकेतील मराठी मंडळींशी ओळखी झाल्या. त्यांना या अधिवेशनाचा आस्वाद घेता आला.

मला अमेरिकेत अधिवेशनात असताना जाणवले की भारतीय मंडळी तेथे असूनही मराठी भाषा संस्कृती जपत आहेत, ही अभिमानाची गोष्ट आहे.

ग्रंथालीमुळे मला अमेरिकेची वारी करता आली, याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद. शेवटी आपला गाव बरा.

भ्रमणध्वनी : ९८६९८५९५७१

## ज्योती स्टोअर्सचा अभिनव उपक्रम

# लेखक तुमच्या भेटीला

ज्योती स्टोअर्स हे नाशिकमधील शालेय पुस्तके आणि इतर साहित्याबरोबर मराठी साहित्यातील नामवंत लेखक-प्रकाशक यांचे दर्जेदार साहित्य मिळण्याचे ठिकाण. १९५८ पासून या व्यवसायात असणारे संस्थापक कै. खैरनार गुरुजी आणि विद्यमान संचालक वसंत खैरनार यांनी अथक प्रयत्नांतून आणि परिश्रमातून हा व्यवसाय वाढवला-फुलवला. या खैरनार पितापुत्रांनी नुसता हा व्यवसाय वाढवला असे नाही तर त्याला नवनवीन प्रयोगांनी आकार दिला. वाचनसंस्कृती वाढावी, ती जोपासली जावी यासाठी ग्राहकांची आवड लक्षात घेऊन आपल्या दुकानात उपलब्ध नसणारी पुस्तके मागवून घेऊन पुरवणे, एकाच छताखाली वाचकांना अनेक प्रकाशनांची पुस्तके बघता यावीत, खरेदी करता यावीत म्हणून सातत्याने ग्रंथप्रदर्शनांचे आयोजन करणे, रसिकांना नवीन पुस्तकांचा परिचय व्हावा म्हणून 'ज्योती ग्रंथवार्ता'सारखे नियतकालिक प्रसिद्ध करणे असे अनेक स्तुत्य उपक्रम ज्योती स्टोअर्सने हाती घेतले. याकामी खैरनार यांना कविश्रेष्ठ कुसुमाग्रज आणि ज्येष्ठ नाटककार प्रा. वसंत कानेटकर यांचे मार्गदर्शन लाभले. आणि त्यातूनच 'लेखन तुमच्या भेटीला' या उपक्रमास सुरुवात झाली.

वाचनसंस्कृतीच्या प्रसार आणि प्रचाराबरोबरच आपण ज्या साहित्यिकांची पुस्तके वाचतो त्यांना प्रत्यक्ष बघणे, त्यांचे विचार ऐकणे हा अनुभव आपण नाशिककरांना द्यावा या विचारातून प्रा. वसंत कानिटकर यांच्या अध्यक्षतेखाली २००० साली 'लेखक तुमच्या भेटीला' या कार्यक्रमास प्रारंभ झाला. पहिल्या वर्षी फक्त नाशिकमधील लेखकांना आमंत्रित करून महिनाभर दररोज हा उपक्रम राबविला. पण नंतर ऑगस्ट ते ऑक्टोबर, ऑगस्ट ते सप्टेंबर या कालावधीत फक्त शनिवार-रविवार याच काळात या कार्यक्रमाचे आयोजन होऊ लागले. मग नाशिकबाहेरील पुणे-मुंबईबरोबरच सांगली, कोल्हापूर, अहमदनगर या भागातील विविध क्षेत्रांतील मान्यवर साहित्यिकांना आमंत्रित केले जाऊ लागले. मराठी वाङ्मयातील कथा-कादंबरी-नाटक-प्रवास-चरित्र-आत्मचरित्र या प्रकारांबरोबरच इतर क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या आणि ते पुस्तकरूपातून वाचकांसमोर मांडणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन त्यांनाही या कार्यक्रमात आमंत्रित केले जाऊ लागले. साहित्य, चित्रपट, नाटक, उद्योग, अर्थकारण, राजकारण, विज्ञान, आरोग्य, चित्रकला, समाजसेवा अशा विविध क्षेत्रांतील २५०हून अधिक दिग्गज साहित्यिकांना आजपर्यंतच्या कार्यक्रमातून आमंत्रित करून त्यांचा नाशिककर रसिकांशी संवाद घडवून आणला आहे. बघता बघता सर्वच नाशिककरांनी या कार्यक्रमाला इतका उदंड प्रतिसाद दिला की फोन करून, प्रत्यक्ष भेटून पुढचा कार्यक्रम कधी आहे, कोण कोण लेखक आहेत अशी चौकशी करू लागले. एवढ्यावरच नाशिककर थांबले नाहीत तर त्यांना आवडलेले, भावलेले लेखक-लेखिका यांची नावे आयोजकांना सुचवू लागले. नाशिककर रसिकांचा पाठिंबा, सर्वच प्रकाशकांचे सहकार्य, लेखकांकडून मिळणारा प्रतिसाद या सगळ्यांच्या मिलाफातून आज या 'लेखक तुमच्या भेटीला' या कार्यक्रमाने नाशिकच्या सांस्कृतिक वर्तुळात एक वेगळा ठसा उमटवला आहे. म्हणूनच उत्तरोत्तर हा कार्यक्रम एक उंची गाठत आहे.

बघता बघता केवळ 'लेखक तुमच्या भेटीला' एवढेच या कार्यक्रमाचे स्वरूप न राहता तो ज्ञानाचा उत्सव कधी झाला हे आयोजकांनाही कळले नाही. यंदा १९ वर्षे पूर्ण करून २०व्या वर्षात प्रवेश करणाऱ्या या कार्यक्रमास ३ ऑगस्ट २०१९ रोजी प्रारंभ झाला तो दिमाखातच. पर्यटनक्षेत्रात धाडसी विक्रम करणाऱ्या ईशा टूर्सचे संचालक आत्माराम परब आणि कवी नरेंद्र प्रभू या जोडीच्या व्याख्यानाने सुरू झालेल्या या उत्सवात दरवर्षीप्रमाणेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांना आमंत्रित केलेले आहे. साहित्य, चित्रकला, न्याय, उद्योग, संगीत, आरोग्य अशा विविध क्षेत्रांतील दिग्गज मंडळी या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. पण लडाख या अतिशय दुर्गम आणि निसर्गाची कृपा-अवकृपा असणाऱ्या भागात वेगवेगळ्या निमित्ताने वर्षभर सहली घेऊन जाणारे परब आणि प्रभू आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या कामकाजातून निवृत्त झालेल्या न्यायमूर्ती श्रीमती मृदुला भाटकर हे लेखक जरा वैशिष्ट्यपूर्णच होते.

अंगात धाडसी वृत्ती असणाऱ्या आत्माराम परब यांना साहस करण्याची खुमखुमी असल्याने आपल्या चार-पाच मित्रांना घेऊन मोटारसायकलवरून लडाखला जायचा बेत आखला. लडाखचा निसर्ग जरी आपल्या मनाला भुरळ घालत असला तरी तिथला निसर्ग कधी रौद्र रूप धारण करून होत्याचं नव्हतं करून टाकील याचा नेम नाही. अशी परिस्थिती असतानाही हे सर्व साहसीवीर लडाख मोहिमेवर निघाले. पण निसर्गापुढे नमते घेत घेत अतिशय कष्टप्रद अशी ही सहल त्यांनी पूर्ण केली ती पुढच्या लडाख मोहिमांचे आयोजन करतच. अनेक सर्वसामान्यांना आपल्याबरोबरच लडाखचे वेड परब यांनी लावले. आणि मग त्यातूनच त्यांनी विविध तपमान असणाऱ्या काळातील मोहिमा, लडाखमधील विविध सण-उत्सव साजरे करणाऱ्या सहली, लडाख भागातील खडतर आयुष्य जगणाऱ्या आणि ज्यांच्या जिवावर आपण निश्चिंतपणाने आयुष्य जगत असतो त्या आपल्या लढाऊ जवानांच्या सहवासात रक्षाबंधन, भाऊबीज यासारखे सण किंवा १५ ऑगस्ट, २६ जानेवारीसारखे राष्ट्रीय सण साजरे करण्यासाठी सर्वसामान्यांना त्यांच्यापर्यंत पोहोचवणे अशा आगळ्यावेगळ्या मोहिमा आखणे सुरू केले आणि त्यांना पर्यटकांचा खूप प्रतिसाद मिळायला लागला. कवीमनाच्या नरेंद्र प्रभू लडाख

परिसराचा आस्वाद घेण्यासाठी प्रथम परब यांच्या लडाख सहलीत सहभागी झाले पण नंतर मात्र ते लडाखच्या इतक्या प्रेमात पडले की ते ईशा टूर्सच्या लडाख मोहिमा आखण्यात आयोजनात टूर मॅनेजर म्हणूनच सहभागी झाली. एकीकडे निसर्गरम्य लडाख पर्यटकांना हाक घालत असतानाच क्षणात इथला निसर्ग कधी रौद्ररूप धारण करील याचा नेम नसतो. त्यामुळे सहलींचे आयोजन करताना आत्माराम परब, नरेंद्र प्रभू आणि ईशा टूर्सचे सर्व सदस्य यांचे संपूर्ण कसबच पणाला लागत असते. हा लडाखचा संपूर्ण प्रवास रघुवीर वैद्य यांनी परब आणि प्रभू यांच्या घेतलेल्या मुलाखतीतून उलगडला गेला 'लेखक तुमच्या भेटीला'च्या पहिल्या विचारपुष्पातून. परब आणि प्रभू यांचे अंगावर थरार आणणारे अनुभव रसिकांना रोमांचित करून तर गेलेच पण रसिकांनी खरा आनंद लुटला तो लडाखवरील चित्रफीत पाहताना. बर्फाच्छादित हिमालय, त्याच्या कुशीतला रमणीय लडाख, बौद्ध वास्तू आणि फुलांनी बहरलेला लडाख बघून तसेच परब यांचे अनुभवकथन ऐकून भारावलेल्या अनेक श्रोत्यांनी लवकरच आपण लडाख सफर करायची असा निश्चयच त्या क्षणी करून टाकला.

लडाख सफरीचा रोमांचकारी, भन्नाट अनुभव गाठीशी असलेल्या नाशिककर रसिकांना न्यायदानासारख्या रुक्ष वातावरणात अनेक वर्षे वावरलेल्या पण कवीचे संवेदनशील मन असणाऱ्या, मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती पदावरून निवृत्त झालेल्या श्रीमती मृदुला भाटकर यांनी श्रोत्यांना एका वेगळ्याच वातावरणात नेले. वकिलीचा वारसा वडिलांकडून मिळालेल्या भाटकर यांनी आपल्या आजवरच्या न्यायालयीन कारकिर्दीतील अनेक घटना, ज्यातून आपल्याला बरेच काही शिकायला मिळाले, अनुभवायला मिळाले हे कथन केले. वकिली करत असतानाचे अनुभव आणि न्यायमूर्ती झाल्यानंतरचे अनुभव असे दोन्ही प्रकारचे अनुभव त्यांनी सांगितले. न्यायमूर्ती झाल्यानंतर सर्व व्यवस्था तर न्यायमूर्तींना बदलता येत नाही परंतु या व्यवस्थेचा एक चिरा जरी आपण बदलू शकलो तरी खूप झाले ही खंत त्यांनी व्यक्त केली. एका परिपूर्ण न्यायाधीशाला नेहमी निखळ सत्य शोधावे लागते आणि हे सत्य शोधण्याचा हा प्रवास न्यायाधीशाचा एकट्याचा असतो असे श्रीमती भाटकर यांनी प्रतिपादन केले. वडिलांच्या इच्छेनुसार परमेश्वरी देणगी असलेल्या न्यायाधीशाचे काम भाटकर यांनी स्वीकारले खरे पण कोर्टासारखा रूक्ष विषय हाताळताना, आपले संवेदनशील कवीमन जपले. आणि म्हणूनच कोर्टातील घटनांवर कर्तव्याच्या भावनेने न्यायदान करताना दुसरीकडे त्यांच्या हातून तरल अशा 'कविता मनातल्या कविता कोर्टातल्या' हा कवितासंग्रह तयार झाला त्यांचा अनुभव श्रोत्यांना त्यांच्या संवेदनशील मनाची साक्ष देणारा होता. काही काळ नाशिकला घालवलेला असल्यामुळे त्या आठवणी जागवतच भाटकर यांनी नाशिकविषयी वाटणाऱ्या जिव्हाळ्यातूनच नाशिकच्या रसिकांसमोर आपल्या कोर्टातील प्रसंगांवर आधारित अशा कवितांचे उत्स्फूर्त वाचन केले आणि रसिकांना भारावून टाकले.

या दोन अगदी वेगळ्या विषयांवरील व्याख्यानांमधून लेखकांनी वाचकांशी संवाद साधलाच. पण त्याचबरोबर आमदार हेमंत टकले 'चांगलं लिहिण्यासाठी चांगल्या वाचनाची गरज', ज्येष्ठ चित्रकार वासुदेव कामत 'माझी चित्रे : माझे विचार', कालनिर्णयचे संपादक जयराज साळगावकर 'उद्योगाचे भवितव्य', ज्येष्ठ नाटककार-कादंबरीकार अशोक समेळ 'मी अश्वत्थामा चिरंजीव', प्रा. डॉ. मृदुला दाढे-जोशी 'रहे ना रहे हम आस्वाद चित्रपट संगीताचा', पुण्याच्या मराठी साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष आणि लेखक प्रा. मिलिंद जोशी, 'साहित्यातील दोन शिवाजी : प्राचार्य शिवाजीराव भोसले आणि मृत्युंजयकार शिवाजी सावंत, पचनसंस्था विकारतज्ज्ञ डॉ. नितीन जोशी 'आपलं पोट आपल्या पचनसंस्थेचे आजार, ओळख, उपाय व उपचार' यांसारखे मान्यवर साहित्यिक यंदाच्या कार्यक्रमात सहभागी आहेत. या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय संपर्क संघटक रविकुमार अय्यर 'हिंदूंचा सर्वव्यापी प्रभाव' यांच्या व्याख्यानाने होणार आहे. ज्ञानाच्या उत्सवाचा हा कार्यक्रम अनेकांच्या सहकार्यामुळे पार पडतो. नाशिकच्या सांस्कृतिक क्षेत्रात वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या या कार्यक्रमाला रसिकांचा मिळणारा उदंड प्रतिसाद हेच कार्यक्रमाचे श्रेय आहे.

**- सुषमा देशपांडे**
भ्रमणध्वनी : ९४०३५०९९१९

ग्रंथाली


कविता मनातल्या
कविता कोर्टातल्या

**मृदुला भाटकर**



**मूल्य ६० रु.  सवलतीत ३५ रु.**

माणूस अन् न्यायाधीशाच्या अनुभवाचा उद्गार, वेदनेचा हुंकार व्यक्त करणारी कविता मनातली, कोर्टातली...



लडाख
...प्रवास अजून सुरू आहे.

**आत्माराम परब, नरेन्द्र प्रभू**

**मूल्य २५० रु.  सवलतीत १५० रु.**

अत्यंत भावपूर्ण, प्रेरणादायी आणि दाद देण्याजोगे असे हे प्रवासवर्णनाचं चांगलं दर्शन या पुस्तकातून होतं. **- लोकसत्ता**

# प्रकाश जगतातला एक अप्रकाशित सारस्वत

## राजेंद्र आंबोसे



मोरेश्वर नांदुरकर

प्रदर्शनात सापडलेल्या एका चोरट्या मुलाला आम्ही सगळ्या नोकर मंडळींनी बऱ्यापैकी धोपटले होते आणि त्यानंतर मालकांना म्हणजेच मोरेश्वर नांदुरकर यांना फोन केला. त्यांना आम्ही सांगितले की, असा-असा एक मुलगा सापडला आहे, त्याला आम्ही धरून ठेवले आहे. त्यांनी आम्हाला जे सांगितले, ते धक्कादायक होते, त्यांनी सांगितले, त्या मुलाला बसवून ठेवा, त्याला मारू नका. मी आल्यावर बघतो. थोड्या वेळाने प्रदर्शन भरवलेल्या हॉलवर ते आले, त्या मुलाला जवळ बोलावले आणि त्याची चौकशी करून त्याला त्यांनी समजावले, की त्याने चोरलेलीही पुस्तके परत आणू दे, पण आयुष्यात कधीही वाईट मार्गाला जाऊ नकोस.'' हा किस्सा कुठल्या कादंबरीतला किंवा एखाद्या प्रबोधनपर धड्यातला नसून, माझ्या आयुष्यात घडलेला खरा किस्सा आहे. व्हॉट्सअपच्या आजच्या जमान्यात, बहीण-भावांची एक जोडी एका दुकानात जाऊन बाहुली खरेदी करते. तीसुद्धा पैसे न देता, उलट वाळूत गोळा केलेल्या शिंपल्यांच्या बदल्यात. गोष्टीतल्या त्या दुकानाचा मालक आपल्या नोकरांना सांगतो, की ''भविष्यात तो मुलगा जेव्हा मोठा होईल तेव्हा माणुसकीवरचा त्याचा विश्वास वाढलेला असेल. माझ्या दृष्टीनं ते महत्त्वाचं आहे. आज सगळीकडे व्हॉट्सअप आणि फेसबुकवरून अशा विविध बोधकथा फिरत असतात. माझी मुले कुणाल आणि करण अशा गोष्टी मला आवर्जून दाखवतात, हे सगळं वाचताना माझ्या डोळ्यांसमोर पटकन येतात ते रसिक साहित्याचे मालक मोरेश्वर नांदुरकर म्हणजे, मी ज्यांना डॅडी म्हणायचो ते..

आज भौतिक जगामध्ये ते नाहीत, तरीसुद्धा त्यांच्या नावामागे दिवंगत हा शब्द लावायला माझं मन धजावत नाही. 'शुभम साहित्य'च्या माध्यमातून मी जी काही थोडीफार वाटचाल केली, त्या प्रवासाची शिदोरी मला नांदुरकरांच्याकडेच मिळाली. त्यांनी दिलेली संस्कारांची शिदोरी आजही माझ्या सोबत तशीच आहे. अख्ख्या दुकानामध्ये त्यांना 'डॅडी' म्हणून हाक मारणारा मी एकटा होतो. वीस वर्षांपूर्वी नियतीच्या खेळामुळे त्यांच्या दुकानातून मी बाजूला झालो, मात्र त्यांच्याबद्दलचा आदर आणि प्रेम कधीच संपले नाही. शैलेश आणि योगेश ही मोरेश्वर नांदुरकरांची म्हणजे माझ्या डॅडींची दोन्ही मुले, अर्थात पुढची पिढी. त्या दोघांना, त्यांच्या बहिणीला मी अनेकदा सायकलवर शाळेत नेऊन सोडले आहे. नांदुरकरांनी मला त्यांचा नोकर म्हणून कधीच वागवले नाही. या मुलांना मी त्यांचा मोठा भाऊ वाटत असे, शाळेत जाताना हक्काने ही सगळीजण माझ्याकडून गोळी किंवा चॉकलेट घेत असत. यातला गमतीचा भाग असा की, आमचे डॅडी म्हणजे दुकानाचे मालक काही वेळा मला आवर्जून काही सुट्ट्या नोटा देत आणि सांगत, सकाळी तू गोळ्या-बिस्किटं वाटतोस, त्याच्यासाठी हे ठेव. हा एकच किस्सा नाही, तर यादी करायला बसलं तर माझ्या या डॅडींबद्दल महाप्रचंड असा लेख होईल. फक्त एकच उदाहरण सांगतो, जगाच्या पाठीवर असा मालक कोणाला मिळाला नसेल की, जो दुकानाच्या सुट्टीच्या दिवशी मला पिक्चर बघायला त्या काळात आवर्जून दहा रुपये देत देत आणि एकदा नाही तर अनेकवेळा असे पैसे त्यांनी मला दिले होते.

रसिक साहित्य आणि नांदुरकर यांचा आणि माझा संबंध ही खरोखर नियतीची खेळी होती. वयाच्या सोळा-सतराव्या वर्षी मला पहिली नोकरी लागली, ती पहिली नि शेवटचीच आणि ती नोकरी म्हणजेच रसिक साहित्यामध्ये दुकान झाडणारी सामान्य व्यक्ती ते पुढे डॅडींच्यानंतर दुकानातले सगळे ज्याला आवर्जून मान देत असत, असा राजाभाऊ म्हणजे मी. हा प्रवास आजही मला एखाद्या स्वप्नासारखा वाटतो. माझे वडील मंडईमध्ये काम करत असत. कुलकर्णी ग्रंथागारचे मालक मंडईत येत असत. माझ्या वडिलांनी त्यांना विनंती केली की, माझ्या मुलाला तुमच्याकडे नोकरी द्या. त्यांनी उद्या तुझ्या मुलाला पाठवून दे, असे सांगितले. मी वडिलांच्या सांगण्यावरून दुसऱ्या दिवशी कुलकर्णी ग्रंथागारमध्ये गेलो. त्यांनी मला मोरेश्वर नांदुरकरांसाठी चिठ्ठी दिली आणि सांगितले, ''माझे नाव सांग, तुला येथे नोकरी मिळेल.'' नांदुरकरांकडे मी गेलो, त्यांनी मला एवढंच सांगितलं, ''दुकान झाडून घेणं, पुस्तके नीट लावणे, पुस्तके नेऊन देणे, हे सगळे तुला करावे लागेल.'' त्यांनी सांगितलेलं सर्व मी मान्य केलं, आणि त्याच दिवसापासून त्यांच्याकडे काम करायला लागलो.

अनेक वेळा योगेश आणि शैलेशला शाळेत सोडून दुकानाच्या किल्ल्या घेऊन मी दुकानात येऊन दुकान झाडून कामाला लागलेलो असे. एकदा सकाळी काम सुरू झाले की रात्रीपर्यंत काम सुरू असे. एकदा प्रदर्शन भरवण्याच्या आधी त्यांनी मला सांगितले, प्रदर्शनाची ही पॅम्पलेट्स म्हणजे जाहिरातपत्रके तू चितळेंच्या दुकानासमोरच्या

चौकात उभे राहून वाट. प्रदर्शनाला त्याचा फायदा होईल. आज अनेक ठिकाणी चौकात किंवा सिग्नलपाशी तरुण मुले छोट्या-छोट्या जाहिरातींची चिटोरी प्रत्येकाच्या हातात देत असतात. ही मुले पाहिली की, पुस्तकांच्या प्रदर्शनाची हँडबिले वाटत असलेला 'माझा मीच' माझ्या डोळ्यांसमोर येतो. त्याचबरोबर डॅडी काळाच्या आधी कमी खर्चात आणि प्रभावी जाहिरात कशी करायची, याचा वस्तुपाठ त्यावेळी कसा घालून देत होते, हे आज प्रकर्षाने लक्षात येते. नांदुरकरांच्याकडे मी काय शिकलो नाही? या प्रश्नाचं उत्तर सर्व काही शिकलो. दुकान झाडणारा मुलगा ते पुढे काउंटरला लीलया अनेक गिऱ्हाईकांना तोंड देत, त्यांना वेगवेगळी पुस्तके काढून देणारा अत्यंत हुशार असा विक्रेता, त्याचबरोबर लायब्ररी व बाहेरगावची अन्य मोठी गिऱ्हाईके करण्यासाठी त्यांचा सर्वात विश्वासू सहाय्यक, अशी माझी प्रगती त्यावेळी खूप झाली होती.

काउंटरला पुस्तक विक्री करताना त्यांनी पहिला धडा मला जो दिला, तो म्हणजे समोरच्या गिऱ्हाईकाशी अत्यंत नम्रपणे वागायचे, त्याच्याशी कधीही वाद घालायचा नाही. त्याला जास्तीतजास्त पुस्तके हसतमुखाने दाखवायची. त्याच्या आवडीची पुस्तके दाखवताना आपल्याला जी पुस्तके विकायची आहेत, जी आपण मोठ्या प्रमाणावर खरेदी केली आहेत, तीही त्यांना खुबीनी दाखवून ती कशी खपतील, याकडेही लक्ष दे, असे त्यांनी मला सांगितले होते. डॅडींची एक खासियत अशी होती की, आलेल्या गिऱ्हाईकाला काहीही करून परत पाठवायचे नाही. त्याने सांगितलेले पुस्तक शोधून द्यायचे, नसेल तर मागवून द्यायचे. गिऱ्हाईक समाधानी कसे होईल, याकडे त्यांचा कटाक्ष असे. त्या काळात महाराष्ट्राच्या विविध भागांतून 'रसिक साहित्य'मध्ये लायब्ररीसाठी पुस्तके घ्यायला अनेक लायब्ररींचे चालक, ग्रंथपाल येत असत. त्यांना पुस्तके देण्याबरोबरच वेळप्रसंगी जेऊ घालण्याचे कामही डॅडी अत्यंत झपाट्याने सहजपणे करीत. त्यामध्ये आपण या लोकांना सहकार्य करतोय, खूप मोठी मदत करतोय, असा कुठलाही आव आणलेला नसे. आपण पुस्तकांच्या धंद्यात आहोत, माणसाच्या मनाशी आणि बुद्धीशी जोडलेला असा हा व्यवसाय आहे. केवळ पैशाचा धंदा नव्हे, याची प्रचंड जाण मोरेश्वर नांदुरकरांना होती. कुठल्याही मालक आणि नोकर यांच्यामध्ये संबंध बिघडण्याचा हमखास मुद्दा म्हणजे पगार आणि नोकर घेत असलेली उचल. पण माझ्या बाबतीत डॅडी इतके उदार होते, की त्यांनी माझ्याकडे नोकर म्हणून कधी बघितले नाही. मला कायम मुलासारखे वागवले. माझी उचल इतकी झालेली असे की, त्या उचलेची रक्कम माझ्या तीन महिन्यांच्या पगाराइतकी झालेली असे. माझ्या आर्थिक अडचणीचा तो कालखंड इतका विचित्र आणि वाईट होता, की अंगावर इतके पैसे असूनही मला काही वेळा नड येई. मी दुकानात त्यांच्याकडे पैसे मागत असे. सुरुवातीला ते नाही म्हणत, मग रात्री जाताना म्हणत असत, अरे, तू पैसे घेतले नाहीस? बरं, आता उद्या सकाळी घरी ये आणि मला घरी गेल्यावर पैसे देत असत. मालक म्हणून त्यांचा एकमेव हट्ट आणि पराकोटीचा आग्रह असे, तो म्हणजे कर्मचाऱ्याने खाडा करायचा नाही. दांड्या मारणारे कर्मचारी त्यांना मुळीच खपत नसत. मी जेव्हा जेव्हा आजारी पडलो, अर्थात तरुणपणामुळे व माझी तब्येत भक्कम असल्यामुळे असे प्रसंग अत्यंत कमी आले, पण त्या आजारपणाच्या काळातील दवाखान्याची बिले त्यांनी बिनबिभोट भागवली. त्याचे पैसे माझ्या पगारातून कापल्याचे मला तरी आठवत नाही. नांदुरकरांचा हा जिव्हाळा वेगळाच होता. त्याची उदाहरणेदेखील वेगवेगळी आहेत. दुकानातल्या कुठल्या कर्मचाऱ्याच्या घरी लग्न असेल, तर दुकानातले सगळेजण त्या लग्नाला जात असतंच, पण मालक म्हणून नांदुरकरांचे एक वेगळेपण आजही माझ्या लक्षात आहे, ते म्हणजे आपली गाडी ते त्या कर्मचाऱ्याच्या लग्नघरी आवर्जून पाठवत असत. आजच्या 'ओला'-'उबेर'च्या एका फोनवर गाडी येण्याच्या काळात चारचाकी गाडी एका दुकानातील साध्या कर्मचाऱ्याच्या घरी तैनातीला मिळावी, याचे सुख आजच्या तरुणपिढीला लक्षात येणार नाही किंवा त्याचे कितीही वर्णन करून सांगितले, तरी कळणार नाही.

पुस्तकांची निवड, पुस्तकांची विक्री कशी करायची, त्याचबरोबर प्रकाशकांबरोबरचे संबंध कसे राखायचे, त्यांच्या पुस्तकांचे बिल वेळच्या वेळी कसे जाईल, त्यांना दिलेले पोस्ट डेटेड चेक्स परत कसे जाणार नाहीत, बँकेत ऑनर कसे होतील, याकडे त्यांचा कटाक्ष असे. अनेक चांगली पुस्तके त्यांनी लेखकांकडून लिहून घेतली, रमेश मुधोळकरांसारख्या लेखकाला त्यांनी प्रचंड बळ दिले. 'अनमोल पूर्वपरीक्षा', तसेच 'ज्ञानविज्ञान स्वाध्यायमाला' ही त्यांची कल्पना होती. पुस्तक विक्रीसाठी अनेक छोटे-मोठे उपक्रम त्यांनी राबवलेच, पण 'साहित्य-सूची'सारखे साहित्याला वाहिलेले मासिक त्यांनी सुरू केले. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे स्वत: मासिक सुरू करूनही यामध्ये स्वत:बद्दलच्या बातम्या अत्यंत तुरळक असत. पुस्तकाच्या अनुक्रमणिकेच्या पहिल्या पानावर संस्थापक म्हणून त्यांचा जो उल्लेख असे, त्यानंतर अख्ख्या मासिकामध्ये स्वत:बद्दलचं कोडकौतुकाचा लेख किंवा उल्लेख मुळीच नसे. मात्र, मासिकात चांगले काय यायला हवे, याकडे त्यांचे लक्ष होते. वाचक कसा वाढेल, यासाठी त्या काळात त्यांनी वर्षाला १०० रुपये इतक्या अल्प किंमतीत वाचनालयाची योजना राबवली होती. पुस्तक विक्रीसाठी कुठलाही सवंगपणा न आणता त्यांनी अनेक उपक्रम लीलया राबविले. त्याचबरोबर काउंटर सेलला चालतील, अशी विविध पुस्तके नियोजन करून काही लेखकांकडून लिहून घेऊन त्यांनी प्रकाशित केली. अनमोल आणि नरेंद्र प्रकाशनाच्या पायाभरणीचे काम त्यांनी त्या काळात नेटाने, निष्ठा आणि नेमकेपणाने, सहजपणे केले.

डॅडी आणि माझे संबंध जवळचे होते की त्यांनी एक घर खरेदी केले. त्यांच्यासारख्या सज्जन माणसाने ते घर खरेदी करताना सगळी काळजी घेतली होती, पण एकदा दुसऱ्या कुणामुळे तरी प्रॉब्लेम झाला आणि काही जण भांडायला आले, डॅडींवरच्या प्रेमापोटी त्या माणसाच्या अंगावर मी धावून गेलो, शेजारचा पडलेला बांबू त्या माणसाच्या डोक्यात घालायचा प्रयत्न केला, दुसऱ्या माणसाने

मला बाजूला ओढले आणि त्या माणसालाही बाजूला ओढले. तो बांबू दुसऱ्याला लागला, ज्याला लागला तो सहा महिने त्या जखमेचा त्रास सहन करीत होता. खरंतर तो माझा वेडेपणा होता, पण डॅडींवरच्या प्रेमापोटी असा माथेफिरूपणा माझ्याकडून घडला होता. डॅडी रागाच्या प्रसंगातसुद्धा इतके शांत असत. दुकानात त्यांनी कधी चिडचिड केलेली किंवा कोणावरती वसवस केलेली मला आठवत नाही. प्रत्येक गोष्ट ते आधी समजावून सांगत, संधी देत, त्यानंतरही चुका झाल्या, तर चिडत, पण तेही अगदी थोडा वेळा. त्यांचा राग अगदी तात्पुरता असे. समोरच्याला समजावून सांगण्याकडे त्यांचा भर असे. त्यांच्या दुकानात त्यावेळी मी नोकरीला लागलो नसतो, तर घरची शेती करत बसलो असतो. नंतर माझ्यात असलेल्या त्या वेळच्या उतावीळपणामुळे गुंड झालो असतो. चांगली संगत आणि डॅडींचा सहवास यामुळे माझ्या आयुष्यात सारं काही शुभ झालं.

प्रकाशनक्षेत्रात आज वेगवेगळे प्रयोग केले जातात, मात्र विज्ञानयुग मासिकाचे संपादक क्षीरसागर यांनी त्या काळी साहित्यिक डायरीसारखा उपक्रम राबवला होता. वयोमानानुसार त्यांनी त्याचे प्रकाशन थांबवण्याचा निर्णय घेतला. डॅडींनी त्यांच्याकडची सगळी पुस्तके खरेदी केली, त्याचबरोबर त्यांची डायरीदेखील दत्तक घेतल्यासारखी आपल्याकडे घेऊन पुढे काही काळ प्रकाशित केली. काही फायदा नसताना साहित्याची सेवा म्हणून त्यांनी तो उपक्रम राबवला. साहित्याच्या पुस्तकांच्या म्हणजेच प्रसिद्धीच्या झगमगत्या जगात राहूनही प्रकाशात न आलेला असा हा सारस्वत होता. एखाद्या नंदादीपाप्रमाणे त्याने आपले आयुष्य व्यतीत केले. आपल्या प्रकाशाच्या कोणाला झळा बसू दिल्या नाहीत, दिली ती प्रत्येकाला मायेची उब आणि संस्कारांची शिदोरी. त्यांनी दिलेल्या या संचिताची व्याप्ती केवळ व्यवसायातच नाही, तर जीवनातदेखील मार्गदर्शक ठरेल, इतकी मोठी आहे. त्यांनी दिलेला साठा अक्षय असा आहे. फक्त तो साठा कळण्याइतकी रसिकता तुमच्यात हवी. आणि माझं भाग्य असं की, माझ्या तरुणपणाच्या जडणघडणीच्या काळात ही रसिकता त्यांनी कृतीतून माझ्यात रुजवली. त्यामुळेच मी काही यशाच्या पायऱ्या चढू शकलो.

**– राजेंद्र आंबोसे**
भ्रमणध्वनी : ९८२२५१८५१५
shubhamsahitya@yahoo.com

ग्रंथाली

# घातसूत्र

**दीपक करंजीकर**




'घातसूत्र' ही कादंबरी नाही. इतिहास नाही. अर्थशास्त्रीय–राजकीय ग्रंथ नाही. निबंध नाही. प्रबंध नाही. आंतरराष्ट्रीय घडामोडींचे संकलन नाही. तत्त्वज्ञान नाही. आध्यात्मिक प्रवचन नाही वा क्लिष्ट चिंतनाचे तथाकथित निरूपण नाही. सध्याच्या विलक्षण गुंतागुंतीच्या, आर्थिक अरिष्टाच्या, संभाव्य प्रलयसमान भासणाऱ्या आंतरराष्ट्रीय प्रवाहांचा घेतलेला हा वेधक शोध आहे.

**– कुमार केतकर**

**मूल्य ८०० रु. सवलतीत १२० रु.**

# नदिष्ट

**मनोज बोरगावकर**




विषय चाकोरीबाहेरचा आहे. शैली पहिल्या धारेची आहे. थेट कोंडुरा किंवा बनगरवाडीची आठवण करून देणारे लिखाण आहे. 'नदीष्ट' ही मनोज बोरगावकर यांची केवळ कादंबरी नाही, तो आहे त्यांच्या प्रत्यक्षदर्शी आणि अनुभवसिद्ध घटनांचा कसदार ललित गद्य हुंकार. 'नदीष्ट' ही मराठी कादंबरीविश्वातील अकरावी दिशा आहे.

**– विनायक पाटील,** नाशिक

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

## ‘होरपळ ते हिरवळ’




कथाकार प्रा. भास्कर बंगाळे यांचे आत्मकथन हे संघर्षाला बळ देणारे आत्मकथन आहे. हे आत्मकथन म्हणजे समाजाचं अख्या पिढीचं आत्मकथन आहे. या आत्मकथनातून सामाजिक बांधिलकी जोपासली जाते असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक डॉ. द.ता. भोसले यांनी केलं. प्रा. भास्कर बंगाळे यांनी लिहिलेल्या ‘होरपळ ते हिरवळ’ या आत्मकथनाच्या प्रकाशनावेळी डॉ. द.ता. भोसले विचारपीठावरून पंढरपुरात बोलत होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ‘ग्रंथाली’ प्रकाशनाचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर हे उपस्थित होते. विचारपीठावर ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक योगिराज वाघमारे, ज्येष्ठ लेखक डॉ. कृष्णा इंगोले, प्रा. डॉ. रमेश शिंदे, मसाप विभागीय सचिव कल्याणराव शिंदे, जेष्ठ पत्रकार सिद्धार्थ ढवळे, पुण्यनगरीचे भरतकुमार मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी ग्रंथाली प्रकाशनाचे सुदेश हिंगलासपूरकर बोलताना म्हणाले, हे आत्मकथन नव्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरणारे आहे. या पुस्तकातून सामाजिक बांधिलकी जोपासली गेली आहे. नव्या पिढीने हे पुस्तक वाचलं पाहिजे. यावेळी योगीराज वाघमारे, प्रा. डॉ. रमेश शिंदे, भरतकुमार मोरे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मसापचे कल्याणराव शिंदे यांनी केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहित्यिक अंकुश गाजरे यांनी केले तर आभार प्रा. धनाजी चव्हाण यांनी मानले. यावेळी कार्यक्रमासाठी साहित्यक्षेत्रातील मान्यवर साहित्यिक व साहित्यप्रेमी रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ‘लोकयात्री’ पुस्तक युवकांना दिशा देणारे : विवेक घळसासी




केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांची प्रकृती अचानक बिघडल्यामुळे ते सहकार मंत्री सुभाष देशमुख यांच्या जीवनावर, सिद्धहस्त लेखिका सुरेखा शहा यांनी लिहिलेल्या ‘लोकयात्री’ पुस्तक प्रकाशन कार्यक्रमाला, हुतात्मा स्मृती मंदिर येथे येऊ शकले नाहीत. त्यानंतर सहकारमंत्री सुभाष देशमुख यांच्या निवासस्थानी ‘लोकयात्री सुभाष देशमुख’ या पुस्तकाचे औपचारिक प्रकाशन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सहकार मंत्री सुभाष देशमुख, ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी, कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशाभाई पटेल, सांगलीचे खा. संजयकाका पाटील, महापौर शोभा बनशेट्टी, म.सा.प. दक्षिण सोलापूरच्या अध्यक्षा रेणुका महागावकर, शिखर बँकेचे प्रशासकीय सदस्य अविनाश महागावकर, जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले, माजी आमदार सिद्रामप्पा पाटील, म.सा.प.चे कार्यवाह जितेश कुलकर्णी, कार्याध्यक्ष प्रशांत बडवे, माजी पं.स. सदस्य इंद्रजित पवार, मनिष देशमुख, सचिन कल्याणशेट्टी आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी ‘ग्रंथाली’ प्रकाशनचे सुदेश हिंगलासपूरकर, मसाप दक्षिण सोलापूर शाखेचे कार्यवाह जितेश कुलकर्णी, पृधा हलसगीकर उपस्थित होते.

प्रारंभी मसाप दक्षिण सोलापूर शाखेच्या रेणुका महागावकर यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर लेखिका सुरेखा शहा यांनी पुस्तकाविषयी मनोगत व्यक्त करताना लोकयात्री सुभाष देशमुख हे पुस्तक प्रसिद्धी मिळविण्यासाठी लिहिले नसल्याचे स्पष्ट केले. आणि सुभाष देशमुख यांनी निराधारांना दोन वेळचे जेवण, विद्यार्थिनींना शिक्षणाची संधी, ग्रामीण युवकांना रोजगार, दुष्काळग्रस्तांसाठी तलावातील गाळ काढण्याची मोहीम या समाजोपयोगी कार्याने प्रेरित होऊन एका कार्यसिद्धी व्यक्तीची गाथा लिहिण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शोभा बोल्ली यांनी केले तर प्रशांत बडवे यांनी आभार मानले.

**सातवा पुरस्कार...**
**कोल्हापुर जिल्ह्यातील शिवगर्जना फाऊंडेशनचा**
*** राज्यस्तरीय शिवगर्जना बालसाहित्य पुरस्कार ***
**‘सुंदर माझी शाळा’ बालकवितासंग्रहाला जाहीर.**




# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## उजळले स्मृतींचे दिवे

**मुक्ता कणेकर**




**दिव्यत्वाची तिथे प्रचिती**

'पतीची ताबेदारी स्वीकारून स्वातंत्र्य गमवायचे, की तुरुंगवास मान्य करून कायमचा कलंक लावून घेऊन भविष्याचे दरवाजे कायमचे बंद करून घ्यायचे, यापैकी एक निर्णय घ्यायचा होता. पण माझा निर्णय अभंग होता. मी खंबीरपणे दुसरा निर्णय घ्यायचे ठरवले आणि निक्षून सांगितले, की पत्नी म्हणून राहायला जाण्याऐवजी मी शिक्षा भोगायला तयार आहे.' (पृ. क्र. ७१)

'उजळले स्मृतींचे दिवे' हा कर्तृत्ववान अशा पंधरा महिलांचा कर्तृत्व आलेख असलेला चरित्रात्मक लेखसंग्रह आहे. या महिलांच्या एकूण जीवनप्रवासाचा आढावा घेताना त्यांचे वैयक्तिक जीवन, संसार, पती, मुले, सासू-सासरे यांचा परिचय येणे अपरिहार्य आहे. तरीही त्यातून त्या स्त्रीचं स्त्रीपण आणि तिचे ठळकपणे उठून दिसणारे कार्य यावर अधिक भर दिलेला आहे. त्यामुळे 'ती' एका लहानशा लेखातही खूप मोठे संचित समोर मांडले गेलेले आहे. मुळातच या कर्तृत्ववान तेजस्विनींच्या नावांची यादी पाहिली तर लक्षात येईल की त्या काळातल्या खरोखरच या तपस्वी महिला किती थोर होत्या. त्यांचे कार्य किती मोठे होते. एकाच वाक्यात सांगायचे तर अंधारलेल्या वाटेवर दिवे लावण्याचे, वाट उजळण्याचे काम कुणी केले असेल तर ते या महिलांनी केले आहे. त्यामुळेच या संग्रहाला दिलेले शीर्षक अतिशय चपखल ठरते.

सौ. सावित्रीबाई फुले (१८३१-१८९७) स्त्री शिक्षण आणि समाजकार्यात पुढे आलेल्या या पहिल्या महिला. जोतिरावांच्या पावलांवर पाऊल टाकताना चिखलफेक सहन केलीच, पण धीराने धडाही शिकवला. शिक्षिकाही त्याच आणि मुख्याध्यापिकाही त्याच. शाळा सुरू केली तेव्हा फक्त सहा मुली होत्या. स्त्रीशिक्षणाचे दार उघडले गेले आणि एक मोठा रस्ता तयार झाला. त्यांच्याविषयी प्रा. गं.बा. सरदार लिहितात, 'चूल व मूल यात गुंतून न पडता, घराचा उंबरठा ओलांडणारी व सामाजिक कार्यात भाग घेणारी पहिली स्त्री म्हणजे सावित्रीबाई होय.

रमाबाई रानडे (१८५८-१९२२) वयाच्या बाराव्या वर्षी संस्कृतचे बारा हजार श्लोक पाठ होते. बाबा वारले तेव्हा त्यांना उचलण्यासाठी तिरडीचा दांडा डोक्यावर घेऊन चालायला लागली. अवघ्या दीड वर्षात संसार मोडला, वैधव्य आले. अमेरिकेत शिक्षण घेऊन विधवा व अनाथ स्त्रियांची सेवा हेच जीवनध्येय ठेवले. मुंबईत बालविधवांसाठी 'शारदासदन' ही शाळा सुरू केली. धर्मनिरपेक्षाची अट काढून ख्रिस्ती स्त्रियांसाठी 'मुक्तीसदन', 'पतित स्त्रियांसाठी कृपासदन', वृद्ध अशक्त स्त्रियांसाठी 'प्रीतिसदन' सुरू केले. हे त्यांचे कार्य. ख्रिस्तीधर्म स्वीकारला परंतु जगणे स्वत:च्या इच्छेप्रमाणेच ठेवले.

सौ. आनंदीबाई कर्वे (१८६४-१९५०) वयाच्या आठव्या वर्षी लग्न आणि अवघ्या तीन महिन्यात वैधव्य! वयाच्या चोविसाव्या वर्षी पंडिता रमाबाईच्या शारदासदनमध्ये आलेली पहिली विद्यार्थिनी. वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी कर्व्यांशी पुनर्विवाह. परंतु या पुनर्विवाहामुळे सर्वांनाच 'वाळीत-बहिष्काराचा' सामना करावा लागला. परंतु सर्व उपेक्षा सहन करून, कर्व्यांच्या आश्रमाच्या कामात मोलाची साथ दिली.

डॉ. रखुमाबाई राऊत (१८६४-१९५५) कुटुंबव्यवस्था, बालविवाह, स्त्रीस्वातंत्र्य यासाठी जो प्रदीर्घ लढा दिला तो थक्क करणारा आहे. बालविवाहाच्या दुष्परिणामाला वाचा फुटली ती या लढ्यामुळे. डॉक्टर झाल्यानंतर त्यांनी ज्या पद्धतीने दवाखान्यातील सेवा दिल्या, त्यावरून त्याची ओळख रखमाबाईंचे हॉस्पिटल अशी झाली.

डॉ. आनंदीबाई जोशी, ताराबाई शिंदे, काशीबाई कानिटकर, रमाबाई रानडे, पार्वतीबाई आठवले, अवंतिकाबाई गोखले, जनाक्का शिंदे, काशीबाई हेर्लेकर, ताराबाई मोडक, कमलाबाई हॉस्पेट, अनुताई वाघ यांचीही माहिती या पुस्तकात आहे. त्याकाळी होत असलेले बालविवाह, पुरुषांची मोठी वये, कर्मठपणा, स्त्री शिक्षणाचा अभाव, अस्पृश्यास्पृश्यता, अज्ञान यातून चिकाटीने उभ्या राहिलेल्या या स्त्रिया आहेत. प्रत्येकीचा जीवनकाळ दिलेला आहे. तो एकोणिसाव्या शतकापासून सुरू झालेला आहे. त्यावरून त्या काळाचे चित्र समोर येते.

लेखिकेने या लेखनाला एक संवादी स्वरूप दिलेले आहे. सुरुवातीला लहानशी ओळख. त्यानंतर ती व्यक्तिरेखा स्वत:च्या जीवनप्रवासाविषयी सांगत जाते. त्यामुळे थेट वाचकाशी संवाद साधला जातो आणि मोठा आवाका, मोजक्या व नेटकेपणाने सादर होतो. मुक्ता कणेकर या स्वत: सिद्धहस्त लेखिका आहेत. विविध स्वरूपाचे लेखन त्यांनी केलेले आहे. त्यांच्या प्रकाशित साहित्याचा आलेख मोठा आहे. त्यांच्या लेखनातला सहजपणा, त्यातले वैविध्य, इतर मान्यवरांचे शैलीदार संदर्भ यामुळे 'उजळले स्मृतींचे दिवे' हे पुस्तक केवळ भावत नाही तर ते संग्रही ठेवायला हवे, असे संग्राह्य झालेले आहे. डॉ. विजया वाड यांनी प्रस्तावना लिहून या पुस्तकाचे कौतुक केले आहे. अनिल दाभाडे यांनी मुखपृष्ठावर दिवे आणि फोटो यांची सुंदर आरास केली आहे.

**मूल्य २५० रु.   सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

**मन:पूर्वक**
**डॉ. वसुधा सरदेसाई**




**गाभाऱ्यातील स्वपडसाद**

कवी कविता का लिहितो? कवीलाही या प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात नाही सांगता येत. मात्र त्याला जोडून काही सांगता येते. डॉ. वसुधा सरदेसाई त्यांच्या मनोगतात अशाच तऱ्हेने व्यक्त होतात. माझ्यासाठी कवितानिर्मिती हा माझ्या अंतर्मनाचा हुंकार आहे. आयुष्यात आपण बरेचदा दोन भिन्न पातळ्यांवर जगत असतो. एक आपली बाह्यात्कारी व्यवहारी चाकोरी, तर एक आपल्या मनातली आपली अशी स्वतंत्र जाणीव. बाहेर कितीही कोलाहल असला तरी माझ्या मनात व्हायोलीनचे सूर उमटत असतात. कधी कधी अनुभवच असे असतात की ते अंतर्मन ढवळून टाकतात. या सगळ्यातून शब्दांच्या धारा बरसू लागतात. गाणे आणि त्याची लय याचा मला लळा आहे. आणि त्या लयीतून निर्माण होत राहते नादमधुर कविता. (पृ. क्र. अकरा)

'प्रेम' या शब्दात असलेली भावना आणि संवेदना ही वयाच्या टप्प्याटप्प्यानुसार वृद्धिंगत, संमजस आणि प्रगल्भ होत जाते. या शब्दाशी फारकत घेतलेला कवी सहसा सापडत नाही किंबहुना प्रेम या शब्दातच कवितेचा अंकुर विसावलेला असतो. त्याचे उमलणे, बहरणे, फुलणे या अवस्थांची वर्णने, त्याची आस, आकर्षण, ओढ, विरह, अलवारपणा यांनी बंदिस्त केलेल्या मनाची तरलता, अस्वस्थता, हुरहुर, हळवेपणा अशा अनेक अवस्थांची स्थळे कवितेतून हमखास आढळतात. 'चंद्र माझाच माझाच', 'सय', 'नादात मी', 'मोहोर', 'छे! कुठे काय घडलं?' यासारख्या या संग्रहातील कविता प्रेमभावना व्यक्त करतात. त्यांच्यातले नेमकेपण खूप हळवेपणाने टिपलेले दिसून येते.

'माझ्या आंब्याच्या झाडाला आला आला गं मोहोर
असे डवरून आले जशी न्हाती झाली पोर (पृ. क्र. ६)

रूपकाची कल्पना इतकी सुंदरतेने व्यक्त होते, तेव्हा क्षणभर वाचक म्हणून आपण तिथेच थबकतो. कविता जशी जशी उमलत जाते फुटून आलेल्या मोहोरासारखी, तसा त्या कवितेचा आनंद आपल्या मनाला फुलवीत जातो. अशा वेळी खूप काही घडून जाते, तरीही वाटत राहते, छे! कुठे काय घडले, हे सारे वाऱ्याच्या झुळुकीसारखे असते. मनातलं गुपित व्यक्त न करताही कळत जाते. त्यातून निर्मिती होते ती चित्रांच्या भाषेची, ती न बोलताही मूकपणे खूप काही बोलत राहते. ती आपल्याच नादात रमते. हे जोडले आहे वयाशी. कवयित्री ही भावना व्यक्त करताना सहजपणे सांगून जाते, 'हा वयाचाच गं दोष। उगा नको मजवरी रोष'.

असे असूनही लक्षात येते, सारेच काही व्यक्त करता येत नाही. साऱ्याच कविता शब्दात बांधता येत नाही. हृदयातल्या झंकारासाठी कुठला रंग दाखवायचा? हो इतके मात्र सांगता येते, शोधासाठी रानावनात जाण्याची आवश्यकता नाही. मी तुझ्याच मनात एकरूप आहे. तर कधी अशी वेळ येते, आपण परकेच राहिलो. आता सवय करायला हवी तुझ्याशिवाय आयुष्याची.

मग एका टप्प्यावर उभे असताना लक्षात येते. आपल्या आयुष्याचा हिशोब काय? आपले निम्मे आयुष्यतर असेच गोंधळात गेले, व्यवहाराच्या पातळीवर आल्यानंतर माणसांविषयी, व्यवहाराविषयी कळायला लागले. जे जगून झाले त्यात किती हाती आले, असा प्रश्न येतो तेव्हा लक्षात येते. फारच थोडे असे सार्थकी लागलेले आयुष्य हाती आले. त्याला कारणेही शोधण्याचा प्रयत्न करताना सापडते, जगणे सोपे नसते, त्याला वाहून नेणारे रस्ते सरळ नसतात, कुठे घेऊन जाणार आहे ते ठाऊक नसते. तरीही जगण्याला बळ द्यायचे असेल तर स्वत:वरचा विश्वास दृढ ठेवायला हवा. ओठांवर ताबा आणि आसवांवर नियंत्रण ठेवायचे. अस्तित्वाचा कस लावत, आव्हान पेलीत सर्व संकटावर मात करीत पुढेच चालत राहायचं.

या 'मन:पूर्वक' कवितासंग्रहाला एका आलेखाचे स्वरूप आहे. माणूस याच्या केंद्रस्थानी आहे. त्याच्या जगण्याच्या, भावना-संवेदना-व्यवहाराच्या, प्रेमाच्या पातळ्यांचा हा आलेख कवयित्रीने चित्रित केलेला आहे. हे चित्रित करणे खूप मोकळेपणाने सभोवताल समोर ठेवून साधलेले आहे. त्यामुळे सहजपणे आपण त्याचे टप्पे आणि त्यातला आशय आपल्या जगण्याशी, आयुष्याशी जुळवून पाहू शकतो. नव्हे जणू तो आलेख आपला आहे असेच वाटत राहते. आपल्याच मनातला हुंकार इथे व्यक्त झाला असा अनुभव येत राहतो. कवयित्री या डॉक्टर आहेत. सतत व्यग्र राहणे त्यामुळे आलेच परंतु त्याही परिस्थितीत त्यांचे कवीमन सतत जागृत आहे. त्यांच्या कवितेला गेयता आहे. नादमधुरता आहे. छंदात बांधण्याचा प्रयत्न आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे ही कविता जड, बोजडपणा घेऊन येत नाही. जगण्यातले प्रवाहीपण टिपत येते, त्यातले संदर्भ शोधत येते. जगण्याच्या सोबतीला सकारात्मकता आहे. एक आश्वासक असा हुंकार असे या कवितासंग्रहाचे वर्णन करता येईल. आश्लेषा महाजन यांची प्रस्तावना वाचल्यानंतर लक्षात येते, कवी आणि कविता यांच्याकडे पाहताना जाणिवा आणि भान कसे जागृत असावे. सुभाष कुलकर्णी यांनी मुखपृष्ठ खूप मनापासून सजविलेले आहे.

**मूल्य १०० रु.   सवलतीत ६० रु.**




# ग्रंथपान

**संगणकक्षेत्रातले काही प्रज्वलित दिवे**
**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**




**प्रेरक इथे नांदतात**

'पैसा ही यशाची एक मोजपट्टी समजतात. ते ध्येयपूर्तीचं लक्षण असू शकत नाही. पैशापेक्षा ध्येय मोठं असू शकतं. म्हणून या संस्थापकांजवळ जन्मभर ऐश्वर्य भोगण्याएवढे पैसे असूनही ते रोज कामाला जातात. त्याचं उद्दिष्ट मानवी जीवन बदलून त्यावर कायमची छाप पाडणे हे आहे, त्यातूनच त्यांना खरा आनंद मिळतो. तो पैशाच्या तराजूनं मोजता येत नाही.' (पृ. क्र. १०९)

जिद्द व ध्यास यांच्या चिकाटीने अशक्य वाटणाऱ्या कल्पना वास्तवात आलेल्या पाहायला मिळतात. ते भाग्य ज्यांच्या वाट्याला आले ते सर्वजण आज जगभर आपल्या यशाच्या जोरावर, कीर्तीच्या शिखरावर विराजमान झालेले आहेत. आपली बुद्धिमत्ता, कौशल्याच्या जोडीला परिश्रमाची अजोड तयारी यामुळे या व्यक्तींनी संशोधनाच्या क्षेत्रात इतिहास घडविलेला आहे, असे इतिहास घडविणारे आपल्या पिढीतले, आजच्या घडीला कार्यरत असणारे आणि ज्यांच्या यशाने आश्चर्याने सगळ्यांना स्तिमित करणारे आपण आजही त्यांच्या संशोधनाच्या पडद्यावर पाहतो आहोत. विविध क्षेत्रात असे अनेक दिग्गज आहेत, ज्यांचा इतिहास स्वतंत्रपणे लिहिला गेला आहे. या विविध क्षेत्रांपैकी एक क्षेत्र आहे, ज्याने जीवनाच्या साऱ्या टप्प्यांना आपल्या कवेत घेतले आहे, ते क्षेत्र म्हणजे संगणक! संगणक म्हटला की जी नावे समोर येतात ती अशी– बिल गेट्स, स्टिव्ह जॉब्ज, जेफ बेझोस, मार्क झकरबर्ग, लॅरी पेज व सर्गे ब्रिन, सुंदरराज पिचाय, सत्या नाडेला. जसं महाभारत आठवलं की धर्म, भीम, अर्जुन, कर्ण, दुर्योधन, कृष्ण ही नावे पटकन नजरेसमोर उभी राहतात, तशी वरील नावे ही संगणकाच्या क्रांतीशी जोडली गेलेली आहेत. त्यांच्या जोडीला आहेत ट्रॅव्हिस कालनिक, ज्याने 'उबर' या नावाने परिवहन क्षेत्रात वेगळीच क्रांती करून सुखवस्तू माणसाचे जीवन आणखी सुखावह केले. तर शेवटचा आहे जॅक मा जो ॲमेझॉनसारखाच स्वतंत्र ध्रुवावर उभा आहे. अशा या नऊ व्यक्ती आहेत, त्यांना संस्थापक, जनक, संशोधक, संशोधनातले क्रांतिकारक, अब्जाधीश अशी कुठलीही बिरुदावली लावली तरी ती थिटी वाटावी, इतके त्यांचे कार्य–कर्तृत्व प्रचंड मोठे, अत्यंत वेगळे आणि काळाच्या पडद्यावर कायम कोरले गेलेले आहे. त्याच्याविषयीचा आढावा थोडक्यात, मोजक्या व नेटक्या पद्धतीने या पुस्तकात घेतलेला आहे. खूप मोठा कॅनव्हास असलेल्या विषयाला गवसणी घालून वाचकांच्या सोयीसाठी केलेला हा प्रयत्न स्तुत्यच म्हणावा लागेल!

खरंतर या पुस्तकाचे लेखक डॉ. अनंत लाभसेटवार हे व्यक्तिमत्त्व सुद्धा कर्तृत्वाने वरील इतर कुठल्याही व्यक्तींपेक्षा कमी आहे असं म्हणता येणार नाही. एक मराठी माणूस अमेरिकेत स्वत:ची बँक विकत घेऊन चौदा वर्षे तिचे चेअरमन ऑफ दि बोर्ड हे पद भूषवितो आणि आपल्या उद्योगजगतात कुशल उद्यमशीलता दाखवितो. जननशास्त्रात संशोधनात्मक असे शंभराहून अधिक शोधनिबंध सादर करून आंतरराष्ट्रीय मान्यता मिळवितो. याच वैद्यकीय क्षेत्राला आणि साहित्यिक गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी 'लाभसेटवार फाऊंडेशन'ची स्थापना करून दरवर्षी लाख रुपयांची प्रत्येकी पारितोषिके देऊन गौरव करतो. आणि स्वत: लेखक म्हणून जी झेप घेतो तीही आश्चर्यचकित करणारी बाब आहे. कादंबरी, कथासंग्रह, प्रवासानुभव, चरित्र, लेखसंग्रह, संपादन अशी त्यांची सुमारे तीस पुस्तके प्रकाशित आहे. साहित्याच्या या विविध अंगांचा त्यांचा व्यासंग थक्क करणारा आहे. त्यांचे लेखन वाचणे हा एक आनंददायी अनुभव असतो. त्यांच्या लेखनात असलेला व्यापकपणा, दूरदृष्टी, संदर्भ आणि लेखनातली सहजता, तिच्यातला प्रवाहीपणा, वाचकाला खिळवून ठेवण्याची ताकद, हे सारे सारे अनुभवाला येते. जगण्यातला उल्लेखनीय भाग ते जितका समर्पकपणे नोंदवतात तितकाच अपयशाचाही शोध घेतात. लेखनात सुटसुटीतपणा हवा, वाचकाला नेमकेपणाने आशय सादर व्हावा हा कटाक्ष ते आवर्जून पाळतात. विषय इंग्रजीशी संबंधित असू दे वा आंतरराष्ट्रीय. चपखल आणि नावीन्यपूर्ण मराठी शब्द योजण्यातील कल्पकता त्यांच्याइतकी खचितच कुणाला अवगत असावी.

संगणकक्षेत्रातले शोध, त्यांची मंत्रणालेखन आणि यंत्रणानिर्मिती हा महत्त्वाचा भाग आहे. बिल गेट्स यांचा पितामह. मायक्रोसॉफ्ट ही त्याची निर्मिती. तिच्यासाठी त्याने दाखविलेले कर्तृत्व, त्यांची संपत्ती, घर, स्वभाव, लग्न असा सर्वांगीण आढावा त्यांनी घेतला आहे. ॲपल, आयफोनचा स्टिव्ह जॉब्ज याचीही माहिती अशीच सुटसुटीत दिलेली आहे. आयफोनचे फायदे आज कुणाला सांगण्याची गरज उरलेली नाही. परंतु याचा निर्माता हा क्षणिक सुखाचं सांडपाणी म्हणून जन्माला आलेला होता. ते शल्य त्याने आयुष्यभर जपले. विशेष म्हणजे त्याने भारतात येऊन बौद्धधर्म स्वीकारला होता, ही माहिती वेगळीच. ॲमेझॉनने आज प्रत्येक वस्तू विकत घेऊन ग्राहकाला त्याच्या आज्ञेप्रमाणे घरपोच पाठविण्याची व्यवस्था निर्माण केली. सुरुवातीला हा जेफ बेझोस फक्त पुस्तके विकण्याचा व्यवसाय करीत असे. फेसबुकमुळे सर्वांना परिचित झालेला झकरबर्ग वयाच्या विसाव्या वर्षी मोठा उद्योजक ठरला होता. गूगल हा शब्द गूगॉल या शब्दावरून आला. गुगॉल म्हणजे एकावर शंभर शून्य! गूगलच्या लॅरी पेजने सुंदर पिचायला गूगलचा व्यवस्थापकीय संचालक म्हणून नेमले आहे, तर सत्या नडेला हा मायक्रोसॉफ्टचा मुख्याधिकारी आहे.


अमेरिकेतील संगणक व्हॅलीचे वर्णन करताना लेखक एक मार्मिक टोला देतात, तिथे असणारे भारतीय हे भारतीय ज्ञानसमृद्धीच्या जोरावर नक्कीच नोकरी करीत नाहीत. या पुस्तकाला दोन उल्लेखनीय बाबी लाभलेल्या आहेत. लेखकाची प्रस्तावना आणि सतीश भावसारांचे मुखपृष्ठ!

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

**होरपळ ते हिरवळ**

**प्रा. भास्कर बंगाळे**



**जिद्द ज्याच्या मनी, सिद्धीचा तो धनी**

संस्थेत एकूण तेहेतीस वर्षे सेवा केली. केवळ पगार घेतो म्हणून ठरावीक तास काम न करता नैतिकतेच्या दृष्टीने कामात झोकून देऊन संस्थेच्या अस्तित्वाची, सुरक्षिततेची व प्रतिष्ठेची काळजी घेण्याच्या भावनेने सामाजिक ऋण फेडण्याच्या भावनेने काम करत गेलो. कितीही कष्ट पडले, बदल्या झाल्या, अडचणी आल्या, हाल सोसावे लागले तरी तो आपल्या सेवेचा व जगण्याचा अविभाज्य घटक आहे, असे समजून काम केले. माझ्या सेवेत मी आनंदी आणि समाधानी आहे. सुख, शांती, समाधान हे आपल्या मनावर असते. रडत-रडत, कुढत-कुढत जगण्यापेक्षा हसत-हसत, गीत गात जगावं, जीवनाला अर्थ प्राप्त होतो तो त्यामुळेच! (पृ. क्र. २६२)

मागासवर्गीय समाजात जन्म घेणे म्हणजे शाप, आणि त्याच्यावर हक्क गाजविण्याचे सवर्णांना मिळालेले वरदान, ती आपल्या भारत देशाची प्रतिमा. तिला कितीही दोष दिला, उखडून फेकण्याचे प्रयत्न केले, तरीही ही युगानुयुगे रुतून बसलेली मुळे अजूनही आपले पाश घट्ट धरून आहे. त्यामुळे ग्रामीण भागातले हे दाहक पिळ ज्यांच्या वाटेला आले, त्यांनी जे भोगले, त्याचे वर्णन करणे शब्दांना अशक्य ठरावे. असे भीषण वास्तव 'बलुतं'पासून साहित्य प्रवाहात आले आणि त्या वास्तवाला खऱ्या अर्थाने वाचा फुटली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखविलेल्या मार्गावरचे चालणे आताशी कुठे सुकर होताना दिसू लागले. त्यांनी दिलेल्या संदेशाला सकारात्मकतेची फळे लागलेली दिसू लागली. अन्यथा होती ती भीषण दाहकता, प्रचंड होरपळ. त्या होरपळीतून ज्यांनी आपली जीवनबाग वाचवली, मनात जिद्द धरली, डॉ. बाबासाहेबांचा संदेश आचरणात आणून बुद्धीमत्तेच्या जोरावर प्रचंड मेहनत, अंगमेहनतीने परंपरेने आलेले वास्तव खडकासारखे फोडले तेव्हा कुठे हिरवळीचे कोंब वाट्याला आले. अशा ज्यांनी ज्यांनी हा पैलतीर गाठून हिरवळीला जवळ केले, त्यात एक नाव आहे, प्रा. भास्कर बंगाळे यांचे. ते एकटेच नाहीत, त्यांचे चौघा भावंडांचे कुटुंब माळरानातून हिरव्यागार हिरवळीपर्यंत पोहोचले आहेत. त्याचेच चित्रण म्हणजे 'होरपळ ते हिरवळ.'

प्रा. भास्कर बंगाळे यांचे जन्मगाव अजनसोंड पंढरपूर तीर्थक्षेत्रापासून सहा-सात किलोमीटर अंतरावर वसलेलं गाव. निसर्गसौंदर्याने नटलेले गाव. विषमतेची, जातीयतेची बिजे त्याही गावी या सौंदर्यात धोत्र्याच्या बियासारखी होतीच. तिथून झालेला प्रवास आज पंढरपूर येथे विसावला आहे. म्हटले तर अंतर सहा-सात किलोमीटरचे म्हटले तर दोन पिढ्यांचे. उणेपुरे साठ वर्षांचे. काय काय घडले नाही या जीवन प्रवासात? काय काय सहन करावे लागले, कसा कसा सहन केला प्रत्येक वळणावरचा प्रवास, त्याचे चित्रण अतिशय संयमितपणे लेखकाने चितारले आहे. घरचे अठराविश्वं दारिद्र्यं, अंगमेहनतीला कुठलाही पर्याय नाही, अशा परिस्थितीत आई-बाबा राहतात. तरीही मुलांचे शिक्षण व्हावे याची जिद्द ते सोडीत नाहीत. पोटाला चिमटा काढून शिक्षणाचा ध्यास कायम ठेवतात. त्या मातापित्यांचा दिसत असलेला ध्यास, मेहनत, वास्तव याचे भान लेखकही कायम उराशी बाळगतो. कधी उपाशी कधी अर्धपोटी राहून शिष्यवृत्तीच्या जोरावर आपलं शिक्षणाचं ध्येय पूर्ण करतो, हा सारा प्रवास अचंबित करणारा आहे तसा आतड्यांना पीळ पाडणारा आहे. प्राध्यापक होण्यासाठी केवळ एमए, बीएड असून चालत नाही, एमएला दुसऱ्या वर्गात उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तो वर्ग मिळवण्यासाठी लेखक पुन्हा त्याची तयारी करून तो वर्ग मिळवतात. आपलं स्वप्न पूर्ण करतात. त्यांची ही मेहनत पाहताना त्यांना सलाम करावासा वाटतो. ते केवळ शिक्षक होत नाहीत, आदर्श शिक्षक ठरतात. ते केवळ मुख्याध्यापक होत नाहीत, गावकरी-पालकच त्यांना त्यांच्या गावी कायम ठेवण्याची मागणी करतात, यातंच सारं आलं. ते ज्या-ज्या ठिकाणी गेले, तिथे त्यांनी स्वतःचा ठसा उमटवला. शाळेत पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती, ही 'नाही' नावाची गोष्ट लेखकाने आपल्या सहकाऱ्यांसह गावातून, मिळेल ती वर्गणी मिळवून पुसून टाकली. जे जे करणे शक्य आहे ते सारे केले. म्हणूनच ते स्वतः समाधानी असल्याचे नमूद करीत आहेत.

प्रा. भास्कर बंगाळे हे स्वतः समाधानी असल्याचे नमूद करीत आहेत. विद्यार्थ्यांना काय हवे, त्यांना कसे शिकवले म्हणजे ते यशस्वी होतील, हे उत्तम शिक्षकच सांगू शकतो. तसे वाचकाला काय हवे, आपले लेखन कसे केले म्हणजे ते वाचकाच्या पसंतीला उतरेल, याची उत्तम जाण त्यांना आहे. सदरच्या या आत्मचरित्रात त्यांनी ते भान जपलेले आहे. आपले आई, बाबा, भाऊ, पत्नी, परिसर, शाळा, समाज, पंढरपूर या सगळ्यांची माहिती देताना त्यांना स्वतंत्र असे वेगळेपण दिलेले आहे. प्रकरणांसारखी विभागणी केल्याने त्या लेखनाला उठावदारपणा लाभलेला आहे. लेखनाची, कथाकथनाची आवड तर आहेच. परंतु ती केवळ हौसेपोटी नाही तर त्यासाठी त्यांना साहित्य पुरस्कार लाभलेला आहे. नम्र, साधेपण टिकवून असलेल्या प्रा. भास्कर बंगाळे यांचं हे आत्मचरित्र त्याच परंपरेतील आपले स्थान सिद्ध करील असा विश्वास वाटतो.

पंढरपूर आणि जीवनातले माळरान या पार्श्वभूमीवर चितारलेले मुखपृष्ठ सतीश भावसारांच्या कल्पकतेची साक्ष देते, आशयाचा नेमका गाभा पकडते.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

## संजय कृष्णाजी पाटील लिखित पाच पुस्तके




मूल्य ३०० रुपये

### आभाळ झेलण्याचे दिवस

ललित लेख, समीक्षा, लघु तसेच दीर्घ कथा अशा एकाच वेळी तीन वाङ्मयप्रकारांना कवेत घेऊन पाहणारा संग्रह. विविधस्पर्शी अनुभव तसेच नागर-अनागर संवेदनांची अभिव्यक्ती साकारणारे चतुरस्त्र लेखन.

### दशक्रियेची चित्रकथा (साकेत प्रकाशन)

साहित्यकृतींवर चार सातत्यपूर्ण चित्रपट लिहिणाऱ्या, राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या पटकथाकारांच्या पटकथा तसेच लेखनाचा अभ्यास करणाऱ्या जिज्ञासूंना अभ्यासासाठी उपयुक्त ठरेल अशा 'कादंबरी ते चित्रपट' या प्रवासाची वाटचाल दृगोच्चर करणारी साहित्यकृती.




मूल्य १८० रुपये

### शून्य प्रहर (एकांकिकासंग्रह)

आत्ताच्या स्पर्धेत देखण्या एकांकिका होतात किंवा व्हिज्युअल्सचा मारा असतो. बऱ्याच एकांकिका ह्या एपिसोडीक एकांकिका असतात. अशा वेळी वाचनीय व आशयघन असलेल्या एकांकिका पाहायला मिळणं दुर्मिळच. या साऱ्या आजच्या एकांकिकांना छेद देत पूर्णपणे वाचिक अभिनयाचा कस लागेल अशा व दिग्दर्शकाला आव्हान देणाऱ्या एकांकिकांचा संग्रह.




मूल्य १२५ रुपये




मूल्य २०० रुपये


### हरवलेल्या कवितांची वही (कवितासंग्रह)

भाषेवरील हुकूमत आणि तल्लख हजरजबाब देणारी बुद्धिमत्ता, बेगुमान अविर्भाव, सडेतोडपणा, नागवल्या जाणाऱ्यांबद्दलची कणव आणि लुबाडणाऱ्यांबद्दलचा संताप, शासकीय निगरगट्टपणा या विषयीची कडवट चीड टोकदारपणे व्यक्त करीत समकालीन वास्तव मांडणारा रसरशीत कवितासंग्रह.

### लेझीम खेळणारी पोरं (कवितासंग्रह-दुसरी आवृत्ती)

मानवीमनाचे एकाकीपण-अगतिकता, मृत्यूचे तांडव-बेपर्वाई, प्रचंड वैभव-शरीरविक्रय, अपत्य-संसारप्रेम आणि विदारक क्रौर्य या सगळ्याला साद घालून वास्तव, बीभत्स आणि सर्व रसात्मकतेला शब्दबद्ध करणारी, महाराष्ट्राच्या पीळदार मातीची आणि भारताच्या धर्मनिरपेक्ष रीतीची, आधुनिकच नव्हे तर अत्याधुनिक अशी अनोखी कविता.

पाच पुस्तकांचा संच
सवलतीत ५०० रुपये
टपालखर्च ६० रुपये





मूल्य १५० रुपये




## माध्यमरंग – रविराज गंधे

आज प्रसारमाध्यमं आणि समाजमाध्यमं ही सर्वसामान्याच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. प्रत्येक माणूस हा देखील माध्यमकर्मी झाला आहे. गरज आहे ती माध्यमकर्मींमध्ये सकारात्मक दृष्टिकोन विकसित होण्याची! माध्यमविषयक जाणिवा प्रगल्भ करणारं आणि तंत्र-कौशल्याचं माहिती देणारं आगळं-वेगळं पुस्तक माध्यमरंग!


**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**




## परिमळामाजि कस्तुरी – डॉ. सिसिलिया कार्व्हालो

या पुस्तकात विविध भाषांतील साहित्य, चित्रपट यामधील संदर्भ, यामुळे सकारात्मकता, सांस्कृतिक एकात्मता आणि माणसाचे 'माणूसपण' अधोरेखित करणे सुलभ झाले. हे संदर्भ लेखिकेला कस्तुरीसारखेच वाटतात. जीवनाचं तत्त्वज्ञान, सार त्यात सामावलेलं असतं... कस्तुरीच्या अवगुंठनात ते मांडता आलं.

**मूल्य १२५ रुपये सवलतीत ७५ रुपये**




## नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१८ – सुधीर थत्ते-नंदिनी थत्ते

नोबेल पुरस्कार विजेत्या शोधांची गोष्टीरूपाने यथार्थ वैज्ञानिक माहिती देणारा तेवीस वर्षे चाललेला जगातला एकमेव उपक्रम.

**मूल्य ८० रुपये सवलतीत ५० रुपये**




## दूरस्थाचा पसारा – डॉ. दीपक पवार

डॉ. दीपक पवार यांचा हा पहिला कवितासंग्रह आहे. १९९२ सालापासून अलीकडेपर्यंत लिहिलेल्या कविता या संग्रहात आहेत. त्यातल्या काही व्यक्तिगत वाटाव्यात अशा आहे तर काही सामाजिक-राजकीय आशय व्यक्त करणाऱ्या आहेत. अभंग आणि एखाद-दुसरी कविता वगळली तर बहुतांश कविता मुक्तछंदातल्या आहेत.

**मूल्य १२५ रुपये सवलतीत ७५ रुपये**

## लेखक तुमच्या भेटीला या उपक्रमातील क्षणचित्रे
















सुरेखा शहा लिखित 'लोकयात्री सुभाष देशमुख' या पुस्तकप्रकाशनसमयी माननीय केंद्रिय रस्ते वाहतूक आणि दळणवळण मंत्री नितीनजी गडकरी, सहकार मंत्री सुभाष देशमुख, ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी, कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशाभाई पटेल, सांगलीचे खा. संजयकाका पाटील, महापौर शोभा बनशेट्टी, म.सा.प. दक्षिण सोलापूरच्या अध्यक्षा रेणुका महागावकर, शिखर बँकेचे प्रशासकीय सदस्य अविनाश महागावकर, जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले, माजी आमदार सिद्रामप्पा पाटील, म.सा.प.चे कार्यवाह जितेश कुलकर्णी, कार्याध्यक्ष प्रशांत बडवे, माजी पं.स. सदस्य इंद्रजित पवार, मनिष देशमुख, सचिन कल्याणशेट्टी आदी मान्यवर.

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/ 2019-2021
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.